# महाभारत

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे

## खंड३ : आदिपर्व ३



# महाभारत

## खंड ३रा : आदिपर्व

अशोक कोठारे

ई साहित्य प्रतिष्ठान

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवायी होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्याप्पु र्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० एप्रिल २०१८**

## - अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याचवेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना मुद्दाम प्राचीन (Archaic) भाषा वापरतात परंतु माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत पंचवीस खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यात मूळ आदिपर्वाचे पांच खंड केले आहेत, त्यातील हा तिसरा खंड आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच

मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील  गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, अशोक सम्राटाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहे म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल – ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते ___

## - महाभागत आदिपर्व खंड तिसरा प्रारंभ -

### आदिपर्व भाग एकशे एकावा

(संभव पर्व पुढे चालू)

अहो राजा जनमेजया, लग्नविधी उरकल्यावर शंतनु आपली लावण्यवती पत्नी गंधवतीला घेऊन नव्या संसाराला प्रारंभ करतो. लवकरच त्यांना बुद्धीमान मुलगा होतो त्याचे नांव चित्रंगद असते. त्यानंतर त्या जोडप्याला आणखीन एक पुत्र होतो त्याचे नांव असते विचित्रवीर्य. तो मोठा होतो तसा शंतनुसारखाच उत्तम तिरंदाज व महारथी होतो. शंतनु समजतो किं, त्याची जग सोडण्याची वेळ झाली आहे. शंतनुच्या जाण्यानंतर सत्यवतीच्या आदेशाने भिष्म चित्रंगदाला गादीवर राज्यकारभार करण्यासाठी बसवतो. लवकरच तो त्याच्या राज्याच्या शत्रूंना पराभूत करतो व राज्यसत्ता मजबूत करतो. चित्रंगदाने मानवी शत्रू, असुर व देवांना हरवले होते अशा परिस्थितीत गंधर्व राजा त्याला आव्हान देतो. कुरुक्षेत्री ते युद्ध होते. तीन वर्षे ती लढाई चालते. सरस्वती नदीच्या किनार्यावर होणार्या त्या लढाईने नदीचा रंग लाल झालेला असतो. विविध शस्त्रास्त्रांचा वर्षाव होत रहातो व अखेरीस कुरु राजा चित्रंगद त्यात कामी येतो. राज्यावर दुःखाची सावट पसरते. गंधर्व कुरु राजाला मारल्यानंतर स्वर्गात जातो. चित्रंगदाचा अंत्यविधी भिष्म उरकतो व चित्रंगदाचा धाकटा भाऊ विचित्रवीर्य गादीवर बसवतो परंतु, तो वयाने लहान असल्यामुळें त्याच्यावतीने राज्यकारभार करू लागतो. शंतनुच्या पुत्राला शोभेल असा राज्यकारभार तो भिष्माच्या मार्गदर्शनाखाली पहातो. भिष्म आपली मर्यादा सांभाळून सर्व कार्य करत असतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशेएकावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे दुसरा

(संभव पुर पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, अहो कुरुवंशाचे राजश्री, जनमेजय, चित्रंगदाचा देहांत झाल्यानंतर सत्यवतीच्या आदेशानुसार भिष्म विचित्रवीर्यास गादीवर बसवून राज्यकारभार करू लागतो.

विचित्रवीर्य त्याच्या मोठ्या भावासारखाच शूरवीर होता. विचित्रवीर्य वयात आल्यावर त्याचे लग्न करण्याचा मनोदय सत्यवती व भिष्माने मिळून केला त्याना ऐकण्यात आले होते काशी नरेशाच्या तीन कन्या विवाहयोग्य झालेल्या आहेत. त्या सगळ्या राजकन्या अप्सरेसारख्या सुंदर होत्या. काशीनरेशांनी आपल्या तिनही मुलींचे विवाह स्वयंवर पद्धतीने करण्याचे ठरवले. सत्यवतीच्या सांगण्यावरून भिष्म एका रथातून त्याच्या सारथ्या बरोबर काशीनरेशांच्या वाड्यावर जातो. तेथे तो बघतो किं, बरेच लढवय्ये राजपुत्र तेथे निरनिराळ्या देशांतून विवाह करण्यासाठी आमंत्रित म्हणून आलेले असतात. त्याच बरोबर तो त्या तीन सुंदर राजकन्या पहातो. त्या स्वयंवराच्या तयारीत असतात. त्या समारंभात जमलेल्या सगळ्या राजपुत्रांचा नांवाने उल्लेख केला जात असतो. जेव्हां भिष्माची पाळी येते तेव्हां तो जाहिर करतो किं, तो आपल्या भावांसाठी आला आहे. भिष्म त्या तिनही बहिणांना आपल्या रथात घेतो व मोठ्याने ओरडून सगळ्यांना सांगतो, "आपण सगळे शहाणे हे जाणतां कीं, जेव्हां एकादा कर्तबगार राजा बोलावला जातो तेव्हां त्याला उपवर कन्या तिच्या साजशृंगारासह दान केली जाते. कांहीं केवळ एक दोन गुरं तिच्या बरोबर दिली जातात. कांहीं पालक हुंडा घेऊन आपली मुलगी दान करतात, कांहीं त्या ऐवजी बळजबरीने मुलगी पळवून नेतात. कांहीं मुलीच्या संमतिने तिला पळवतात, कांहीं तिला बळजबरीने संमति देण्यास भाग पाडून मग तिला पळवतात. कांहीं मुलीबद्दल एक रक्कम ठरवून तिला नेतात, कांहीं यज्ञात मोबदला म्हणून कन्या दान मिळवतात, त्यातील आठवा पर्याय जाणकार जास्त श्रेयस्कर समजतात. आपला  राजा मात्र स्वयंवर श्रेष्ठ मानतात, त्यांनी स्वताचा विवाह तसांच केला आहे. परंतु, ऋषी सांगतात, बळजबरीने नेलेली कन्या क्षत्रियांसाठी जास्त चांगली असतें, त्यात तो विरोधकांचा त्यांना  मारून पाडाव करून ती कन्या मिळवतो तो उत्तम विवाह आहे. म्हणून मी त्या शेवटच्या

पर्यायानुसार ह्या तिनही कन्या माझ्या भावासाठी पळवून नेत आहे, जर कोणाची हिम्मत असेल तर त्याने पुढे येऊन व मला हरवून त्या तिघी माझ्या ताब्यातून काढून मिळवाव्यात". असें बोलून भिष्म त्या तिघींना आपल्या रथात घेऊन पसार झाला. जमलेल्या राजांतील कांहींने ते आव्हान स्वीकारले व ते आपले दागिन्याने भरलेली वस्त्रे उतरवून युद्धाच्या तयारीची वस्त्रे नेसण्यास सुरुवात करतात. त्यावेळी जो शस्त्रास्त्रांचा आवाज झाला त्यामुळे सर्वजण विस्मय करू लागले. अरे जनमेजया, त्या शस्त्रांच्या चमकण्यामुळे आकाशात वीजा चमकत आहेत असा आभास झाला. घाई घाईने ते राजे भिष्माच्या रथामांगे आपले रथ घेऊन पळू लागले. त्या अनपेक्षित आव्हानामुळें त्यातील सर्वच राजे भिष्मावर भयंकर संतापले होते. भिष्माला रोकण्यासाठी ते आपल्या धनुष्यातून हजारो बाण फेकत होते. कांहीं वेळानंतर त्या राजांनी भिष्माच्या रथाला घेरले व बाणांच्या वर्षावांने ते त्याला मारण्याचा प्रयत्न करू लागले. भिष्म त्याच्या ढालीने ते सगळे बाण अडवत व त्यांच्यातून मार्ग काढत पळत राहिला. कांहीं राज्यानी त्यांच्या भाल्याने भिष्माला जखमा केल्या. त्या बरोबर भिष्माने त्यांना आपल्या भाल्यांने मारून टाकले. ती हाणामारी अशी रंगली होती कीं, असें वाटावे देव व असुरांचे युद्ध होत आहे. जे सामान्य लोक ते पहात होते ते घाबरून गेलेले दिसत होते. अनेक राजे व त्यांचे सैनिक त्यात मारले गेले होते. भिष्म मात्र त्या तीन बहिणींना घेऊन हस्तिनापुराकडे कूच करतच होता. शेवटी राजे माघारी फिरले व युद्ध संपले. भिष्म त्या मुलींना घेऊन भरताच्या राजधानीला पोहोचला होता त्यावेळी महारथी शल्य भिष्माला आव्हान देत मागून वेगांने त्याच्या रथाजवळ आला. एकाद्या माजावर आलेल्या भयंकर हत्ती सारखा तो महारथी शल्य भिष्मावर तुटून पडला. शल्य भिष्माला संतापाने बोलला, "थांब थांब बदमाश चोरा,"

भिष्म ते शिवराळ शब्द ऐकून आपला रथ चिडून थांबवतो, त्याच्या कपाळावर असंख्य आठ्या उमटतात. ते पाहून इतर राजे पुढे काय होते ते उत्सुकतेने पहात रहातात.

दोनही योद्धे रथ थांबवून जागीच लढू लागतात. बघणारे राजे दोघांनाही लढण्यासाठी ललकारू लागतात. शल्याचे युद्ध कौशल्य पाहून ते राजे टाळ्या व शंख वाजवून त्याला प्रोत्साहीत करीत होते.

तो प्रकार पाहून संतापलेल्या भिष्माने आपल्या सारथ्यास रथ असा नेण्यास सांगितले किं, तो शल्यास तात्काळ मारू शकेल. जवळ आल्यावर भिष्म वरूण अस्त्राचा बाण वापरून शल्याच्या चारही घोड्यांना जखमी करतो. त्यानंतर शल्याच्या सारथ्यास मारतो. इंद्र अस्त्र सोडून तो त्याचे घोडे मारतो. अशारितीने शल्याला हरवल्यानंतर त्याला जीवंत सोडून देतो.

शल्य हा पराभव विसरू शकत नाही, तो पुढे कधीतरी भिष्मावर सूड उगवण्याचे ठरवून परत फिरतो. सर्व विरोध संपवून भिष्म त्या तीन राजकन्या त्याचा भाऊ विचित्रवीर्यासाठी घेऊन येतो. त्या तीन मुलींना भिष्म वाटेत येणार्या रानावनांतून अतिशय नाजूकपणे आपल्या गृही आणतो. जणुकाय त्या त्याच्या सुना अथवा मुलीं असाव्यात. त्यानंतर तो त्यागमूर्ती गंगापुत्र आपल्या धाकट्या भावाच्या लग्नाच्या तयारीला लागतो. सत्यवतीच्या सुचनांप्रमाणे सर्व तयारी होत असतांना त्या तीन मुलींपैकीं एक मुलगी, अंबा आपले मनोगत सांगते. ती बोलते, "मी मनानें शौभदेशाच्या राजास वरले आहे, एवढेच नाही तर आमचे दोघांचे तसें आधीपासून ठरलेसुद्धा होते. स्वयंवरात मी त्याला वरणारसुद्धा होते पण आपण असा दाणगटपणा केल्यामुळें सगळे बिघडले आहे. माझ्या पित्याला सुद्धा ते मान्य होते, स्वयंवराचा केवळ बहाणा होता, ती पुढे बोलते, आपण पुण्यमार्ग व मर्यादांचे नियम काय ते चांगलेच जाणता तेव्हां त्यानुसार योग्य ते करावे". ते ऐकून भिष्म तिला परत जाण्याची परवानगी देतो. उरलेल्या दोघींचे, अंबिका व अंबालिका, लग्न विचित्रवीर्याशी मोठ्या थाटामाटात केले जाते. विचित्रवीर्य मर्यादाशील आणि पुण्यप्रत होता तरी तो तरूणसुद्धा होता व त्यानुसार त्याला त्या दोन राण्यांबद्दल वासना उत्पन्न होते. अंबिका व अंबालिका उंच्यापुर्या व रुंद बांध्याच्या धष्टपुष्ट असतात. त्यांची अंगकांती सोनेरी असते. त्यांचे डोक्याचे केस काळेभोर व कुरळे होते. बोटांची नख रक्तवर्णी होती, त्यांचे ओठ सुंदर टवटवीत होते, त्यांचे उरोज उन्नत होते, त्यांचे नितंब गोल व आकर्षक होते. इतर सगळीच उत्तम लक्षणे त्या दोनही कन्यांत दिसत होती. त्यांचा विवाह त्यांना अनुरुप मुलाशी झाल्यामुळे त्या समाधानी दिसत होत्या. विचित्रवीर्याला त्या दोघींनी त्याचा जीवन साथीदार म्हणून मनापासून स्वीकारले होते. त्यांच्या सहवासात विचित्रवीर्य सात वर्षे सुखात घालवतो. विचित्रवीर्य तरुण असतांनाच त्याला एका असाध्य व्याधीनें

ग्रासले, त्यावर कांहीं इलाज आहे कां ते पहाण्यासाठी बरेच प्रयत्न सर्व मित्र व आप्तमंडळांनी केले पण सगळे व्यर्थ ठरले. भिष्म त्यामुळें एका वेगळ्याच विवंचनेने त्रासला गेला कारण, विचित्रवीर्याला अजून एकही संतान झाले नव्हते. घराण्याला व राज्याला वारस पाहिजे तो कसा मिळवावयाचा हींच विवंचना भिष्माला सतावू लागली. विचित्रवीर्य त्या व्याधीने अखेरीस मरण पावतो. त्याचे अंत्यविधी सत्यवती विद्वान पुरोहितांच्या सल्ल्यानुसार भिष्माकडून उरकते.

अशा रितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे दुसरा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे तिसरा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, ती अभागिनी सत्यवती आपल्या मुलांच्या शोकांत बुडून जाते. विचित्रवीर्याचा अंत्यविधी त्याच्या दोनही बायकांच्यासह उरकल्यावर ती पुढचा विचार करू लागते. त्या अभागी सुनांचा शोक आवरण्यासाठी ती प्रयत्न करते पण कुरु वंशाच्या भवितव्याचा विचार तिला चैन पडू देत नाही. अखेरीस सत्यवती भिष्माला बोलावून सांगते, "अरे भिष्मा कुरुवंशाचा दिवा, पिंडदान, कुरुवंशाची किर्ती हे सगळे आता तुझ्या हातात आहे. स्वर्गात जाण्यासाठी सत्कृत्याची गरज असते, दीर्घायुष्यासाठी श्रद्धा आवश्यक असते, तसें पुण्यव्रत तुझ्या पासून वेगळे नाही. तू सगळे पवित्र नियम जाणतोस. सर्व वेद व श्रृतीमध्ये जे दिले आहे ते तुला चांगलेच माहित आहे. तुझे ज्ञान शुक्र व अंगिरसांसारखे आहे. कुटूंबाचे रितीरीवाज कसे पाळावयाचे हे तू चांगलेच जाणतोस. त्यामध्ये गरजेनुसार कसें बदल करावयाचे हेसुद्धा तू जाणतोस. हे सर्व लक्षात घेऊन मी तुझ्यावर कांहीं जबाबदार्या टाकणार आहे. तुला ते सगळे माझ्यासाठी करावेच लागेल, नाही म्हणू नकोस. माझा गुणी पुत्र व तुझा भाऊ निपुत्रिक देवा घरी गेला आहे. तुझ्या भावाच्या दोनही बायकां ज्या अजून खूप तरुण आहेत व पुत्रवती होण्याची अभिलाषा धरून आहेत, ते तू लक्षात घेऊन माझ्या आदेशाचे पालन करण्यासाठी त्या दोघींचा स्वीकार कर. त्यामुळे आपल्या वंशाला कुलदिपक मिळेल. वंशाचे जे नुकसान झाले आहे ते भरून काढण्यासाठी तुला ते करावे लागेल. तू गादीवर बसून हस्तिनापुराचा राजा होऊन प्रजेची सेवा करावी असें मी सांगते. तू लग्न करावेस व कुरुवंशाचा दिवा तेवत ठेवावा असें मला वाटते. जर तसें तू केले नाहीस तर हा भरत वंश नरकात जाईल. तसें होऊ देऊ नकोस अशी मी तुला विनंती करते".

पुढे वैशंपायन सांगतात, सत्यवती व इतर सर्वच आप्त भिष्माला तसांच सल्ला देतात. त्यानंतर भिष्म त्या सगळ्यांना पवित्र नियमानुसार काय योग्य ते त्याला समजले त्याप्रमाणे जे आहे ते सांगतो.

"अहो माझे आई, तुम्ही सगळे जाणता कीं, मी कोणती प्रतिज्ञा तुझ्या लग्नाच्या प्रसंगी केली होती. पवित्र नियमानुसार त्याचे पालन करणे हेंच मला इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा जास्त

महत्वाचे आहे. मी पुन्हा सर्वांसमक्ष सांगतो किं, तिनही जगाच्या साम्राज्यापेक्षा मला माझी प्रतिज्ञा कितीतरी जास्त महत्वाची वाटते आहे. एकवेळ पृथ्वी आपला गंध सोडेल, पाणी त्याचा ओलसरपणा सोडेल, प्रकाश गोष्टी दाखवण्याची त्याची किमया हरवेल, हवा स्पर्श करण्याचे सोडेल, सूर्य त्याचे तेज हरवेल, अग्नी त्याची उष्णता, चंद्र त्याचा थंडपणा, अवकाश ध्वनी निर्माण करण्याचे थांबवेल, वृत्राचा नाश करणारा इंद्र त्याची हिम्मत हरवेल परंतु, मी माझा दिलेला शब्द कदापिही मोडणार नाही". असें भिष्माचे निर्धारपूर्वक बोलणे ऐकल्यावर सत्यवती सांगते, "तुझा निर्धार मी जाणते, परंतु, तुझ्या सगळ्या हिम्मतीने सुद्धा तू ही तीन जगं (स्वर्ग, पृथ्वी व पाताळ) उत्पन्न करू शकत नाहीस. मला माहीत आहे, तू कोणती प्रतिज्ञा माझ्यामुळें केली होतीस. परंतु, आजची आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेऊन तू तुझ्या पूर्वजांच्या भल्यासाठी तरी थोडे नमते घेतले पाहिजेस. असें कांहींही करू नकोस ज्यामुळें आपला वंश संपेल व आपले सगळे आप्त पूर्वज दुःखी होतील". एवढे बोलून ती तिच्या मुलाच्या मृत्यूमुळे आधीच दुःखी असलेली सत्यवती रडत रहाते. भिष्म ते पाहून तिला समजावण्याचा प्रयत्न करतो, "अहो राणीसाहेब, आपण मला असें करायला सांगून पवित्र नियमांचे माझ्याकडून उल्लंघन व्हावे असें कां सांगता? कृपया असें करायला लावून तुम्ही मला नष्ट करू नका. एका क्षत्रियांने दिलेला शब्द मोडला तर त्याचे आपल्या वेदांत कोठही समर्थन दिलेले नाही. प्रस्थापित नियम काय आहेत ते मी तुम्हाला सांगतो, त्यानुसार व्यवस्था करून शंतनुचा वंश पुढे चालवण्याची व्यवस्था कशी करता येईल ते मी सांगतो ते ऐका. माझे ऐकल्यावर इतर ज्ञानी जनांचे मत पाहून पुढे काय करावयाचे ते ठरवता येईल. अशा आणीबाणीच्या प्रसंगी जे करण्याचे मार्गदर्शन दिले आहे ते बघा. त्याच वेळी सामान्य जनांच्या (प्रजेच्या) विचारांची सुद्धा दखल घेऊन नंतरच काय ते ठरवू.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे तीनवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे चौथा

(संभव पर्व पुढे चालू)

भिष्म पुढे तिला सांगतो, "फार प्राचीन काळी, जमदग्नीचा मुलगा (परशु) राम, भ्रष्ट हैहव क्षत्रियांच्या राजाला, अर्जुनला मारतो त्याच्या परशुने (कुर्हाडीने) मारतो कारण, त्या राजाने जमदग्नी ऋषीचा खून केला होता. त्यानंतर तो भ्रष्ट क्षत्रियांचे हजार (हात) तसेंच मारून टाकतो व हैहव क्षत्रियांचा वंश नष्ट करतो. त्यामुळें समस्त क्षत्रिय लोकांत दहशत उत्पन्न होते. त्यानंतर तो सर्वच भ्रष्ट क्षत्रियांचा समूळ नाश करण्याचे ठरवून जगभर फिरतो. तो भृगु कुळातील राजा आपल्या सहस्र बाणांनी सर्व क्षत्रियांचा अशारितीने नाश करतो. एकही क्षत्रिय पृथ्वीवर उरत नाही. असें तो एकवीस वेळा करतो.

त्या क्षत्रियांच्या बायका परशुरामाला विचारतात, आता त्यांचे काय होणार? त्यावर तो ब्रह्मदेवाला विचारतो तेव्हां त्याला उत्तर मिळते किं, त्या बायकांनी वेदशास्त्र संपन्न ज्ञानी ब्राह्मणांकडून वासनामय न होता संतान मिळवली तर ती त्यांच्या मृत पतिचीच संतान असेल. त्या प्रमाणे परशुराम त्या महिलांना सांगतो व त्यातून पुनः नवीन कुलीन क्षत्रिय समाज उत्पन्न होतो.

ते सांगितल्यानंतर भिष्म इतिहासातील आणखीन एक प्रसंग सांगतो, बर्याच वर्षापूर्वी उतथ्य नांवाचा ऋषी होऊन गेला. त्याला एक पत्नी होती तिचे नांव ममता होते. त्या दोघांचे एकमेकांवर उत्कट प्रेम होते. उतथ्यचा एक धाकटा भाऊ वृहस्पति नांवाचा असतो. तो वृहस्पति स्वर्गीय पुरोहित होता व त्याची अध्यात्मिक शक्ति प्रचंड होती. तो ममता पोटाशी असतांना तिला पृच्छा करतो कीं, त्याला तिच्याशी वासनिक संबंध ठेवावा असें वाटते. ममता त्याला सांगते कीं, ती आधीच त्याच्या मोठ्या भावाच्या गर्भाने भरलेली आहे. त्यामुळे असा संबंध ठेवणे श्रेयस्कर नाही. ती पुढे सांगते कीं, तिच्या उदरातील गर्भाने तेथेच सर्व वेद आत्मसात केले आहेत. अशा परिस्थितीत आणखीन एक गर्भ तेथे वाढवणे कसें शक्य आहे. म्हणून वृहस्पतीने तो विचार सोडून द्यावा असा सल्ला ती त्याला देते. असा सल्ला मिळूनही तो वासनांध झालेला ब्राह्मण वृहस्पति तसाच तिचा विचार करीत रहातो. वृहस्पति ममतावर बळजबरी करून तिला मिठी मारतो. ती ममता त्याला झिडकारते. त्यावेळी ममताच्या उदरातील गर्भ वृहस्पतीला सांगतो, आपल्याला असें

करून माला त्रास देता येणार नाही. येथे फक्त एकच गर्भ वाढू शकतो तरी तुम्ही माझ्या आईला सोडून द्यावे. त्यामुळें संतापलेला वृहस्पति त्या गर्भाला शाप देतो. तो रागांने बोलतो, "अशा सुखाच्या क्षणी तू माझ्या आड आला आहेस तेव्हां तू जन्मजात अंध होशील". त्या शापामुळें उतथ्याचा मुलगा जो त्याच्या काका इतकांच हुशार होता, अंध जन्मतो. त्याचे नांव होते, दीर्धतमस, म्हणजे कायम अंध. त्याच्या वेदाच्या ज्ञानाच्या प्रभावामुळे तो पत्नी मिळवू शकतो. एक देखणी ब्राह्मण कन्या त्याला अर्धागनी म्हणून मिळते. तिचे नांव प्रदवेशी होते. अशारितीने दीर्घतमस आपल्या पित्याचा वंश पुढे चालवू शकतो. त्याला बरीच मुलं होतात, त्यातील सर्वात मोठा होता गौतम. परंतु, दुर्दैवाने ते सगळे वाममार्गाला जातात. दीर्घतमस वेदाचा पूर्ण अभ्यास केल्यानंतर तो सुरभीच्या मुलाकडून त्यांचे तंत्र सुद्धा शिकतो. त्यानंतर कोणालाही न भिता तो त्या तंत्राचा उपयोग करू लागतो. त्याची त्याला लाज वाटत नाही. तो समजायचा कीं, जर आपण जे करतो त्यात पाप नसेल तर अशा कामाची लाज वाटण्याचे कारण मला दिसत नाही. परंतु, इतर ऋषी जे त्या आश्रमात एकत्रपणे रहात होते त्यांना असें वाटते किं, तो दीर्घतमस पाप मार्गाचे पालन करणारा व म्हणून असा दुष्कर्म करणारा आपल्या मध्ये रहाणे अप्रस्तुत आहे. त्याला व त्याच्या परिवाराला आपण बहिष्कृत केले पाहिजे. दीर्घतमस व त्याची पत्नी प्रदवेशी दोघांना ते समजते, मुनींचा तो निर्णय समजल्यावर तो आपल्या पत्नीला, प्रदवेशीला विचारतो, "तू माझ्यावर नाराज कशी असू शकतेस"?

त्यावर ती उत्तर देते, "पतिला भरर्ती म्हणतात कारण तो तिला पोसतो. त्याला पति म्हणतात कारण, तो तिचे संरक्षण करतो. परंतु, आपल्याबाबत बघितले तर तू ह्यापैकीं कांहींही करत नाहीस. तू वैराग्यात मोठा आहेस पण तू आंधळा आहेस, मी तुला व आपल्या मुलांना सांभाळते. आता ह्या पुढे मी तुला सांभाळणार नाही".

पत्नीचे असें उद्‌गार ऐकून दिर्घतमस पत्नीवर रागावतो. तो आपल्या नालायक मुलांना व बायकोला सांगतो, "तुम्ही मला क्षत्रियांकडे घेऊन जा, म्हणजे तुम्हाला मी भरपूर धन मिळवून देईन". ते ऐकून ती बोलते, "मला तुझ्यामुळें मिळणारी संपत्ती नको आहे. कारण, त्यामुळे मला समाधान मिळणार नाही. अहो ब्राह्मण, तुम्हाला जे पाहिजे ते करा पण एक गोष्ट स्पष्ट आहे किं, ह्यापुढे मी तुम्हाला सांभाळू शकणार नाही". ते ऐकून दिर्घतमस तिला

बोलतो, "मी आज एक नियम जाहिर करतो, ह्यापुढे कोणतीही स्त्री फक्त एकाच पुरुषाबरोबर पत्नी म्हणून राहील. जरी तो पुरुष मेला तरी ती पुनः लग्न करणार नाही. ती इतर कोणाही पुरुषाशी संबंध ठेवू शकणार नाही. जी बाई अशाप्रकारचा संबंध ठेवत असेल तीचा धिक्कार झाला पाहिजे. पति नसलेली स्त्री नेहमीच पतिता समजली पाहिजे. जरी अशी स्त्री संपन्न असली तरी तिला ती संपन्नता उपभोगता येणार नाही. समाज नेहमी अशा एकट्या रहाणार्या बाईकडे संशयानेच पाहिल". *टीपः मनुस्मृतीत हा नियम स्त्रीयांसाठी दिला आहे.*

हे दिर्घतमसचे बोलणे ऐकून त्याची बायको भयंकर संतापली. वैशंपायन पुढे सांगतात, त्या भांडणाचा शेवट काय झाला ते ऐक. आपल्या मुलांना ती आदेश देते किं, त्यांनी त्यांच्या अशा बापाला गंगेत फेकून द्यावे. ते ऐकून मोठा मुलगा गौतम व त्याचे इतर भाऊ ठरवतात किं असा कुचकामी बाप गंगेत फेकून देण्याच्या लायकीचाच आहे. असें समजून ते त्याला एका होडीत बांधून ती गंगेच्या प्रवाहात सोडून देतात. ते करून कोणताही पस्ताव न वाटता ते त्यांच्या आईबरोबर घरी जातात. ती होडी गंगेच्या प्रवाहाबरोबर वाहत अनेक राजांच्या देशांतून जात अखेरीस वली नांवाच्या राजाच्या हद्दीत येते. राजा वली फार ज्ञानी होता. तो एके दिवशी गंगेवर अर्ध्य देण्यासाठी गेला असतां त्याला ती भटकणारी होडी दिसते. त्यात बांधून ठेवलेले ब्राह्मण दिर्धतमस त्याला दिसतात. तो गुणी वली राजा, खर्याचा समर्थक, दिर्घतमसची सगळी माहिती मिळवण्याचे ठरवतो. दिर्घतमस राजाला सांगतो, कारण त्याची पत्नी कुमार्गी असल्यामुळे त्याची मुलं त्याच्या सारखी गुणी न जन्मता मातेसारखी वाममार्गी झाली व जेव्हां त्याने त्याचा निषेध दाखवला तेव्हां त्याच्या कुमार्गी मुलांनी व पत्नीने मिळून त्याला होडीत घालून गंगेत सोडले आहे. एक प्रयोग म्हणून राजा वली आपल्या राणीला त्या ऋषीसह संभोग करण्यास सांगतो. त्या प्रयोगास ऋषी तयार होतो. राजा वली आपली राणी सुदेशना दिर्घतमसकडे पाठवतो. परंतु, जसें तिला समजते किं, तो वृद्ध व अंध आहे ती त्याच्याकडे जात नाही. तिच्या ऐवजी ती तिची दासी पाठवते. तो ऋषी ज्याच्या वासना पूर्ण नियंत्रित होत्या त्याला तिच्यापासून अकरा मुलं होतात. त्यातील कक्शिवत मोठा होता. ते सगळे त्यांच्या पित्यासारखे वेदशास्त्र संपन्न झाले. ब्रह्म शक्तिने ते परिपूर्ण होते. एक दिवस राजा वली दिर्घतमस ऋषीला विचारतो,

"काय ही मुलं माझी आहेत कां"? त्यावर ऋषी सांगतो, "नाही, ती माझी आहेत. हे सगळे माझ्यापासून एका शुद्र स्त्रीला झाली आहेत, त्यात तुझी राणी नव्हती, ती मला वृद्ध व अंध आहे हे पाहून तिने दासी माझ्याकडे पाठवली होती". राजा ते सगळे जाणत होते. राजा दिर्घतमसला शांत करतो व आपल्या पत्नीस त्याच्याकडे जाण्यास सांगतो. राणी त्याच्या जवळ जाते तसें ऋषी दिर्घतमस तिला फक्त स्पर्श करतो व त्या स्पर्शामुळें केवळ पांच मुलं होतील असें सांगतो. त्यांची नांव अंग, वंग, कलिंग, पुंड्र आणि कुंभ अशी असतील . ते सूर्यासारखे तेजस्वी असतील. त्यांच्या नांवांची राज्ये भविष्यात उभी रहातील. अशारितीने वली राजाची वंशावळी एका ऋषीच्या वीर्याने तयार झाली. असें अनेक शूरयोद्धे, महारथी व तिरंदाज क्षत्रिय ब्राह्मणांच्या वीर्यातून उत्पन्न झाली आहेत. त्यात कांहींच गैर समजले जात नाही. आर्य संस्कृतीत वारस संस्काराचा असतो, रक्ताचा नाही. त्यासाठी फक्त वीर्य तोलामोलाच्या घराण्यातील आहे एवढे पहावयाचे असते. भिष्म सत्यवतीला सांगतो. हे सगळे समजून त्याप्रमाणे कांहीं तू योजशिल तर ते शक्य आहे असें भिष्म तिला सुचवतो. अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशेचौथावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे पांचवा

(संभव पर्व पुढे चालू)

भिष्म पुढे सांगतो सत्यवतीला, "पत्नी व इतर स्त्री ह्यातील फरक येथे लक्षात घ्यावयाचा आहे. पत्नी कन्यादानाने वराच्या गृही येत असते. विवाह विधीतील कन्यादान हा भाग महत्वाचा कां असतो ते लक्षात घे. त्यामुळें ती त्या सासरची वारसदार ठरते. कन्यादान विधी दोन परिवारातील संबंध प्रस्थापित करतो. अंतरपाट व अक्षता विधीने त्या स्त्री व पुरुषाचे पतिपत्नी नाते समाजाने मान्य केले असें जाहिर होते. म्हणून विवाहात हे दोन विधी महत्वाचे असतात. तरीसुद्धा, तिच्या उदरातील गर्भ कोणाच्या वीर्याचा ते पवित्र नियमांनुसार महत्वाचे नसते, म्हणून तो गर्भ त्या कुळाचाच समजला जातो असें शास्त्रसंम्मत विधान आहे. वस्तुतः रक्त (वीर्य) महत्वाचे नसते, संस्कार महत्वाचे असतात व ते त्या घराण्याचे असावे लागतात. म्हणजे, वारसा संस्कारांचा असतो रक्ताचा नाही हे लक्षात घे. म्हणून अगदी प्राचीन काळांपासून अनेक घराणी अशारितीने चालवली जात आहेत. त्याप्रमाणे अहो राणीमाता. आपण एकादा उच्च दर्जाचा आपल्या तोलामोलाचा ज्ञानी ब्राह्मण ऋषी निवडून त्याकरवी आपल्या सुनांना भरत वंश पुढे चालवण्याची आज्ञा करावी. असें ब्राह्मण धनाच्या आमिषाने आपण बोलावू शकता".

वैशंपायन सांगू लागतात, ते भिष्माचे आशादायक बोलणे ऐकून राणी सत्यवती मंदपणे स्मित करत, थोडे लाजत भिष्माला सांगते, "अहो भरत कुळाचे सामर्थ्यवान पुत्र तुमच्या ह्या कथनामुळें माझ्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. तुझ्यातील माझ्या आत्मविश्वासाने मी ह्यापुढे कांहीं निर्णय घेणार आहे. ते तू मान्य करशील असें मी समजते". तुम्ही चांगलेच जाणता अशा विलक्षण परिस्थितीत शास्त्राचे नियम कसे वापरावेत. आपल्या घराण्यातील तुम्ही श्रेष्ठ पुरुष अहात म्हणून आता मी जे सांगते ते नीट ऐकून त्यानंतर मला योग्य काय, त्याबद्दलचे तुमचे मत सांगा".

पुढे सत्यवती सांगते, "माझे वडील एक सच्चे इसम होते, त्यांनी माझ्या उदरनिर्वाहासाठी मला एक मचवा दिला होता. त्यातून लोकांना एका किनार्यावरून पलिकडील किनार्याला पोहोचवण्याचे काम करून माझा उदरनिर्वाह मी करीत असें. असेंच मचवा चालवत असतांना एकदा, एक श्रेष्ठ ऋषी ज्याचे नांव पराशर होते, ते माझ्या नावेतून प्रवास

करण्यासाठी आले. आम्ही दोघे एकटेच तेव्हां प्रवास करीत असतांना अचानकपणे त्या ऋषीला माझ्याशी गप्पा मारण्याची इच्छा झाली व ते माझ्याशी गोड आवाजात बोलू लागले. असें जसें ते माझ्याशी बोलू लागले व माझ्याशी जवळीक करू लागले तसें मला त्याचा उद्देश समजला व माझ्या मनात माझ्या बापाची भिती उभी राहिली. त्याचवेळी पराशर ऋषीला नाराज करण्यामुळे जर त्यानी शाप दिला तर माझे काय होईल अशी भितीसुद्धा मला सतावत होती. तसेंच जर, त्या सिद्धहस्त ऋषीला प्रसन्न केले तर त्याचा दुवा मिळण्याची शक्यता मला खुणवत होती. अशाप्रकारे मी द्विधा मनस्थितीत होत्ये. नेमके काय मी करावे ते मला समजत नव्हते. पराशराने त्याच्या सिद्धीच्या जोरावर माझा पूर्ण ताबा घेतला होता, मी त्याच्या इच्छे विरुद्ध वागू शकत नव्हती". एवढे बोलून सत्यवती देवव्रताकडे अपेक्षेने पाहत होती व भिष्मसुद्धा तिच्या विलक्षण अवस्थेचा अंदाज आल्यासारखा प्रतिक्रिया देत होता. त्यामुळे सत्यवती स्वताला सावरत पुढे सांगू लागली. "सर्वच मुली ज्या सबबी देऊन पुरुषाला टाळतात त्या सगळ्या युक्त्या मी केल्या पण पराशर त्यांच्या निर्णयावर ठाम होते. त्यांनी मला आश्वासन दिले कीं, माझे कौमार्य त्यानंतरही अबाधित राहील. असें करण्याचे कारण ऋषी पराशर माझ्याशी विवाह न करतां मला गर्भवती करण्याच्या विचारात होते. मी, इतर लोक पहातात, असें सांगताच सर्वकडे दाट धुके पडले व त्यामुळे कोणीही मला व पराशराला एकत्र आलेले पाहू शकत नव्हते. त्या काळी माझ्या अंगाला माशांची दुर्गंधी येत असें म्हणून पराशराला थांबवण्यासाठी ते कारण त्याना दूर ठेवण्यासाठी मी बोलले तर ताबडतोब माझ्या अंगाचा गंध इतका सुधारला किं मी पराशराकडे आकर्षित झाल्ये. त्यांच्या सिद्धहस्तते बद्दल माझी खात्री पटली. पराशर यमुना नदीच्या ज्या बेटावर रहात होते तेथे मी त्यांच्या अपत्यास जन्म दिला तर, मी त्या प्रसुतीनंतर पुन्हा कुमारिका होईन असें पराशरानी सांगितले. त्याप्रमाणे मी माझ्या त्या अपत्यास त्या बेटावर जन्म दिला. त्या बेटाचे नांव कृष्णद्वीप होते म्हणून त्या पुत्राचे नांव कृष्ण द्वैपायन, म्हणजे कृष्णद्वीप बेटांवर जन्मलेला असा आहे, ठेवले गेले". ती पुढे सांगते, "तो माझा मुलगा जन्मजात वेद वेदांग अशी सर्व अंगे जाणत होता. त्यांने वेद पुन्हा लिहीले, त्याचे अध्यात्मिक सामर्थ्य अवर्णनीय आहे. वेदांचा अर्थ सांगितला म्हणून त्याला सर्व ज्ञानी व्यास असें संबोधू लागले. तो काळसर वर्ण असलेला माझा

मुलगा त्याच्या बापासारखा विद्रूप होता पण तो माझा मुलगा असल्यामुळे मला प्रिय होता. जन्मानंतर लवकरच त्याच्या पित्यासह तपस्या करण्यासाठी वनात निघून गेला. तो सत्यव्रत, पूण्यवंत, वासनाशुन्य, पापविरहीत असा माझा मुलगा जातांना मला म्हणाला किं जेव्हां मी त्याची आठवण करीन तेव्हां तो माझी इच्छा पूर्ण करण्यासाठी हजर होईल". पुढे सत्यवती भिष्माला सांगते, "आता समय आला आहे किं, मी त्याला बोलवावे, जर तुला ते योग्य वाटत असेल. मी माझ्या मुलास विचित्रवीर्याच्या बायकांना गर्भवती करण्यासाठी सांगितले तर तो त्या माझ्या इच्छेस नाकारणार नाही. आता तुझ्या मताचा प्रश्न आहे". असें बोलून सत्यवती भिष्माकडे अपेक्षेने पहात रहाते.

वैशंपायन पुढे सांगत होते, कृष्ण द्वैपायनांचा उल्लेख सत्यवतीने केल्यावर भिष्म आदरपूर्वक म्हणाले, "तो एक महान ऋषी आहे". भिष्म हात जोडून पुढे बोलतात, "ते खरोखरच श्रेष्ठ बुद्धिमान आहेत हे सर्व जाणतात. न्यायिक बुद्धी, हितोपकार, सौख्य ह्यांचे मिलन असलेले निर्णय घेण्यासाठी ते ख्यातनाम आहेत. त्यांच्या निर्णयात विशेष असें आहे कीं, त्यांच्या एका शहाण्या निर्णयातून दुसरा शहाणा परिणाम दिसून येतो. दूरगामी हितकारक निर्णय ते घेऊ शकतात. म्हणून राणीसाहेब आपल्या मताशी मी सहमत आहे. असे जर झाले तर त्याच्यापेक्षा जास्त चांगले कांहींच नसेल".

भिष्म सत्यवतीला तिच्या मतानुसार व्यासांना बोलावण्यास सांगतात. तेथे व्यास वेदाचा अर्थ काढण्यात गर्क होते. आपल्या मातेची हाक त्याना समजते व तो आज्ञाधारक पुत्र तत्क्षणी तिच्यापुढे अवतरतो. त्याला पाहून माता सत्यवती त्याला मिठी मारते. बर्याच काळानंतर ते उभयता भेटत असतात. तिला अश्रू आवरता येत नाहीत. तो तिचा पहिला पुत्र होता. तिचे अश्रू पाहून व्यास तिला सावरतात व तिचे अश्रू थंड पाण्याने पुसून काढतात. आदरपूर्वक वाकून तो श्रेष्ठ ऋषी आपल्या आईस विचारतो, "बोल आई, मी तुझ्या बोलावण्याने तुझ्याकडे आलो आहे. काय तुझी इच्छा आहे ते सांग. मी तुझी ती इच्छा क्षणात पूर्ण करण्यास उत्सुक आहे".

त्यानंतर भरत कुळाचे पुरोहित व्यासांची पुजा करतात व त्यांना स्थानापन्न होण्याची विनंती करतात. व्यासमुनी ती पुजा स्वीकारतात. आसनस्थ होण्या आधी म्हणावयाचे मंत्र उच्चारून नंतर व्यासमुनी स्थानापन्न होतात. नेहमीच्या क्षेमकुशल वार्ता झाल्यावर

सत्यवती मुख्य मुद्याला येते. "माझ्या ज्ञानी मुला, तू जाणतोयस कीं, पुत्र आई व पिता असा दोघांचा असतो. त्यामुळें अशी संतान त्यांची एकत्र संपत्ति असते. ह्यात तिळमात्र शंका नाही कीं, बापा एवढाच आईचा अधिकार त्यांच्यावर असतो. तू माझा मोठा पुत्र आहेस तसेंच विचित्रवीर्य माझा लहान पुत्र होता. भिष्म त्याच्या वडिलांच्या बाजूने आहे तसा तू त्याचा मोठा भाऊ आईच्या बाजूने आहेस. मला समजत नाही कीं, तू काय समजशील पण एक गोष्ट स्पष्ट दिसते कीं, विचित्रवीर्याच्या मृत्यूमुळे राज्याला राजा राहिलेला नाही. भिष्म त्याच्या वचनांत व ते सुद्धा माझ्यामुळें अडकलेला आहे. त्या प्रतिज्ञेमुळे तो पिता किंवा राजा होऊ शकत नाही, तरी शंतनुच्या वंशाला पुढे चालवण्यासाठी तुझी आम्हाला मदत पाहिजे. तुझ्या धाकट्या भावाच्या प्रेमाखातर तू त्याच्या विधवा बायकांशी संभोग करावा. त्यांना पुत्रवती होण्याची इच्छा आहे ती तू पूर्ण करावीस असें मला वाटते. त्या दोघीही स्वर्गीय सौंदर्य असलेल्या आहेत, म्हणून एक कर्तव्य समजून तू माझी मांगणी मान्य करावी. तू मला शब्द दिला होतास त्याप्रमाणे तू करशील. मी तो माझा हक्क तुझ्याकडून पूर्ण करून घेऊ इच्छिते, अहो ब्रह्मचारी व्यासमुनी".

ते ऐकून व्यासमुनी बोलतात, "ह्या व नंतरच्या जन्मात जे पुण्यप्रद आहे तेंच मी करीन. तुझे मांगणे शुद्ध विचारातून आलेले आहे, म्हणून मी तुझी मांगणी पूर्ण करण्यास तयार आहे. तू जे सांगतेस ते शाश्वत धर्मानुसार योग्य आहे हे मी समजतो, त्यात कांहींच अयोग्य नाही. मी तुझ्या सुनांना, माझ्या धाकट्या भावाच्या बायकांना तम व वरुणासारखी तेजस्वी मुलं देईन. परंतु, त्यासाठी त्या कौशल देशाच्या राजकन्यांना एक वर्षभर व्रत राखावे लागेल, त्या व्रतांने त्या माझ्याशी समागम करण्यास योग्य होतील. ते ऐकून सत्यवती अधीर होते व व्यासांना सांगते, "अहो निष्पापी मुला, असें करता येणार नाही. तू असें कांहीं कर ज्याने त्या ताबडतोब गर्भवती होतील. ज्या देशाला राजा नाही तो देश नष्ट होतो, त्यासाठी राजा ताबडतोब जन्मणे अत्यंत निकडीचे आहे. राज्यासाठी जे यज्ञ करावयाचे, इतर कर्मकांडं असे अनेक विधी होण्यासाठी राजा आवश्यक आहे तरी तुझा व्रताचा आग्रह सोडून तू त्या दोघींना त्वरित गर्भवती केले पाहिजेस. एकदा ते जन्मले किं,

त्यांचा प्रतिनीधी म्हणून भिष्म राज्य चालवेल पण राजाच नसेल तर तोसुद्धा कांहीं करू शकणार नाही".

व्यास बोलतात, "जर असेंच अयोग्य रीतीने काम करावयाचे असेल तर त्या राजकन्यांना माझे कुरुप स्वरुप स्वीकारावे लागेल कारण तेंच त्यांचे व्रत ठरेल. माझे विद्रूप शरीर, कुरुप मुख व माझ्या अंगाला येणारा मासळीचा दुर्गंध, जो तुझ्याकडून माझ्यात आला आहे, हे माझ्या अंगावरील काटेरी केस, ते सगळे त्यांना सहन करावे लागेल. जर त्या ह्यांना तयार असतील तर त्यांना उत्तम संतान होईल".

वैशंपायन नंतर सांगतात, सत्यवतीला असें सांगून व्यास तिला बोलतात, "त्या कोसलच्या राजकन्यांना चांगले वस्त्र व साजशृंगार करून त्यांच्या शय्यागृहात माझी वाट पहाण्यास पाठवावे". असें बोलून तो महर्षी अदृश्य झाला.

सत्यवती तिच्या विधवा सुनांकडे जाते व त्यांची त्यासाठी मनधरणी करते म्हणजे त्या दोघी व्यासाबरोबर संभोगास तयार होतील. सत्यवती त्या काशीनरेशाच्या मुलींना सांगते, "हे सगळे शास्त्र संम्मत आहे, त्यात काहीं गैर नाही. राज्याच्या भल्यासाठी व भरत वंशाच्या वाढीसाठी हे आवश्यक आहे. ती त्यांना सांगते, भिष्माच्या प्रतिज्ञेमुळे हे करावे लागत आहे, त्याला तुमची मान्यता मिळणे आवश्यक आहे. आपल्या घराण्यासाठी तुम्हाला हे करावेच लागेल. ह्या संपर्कामुळे तुम्हाला उत्तम स्वर्गीय संतान मिळेल, राज्याला राजा मिळेल व तुमची आई होण्याची इच्छासुद्धा पूर्ण होईल. असे सर्व काहीं साध्य होणार आहे". मोठ्या मिनतवारीने अखेरीस सत्यवती त्या दोघींना पटवण्यात यशस्वी होते. त्या खुषीत ती सर्व ब्राह्मणांना एक मेजवानी देते.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशेपांचवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सहावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, राजकन्यांची मासिक पाळी संपल्यावर सत्यवती त्या दोघींना शुद्ध करून त्यांच्या शय्यागृहात जाण्यास सांगते व तेथे ती त्याना सांगते, "कौशलच्या राजकन्यां, माझ्या लाडक्या सुना आता मी काय सांगते ते नीट ऐका. आज तुमचा प्रिय पतिचा मोठा भाऊ तुमच्या गर्भात शिरणार आहे. म्हणून जाग्या रहा, झोपू नका. ते ऐकल्यावर त्यातील एक राणी बिछान्यावर पडल्या पडल्या विचार करू लागते. ती भिष्माचा विचार करते. त्यांने कसे तिच्या मोठ्या बहिणीस जाऊ दिले ते सगळे ती आठवते. कुरुवंशाचे विचार तिच्या मनात येतात. तशात व्यास त्या शयनगृहात शिरतात. शयनगृहात दिवा तेवत होता त्यात ती राजकन्या व्यासाला पाहते. तो कुरुप चेहरा, तपकिरी रंगाचे राकट केसाळ, अंगाला भारी दुर्गंध येत असलेला असा पाहून ती घाबरून डोळे घट्ट मिटून घेते. तसांच त्याचा संभोग होतो. त्यानंतर व्यास कक्षातून बाहेर येतात तेव्हां सत्यवती आतुरतेने कसे झाले ते तिच्या मोठ्या मुलांस विचारते, "सगळे कसे व्यवस्थित झालें नां", तो सांगतो, "तिला हत्तीचे बळ असलेला पुत्र होईल. कुरु घराण्यासाठी तो योग्य असेल. परंतु, तो अंध असेल कारण त्याच्या आईने मला घाबरून डोळे घट्ट मिटले होते". यथावकाश अबिकेला पुत्ररत्न होते पण तो अंध असतो. ते पाहून सत्यवती व्यासाला बोलते, "असा राजा जो अंध आहे, राज्य कसें करणार"? त्याला ती सांगते आणखीन एक प्रयत्न केला पाहिजे व ह्यावेळी व्यास अंबालिकेच्या शयनगृहात जातात. तेथे ती कुतुहलाने व्यास कसे दिसतात ते पहाते व त्याचे ते भयानक उग्र रुप पाहून ती पांढरीफिक्कट होते. तशाच स्थितीत तो संभोग होतो. व्यास कक्षाबाहेर येतात तेथे सत्यवती वाटच पहात असते. ती व्यासांना विचारते कसे झाले, व्यास तिला सांगतात, "हे बाळ फिक्कट वर्णाचे असेल, त्याला मुलं होणार नाहीत परंतु, मोठा शूर व महारथी होईल. त्याचे वारस म्हणून अशाच प्रकारे पांच तेजस्वी मुलं होतील". ते ऐकून सत्यवती व्यासाला आणखीन एकदा ते करण्याचा आग्रह करते व अंबिकेला ह्यावेळी न घाबरता सामोरी जाण्यास सांगते. परंतु, ती इतकी घाबरलेली असते ते बिभत्स रुप पुन्हा तिला पहावयाचे नसते म्हणून ती तिच्या दाशीस चांगले कपडे व तिचा साजश्रृंगार करून

शयनगृहात पाठवते. ती दासी व्यासाच्या भयानक रुपाने किंचितही विचलित न होता त्याचे आदरपूर्वक स्वागत करते व समागम होतो. सत्यवती व्यासाला विचारते ह्यावेळी कसे होते? तो सांगतो, "ह्यावेळी तुझ्या कन्येने तिची दासी पाठवली होती व तिने माझे उत्तम स्वागत केले व समागम सुद्धा उत्तम झाला. व्यास तिच्यावर संतुष्ट होऊन तिला आशिर्वाद देतात कीं, ती ह्यापुढे दासी रहाणार नाही. तिच्या पोटी धर्मदेव (यम) जन्म घेईल कारण मांडव्य ऋषीच्या शापामुळें यमाला पृथ्वीवर यावे लागत आहे". त्या दासीचा पुत्र सर्वश्रेष्ठ बुद्धीमान विदूर होता. ज्याने पांडवांना नेहमी सहकर्य केले. जेव्हां व्यास त्याच्या मातेस भेटतात तेव्हां तिला सांगतात किं, ह्यावेळी तिच्या सुनेने फसवणूक केली व एका दासीला पाठवले होते. त्यानंतर व्यास कायमचे अंतर्धान पावतात. अशारितीने विचित्रवीर्याच्या नांवाने व्यास कुरु वंशाला गति देतात.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशेसहावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशेसातवा

(संभव पर्व पुढे चालू)

जनमेजय विचारतो, "असें काय खोटे कर्म यमाने केले म्हणून ते पृथ्वीवर पाठवले गेले, तो कोण ब्राह्मण ऋषी होता, ज्याने तसा शाप दिला ज्यामुळे यमदेवाला शुद्र म्हणून जन्म घ्यावा लागला"?

वैशंपायन सांगतात, मांडव्य नांवाचा एक ब्राह्मण होता, तो कर्तव्य व वैराग्य अशा दोनांचे नियम प्रामाणिकपणे पाळत होता. मांडव्य नेहमी त्यांच्या आश्रमाबाहेर एका झाडाखाली बसत असत. मौन व्रताचे पालन करीत ते एक हात वर करून तसें बसत असत. अशारितीने मांडव्य अनेक वर्षे बसले होते. एक दिवस कांहीं दरोडेखोर त्यांची लुट घेऊन तेथे आले, त्याचा पाठलाग राजाचे शिपाई करीत होते तेसुद्धा तेथे पोहोचले. दरोडेखोर त्यांची लुट आश्रमात लपवून आश्रमात इतरत्र लपून राहिले. परंतु, त्या दरोडेखोरांनी ती लुट व्यवस्थितपणे लपवलेली नसल्याने ती राजाच्या शिपायांना सापडते. ते शिपाई मांडव्य ऋषीला तेथे बसलेले पहातात व त्याला त्या चोरांबद्दल विचारणा करतात. ते मांडव्यास विचारतात, "ते चोर कोठल्या दिशेने पळाले"? परंतु, ब्राह्मण मौनव्रतात असल्याने ते उत्तर देत नाहीत. शिपाई आश्रमाचा तपास करतात तेव्हां त्याना ती लुट व दरोडेखोर मिळतात. त्यामुळे शिपाई त्यांच्या सामान्य (शुद्र) बुद्धीनुसार त्या मुनीला संशयित ठरवतात. राजाकडे त्याला घेऊन जातात व राजा त्यांच्या युक्तिवादाला खरे मानून ब्राह्मणाला सुळावर फाशीची शिक्षा देतो. सुळी देऊनही तो ब्राह्मण जीवंत रहातो ते पाहून ते शिपाई त्याचा देह घेऊन राजाकडे जातात. मांडव्य त्याच्या योगसामर्थ्याने आणखीन कांहीं ऋषी तेथे बोलावतो, ते दुसरे ऋषी पक्षांच्या रुपात तेथे येतात. मांडव्यला सुळावर असून ध्यानस्थ असल्याचे पाहून ते दुःखी होतात. ते पक्षीरुपातील ऋषी मांडव्यला विचारतात, "आम्हाला सांग असा काय गुन्हा तू केलास कीं, तुला सुळावर दिले आहे"?

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशेसातवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशेआठवा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, त्या मांडव्याला जेव्हां ते इतर ऋषी विचारतात तेव्हां तो प्रश्नांकीत होऊन स्वगत बोलतो, मी कोणाला दोष देणार? मी कोणालाही दोष देऊ शकत नाही. जर दोष द्यावयाचाच असेल तर तो मी माझ्या कर्माला देईन. नंतर ते अधिकारी राजाकडे त्या ब्राह्मणाला सुळासह घेऊन जातात. ते पाहून राजा त्याच्या मंत्र्याना सल्ला विचारतो, ते सांगतात कीं हे ऋषी असून शिपायांनी चुकीने त्याला ह्या गुन्ह्यात गुंतवले आहे. राजा ऋषीचे सांत्वन करू लागतो. राजा क्षमा मागून बोलतो, "अहो ब्राह्मण, माझे शिपाई शुद्र वर्णाचे असल्यामुळें त्यांच्या शुद्र बुद्धीमुळें असा प्रमाद झाला आहे". क्षमाशिल मांडव्य त्याने समाधानी होतात. राजा ऋषीमध्ये घुसलेला सुळा काढण्याचा प्रयत्न करतो परंतु, ते शक्य होत नाही तेव्हां ते त्या सुळ्याचे शरीराबाहेरील भाग कापून टाकतात. सुळ्याचा शरीरातील भाग तसांच असतांना मांडव्य ऋषी तेथून बाहेर निघतात. त्या अवस्थेत ते महान ऋषी सर्वोच्च कोटीचे तप यशस्वी करतात जे इतरांना जमले नव्हते. सुळाचा एक मधला भाग त्याच्या शरीरात असल्यामुळें तो ऋषी तिनही जगात अम-मांडव्य ह्या नांवाने ओळखले जाऊ लागतात. असाच तो ज्ञानी ब्राह्मण पवित्र नियमांचे पूर्ण ज्ञान असलेला, यमाच्या घरी जातो व विचारतो, "अरे, न्यायदेवा, असे कोणते पापकर्म माझ्याकडून अजाणता झाले म्हणून मला तू हि शिक्षा केली ते समजेल कां? माझे वैराग्य लक्षात घेऊन तू त्वरित उत्तर दे".

ते ऐकून यमदेव मोठ्या आदरानें मांडव्य ऋषीला सांगतो, "तू जेव्हां लहान होतास तेव्हां एका किटकाला तो गवताच्या पातीवर बसला असतांना चिरडले होतेस. त्या पापाचे परिणाम तू हल्ली भोगत आहेस. अहो ऋषी, तुझे वैराग्य जसें तीव्र त्या प्रमाणात त्या पापाचा परिणाम वृद्धिंगत झाल्यामुळे तुला आता हे भोगावे लागत आहे". ते ऐकून मांडव्य त्याला विचारतात, "मला सांग, ते कर्म माझ्याकडून केव्हां झाले, तेव्हा मी किती मोठा होतो"? यमदेव सांगतो, "तू फार लहान होतास तेव्हां". ते ऐकून ऋषी त्याला सांगतात, "लहान वयात न जाणता जे कृत्य होते त्याला पाप समजता येणार नाही. धर्मशास्त्र त्याला पाप मानत नाही. तू माला अशा मामुली चुकीसाठी जी बेहिशेबी शिक्षा दिली आहेस

त्यासाठी, तूझ्या अशा चुकीमुळे एका ब्राह्मणाला मृत्यूची शिक्षा दिली गेली, अशा अक्षम्य कृत्यासाठी मी तुला शाप देतो कीं, तू माणसात शुद्र म्हणून जन्म घेशील. आणि आजपासून मी असें नियमात बदल करतो कीं, चौदा वर्षाखालील मुलांने केलेल्या कृत्यास पाप समजले जाऊ नये. त्यापेक्षा जास्त वयाच्या इसमाने ते कृत्य केले तर ते शिक्षापात्र पाप समजावे". वैशंपायन सांगतात, अशारितीने ऋषीच्या शापामुळें धर्म (यमदेव) माणसांत शुद्र म्हणून विदूर नांवाने अवतार घेतो. विदूर नितीशास्त्र जाणणारा, राजकारण धुरंधर, आणि हित व अहित ह्यांचे ज्ञान असणारा, क्रोध नसलेला असा निष्पाप प्रवृत्तीचा होता. त्याची दूरदृष्टी व संयमीपणा, सर्वश्रूत होते. तो सदैव कुरु घराण्याच्या भल्याचाच विचार करीत असें.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे आठवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे नववा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, कुरुजंगल, कुरुक्षेत्र व कुरु वंश भरभराटीला आले. पृथ्वीनी भरपूर पिकं द्यावयास सुरुवात केली. शेतीचा विकास झाला, सर्व मोसम योग्य वेळी येऊ लागले. पाऊस सुधारला, झाडे फळाफुलांनी बहरली, दुष्काळ बंद झाले, गुरं ढोर आनंदात वावरू लागली. फुलांना सुगंध वाढला व फळें जास्त चवदार झाली. जणू सत्ययुग अवतरले. नगरातील व्यापार व शेतातील धनधान्य वाढली. व्यापारी, कारागीर, कलाकुलसर करणारे असें सगळे वधारले. शूर योद्धे अधिक शूर झाले. सुवर्ण युग अवतरले. लोकांतील शौर्य वाढल्याने चोर, डाकू नाहीसे झाले. सद्गुण वाढले, एकमेकांबद्दल आदरभाव वाढला, लोभीपणा व अहंकारी प्रवृत्ती नाहीशी झाली. कुरुंची राजधानी दुसरी अमरावती झाली. मोठमोठे राजवाडे, महाल, बाग बगीचे, उद्यानं असा त्या नगरीचा दिमाख होता. आनंदात फिरणारी माणसे दिसत होती. तेथे असलेल्या नद्या, तलाव, झरे, फळांनी डवरलेली झाडी अशा ठिकाणी त्या राज्याची प्रजा वावरतांना दिसत होती. तपस्वी, सिद्ध, मुनी, शरण असें अध्यात्मिक लोक सुद्धा तेथे फिरत असतांना दिसत. अशामुळे कुरु देशाची समृद्धी झालेली दिसत होती. त्या राज्यात कंजुष माणसे नव्हती तसेंच कोणी विधवा होत नसे. तलाव विहीरी कधी कोरडे होत नसत. ब्राह्मणांची घरं पैशानी भरलेली असत. सगळे राज्य जणुकाय रोजच दिवाळी साजरी करीत होती अशी परिस्थिती होती. गुणी भिष्माच्या त्या सुखी राज्यात ठिकठिकाणी यज्ञकुंड होती व भिष्माच्या त्या राज्यात गुणवत्ता एवढी वाढली होती किं, इतर राज्यातील गुणी जन भिष्माच्या राज्यात येऊन राहू लागले होते. त्यामुळे गुणीजनांची संख्या भिष्माच्या राज्यात वाढत होती. भिष्माच्या कार्यक्षम कारभारामुळें लोकांच्या अपेक्षा राजांकडून वाढत होत्या. अशा माहोलात धृतराष्ट्र, पंडु आणि विदूर आपले बालपण घालवत होते. भिष्म त्यांना असें प्रेम देत, जणुकाय ते त्याचीच संतान आहे. सर्व संस्कारातून गेल्यानंतर ते राजपुत्र आपले व्रतस्थ जीवन जगत विद्याभ्यास करत होते. वेदाभ्यास, शस्त्रसंधानादि अभ्यास ते करीत होते. तिरंदाजी, घोडेस्वारी, हत्तीस्वारी, युद्धशास्त्र, तलवारबाजी, दांडपट्टा, अशात ते तरबेज होत होते, त्याशिवाय ते नितीशास्त्र, धर्मशास्त्र, न्याय, तर्क, ते शिकत होते. वेदाच्या अनेक शाखांत ते

शिकत होते व त्याबरोबर सामान्य ज्ञानाचा अभ्यास ते करीत होते. पंडुने तिरंदाजीत सर्वांना हरवले होते. धृतराष्ट्र पेहलवानीत सर्वांना हरवत होते. विदूराचे गुणवत्तेत सार्या विश्वात कोणी तुलना करू शकत नव्हते. नितीशास्त्र, न्याय अशा विषयात विदूराचा हात कोणी धरू शकत नव्हता. अशामुळें सगळे बोलत होते किं, शंतनुच्या घराण्यातील राजपुत्रांना जन्म देणार्या काशीनरेशाच्या मुली, कौसलच्या राजकन्या धन्य होत. सर्व देशांत कुरुजंगल सर्वश्रेष्ठ आहे. पुण्यवंतांत विदूर श्रेष्ठ, सर्व नगरांत हस्तिनापुर श्रेष्ठ. यथावकाश पंडु गादीवर बसला. कारण, धृतराष्ट्र त्याच्या अंधपणामुळें गादीवर बसू शकत नव्हता. विदूर दासीपुत्र असल्याने गादीचा हक्कदार होऊ शकत नव्हता. एक दिवस भिष्म जे राज्यकारभाराचे ज्ञान असलेले, नितीशास्त्र जाणणारे, व धर्मशास्त्राचे ज्ञान असलेले, विदूराला बोलावून सांगतात,

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे नववा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे दहावा

(संभव पर्व पुढे चालू)

भिष्म विदूराला सांगतात, ह्या पृथ्वीवरील सर्व राजे आपले मांडलिक आहेत अशा ख्यातनाम, गुणसंपन्न आणि कर्तृत्ववान घराण्याचा आपल्याला रास्त अभिमान आहे. घराण्याची ख्याती त्यात होऊन गेलेल्या अनेक शूरवीर सम्राटांनी सतत वाढवत नेली. तेजस्वी कृष्ण द्वैपायन, सत्यवती आणि मी तुम्हा तिघांना वाढवले त्यामागील उद्देश हे घराणे अस्तंगत होऊ नये असा होता. आता आपल्या सगळ्याचा असा प्रयत्न असला पाहिजे किं, हे तेजस्वी घराणे असेंच सागरासारखे समृद्ध होत राहील. एवढे बोलल्यानंतर भिष्म पुढे बोलतात, मी असें ऐकत आहे किं, आपल्या मित्र राज्यांच्या घरात तीन कन्या आहेत ज्यांच्याशी आपण नाते करू शकतो. ते राजे आहेत, सुरसेन यादव कुळातील आहे तसेंच गांधारच्या सुवलाची कन्या आणि मद्र देशाच्या राजाची कन्या. त्या सगळ्या राजघराण्यातील आहेत. त्या सुंदर आहेत, शद्ध रक्ताच्या आहेत, म्हणून मला असें वाटते त्यांना मागणी घालणे यथोचित होईल. तू बुद्धिमान आहेस तर तुला काय वाटते ते सांग. ते ऐकून विदूर बोलतो, आपण आमचे बाप आणि माता अहात. आपण आमचे अध्यात्मिक मार्गदर्शक सुद्धा अहात. म्हणून आपल्याला जे योग्य वाटते ते आपण करावे.

वैशंपायन पुढे सांगतात, सर्व पुरोहितांच्या सल्ल्यानंतर भिष्म गांधारच्या सुवलाची कन्या गांधारी हिचा संबंध मोठा मुलगा धृतराष्ट्र ह्याच्यासाठी करण्याचे ठरवतात. गांधारीने शिवाची प्रार्थना करून शंभर पुत्र व्हावे असा आशिर्वाद मिळवला होता, ते भिष्माला समजले तसें त्वरित तो आपला संदेशवाहक दूत गांधारला रवाना करतो. प्रथम गांधार नरेश सुवल त्या संबंधाला विरोध करतात कारण नवरदेव अंध आहे, परंतु, नंतर विचार करून व कुरु घराण्याची ख्याती व समृद्धी लक्षात घेऊन त्या लग्नाला राजी होतो. आपला विवाह अंध पुरुषाशी होत आहे असें जेव्हां गांधारीला समजते तेव्हां ती आपल्या डोळ्यांवर कापडाची पट्टी बांधून स्वतःला अंध करते. शकुनी गांधारीचा भाऊ व सुवलाचा पुत्र तिला घेऊन हस्तिनापुरी येतो व राजपुत्र धृतराष्ट्राशी तिचा विवाह होतो. ते लग्न भिष्माच्या देखरेखी खाली मोठ्या थाटामाटात साजरे होते. शकुनी त्याचा नवरीचा भाऊ म्हणून असलेला मान घेऊन गांधारला परततो. येथे गांधारी कुरु घरात लवकरच स्वीकारली जाते

कारण, तिचे मर्यादाशील वागणे व इतर स्वभावामुळे सर्वच जण तिच्यावर खूष असतात. तिचे पातिव्रत्य सगळ्यांना भावते. मोठ्यांशी तिची वागणूक लोभस होती. अशारितीने गांधारी कुरु परिवाराचा एक भाग बनून जाते.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशेदहावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे अकरावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, यादव कुळात एक सत्त्वशिल राजा असतो, त्याचे नांव सुर, तो वसुदेवाचा पिता असतो व त्याला एक अतिशय सुंदर कन्या असते. तिचे नांव पृथा असते. परंतु, वसुदेवाच्या एका परम मित्राला, कुंतीभोजला जो वसुदेवाचा मामेभाऊ असतो , संतान नसल्याने तो आपली कन्या पृथा त्याला दत्तक देतो. त्यानंतर तिचे नांव कुंती होते . कुंतीभोज आपल्या दत्तक मुलीवर , कुंतीवर यज्ञासाठी येणार्या ब्राह्मणांचे आदरातीथ्य करण्याची कामगीरी सोपवतो. कुंती आपले काम अतिशय समजूतदारपणे करीत असे त्यामुळे सर्व अतिथी ब्राह्मण तिच्यावर संतुष्ट असतात. एकदा दुर्वास ऋषी जे त्यांच्या रागीटपणाबद्दल ओळखले जात ते तेथे येतात. कुंती त्यांचे आगत स्वागत अतिशय आदरपूर्वक करते व त्यामुळें दुर्वास ऋषी तिच्यावर प्रसन्न होतात. दुर्वास त्यांच्या भविष्य दर्शन सिद्धीने हे जाणतात किं, पुढे होणारा तिचा पति पंडु कोणते गैर कृत्या करणार आहे व त्यामुळें पुढे कुंतीच्या नशिबी काय होणार आहे . ते तिला एक मंत्र संस्कारीत करून देतात, त्या प्रमाणे जेव्हां ती तो मंत्र उच्चारून एकाद्या देवतेस बोलवील तेव्हां ती देवता तिच्या पुढे येईल व तिची इच्छा पूर्ण करील. त्यावेळी कुंती तिच्या उपवर वयात होती व नासमजसुद्धा होती, तिला त्या मंत्राबद्दल उत्सुकता होते किं, त्या मंत्राचा खरोखरच प्रभाव आहे कां ते तपासावे. ती त्या समयी अविवाहीत होती तरी ती सूर्याला त्या मंत्राने बोलावते. मंत्र बोलताच सूर्यदेव तिच्या पुढे हजर होतात. तिला आश्चर्य वाटते, कुंती सूर्याला विनंती करते कीं, तिने फक्त मंत्राची प्रचिती घेण्यासाठी तो मंत्र उच्चारला होता. कुंती सूर्याची माफी मांगते . परंतु, सूर्यदेव तिला समजावतात कीं, त्याचे येणे अशारितीने व्यर्थ जाऊ शकत नाही. पण आता तिला सूर्यासह समागम करणे प्राप्त होते. अशारितीने तिला दुर्वास ऋषीच्या मंत्राची प्रचिती येते.

वैशंपायन सांगतात, विवस्वात (सूर्य) तिची भिती काढून टाकण्यासाठी तिला आणखीन कांहीं सांगतात. "अहो, राजकन्या, ह्या मंत्राच्या प्रभावाखाली माझ्याशी संगम झाल्याने तुला पाप लागणार नाही". तरी कुंती त्यांच्या एकत्र येण्यास विरोध करत रहाते . सूर्य मात्र आपल्या विचारांवर ठाम रहातो व सांगतो, "तुला माझ्या स्पर्शाने ताबडतोब पुत्र रत्न

होईल". त्यानंतर एक पुत्र त्यांच्या जवळ येण्याने उत्पन्न होतो. त्याला कर्ण ह्या नांवाने सर्व लोक ओळखतात. तो बाहेरच जन्मला होता व त्याच्या शरीरावर एक शरस्त्राण जन्मतः होते, जे सूर्याचे लक्षण होते. त्याचप्रमाणे त्याच्या कानांत कुड्या होत्या त्याद्वारा असें दिसत होते कीं, कर्ण कुंतीचा मुलगा असला तरी तो अप्रसृत होता . कुंतीच्या सूर्याला बोलावण्याने तो जन्मला असल्याने ती त्याची जन्मदात्री ठरली होती. असा हिम्मतवान शूरयोद्धा, असा जन्मलेला पहिला होता. तो स्वर्गीय देखणेपणाने चमकत होता. कर्णाच्या जन्मानंतर सूर्य कुंतीला तिचे कौमार्य पुनः देतो व निघून जातो. कुंतीचे अजून लग्न झालेले नव्हते. त्यामुळे ती अजून वृश्नी कुळातील समजली जाते. अशा परिस्थितीत ती ते बाळ पदरी पडल्यामुळें विलक्षण स्वरुपाच्या अडचणीत सांपडलेली असते. आपण कोणाला सांगितले किं, हे बाळ अप्रसृत आहे तरी कोणीही त्यावर विश्वास ठेवणार नाही हे ती जाणून होती. अखेरीस ती त्या बाळाला तिच्या आप्तांपासून लपवण्याचा विचार करते. अशारितीने मातृत्व प्राप्त होणे ही एक हास्यास्पद गोष्ट होती व त्याचे कोणत्याही प्रकारे समर्थन होत नव्हते, हे कुंती जाणत होती . शेवटी ती ठरवते किं, ते बाळ यमुनेच्या पाण्यात सोडून द्यावे. अतिशय दुःखाने असा निर्णय कुंतीने घेतला होता . पाण्यात एका मोठ्या कमळाच्या पानावर ती कर्णाला अलगदपणे ठेवते व ते पान पाण्यात सोडते. कर्ण अशाप्रकारे जात असतांना राधा नांवाच्या कोळी (सुत) बाईच्या नवर्याला, आधिरथाला मिळतो. त्या मासेमारी करणार्या जोडप्यास संतान नसल्याने ते कर्णाला आपल्या मुलाप्रमाणे वाढवतात. त्या बाळावर असलेल्या रत्नजडीत शरस्त्राण व कर्णकुड्यामुळे ते त्याला वसुसेना म्हणजे वैभव घेऊन जन्मलेला, असें नांव देतात. कर्ण जसा मोठा होत होता, त्याचे शारीरीक सामर्थ्य दिसत होते. कर्ण उत्स्फूर्तपणे सूर्याची पुजा उषःकालापासून दुपार पर्यंत करीत असें, सूर्याच्या तापाने त्याची पाठ तापून निघत असें. मोठा झाल्यावर स्वसामर्थ्याने तो शूरयोद्धा म्हणून नावाजला गेला. तरी जग त्याला सुतपुत्र म्हणूनच ओळखत होते. कर्णाची सांपत्तिक स्थिती त्याच्या शौर्यामुळे संपन्न झाली व तो ब्राह्मणांना ते मांगतील ते देण्याबद्दल प्रसिद्ध झाला, त्याला दानशूर कर्ण असें जग ओळखू लागले. त्याची ख्याति इंद्रापर्यंत गेली. कर्णाच्या दानशूरपणाची प्रचिती घेण्यासाठी स्वतः इंद्रदेव ब्राह्मणाचे सोग घेऊन कर्णाकडे त्याचे शरस्त्राण मांगतो. त्या शरस्त्राणामुळें कर्ण नेहमी अजिंक्य रहाणार

होता. इंद्र फार दूरदृष्टीने ती मांगणी करतो कारण, त्याला दिसत असते कीं, महायुद्धात कर्णाचा, त्याचा पुत्र फाल्गुनी अर्थात् अर्जुन बरोबर मुकाबला होणार असतो व त्यात अर्जूनाला जीत मिळावी हा इंद्राचा उद्देश असतो. कर्ण त्या ब्राह्मणाच्या सोंगात आलेल्या इंद्राला ते देऊन टाकतो. कदाचित असें असेल कीं, कर्णाला त्याच्या शौर्यावर पूर्ण भरवसा होता. अशारितीने कांहीं प्रश्न न विचारता कर्णांने ते कवच इंद्राला दिल्याने इंद्राला अपराध्याची भावना खाऊ लागते, त्याशिवाय सूर्याचीसुद्धा त्याला भिती वाटली व म्हणून त्या कवचाच्या बदल्यात इंद्र त्याला एक अस्त्र देतो. त्याचा वापर तो फक्त एकदाच करू शकत होता. त्या अस्त्रापुढे कोणीही टिकू शकणारे नव्हते. त्यात देव, असूर, राक्षस, गंधर्व, नाग, मनुष्य अशा कोणावरही तू ते वापरून मारू शकशिल असे इंद्र कर्णाला सांगतो. त्या घटनेनंतर आकाशवाणी होते व वसुसेनाला कर्ण असें म्हणून आवाज दिला जातो, तो पर्यंत तो वसुसेना म्हणून ओळखला जात होता त्याला त्यानंतर सर्वजण कर्ण (स्वताचे कवच काढून देणारा) अशा किताबाने ओळखू लागले.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे अकरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे बारावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, ती मोठे व काळेभोर डोळे असलेली कुंतीभोजाची कन्या , पृथा अप्रतिम सौंदर्य असलेली, गुणवान, सत्वशिल व व्रतस्थ जीवन जगणारी, पुण्यवान असूनही कोण्याही राजांने तिला मांगणी घातली नव्हती. अखेरीस कुंतीभोज तिचा स्वयंवर करण्याचे योजतो.

चलाख कुंती स्वयंवराच्या कक्षात प्रवेश करते . तेथे विराजमान असलेल्या भरत कुळातील पंडुला ती पहाते. पंडु, उंचधिप्पाड, मजबूत बांधा असलेला, मोठ्या डोळ्याचा असा पंडु इतर राजांत उठून दिसत होता. त्याला पाहून कुंती त्याच्या बद्दलच्या आकर्षणामुळें विचलित झाली. त्या मानसिक अवस्थेत ती सुंदरी सावकाशपणे पंडुकडे आपली पावले टाकत जाऊ लागली. चालतांना तिचे अंग उत्तेजनेने कंप पावत होते. अखेरीस स्वयंवराचा हार ती पंडुच्या गळ्यात टाकते. त्यानंतर इतर राजे हत्ती, घोडे, रथ, अशा आपापल्या वाहनाने, तेथून निघून जातात. त्या नंतर त्यांचा विवाह रीतसरपणे कुंतीभोज करतो . कुंती अधिकृतपणे पंडुची वाङ्दत्त पत्नी होते. ते दांपत्य स्वर्गीय जोडी, मेघावत व पौलोमी, असें दिसत होते. रिवाजानुसार कुंतीभोज त्याच्या जावयाला खूप धनसंपत्ती देऊन निरोप देतो. पंडुराजा मोठ्या राजेशाही लव्याजम्याने ज्यांत ब्राह्मण, ऋषी, पुरोहित होते ते राजा व त्याच्या राणीला दुवा देत होते, त्याबरोबर मिरवणूकीत अनेक फलकं व बावटे फडकत होते ती मिरवणूक नजर लागण्यासारखी अविस्मरणीय होती. अशा दिमाखात ती मिरवणूक हस्तिनापुरी पोहोचते. आपल्या निवासी पोहोचल्यावर पंडूने कुंतीचे स्वागत केले जशी रीत होती.

अशा रितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे बारावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे तेरावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, कांहीं काळानंतर भिष्म ठरवतात कीं, पंडुचा आणखीन एक विवाह केला पाहिजे. कारण, कुंतीभोज कुरु घराण्याच्या योग्यतेचे नाहीत असे मत कांहीं ब्राह्मणांनी भिष्माला दिले. म्हणून तोलामोलाच्या घराण्यातील राजकन्या पंडुसाठी निवडण्याचे ठरले. असें ठरवल्या नंतर तो त्याचा फौजफाटा घेऊन मोठ्या दिमाखाने दुसरी पत्नी पंडुसाठी शोधण्यासाठी निघतो. त्याच्या बरोबर त्याचे पुरोहित, मंत्री, ब्राह्मण सल्लागार होते. तो थेट मद्र देशाच्या राजधानीकडे कुच करतो. तो वल्हीक वंशाचा राजा भिष्माचे यथोचित स्वागत करतो. त्याचे स्वागत केल्यानंतर ते सगळे मद्र राजाच्या वाड्यात प्रवेश करतात. तेथे भिष्म व इतर श्रेष्ठींचे पादपुजन होते. असें सगळे आदर स्वागत झाल्या नंतर मद्र देशाचा राजा भिष्माला विचारतो, "आपले असें येथे येणे कोणत्या उद्देशांने झाले आहे ते सांगावे". कुरुघराण्याची इभ्रत सांभाळत भिष्म त्याचा उद्देश सांगतो, मद्र देशाची राजकन्या तिच्या उत्तम गुणांमुळें सर्वश्रूत झाली होती व त्याकारणांने भिष्म राजाला सांगतो किं, त्याला माद्रीचा हात पंडुसाठी पाहिजे. माद्री राजाची धाकटी बहीण असते. भिष्म राजाला सांगतो, "आपण आमच्या तोलामोलाचे अहात आणि आम्हीसुद्धा तुम्हाला फार मानतो. त्या कारणांने मला वाटते आपण हे नाते मान्य करावे. माझ्या माहितीप्रमाणे, दुसरा कोणीही राजा आमच्या योग्यतेचा नाही तरी आपण हा संबंध स्वीकारावा".

ते ऐकल्यावर मद्र नरेश खुष झाल्यासारखे दिसले. परंतु, तो व्यवहारी राजा भिष्माला सांगतो, "आपले म्हणणे मला सर्वथा मान्य आहे पण आमच्या घराण्याचे शल्यांचे, कांहीं रितीरीवाज व प्रथा आहेत. त्याचे पालन करणे आम्हाला बंधनकारक असते. एवढे बोलल्यानंतर भिष्म जे समजायचे ते समजला व आनंदात म्हणाला, आम्ही तुमच्या रितीरीवाज व प्रथांचा आदर करतो. असें बोलून भिष्म सेवकांना आदेश देतो व बरोबर आणलेले अगणित धनदौलत मद्र राजापुढे आणून ठेवतो. तो शल्य राजा ती संपत्ती पाहून फार खूष होतो व ती संपत्ती आपल्या दासांकरवी ताब्यात घेतो. नंतर भिष्माला सांगतो "मला हे नाते मंजूर आहे". त्यानंतर अलंकृत अशी माद्री पंडुशी विवाह करण्याच्या तयारीने

भिष्माबरोबर हस्तिनापुरी हत्तीवर बसून निघते. तेथे योग्य मुहुर्त पाहून भिष्म त्यांचे लग्न लावतो.

अशा दोन विवाहानंतर पंडु आपल्या बायकांबरोबर जीवनाचा आनंद भोगण्यात कांहीं समय घालवल्यावर नवीन युद्धाच्या मोहिमेवर निघतो. कुटुंबातील सगळ्या वडील मंडळींचा तो निरोप घेतो. धृतराष्ट्र त्याचा मोठा भाऊ व अंध, त्याचासुद्धा तो निरोप घेतो. त्याच्या सैन्यात अनेक हत्ती, घोडेस्वार, पायदळ, महारथी असें सगळे असतात. त्याला सदैव यश मिळावे म्हणून सगळी प्रजा यज्ञ व तत्सम आयोजने करीत होती. अशा प्रबळ फौजेसह तो शत्रूंच्या प्रदेशावर चाल करतो. एका लुटमार करणार्या लोकांच्या राज्याचा तो नाश करतो व निष्पाप लोकांचे जीवन सुखरुप करतो. त्या यशानंतर पंडु आपली प्रभावी व शक्तिमान सेना घेऊन मगधचा राजा धिर्गावर चाल करून जातो. धिर्गा स्वताच्या सामर्थ्यावर गर्व करत होता. त्यांने अनेक राजांचा पराभव करून त्यांना खलास केले होते. त्याला पकडून पंडु मारून टाकतो व अनेक निष्पाप लोकांचे जीवन सुखरुप करतो. तेथून तो मिथिला, काशी, सुंभ आणि पुंड्र देशांतील अराजक संपवून शांती व सौहार्द्य वाढवतो. त्याच्या हिम्मतीला कांहीं पारावार नव्हता. त्याची सेना व तो स्वतः उत्तम तिरंदाजीसाठी प्रसिद्ध होते. त्यामुळें त्याची ख्याति सर्वत्र पसरली. अनेक राज्ये त्याची मंडलिक झाली अशारितीने कुरु घराण्याचा नांवलौकीक खूप वाढला. पंडुच्या सामर्थ्यापुढे नमते घेऊन अनेक राजांनी धनदौलत देऊन हस्तिनापुराला श्रीमंत केले. त्याशिवाय उत्तम हत्ती, घोडे, गुरढोरं, म्हैस, बकरे, शेळ्या अशी संपत्ती त्याला देत होते. त्याच्या वाड्यात बक्रू जातीच्या हरणाच्या कातडीचे गालिचे वापरले जात होते. लोक बोलत होते, कुरु घराण्याची शंतनु नंतर जर कोणी शान वाढवली असेल तर ते पंडुने केली. आधीच्या राजाच्या काळात गेलेले प्रदेश पंडुने स्वकर्तृत्वाने परत राज्याला जोडले. जणू साक्षात इंद्र राज्य करीत आहे. असे वैभव प्राप्त केल्यानंतर तो भिष्माचे पाय धरून पुजा करतो. ते करतांना त्याच्या नेत्रांतून आनंदाश्रू निघतात. मोठी कामयाबी प्राप्त केल्यानंतर पंडु राज्यात त्याची यशस्वी सेना घेऊन हस्तिनापुरात प्रवेश करतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे तेरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे चौदावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, एका विधीने पंडु आपल्या हिम्मतीने मिळवलेली अफाट संपत्ती धृतराष्ट्राच्या आदेशानुसार भिष्माला, त्यांची आजी सत्यवती व त्याच्या सर्व मातांना ज्या कौसलच्या राजकन्या होत्या अशा सर्वांना अर्पण करतो. कांहीं हिस्सा न विसरता आपला बंधू विदूराकडे पाठवतो. त्यानंतर इतर आप्तांचा तो कांहीं दान करून सत्कार करतो व अशारितीने पंडु सर्वांना खूष करतो. त्याची आई अंबालिका पंडुला मिठी मारते, तिला इतका हर्ष होतो कीं त्याची तुलना त्या हर्षाशी करता येईल जो इंद्राच्या पत्नीस झाला होता जेव्हां तिने जयंताला मिठी मारली होती. मिळालेली अफाट संपत्ती वापरून धृतराष्ट्र अनेक यज्ञ करतो ज्यांची तुलना शेकडो अश्वयज्ञांशी करता येईल. त्यानंतर झालेल्या कष्टातून आराम मिळावा म्हणून पंडु आपल्या दोनही भार्या, कुंती व माद्री , घेऊन वनांत विश्राम करण्यासाठी निघून जातो. आपले वैभवसंपन्न महाल व श्रीमंती शय्यागृह सोडून तो आता जवळ जवळ कायमचाच वनवासी होण्याचे ठरवतो. शिकार करण्याचा त्याचा छंद त्याला पूर्ण करावयाचा असतो. एका उंच पहाडावर तो स्वतासाठी एक घर बनवून घेतो व तेथे रहातो. ऐरावत त्याच्या दोन हत्तिणांसह फिरावा तसा तो त्याच्या बायकांबरोबर त्या जंगलात भटकत असतो. तेथील वनवासी त्या राजबिंड्या पंडुला त्याच्या दोन बायकांसह व सर्व शस्त्रांने सज्ज असा फिरतांना प्रत्यक्ष परमेश्वरच फिरतो आहे असें समजत होते. धृतराष्ट्राच्या हुकूमानुसार तेथील प्रजा पंडुला त्याच्या सगळ्या गरजा पुरवित होती. अशारितीने पंडुराजाचा समय मजेत जात होता. त्या सुमारास सत्यवती ऐकते किं, देवक राजाला एका शुद्र स्त्रीपासून एक सुकुमार, लावण्यवती मुलगी झाली आहे. त्या मुलीला भिष्म घरी आणतो व तिचा विवाह विदूराशी लावून दिला जातो. त्या पत्नीपासून त्याला अनेक मुलं होतात जी त्याच्या सारखीच तेजस्वी व बुद्धीमान निघतात.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे चौदावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे पंधरावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, त्या सुमारास, अरे राजा जनमेजया, धृतराष्ट्राला गांधारीपासून एक शंभर पुत्र झाले व एका वैश्य स्त्रीपासून एक मुलगा झाला. पंडुला स्वर्गीय देवतांच्या कृपेने पांच हिम्मतवान तेजस्वी पुत्र झाले. ते कुरु घराण्याला वाढवण्यात मदत करतील असें वाटत होते.

जनमेजय राजा वैशंपायन ऋषीला विचारतात, "मला सांगा,धृतराष्ट्राला गांधारीपासून जी शंभर मुलं झाली ती कशी व किती काळात झाली ते. त्यांचे आयुष्य कसे विधात्याने निश्चित केले? आणखीन सांगा, अहो महर्षी, धृतराष्ट्राला त्या वैश्य स्त्रीपासून मुलगा कसा झाला? धृतराष्ट्राची गंधारीशी वर्तणूक कशी होती? पंडुला ती स्वर्गीय मुलं कशी झाली? कारण, पंडुला एका ऋषीचा शापामुळें मुलं होण अशक्य होते. आपण महान ज्ञानी अहात म्हणून मला हे सगळे तुमच्या कडून ऐकावेसे वाटते कारण, मला माझ्या पूर्वजांची सगळी माहिती समजून घ्यावयाची आहे. ".

ते ऐकून वैशंपायन सांगतात, एक दिवस गांधारीकडे ऋषीवर्य कृष्ण द्वैपायन भुकेने व तहानेने व्याकूळ आणि थकलेले असतां आले, गांधारी त्यांचे उत्तम स्वागत करते व त्यांची कृपा प्राप्त करते. व्यासमुनी तिला एक आशिर्वाद तिच्या विनंतीनुसार देतात. गांधारीची इच्छा असते किं, तिला तिच्या पतिसारखे सामर्थ्यवान आणि कर्तृत्ववान शंभर पुत्र व्हावेत. त्यानंतर गांधारी गर्भवती झाली, दोन वर्षे झाली तरी ती प्रसुती करण्याचे लक्षण दिसत नव्हते. गर्भाचा भार तिला सहन होईना असा झाला. त्या गर्भाचा तिला असहय्य व्हावा असा त्रास होऊ लागला. त्या सुमारास ती ऐकते कीं, तिची सवत कुंतीला एक पहाटेच्या सूर्यासारखा तेजस्वी पुत्र झाला आहे. आपल्या आधी कुंतीला पुत्र होतो व माझा गर्भारवास संपत नाही, ह्यामुळें संतापून ती स्वताच्या वाढलेल्या पोटावर जोराजोराने हात मारत रहाते. त्याची कांहींही कल्पना तिच्या नवर्याला नसते. त्या फटक्यांमुळें तिच्या पोटातून एक दोन वर्षाचा वाढलेला मांसाचा गोळा एकाद्या लोखंडाच्या गोळ्यासारखा बाहेर आला. तो गोळा ती फेकून देणार इतक्यात तेथे कृष्ण द्वैपायन हजर होतात. त्यांच्या दिव्य दृष्टाने त्यांना तिच्या कृत्याचे ज्ञान झाले होते. ते तो गोळा त्यांच्या हातात घेतात व

सुवलाच्या मुलीस बोलतात, "हे काय करते आहेस तू"? गांधारी न घाबरता त्यांना सांगते किं, कुंतीला मुल होते व मला होत नाही त्याचा मला राग आला म्हणून असें केले. आपण मला जो दुवा दिला आहे तो आता खरा करा. हा एक नुसतां मांसाचा गोळा आहे त्याचा काय उपयोग? व्यास तिला सांगतात, "माझे शब्द खरे होणार त्याबद्दल निश्चिंत रहावे. मी गमतीने ते बोललो नव्हतो हे लक्षात असू दे". त्यानंतर व्यास सांगतात, शंभर कलश साजूक तुपांने भरून आणावेत. ते कलश एका गुप्त जागी ठेवावेत. त्या काळात थंड पाणी ह्या मांसाच्या गोळ्यावर शिंपत रहावे. कांहीं काळात त्या गोळ्याचे शंभर भागात विभाजन झाले. ते एक एक भाग त्या कलशांत ठेवले गेले. ते तुकडे आंगठ्या इतके होते जेव्हां ते कलशात ठेवले गेले. ते कलश त्या गुप्त जागी होते व त्यांवर लक्ष ठेवलेले होते. ते झाकलेले कलश फक्त सुवलाची मुलगी, गांधारी उघडून पाहू शकेल व तिला व्यास सांगतात कीं, ती दोन वर्षानंतर ते कलश उघडून पाहिल. त्यानंतर व्यास आपल्या तपस्येसाठी हिमालयात निघून गेले. त्यानंतर प्रथम ज्या कलशात दुर्योधनाचा गर्भ होता तो उघडला गेला व त्यातून तो बाहेर आला. जन्माच्या क्रमानुसार कुंतीचा युधिष्ठीर दुर्योधनापेक्षा एका वर्षाने मोठा होता. दुर्योधनाच्या जन्माची वार्ता भिष्म व विदूराला कळवण्यात आली. ज्यावेळी दुर्योधन कलशातून बाहेर आला नेमका त्याच वेळी कुंतीला महाबली भिम झाला आहे. दुर्योधन जन्मला तेंच कोल्ह्यासारखा ओरडू लागला, ते ऐकून आजूबाजुची गाढवं, गिधाडं, कोल्हे, कावळे त्याला साथ देऊन त्यांच्या आवाजात ओरडूं लागले होते. वादळी वारे वाहू लागले. ठिकठिकाणी आगी लागल्याचे सांगतात. ते घडल्याने धृतराष्ट्र घाबरतो व भिष्माला व विदूराला आणि इतर महत्वाचे कुरु लोक, ब्राह्मण आणि इतर मित्रांना विचारतो. तेव्हां ते सगळे सांगतात, जन्माच्या क्रमानुसार कुरु कुळाचा वारस युधिष्ठीर आहे. त्यामुळें युधिष्ठीर गादीचा हक्कदार ठरतो असें ते खात्रीने सांगतात. तरी धृतराष्ट्र त्यांना विचारतो, माझा वारस कधीतरी राजा होइल कां? असें तो विचारतो तसें कोल्हे व इतर श्वापदं जोरजोराने ओरडू लागतात. ते अशुभ लक्षण पाहून तो, धृतराष्ट्र सर्व ब्राह्मणांना बोलावतो, त्याला विदूर सांगतो, "अशी अशुभ लक्षणं पहाता असें समजले जाते कीं, असा राजकुमार त्याच्या घराण्याचा नाश करील. त्यासाठी असा मुलगा टाकून द्यावयाचा असतो, शास्त्रार्थानुसार हेंच आहे. अशा राजकुमारास सांभाळण्याने फक्त नुकसान होईल. त्याला टाकण्याने नंतर

जन्मणार्या नव्याण्णव मुलांचे भाग्य उदयांस येईल. म्हणून तू अरे धृतराष्ट्रा, ह्याला टाकून दे". एक अशुभ मुल टाकल्याने कांहीं तुझे बिघडत नाही, असांच सल्ला सगळे त्याला देतात. ते सांगतात, गांवाच्या भल्यासाठी एक कुटुंब टाकावयाचे असते. कुटुंबाच्या भल्यासाठी एका माणसाला टाकावयाचे असते. राष्ट्राच्या भल्यासाठी गावाला टाकावयाचे असते. आत्म्याच्या भल्यासाठी पृथ्वीचा त्याग माणसाने करावयाचा असतो. असा सल्ला ते सगळे देतात, तरी सुद्धा, त्या मुलाच्या मोहामुळें धृतराष्ट्र दुर्योधनाला सोडण्यास तयार होत नाही. त्यानंतर आठवड्यात ते सगळे उरलेले कलश उघडले जातात व त्यांतून एक एक असें कौरव बाहेर येतात, म्हणजे जन्मतात. त्या सर्व वेळी गांधारी गर्भवती असल्यासारखी होती, त्याकाळात एक वैश्य वर्णाची बाई अंध धृतराष्ट्राची काळजी घेत असें अशा परिस्थितीत त्यांचा संबंध होऊन त्यातून एक मुलगा जन्म घेतो. त्याचे नांव युयुत्सु ठेवले गेले. तो क्षत्रिय पुरुष व वैश्य स्त्री ह्यांपासून झाला म्हणून त्याला कर्ण (कायस्थ) म्हणून सुद्धा ओळखले जाते.

अशारितीने धृतराष्ट्राला एक शंभर पुत्र व एक कन्या व दासीपासून एक पुत्र असे एकशे दोन अपत्ये होतात. त्यातील पुत्र मोठे हिम्मतवान व शूर महारथी होते.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे पंधरावा भाग संपला.

# आदिपर्वाचा भाग एकशेसोळावा

(संभव पर्व पुढे चालू)

जनमेजय विचारतो, "अहो पवित्र, आपण मला सुरुवातीपासूनची सगळी माहिती सांगितली ज्यात धृतराष्ट्राचा जन्म झाला. त्याला व्यासांच्या आशिर्वादामुळें मुलं झाली. परंतु, आपण मला त्याच्या मुलीबद्दल कांहींच सांगितले नाही तरी ते सांगावे. तुम्ही फक्त सांगितले कीं, त्याला एक कन्या होती. ती कशी व केव्हा झाली? त्या गोळ्या व्यतिरीक्त गांधारीला दुसरे कांहीं झाले नव्हते मग ही कन्या कोठून आली"?

वैशंपायन उत्तर देतात, "अहो पांडव, तुझा प्रश्न योग्य आहे. मी हे कसे झाले ते आता सांगतो. व्यासमुनी पाणी शिंपून त्या मांसाच्या गोळ्याचे विभाजन करू लागतात. एक एक भाग एका एका कलशात ते ठेवत होते. मदतीत असलेली दासी नंतर तो कलश गुप्त जागी नेऊन ठेवत होती. हे काम होत असतांना एका बाजूस बसलेली गांधारी विचार करीत होती, ऋषींच्या कृपेने मला शंभर पुत्र तर प्राप्त होतील पण केवळ पुत्र होऊन चालणार नाही कारण, मुलीच्या पतिपासून जे अर्ध्य पितरांना दिले जाते ते होण्यासाठी निदान एक मुलगी मला झाली पाहिजे. आईला मुलाचे कौतुक असते तितकेच तिला तिच्या मुलीचे सुद्धा कौतुक असते. बर्याच वेळा जास्त कौतुक असते. मुलीचे ल़ाड करता येतात तसें मुलांचे होत नाही. असें विचार तिच्या मनात येत होते व ते सगळे कृष्ण द्वैपायनाना त्यांच्या दिव्यदृष्टीने समजत होते. गांधारी मनातल्या मनात विचार करीत असते कीं, ती पवित्र आहे, व्रतस्थ जीवन जगते, सर्व व्रतवैकल्ये नियमांनुसार करते, दान धर्मसुद्धा नियमितपणे करते, ब्राह्मणांकडून यज्ञयाग करून घेते अशी सर्व धार्मिक कर्तव्ये यथासांग पूर्ण करते म्हणून तिची हि इच्छा विधात्याने पूर्ण केली पाहिजे. तसे जर झाले तर मी स्वताला परमभाग्यवान समजेन. असें विचार तिच्या मनात सतत येत होते. गांधारीचे ते विचार तरंग व्यासांना समजत होते व अखेरीस त्यानुसार ते त्या मांसाच्या गर्भाचे शंभर भाग त्या शंभर कलशांत ठेवल्यावर आणखीन एक लहान भाग उरतो तो ते गांधारीला दाखवतात व सांगतात ही बघ तुझी मुलगी, असें बोलून ते आणखीन एक कलश मागवतात व त्यात तुप भरून त्यात तो गर्भाचा तुकडा सोडतात. कृष्ण द्वैपायन नंतर गांधारीला सांगतात ह्यातून तुला हवी असलेली तुझी एकुलती एक मुलगी जन्म घेईल. त्या प्रमाणे ते शंभर मुलगे

जन्मल्यानंतर शेवटी त्या तुकड्यातून गांधाराची कन्या जन्म घेते. तिचे नांव दुःशला असते. वैशंपायान पुढे जनमेजयाला विचारतात, "आता बोल, जनमेजया तुला आणखीन काय माहिती तुझ्या कुळाची ऐकावी असें वाटते कां"?.
अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे सोळावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सतरावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायनांचे ते उद्गार ऐकल्यावर राजा जनमेजय त्यांना विनंती करतो, अहो मुनी कृपया त्या दुर्योधनाच्या सगळ्या भावंडांची नांवं त्यांच्या जन्माच्या क्रमांने सांगावीत. ते ऐकून ऋषी वैशंपायन बोलतात, अरे राजा, ही ऐक त्यांची नांवं त्यांच्या जन्माच्या क्रमानुसार, पहिला दुर्योधन, दुःशासन, दुःसह, दुःशल, जलासंध, सम, सह, विंद, अनुविंद, दुःर्धर्ष, सुवाहू, दुशप्रदर्शन, दुर्मर्शन, दुर्मुख, दुश्कर्ण, काम, विविंगसती, विकर्ण, शल, सत्व, सुलोचन, चित्र, उपचित्र, चारुचित्र, सराशन, दुर्मद, दुर्विघ, विवित्सु, विकटांग, उर्नानभ, सुनभ, नंदक, उपनंदक, चित्रवन, चित्रवर्मन, सुवर्मन, दुर्लोचन, अयुवाहू, महावाहू, चित्रंग, चित्रकुंडन , भिमवेगा, भिमवल, बलकी, बलवर्धन, उगायुध, भिम, कम, कनक्य, दृधयुध, दृधवर्मन, दृधक्षेत्र, सोमकिर्ती, अनुदर, धृदसिंद, जरासंध, सत्यसंध, सदस, सुवच, उग्रश्रव, उग्रसेन, सेनानी, दुश्पर्जन्य, अपराजित, कुंडसईन , विसलक्ष, दुर्धर, धृदहस्त, सुहस्त, वटवेग, सुवर्चस, आदित्यकेतु, वहवशीन, नागदत्त, अग्राईन, कवची, क्रथन, कुंड , कुंडधर , धनुर्धर, त्यातील जास्त हिम्मतवान, उग्र, भिमरथ, विरवाहू, अलोल्युप, अभय, रुद्रकर्मन, ध्रिदर्श, अनध्रिष्य, कुंडभेदीन , विरव, दीर्घलोचन, प्रमथ, प्रमीथ, दिर्घरोम, धृगवाहू, महाबाहू, व्युदूर, कनकधर, कुंडसी , विराजस, त्याशिवाय त्यांची एक बहीण दुःशला असते. ते सगळे शूरयोद्धे, महारथी, असे रणविद्येत प्रवीण होते त्याशिवाय त्यांचा वेदाचा अभ्यास होता. अरे जनमेजया, त्या सर्वांसाठी योग्य भार्या निवडल्या गेल्या होत्या. त्याशिवाय धृतराष्ट्र त्याच्या एकुलत्या एक कन्येचा विवाह सिंधचा राजा जयद्रथाशी लावून देतो. धृतराष्ट्राचे सर्व कुटूंब सदैव मोठ्या विलासी जीवनात रहात असतांना पंडुची मुलं मात्र सदैव हालअपेष्टात जगत होती.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशेसतरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे अठरावा

(संभव पर्व पुढे चालू)

जनमेजय पुढे सांगतात, अहो ब्रह्मवर्दी वैशंपायन, तुम्ही मला कौरवांच्या विलक्षण जन्माची सगळी माहिती दिली आहे. व्यासऋषींच्या कृपेमुळें ते कसें झाले ते मी समजलो. त्यांची नांवसुद्धा जन्मक्रमानुसार तुम्ही सांगितली. अहो ब्राह्मण, मी हे सगळे तुमच्यामुळें समजलो. परंतु, माझे अजून समाधान झालेले नाही कारण, मला पांडवांच्या जन्माची कहाणी समजलेली नाही. स्वर्गीय देव, असुर व इतर शक्तींच्या पृथ्वीवर आगमनाची माहिती सांगतांना तुम्ही सांगितले कीं, पांडव सगळे स्वर्गीय हिम्मत असलेले कोणातरी दैविक शक्तीचे अंशात्मक अवतार होते. म्हणून मी त्या दैविक अवतारांची सगळी माहिती आपल्याकडून समजून घेऊ इच्छितो. त्यांची हिम्मत, त्यांचे कर्तृत्व गाथा, अगदी त्यांच्या जन्मापासूनची मला सांगावी. अहो वैशंपायन, त्याची माहिती सांगा. ते ऐकून वैशंपायन त्याला सांगतात, पंडु मृगयेसाठी हिमालयाच्या परिसरातील जंगलातून फिरत असतांना, जेथे हरणांची व इतर हिंस्त्र श्वापदांची मोठी संख्या असते, एक मोठा हरण त्याच्या मादीशी समागम करीत होता ते पाहिले. पंडुला त्यांची त्या त्यांच्या अवस्थेत शिकार करण्याची इच्छा होते व तो पांच तीक्ष्ण बाण, जे सोनेरी पिसांनी सजवलेले होते, त्या दोघांना मारतो. अहो जनमेजय दुर्दैववशात ते दोघे हरण नव्हते, ते एक ऋषीचे युगुल होते. एका मोठ्या ऋषीकुळातील ते होते फक्त हरणाच्या रुपात ते समागमाचा अनुभव घेत होते. बाण लागतांच तो हरण जमिनीवर कोसळतो व किंचाळतो. त्याचे रुप बदलते व तो मनुष्य रुपात ओरडतो, "अरे दुष्ट राजा, पाप्यातला पापीसुद्धा अशाप्रकारे संभोग घेण्याच्या स्थितीत असलेल्यांना मारत नाहीत व ते महापाप कृत्य तू केले आहेस. न्यायदंडानुसार तू चुकीचे कृत्य केले आहेस. तू एका महान कुळात जन्म घेतला आहेस असें असूनही तू ते सगळे विसरून असें अन्याय्य कृत्य केले आहेस. तू थोडासुद्धा विचार केला नाहीस मग ते पशु असले तरी अशा अवस्थेतील कोणालाही साधा त्राससुद्धा द्यावयाचा नसतो हे तू कसे विसरलास. शिकार करण्याच्या वासनेने तू इतका अंध झालास किं हा सारासार विवेक तुला सुचला नाही, तुझा अहंकार तुला हे कृत्य करण्यास भाग पाडत होता".

ते बोलणे ऐकल्यावर पंडु त्याला उत्तर देतो, "अरे हरणा, आम्ही राजे जेव्हां शिकार करतो तेव्हां एकाद्या शत्रूला मारावे अशाबेतांने ती शिकार करत असतो. त्यामुळें तुझे आरोप करणे उचित नाही. तुझ्या प्रकारचे प्राणी शिकारी लपून अथवा उघडपणे असें कसेही मारतो व त्याप्रमाणे मी केले, तू संभोग करत होतास त्या तुझ्या अडचणीच्या अवस्थेचा मी एक शिकारी म्हणून फायदा घेत होतो, तुझ्या प्रणयक्रियेशी मला कांहींच काम नव्हते. अशीच आम्ही शिकार करतो त्यात कांहींच चुकले नाही असें मी समजतो. मला तू दोष देऊ नकोस. तुला माहित असेल कीं, ऋषी अगस्त्य ऋषींनी यज्ञ करतांना वनातील सगळी हरणं मारून देवांची पुजा केली होती. तुला मारण्यात मी ह्याच परंपरेचा उपयोग केला आहे. तू जर मानव रुपात हे करत असतांस तर मी तुला मारले नसते. अशा रुपात संभोग घेण्याच्या तुझ्या वागण्यात चूक आहे, माझ्या मारण्यात नाही". तो हरणाच्या रुपातील ऋषी त्याला समजावतो, "अरे, वीर पुरुष युद्धनितीप्रमाणे शत्रूंवर अचानक हल्ला करीत नाही. ते देवांचे कृत्य नाही, असें युद्ध असुर करतात, काय तू असुर आहेस? शत्रूला सांगून मगच हल्ला करावयाचा असतो हे तुला तुझ्या गुरूने शिकवले नाहीकां? बेसावध शत्रूवर मारा करणे देवांचे काम नाही असें राक्षस, असुर, दैत्य करतात, तू कोण आहेस ह्यांपैकी"? त्यावर पंडु त्या हरणाला बोलतो, "आम्ही शिकार करतांना सावज जितके बेसावध तितके चांगले हेरून मगच त्याची शिकार करतो हे तू जाणतोस. म्हणून अरे हरणां, तू मला ह्याबद्दल दोष देवू नकोस".

हरणाच्या रुपातील ऋषी बोलतो, "अरे राजा, मी तुला एका हरणाला मारलेस म्हणून दोष देत नाही, तू त्या प्राण्याला त्या अवस्थेत मारलेस म्हणून तू दोषी ठरतोस. संभोगसुखाचा त्या हरणाचा हक्क तू मारलास हा तुझा गुन्हा आहे. प्रणय व संभोगसुख हे कोणाही प्राण्याचे हक्क असतात ते तू तोडलेस हा तुझा दोष आहे. माझे प्रणय व संभोगसुख तुझ्यामुळें व्यर्थ झाले. तू पौरवांच्या घराण्यात जन्मला असतांना असा बेजबाबदारपणा तू कसा केलास? तुझ्या ह्या कृष्ण कृत्याचे, अमानुषतेचे, दुष्टपणाचे कोणत्याही युक्तिवादाने समर्थन करता येणार नाही. सर्व वेदांचे ज्ञान घेतलेल्या राजाला असें कृत्य अशोभनीय आहे, अशा कृत्याने तू नरकात जाशिल. वेद सांगतात, राजा तो, जो पापकृत्य करणार्याला शासन करतो, राजा तो जो धर्म, हित व सुख ह्यांचे समर्थन करतो, ते पहाता तू माझे

हरणाच्या रुपात मारून कांहीं पाप केले नाहीस हे मी जाणतो. मी एक मुनी ह्या वनात शांतपणे रहात होतो. अशात तू मला मारलेस म्हणून मी तुला शाप देतो कीं, जर तुझ्या मनात कोणत्याही स्त्रीबद्दल वासना उत्पन्न झाली तर तू तात्काळ मरशील. मी एक मुनी आहे, माझे नांव किमिंदम, वैराग्यात माझा काळ मी एकटा व्यतीत करत होतो. मी हरणाच्या रुपात संभोग करण्याचे कारण ह्या योनीचे संभोगसुख काय असते ते मला अभ्यासावयाचे होते. अशा स्थितीत तू मला मारलेस, मी ब्राह्मण आहे परंतु, तुला ते माहीत नसल्याने ब्रह्म हत्येचे पातक तुला लागत नाही. माझ्या शापामुळें ते दुःख तुला अनुभवास यावे जे मी आज अनुभवत आहे. संभोग घेत असतांना मरणे किती क्लेशकारक असते ते तेव्हांच तुला समजेल. एवढेच नाही तर तू ह्या निष्पाप हरणीस सुद्धा मारलेस म्हणून जेव्हां तू तुझ्या स्त्रीशी संभोग घेशील तेव्हां ती सुद्धा तुझ्या संभोगात असतांना मृत्यू पावेल व तुझ्या बरोबर त्या लोकात जाईल ज्या लोकात तू जाशिल".

"जे दुःख मी आज अनुभवत आहे ते तू व तुझी पत्नी अनुभवाल".

वैशंपायन पुढे सांगतात, एवढे बोलून तो ऋषी पिशाच्च रुपात निघून जातो, पंडु अस्वस्थ होतो, त्याला काय करावे ते समजत नाही, त्याचे वैवाहीक जीवन अशारितीने अचानक रित्या संपुष्टात आलेले पाहून तो कमालीचा दुःखी होतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे अठरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे एकोणीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगत रहातात, त्यानंतर ते हरण मरते. त्यामुळें पंडु व त्याच्या बरोबर असलेल्या त्याच्या दोनही भार्या अतिदुःखाने रडत रहातात. तो दुःखावेगांने उद्‌गारतो, "उच्च कुळात जन्मलेलासुद्धा त्याच्या वासनांधतेच्या कुकर्माने असें दुःख भोगत असतो". पंडुला आठवते किं, त्याचा पितासुद्धा असाच त्याच्या वासनांत अडकल्यामुळें तरुणपणीच मारला गेला होता. त्यामुळें मला त्याच्या जागी कृष्ण द्वैपायनाने जन्म दिला. अशाच वासनांच्या (इच्छांच्या) आहारी जाण्यामुळें आज मी रानावनात हरणांपाठी फिरत आहे. अहो, असें वाटते कीं, सर्व देवांनी माझा त्याग केला आहे. अशा इच्छांचा त्याग करून मी आता मोक्षार्थी होणेच योग्य समजतो. मोक्षार्थी होण्यातील सर्वात मोठा अडथळा असतो, पुत्रप्राप्तीची इच्छा व जगातील इतर प्रलोभने. मी ह्यापुढे ब्रह्मचर्याश्रम स्वीकारणार व माझ्या पित्याप्रमाणे मोश्रमार्गाने जगणार. वैराग्य पालनाने मी माझ्या सगळ्या वासनावर (इच्छांवर) मात करीन. माझ्या भार्यांना सोडून केशवपन करून जगभर फिरत राहीन. जगण्यासाठी भिक्षापात्र हाती घेईन. सर्व लोभ व मोह ह्यांचा त्याग करीन. माझे शरीर धुळींने माखलेले राहिल. मी वृक्षाखाली अथवा निर्जन अशा पडक्या घरांत आश्रय घेईन. मी आनंद व दुःख अशा भावनांपासून दूर राहीन. माझ्यासाठी निंदानालास्ती व सन्मान, सत्कार सारखेच असतील. मला कोणाच्याही आशिर्वादाची अथवा मदतीची अपेक्षा नसेल. मी सगळ्यांशी शांतबुद्धीने वागेन. मी भेटवस्तु स्वीकारणार नाही. मी कोणाची कुचेष्टा करणार नाही व कोणावर रागावणार नाही. मी सदैव आनंदी व इतर जीवांच्या भल्यासाठी राहीन. मी सजीवांच्या चारही प्रकारांना त्रास देणार नाही. ते चारही प्रकार जे अंडज व गर्भज असें असतील. तसेंच किडे व वनस्पती ह्यांनासुद्धा इजा करणार नाही. उलट त्यांना त्यांचे जीवन जगण्यास मदत करीन. जसेकांहीं ते सगळे माझे आप्त आहेत. एका दिवशी मी फक्त पांच किंवा दहा घरातच भिक्षा मांगीन. जर भिक्षा नाही मिळाली तर त्या दिवशी उपाशी राहीन. मी कोणत्याही माणसाकडे एकदाच भिक मांगीन व जर मला भिक नाही मिळाली तर मी आधाशासारखा जास्त घरात फिरणार नाही. भिक मिळो अगर न मिळो माझ्या चित्तवृत्ती स्थीर रहातील, एकाद्या महान संन्याशासारखा निवृत्त असेन. मी कोणाबद्दल

घृणा अथवा आकर्षण बाळगणार नाही. माझ्यासाठी जीवन व मरण सारखेच असेल. मी न जास्त जगण्याची अथवा लवकर मरण्याची अभिलाषा धरणार नाही. सर्व प्रकारचे पापकारक विचार मी सोडून देईन. आनंद मिळण्यासाठी शुभ मुहूर्त पाहून जे यज्ञ केले जातात त्यांचा साधा विचारसुद्धा करणार नाही. मी माझ्या इंद्रीयांच्या भल्यासाठी कोणताही हित अथवा अहित साध्य करण्याचा प्रयत्न करणार नाही. वारा जसा सगळ्यांशी सारखाच वागतो तसा मी वागेन. मी मरणाच्या वेळीसुद्धा निर्भीड असेन. पुत्रप्राप्तीसाठी कांहींही अभद्र काम मी करणार नाही, मुलं झाली काय अथवा न झाली काय मला त्याचे बंधन नसेल. मुलं व्हावी म्हणून कोणताही गैरमार्ग मी आचरणार नाही, ज्या कारणांने दुःख वाढेल. अभिलेषेने प्रेरीत होऊन जो माणूस इतरांकडे पहातो तो एकाद्या कुत्र्यासारखा असतो, तसें माझ्याकडून होणार नाही. जसें मी कोणालाही माझा वंश वाढवण्यासाठी सांगणार नाही.

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने तो राजा पंडु दुःखाने विव्हळत असतो किं त्याचा वंश नष्ट होत आहे कारण त्याला अजून पुत्र झालेला नसतो. पंडु त्याच्या दोनही भार्यांना, कुंती व माद्री, सांगतो, अहो कौशलच्या राजकन्या असलेल्या माझ्या आई, विदूर व भिष्म तसेंच राजकारभारी, सत्यवती, सर्व व्रतस्थ ब्राह्मण, आप्त ह्यांना माझा निरोप द्या कीं, मी पंडु ह्यापुढे वैराग्यमय जीवन जगण्यासाठी जात आहे. माझी अपेक्षा करू नका. ते त्याचे बोलणे एकून त्या दोघीही बायका त्याला बोलतात, "अहो भारतवंशाचे नरकेसरी, ह्यापेक्षासुद्धा इतर पद्धती आहेत व्रतस्थ जीवन जगण्याचे, त्यासाठी सर्वसंगपरित्याग करण्याची आवश्यकता नाही. आमच्या सह राहूनही तुम्ही वैराग्यमय जीवन व्यतित करू शकता. त्यातूनही तुम्हाला मोक्ष प्राप्त होऊ शकतो. वासना औदासिन्य आचरून, सर्व श्रीमंती जीवनाचा त्याग करूनसुद्धा तुम्ही असें व्रत करू शकता. आम्हीसुद्धा तुमच्या बरोबर तसें त्यागमय जीवन जगू शकतो. त्यासाठी असें निघून जाण्याची आवश्यकता आम्हाला दिसत नाही". पुढे त्या बोलतात, "अहो राजेश्वर, तुम्ही जाणकार अहात, तुम्ही जर आम्हाला सोडून गेलात तर आम्ही हे जग सोडून जाऊ". पंडु त्याना उत्तर देतो, "जर तुमचे असें मत असेल तर आपण तिघेही वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करून निघून जाऊ या. आपण माझ्या पितरांचा अक्षय मोक्ष मार्ग स्वीकारून पुढचे जीवन जगू. सर्व त्याग करून आपण

रानावनात भडकत राहू व तेथील फळे, पिकलेली किंवा कच्ची जशी असतील तशी खाऊन राहू. स्नान करून मी नित्य होमहवन करून आपल्या पितरांची पुजा करीन. फाटके वस्त्र व वल्कलं नेसून राहू. गरमी व थंडी सहन करत मार्गक्रमणा करून तपस्या करू. ध्यान साधनेत आपला काळ व्यतीत करू. समाजापासून दूर श्वापदात निर्भयपणे राहू. अशारितीने आपला अंतकाळ येईस्तोवर जीवनक्रमण करू". वैशंपायन पुढे सांगतात, असें बोलून तो कुरु राजा आपल्या बायकांना सांगतो किं, ते त्यांचे सगळे वैभवसंपन्न जडजवाहीर काढून ब्राह्मणांना द्यावेत. सगळ्या सेवकांना सांगतो, "हे सगळे घेऊन तुम्ही हस्तिनापुराला जा व सगळे दान करून टाका. राजा प्रायश्चित्त करण्यासाठी सर्व इच्छा, वासना, आनंद, लैंगिक सुखं ह्यांचा त्याग करून आपल्या दोनही भार्यांसह वानप्रस्थाश्रमात जात आहे असें सांगा". ते राजाचे अघटीत बोलणे ऐकून सगळे सेवक ओरडू लागतात. त्यांच्या दुःखाला पारावार नसतो अखेरीस ते राजाला तेथे सोडून हस्तिनापुरी निघून जातात. हस्तिनापुरात धृतराष्ट्राला जसे वनात काय झाले ते सगळे समजते, तो दुःखीकष्टी होतो. खाणेपिणे त्याना सुचत नाही. कुरुपुत्र पंडु सेवकांचा निरोप घेतल्यानंतर आपल्या दोनही बायकांसह वानातील फळं, कंदमुळं खाऊन रहात भटकत नागसत पर्वताकडे येतो. त्यानंतर चैत्ररथ व मग कालकूट ओलांडून हिमावतात शिरतो. तेथे ते गंधमदन राज्यात येतात. तो भाग महाभूत, सिद्ध, ऋषीवर्य ह्यांचा असतो. त्या उंचसखल प्रदेशांतून ते जात असतात. तेथून ते इंद्रद्युम्न सरोवराकडे पोहोचतात. त्यानंतर हंसकुट पर्वताकडे पोहोचतात. तेथून ते शतश्रृगी पर्वताच्या पायथ्याशी येतात. तेथे तो तीव्र स्वरुपाची ध्यानसाधना करतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे एकोणीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे विसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, पंडु मोठ्या तपोसामर्थ्याने सिद्ध झालेला, त्या परिसरात सर्वांचा आवडता होतो. तेथील ऋषी, सिद्ध, शरण इत्यादि सगळे पंडुला त्याच्या तपोसामर्थ्यामुळें पसंत करतात. वासनांबद्दलचे औदासिन्य, निरहंकारी स्वभाव, स्थीर विवेक अशामुळें पंडु स्वर्गात जाण्यासाठी योग्य ठरत होता. त्याच्या वैराग्यामुळे बरेच ऋषी त्याला त्यांचा भाऊ, परम मित्र मानू लागले होते. पंडुला ते ब्रह्मर्षी समजू लागले होते जरी जन्माने तो क्षत्रिय होता. एकदा पंडु पहातो किं, सगळे ऋषी ब्राह्मण एकत्र जमून कोठेतरी जाण्याच्या तयारीत होते. पंडु त्यांना नम्रपणे विचारतो, "अहो ब्राह्मण, आपण सगळे जमून कोठे प्रयाण करीत अहात"? ते उत्तर देतात, "आज ब्रह्माच्या घरी एक सोहळा आहे, तेथे सगळे स्वर्गीय ऋषी, पितर ज्यांना विश्वनिर्मिती कशी झाली ते पहावयाचे आहे ते जात आहेत". वैशंपायन पुढे सांगतात, पंडु उठला व त्यांच्यात सामील होण्यासाठी तयार झाला. आपल्या दोनही भार्यांना घेऊन तो त्यांच्याबरोबर जाऊ लागला. असेंच ते जात असतांना उत्तरेकडील शतश्रृंगी पर्वताकडे पोहोचल्यावर ते ऋषी पंडुला सांगतात, ह्या पर्वताच्या अनेक शिखरांवर मर्त्य माणूस जाऊ शकत नाही. तेथे देव, गंधर्व, अप्सरा ह्यांच्या रहाण्याच्या जागा आहेत. तेथे स्वर्गीय श्रवणीय सुरांचे गाणे सदैव ऐकता येते. कुबेराचे सुंदर बगीचे उंचसखल प्रदेशात पसरलेले आहेत. विस्तीर्ण नद्यांची खोरी व इतर कडेकपारी आहेत. त्याशिवाय असा बराच भाग येथे आहे जो सदैव हिमाच्छादीत असतो. तेथे वनस्पती श्वापदं अजिबात आढळत नाही. कांहीं प्रदेश असा आहे किं, तेथे सतत पाऊस पडत असतो व त्याकारणांने तेथे कोणीही राहू शकत नाही. तेथे उडणारे पक्षीसुद्धा आढळत नाहीत. फक्त वार्याचे साम्राज्य तेथे असते. मात्र तेथे सिद्ध व ऋषींचा वावर असतो. एवढे सांगून ते ब्राह्मण पंडुला विचारतात, अरे आता सांग अशा ठिकाणी ह्या सुकुमार राजकन्या कशा प्रवास करू शकतील? त्यांना अशा प्रवासाची व त्रासाची सवय नाही. म्हणून त्यांनी आमच्या बरोबर येऊ नये अशा अभिप्राय ते सगळे पंडुला देतात. तेव्हां पंडु त्यांना उत्तर देतो, अहो भाग्यवानानो, मी निपुत्रीक असल्याने मला स्वर्गात प्रवेश नाही. मी हे सगळे माझ्या दुःखाने सांगत आहे, आमचे वैभव केवळ वैराग्य, मला दुःख होते कारण मी माझ्या

पितरांचे ऋण फेडू शकत नाही. मी मेलो कां माझे पूर्वजसुद्धा पाताळात जाणार कारण त्यांना श्राद्ध देण्यासाठी वंशज मी देऊ शकलेलो नाही. त्यांना न्याय मिळणे आवश्यक आहे. माझ्यामुळे त्यांचे नुकसान होणे अप्रस्तुत आहे. स्वर्गातील कोठलाही प्रदेश त्यांना स्विकारणार नाही कारण, त्यांचे श्राद्ध होत नाही. देवांचे यज्ञविधीने श्राद्ध करतात, ऋषींचे ज्ञानप्रसाराने व ध्यानसाधनेने, सामान्य लोकांसाठी सत्चरित्राने श्राद्ध करतात. मी माझ्या ऋषी, देव पितरांचे श्राद्ध केले आहे परंतु, इतर पितरांचे काय हा प्रश्न माझ्यापुढे आहे, तो मला सतावतो आहे. त्यांचे श्राद्ध केवळ पुत्र होण्यानेच पूर्ण होऊ शकते हे तुम्ही सर्व जाणता आहात. अहो विरक्तांनो, मी अजून ऋणमुक्त झालेलो नाही, माझी अशी इच्छा आहे किं, माझ्यावतीने माझ्या बायकांना पुत्र होवोत जसा मी एका ऋषीच्या मदतीने झालो. त्यावर ते ब्राह्मण, ऋषी त्याला सांगतात, अरे भाग्यवान गुणी राजा, तुझ्या भाग्यात कांहीं पुत्र आहेत ते तुला मिळतील. ते पवित्र व देवांसारखे आहेत. ते आम्हाला आमच्या दिव्यदृष्टीने दिसत आहे. तुझ्या पुण्यवंत जीवनाने तुला ते भाग्य प्राप्त झाले आहे. हुशार पुरुष योजनाबद्ध कर्म करतात व त्यांना त्याची उत्तम फळं मिळतात. त्याकरतां तुला तुझ्या मनपसंत संतती होईल. ते ऋषींचे बोलणे ऐकून पंडु त्याला मिळालेल्या शापाची आठवण करून व्यथित होतो. तो काकुळतीने कुंतीला जवळ बोलावतो व विनंती करतो , कांहीं करून तू माझ्यासाठी एक पुत्र जन्माला घालावा कारण त्याशिवाय मला पुढे गती नाही. तुला माहित आहे किं, यज्ञ, दानधर्म, वैराग्य आणि व्रतस्थता ह्यांच्यामुळें सुद्धा निपुत्रीक माणसास मृत्यू नंतर गती मिळत नाही. तुला हेसुद्धा माहित आहे किं, मी निपुत्रीक आहे. त्यामुळे मी कितीही केले तरी स्वर्गात माझे जाणे अशक्य आहे. माझ्या मूर्खपणामुळें माझ्या हातून जे कर्म झाले त्याचे प्रायश्चित्त घेऊनही ते साध्य होणार नाही त्यासाठी तू माझ्यावर एक कृपा कर कीं, तू माझ्या वंशासाठी एक कुलदीपक जन्माला घाल. त्यासाठी कोण्या उच्च वर्णाच्या ऋषीची कृपा संपादन कर. धर्मशास्त्राप्रमाणे, बारा प्रकारचे पुत्र सांगितलेले आहेत जे माणसाला निपुत्रिकते पासून वाचवू शकतात. अहो पृथा, त्या कोणत्या ते सांगतो ते नीटपणे ऐक. पहिला पर्याय, त्या माणसाला त्याच्या पत्नीपासून झालेला, दुसरा त्या माणसाच्या पत्नीला त्याच्या संम्मतिने परंतु, इतर योग्य माणसाच्या वीर्यापासून जन्मलेला, तिसरा, पैसे देऊन इतर पुरुषाकडून परंतु, स्वताच्या बायकोला

झालेला, चौथा, पतिच्या निधनानंतर जन्मलेला, पांचवा, कुमारिके पासून जन्मलेला नंतर दत्तक घेतलेला, सहावा, त्या माणसापासून इतर स्त्रीस झालेला, सातवा, कोणाचा मुलगा जो पुत्रासारखा परंतु, दत्तक न घेता पाळलेला आहे, आठवा, धन देऊन विकत घेतलेला, नववा, जो मुलगा स्वतःहून त्या माणसाचा पुत्र बनला आहे असा, दहावा, लग्ना आधीच्या संबंधातून त्याच्या पत्नीस झालेला, अकरावा, स्वताच्या भावाचा मुलगा, बारावा, त्या माणसास, परंतु, इतर वर्णाच्या बाईपासून झालेला.

स्वतापासून पुत्र होत नसेल तर त्याच्या भावाकडून पुत्र आपल्या पत्नीला होईल तो घ्यावा. आपत्काळी ह्या क्रमाने जो पुत्र प्राप्त होईल तो स्वीकारावयाचा असतो. मनु सांगतात, जर एकाद्याला स्वतापासून पुत्र होत नसेल तर आपल्या पत्नीला दुसर्याकडून संतति करून घेणे संम्मत आहे. असें करणे जरूरीचे आहे कारण पुत्र माणसाला सद्गती मिळवून देण्यात मदत करतो. एवढे बोलून पंडु कुंतीला सांगतो , "हे पहा मी त्या शापामुळे तुमच्यांशी संभोग करू शकत नाही तरी तू तो पुत्र अशा पुरुषांकडून प्राप्त कर जो आपल्या तोलामोलाचा किंवा आपल्यापेक्षा उच्च कुळातील आहे".

पंडु कुंतीला त्यानंतर सांगतो , "ऐक ती कथा त्या शरदंदेयाच्या मुलीची, तिचा पति तिला पुत्र प्राप्त कर अशी आज्ञा देतो तेव्हां ती शूरकन्या तिची मासिकपाळी संपल्यावर एका चौरस्त्यावर येऊन उभी रहाते. तेथे एक ब्राह्मण तिला येतांना दिसतो. त्याला ती तिची इच्छा सांगते व त्यानंतर तो ब्राह्मण पुंगावन विधी उरकून तिला पुत्र देण्याचे काम करतो. त्यापासून तिला  तीन पुत्र होतात. त्यातील मोठा दुर्जय होता. अशारितीने शरदंदेयाचा वंश पुढे चालू रहातो, अग कुती, तू व माद्री दोघीही अशाप्रकारे माझा वंश वाढवण्यात मदत करावी, त्याला माझी पूर्ण परवानगी आहे".

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे विसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशेएकवीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, असें बोलून झाल्यावर त्याला कुंती उत्तर देते , आपण असें जे बोललात ते तुम्हाला शोभत नाही. मी तुमची विवाहीत पत्नी आहे. मी तुमच्याशी प्रामाणिक आहे. तुम्हाला माझ्यापासून सामर्थ्यवान मुलं द्यावी लागतील. त्यानंतरच मी तुमच्याबरोबर स्वर्गात जाईन. कृपया मला आपल्या बाहुत घ्या व आपल्या मुलांना जन्म द्या. मात्र हे लक्षात असु द्या कीं, मी कोणत्याही परिस्थितीत पर पुरुषाच्या बाहुत जाणार नाही, त्याची नुसती कल्पनासुद्धा करू नका. आपल्यापेक्षा श्रेष्ठ कोण पुरुष आहे ते सांगा, मी तुम्हाला एक पौराणिक कथा सांगते ती ऐका, मी तुमची कथा ऐकली आता माझी ऐका. प्राचीन काळी एक राजा पुरुवंशात होता. त्याचे नांव व्युशित्सव होते. तो सत्चरित्र व बलवान होता. एकदा तो एका प्रसंगी यज्ञ करत होता. तेथे इंद्र व इतर ऋषी येतात. राजाच्या यज्ञात इंद्र सोम पिऊन तर्र झालेला होता. त्यांने ब्राह्मणांना मोठी बिदागी दिली. त्यामुळें इंद्र व ते ब्राह्मण राजाच्या यज्ञात सर्वकांहीं करतात व राजर्षींना संतुष्ट करतात. त्या यज्ञानंतर राजा व्युशित्सवाचा उत्कर्ष होत गेला. जणुकाय साक्षात सूर्य चमकत होता. दहा हत्तीची ताकद असलेला तो राजा सर्व दिशांना आपले साम्राज्य वाढवतो. चारही दिशांना ते पसरते अगदी सगळ्या सागरांच्या किनार्यांना टेकलेले असें विस्तीर्ण होते. कुरुं मधला तो एक सर्वश्रेष्ठ राजा समजला जाऊ लागला. त्यांच्या राज्यात सर्व लोक सुखी होते. जसें पिता आपल्या मुलांची काळजी घेतो तसेंच तो आपल्या प्रजेची काळजी घेत असें. अनेक यज्ञ करून तो ब्राह्मणांना अमाप संपत्ती दान करतो. अमुल्य रत्नं व इतर संपत्ती जमवल्यानंतर तो कुरुवंशाचा राजा अनेक वैदीक यज्ञ करतो. त्यासाठी सोमरस वाटतो. त्याचे त्याच्या पत्नीवर अपरंपार प्रेम असते. तिचे नांव वद्रा असते. कक्शिवत राजाची मुलगी असते. ती अप्रतिम सुंदर असते. व्युशित्सव तिच्या पासून कधीच दूर रहात नसें. परंतु, त्याचे अतिलैंगिक व्यसनामुळें अखेरीस राजाला परमा सारखी व्याधी जडते व त्याने तो मरतो. ती निपुत्रिक असते म्हणून ती दुःखाने रडते. कुंती पुढे पंडु ला सांगते, "ऐक राजा, ती वद्रा तिच्या दुःखात काय बोलते. बायको नवरा मेल्यानंतर त्याच्या बरोबर मरते. ती त्याच्या बरोबर तो ज्या लोकांत जातो तेथे जाते. कृपया मला तुझ्याबरोबर घेऊन जा.

तुझ्या गैरहजेरीत मी ह्या जगात काय करणार, तुझ्याशिवाय एक क्षणसुद्धा मी जगू शकणार नाही. हे समजून तू मला तुझ्याबरोबर घेऊन जा. माझ्यावर कृपा कर. मी तुझी सेवक बनून राहीन. मी तेच करीन जे तुझ्या हिताचे आहे. मी माझ्या गत आयुष्यात कांहीं प्रेमी युगुलांना मोडले त्याची शिक्षा मला होत आहे. त्या पापाचे फळस्वरुप हे घडत आहे. नवर्याशिवाय रहणारी बाई दुःख व यातनाशिवाय दुसरे कांहीं मिळवत नाही. मी ह्यापुढे गवताच्या शय्येवर निजेन व सर्व प्रकारच्या सुखांचा त्याग करीन. जरा तुझ्या ह्या दुःखी पत्नीकडे पहा".

कुंती एवढे बोलल्यावर पुनः सांगू लागते , "अशाप्रकारे रडत ती वद्रा आपल्या मृत पतिच्या कलेवराला मिठी मारते. त्यावेळी एक अद्भूत आवाज उठतो, तो सांगतो, उठ वद्रा व येथून निघून जा. मी तुला आशिर्वाद देतो कीं, तुला तीन मुलं होतील. स्नान करून महिन्याच्या आठव्या व चौदाव्या दिवशी तू माझ्या शय्येवर झोप. त्या अद्भूत आवाजाने असें सांगितल्यावर ती वद्रा त्याप्रमाणे करते. त्या राजाच्या  कलेवरा बरोबर ती अशाप्रकारे झोपल्यामुळें तिला सात मुलं होतात. त्यातील तीन शल्व असतात व चार मद्र असतात".

कुंती पंडु ला सांगते, "अशाप्रकारे जसें व्युशित्सवाने वद्राला मुलं दिली तशी तुम्ही मला द्या. मला विश्वास आहे किं जे तपोसामर्थ्य आपण जमवले आहे त्याच्या जोरांवर हे करणे तुम्हाला सहज शक्य होईल".

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे एक विसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे बावीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, कुंत्तीचे ते बोलणे ऐकल्यानंतर तो विद्वान क्षत्रिय राजा , नैतिक मुल्यांची चांगली समज असलेला पंडु तिला उत्तर देतो. "अहो कुंत्ती , तुम्ही जे आता मला सांगितले ते योग्य आहे. प्राचीन काळी होऊन गेलेला व्युशित्सवांने जे केले ते उचित होते. तो स्वर्गीय देवतांच्या बरोबरीचाच होता. आता मी तुला सांगतो जे ऋषींनी त्यांच्या नितीशास्त्राप्रमाणे योग्य म्हणून सांगितले आहे. अहो सुंदर मुख असलेल्या माझ्या अर्धांगिनी, त्या प्राचीन काळी बायका आजच्या सारख्या पुरुषांवर व इतर आप्तांवर विसंबून रहात नव्हत्या. त्या स्वतंत्र बाण्याने आपले स्वामित्व स्वतः गाजवत होत्या. त्या नवर्याशी आजच्याप्रमाणे बांधलेल्या त्याच्या कैदी नव्हत्या. तरीसुद्धा ते त्यांचे वागणे वाईट, पापकारक समजले जात नव्हते. तसे वागणे समाजाला मान्य होते. ते वागणे आज पक्षी व इतर प्राणी आचरत आहेत. ती वर्तणूक ऋषीसुद्धा मान्य करतात. उत्तरे कडे रहाणारे कुरुवंशी आजही तसेंच वागत आहेत. ती प्राचीन प्रथा झाली, आजची प्रथा नंतरच्या काळात प्रचलित झाली ज्याप्रमाणे बाई पुरुषाला बांधली गेली आहे व त्याप्रमाणे सर्व अपेक्षा तिच्याकडून केल्या जात आहेत. तू विचारशील असें कां झाले तर त्याची माहिती मी आता तुला सांगतो, फार प्राचीन काळी एक ऋषी होऊन गेला त्याचे नांव उड्डकल होते. त्याला एक पुत्र होता त्याचे नांव होते स्वेतकेतु. स्वेतकेतु मोठा वैरागी होता. आजची प्रथा ह्या स्वेतकेतुने त्याच्या क्रोधातून सुरु केली. ते काय झाले ते आता सांगतो, एके दिवशी स्वेतकेतु व त्याचा पिता ह्यांच्या समक्ष एका ब्राह्मणाने स्वेतकेतुच्या आईला हात धरून जबरदस्तीने नेले. ते पाहून स्वेतकेतुला फार राग आला. ते पाहून उड्डकल स्वेतकेतुला बोलतो कीं, ते पाहून असा रागावू नकोस. हे जे झाले ते आजपर्यंतच्या मान्यवर प्रथेनुसार झाले आहे. सर्व स्त्रीया आपल्या समाजात पूर्णतः स्वतंत्र आहेत. पुरुष त्यांच्या प्रवृत्तीनुसार जनावरासारखे वागतात. ते ऐकून स्वेतकेतु सांगतो किं, त्याला ही प्रथा मान्य नाही व ती थांबली पाहिजे. त्यानंतर तो आजच्या प्रथेचा ऐलान करतो. त्या प्रमाणे स्त्री व पुरुष ह्यांचे वागणे, त्यांच्या परस्परांबाबतच्या जबाबदार्या ह्यांचे नैतिक नियम त्यांने दिले व ते आज प्रचारात आहेत. ते केवळ माणसांना लागू आहेत, इतर प्राण्यांना

नाहीत. स्वेतकेतुने सांगितलेल्या नियमानुसार स्त्री फक्त एकाच पुरुषाशी निष्ठा बाळगेल, जी तो नियम मोडेल तिला भ्रुणहत्त्या केल्याचे पातक लागेल. तसेंच जो पुरुष आपल्या प्रामाणिक पत्नीशी निष्ठेने रहाणार नाही त्यालासुद्धा त्याच पातकाचा गुन्हेगार समजले जाते. जी स्त्री आपल्या पतिच्या मुलांना जन्म देण्यास नकार देईल तीसुद्धा पापीणी समजली जाईल. अशारितीने हे आज प्रचलित असलेले नैतिकतेचे नियम स्वेतकेतुने त्याआधीच्या नियमांना धुत्कारून सांगितले. आणखीन एक गोष्ट सांगतो ती ऐक माझ्या प्रिय कुंती , असें ऐकिवात आहे किं, मदायनि, सुदासाची पत्नी, तिच्या पतिची पुत्राची अभिलाषा पूर्ण करण्यासाठी वसिष्ठाकडे जाते व त्यापासून तिला एक पुत्र होतो, त्याचे नांव अस्मक, जसें आम्ही कृष्ण द्वैपायनापासून झालो अगदी तसें. हे तिने तिच्या पतिची इच्छा संपन्न करण्यासाठी केले होते. एवढे बोलून नंतर पंडु कुंतीला बोलतो , हे सगळे लक्षात घेऊन तू सुद्धा तसेंच करावेस अशी माझी इच्छा आहे. त्यामुळें आपला कुरुवंश चालू राहील. जर तू माझ्याशी प्रामाणिक असशिल तर तू माझी हि इच्छा पूर्ण करशील. गर्भ धारणेच्या काळात ती फक्त तिच्या पुरुषाशी संबंध करील एरव्हीच्या काळात ती इतर कांहीं करण्यास मोकळी आहे. म्हणजे तिला होणारी संतान फक्त तिच्या पुरुषाचीच असली पाहिजे असे नितीनियमात दिले आहे. अशी आपल्या येथे प्रचलित प्रथा आहे. वेदांतसुद्धा सांगितले आहे किं, बायकोने तिच्या नवर्याची आज्ञा शिरसावंद्य मानली पाहिजे. विशेषकरून जेव्हा माझी प्रजनन क्षमता त्या शापामुळें नष्ट झाली आहे अशा परिस्थितीत तरी तू माझे ऐकले पाहिजेस". पंडु त्याच्या दोनही हाताच्या पंजांचा द्रोण करून तो त्याच्या माथ्यावर धरून तिला विनंती करतो किं, माझी तुला आज्ञा आहे किं तू आपला भरत वंश पुढे चालावा म्हणून योग्य पुरुषाकडून वंशवृद्धी कर. असें जर तू केलेस तर मी त्या लोकांत मेल्यानंतर जाईन जेथे पुत्रवंत लोक जातात. मला आशा आहे कीं, तुझीसुद्धा माझ्यासाठी तींच इच्छा आहे.

वैशंपायन ऋषी पुढे सांगतात, अशारितीने पंडु कुंतीला बोलल्यानंतर आपल्या पतिच्या इच्छेची कदर करणारी ती पंडुची भार्या त्याला सांगते, माझ्या लहानपणी जेव्हां मी माझ्या पित्याच्या घरी रहात होते तेव्हां मी यज्ञासाठी येणार्या पाहुण्या ऋषींची व्यवस्था पहात असें. असे दिवशी एक ब्राह्मण माझ्या सेवेने संतुष्ट होऊन मला एक आशिर्वाद देतात, त्या

ऋषीचे नांव होते दुर्वास. तो आशिर्वाद एका मंत्राच्या स्वरुपात होता. तो मंत्र उच्चारून त्यानंतर ज्या देवाची मी इच्छा करीन तो माझ्यापुढे उपस्थित होईल व माझी इच्छा पूर्ण करील असा तो मंत्र होता. दुर्वास तिला सांगतात किं अशा दैवी पुरुषांपासून मला हवी तशी संतान होईल जरी त्या देवतेला नको असली तरी. आता त्या मंत्राच्या मदतीने मी कोणाही देवतेला बोलावून त्यापासून पुत्र प्राप्ती करू शकेन जर त्याला तुमची परवानगी असेल तर. एवढे सांगून कुंती पंडुला बोलते कृपया मला अशी आज्ञा करा म्हणजे मी त्या मंत्राचा उपयोग करीन. ते ऐकून पंडु बोलतो, "अहो भाग्यवान सुंदरी, मी ह्याच गोष्टीची वाट पहात होतो. मी तुला आज्ञा करतो कीं, तू धर्मदेवाला, यमाला, बोलवावे, त्यापासून कांहीं गैर घडण्याची सुतराम शक्यता नाही. अशा संबंधामुळें आपल्या दोघांचे भलो होईल. त्यापासून होणारा पुत्र कुरुवंशाचे नांव वाढवेल ह्यात शंका नको. असें बोलून पंडु कुंतीला यमदेवाला बोलावण्याची आज्ञा देतो. कुंती पंडुला एक प्रदक्षिणा घालून त्यानंतर तो मंत्र पुटपुटते.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे बावीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे तेवीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, अरे जनमेजया, जेव्हां गांधारी एक पूर्ण वर्ष गर्भवती होती त्या सुमारास कुंती यमदेवाला संभोगासाठी बोलावते . वेळेचा अपव्यय न करता कुंती आवश्यक ते यज्ञ करून दुर्वास ऋषीनी दिलेल्या मंत्राच्या सहाय्याने देवांना आवाहन करत रहाते. तिच्या प्रबळ आवाहनामुळें तिच्याकडे येत होते. यमदेव सुहास्य वदनाने तिला विचारतात, मी तुझ्यासाठी काय करावे असें तुला वाटते? त्याला प्रतिउत्तर म्हणून ती बोलते, "मला तुमच्या कडून पुत्राची अपेक्षा आहे". त्याबरोबर यमदेव व कुंती ह्यांचा संभव होतो आणि कुतीला एक तेजस्वी बाळ होते जे मोठे प्रसिद्ध होणार असते. कार्तिक सप्तमीला त्या बाळाचा जन्म होतो. त्या बाळाचा जन्म होतो त्याच वेळी एक आकाशवाणी होते कीं, "हा पुरुष मोठा हिम्मतवान, गुणवान असा होईल व सर्व पृथ्वीवर राज्य करील व त्याचे नांव युधिष्ठीर असेल. हा त्याच्या जन्मदात्यासारखा न्यायी व सत्यवान असेल. तिनही जगात तो ख्यातनाम होईल".

अशारितीने पंडुला एक पुत्र झाल्यावर तो पुनः कुतीला आर्जव करतो, "हे ऐक कुंती , क्षत्रिय शरीराने प्रबळ असावा लागतो हा मुलगा जरा नाजूक शरीरयष्टीचा दिसतो. म्हणून मी तुला आणखीन एक पुत्र द्यावयाला सांगतो जो अतिशक्तिमान असेल".

ते ऐकून कुंती वायूदेवाला त्या मंत्राच्या सामर्थ्याने आवाहन करते व त्याच्या कडून पुत्राची अपेक्षा करते. वायुदेव सांबरावर आरूढ झालेला असा वेगांने तेथे येतो व कुंतीला विचारतो, "तुला माझ्याकडून काय पाहिजे"? ते ऐकून सस्मित कुती त्याच्याकडून पुत्राची अपेक्षा करते. ती सांगते, "अहो वायूदेव, मला तुमच्यासारखा महाबली पुत्र व्हावा अशी इच्छा आहे जो शरीराने मोठा व कोणालाही सहजपणे चीत करणारा असला पाहिजे, तरी ती तुम्ही पूर्ण करावी". त्याप्रमाणे वायूदेवाच्या संभवाने तिला एक महाबळी पुत्र होतो ज्याचे नांव भिम ठेवले जाते. त्याच्या जन्माचे वेळी पुनः आकाशवाणी होते व ती पंडुला सांगते, "हा तुझा पुत्र शरीर शक्तिमध्ये अजोड आहे व सदैव अजिंक्य राहील". वैशंपायन जनमेजयाला कांहीं आठवले असें करून सांगतात, "मी तुला एक घटना सांगतो, जी भिमाच्या म्हणजे वृकोदराच्या जन्माचे प्रसंगी घडली. त्याचे असें झाले, भिम त्याच्या

आईच्या मांडीवरून खाली पृथ्वीवर पडतो तेव्हां त्या ठिकाणी बसवलेल्या दगडाचा चुराडा होतो परंतु, बाळ वृकोदराला कांहींच होत नाही. वृकोदर त्याच्या आईच्या मांडीवरून खाली पडतो कारण तेथे ती एका वाघाला येतांना पहाते व त्यामुळे घाबरून जाते व त्या धडपडीत भिम जमिनीवर कोसळतो. तो प्रकार पंडु पहातो, आणखीन एक योगायोग तुला सांगतो अरे जनमेजया, वैशंपायन बोलतात, ज्या दिवशी भिम जन्मला नेमक्या त्याच दिवशी कांहीं घटकांनंतर गांधारीला दुर्योधन होतो. जो नंतर पृथ्वीचा राजा होतो.

पंडुला आणखीन उत्तम पुत्रांची हाव सुटते, तो विचार करतो असा पुत्र व्हावा जो त्याच्या कृत्याने सर्वदूर प्रसिद्ध होईल. पंडु विचार करतो, आपल्याला इंद्रासारखा पुत्र व्हावा त्यासाठी तो निश्चय करतो किं. तो प्रखर तपस्या करून ते बळ मिळवीन किं त्यामुळे त्याला इंद्रासारखा पुत्र होईल. जो सदैव अजिंक्य असेल व जो इंद्रासारखा देखणा सुद्धा असेल. ते ठरवल्यानंतर पंडु कुंतीला सांगतो किं, ती आता एक वर्षभर व्रतस्थ जीवन व्यतीत करील व पंडुसुद्धा तसेंच करील. पंडु एका पायावर दिवसभर उभे राहून केलेल्या घोर तपस्येमुळें इंद्रदेव प्रसंन्न होतो व त्याला आश्वासन देतो कीं, तो त्याच्यासाठी कुंतीबरोबर संभव करून त्याला हवा असलेला पुत्र देईल जो तिनही जगात ख्यातनाम होईल. जो ब्राह्मणांचा यथायोग्य सत्कार करील, गुरंढोरांचे हित पाहिल व सामान्य प्रजेचेसुद्धा कल्याण करील. दुष्टांचा संहार करील, सज्जनांचा गळ्यातील हार बनेल. आप्त मित्रांची काळजी घेईल. तो शत्रूंचा नाश करील. एवढे बोलून तो वसवा (इंद्र) पंडुला आश्वस्थ करतो. ते ऐकून पंडु कुंतीला बोलतो, "तुझी प्रार्थना यशस्वी झाली आहे, इंद्र तुझ्यासह संभवासाठी तयार झाला आहे. त्याच्या पासून तुला एक अद्वितीय पुत्र होणार आहे. असा पुत्र जो सर्व शत्रूंचा विनाश करील, जो सुबुद्ध असेल, अजिंक्य असेल, जो अतिसुंदर देखणा असेल, ज्याच्या कर्तृत्वाला तुलना नसेल. मी त्याला बोलावले आहे, तुझ्या मंत्राशिवाय, केवळ माझ्या तपोसामर्थ्याने, त्याच्या कडे जा. त्याच्या पासून तुला क्षत्रियोत्तम असा पुत्र होणार आहे".

पुढे वैशंपायन सांगतात, पंडुचे ते बोलणे ऐकल्यानंतर कुंती तिच्या मंत्राच्या जोरावर शक्राला (इंद्राला) आवाहन करते व इंद्र येतो. त्यांच्या त्या समागमातून अर्जुन जन्मतो. त्याच्या जन्माचे वेळी पुन्हा आकाशवाणी होते, "अहो कुंती तुझा हा पुत्र कार्त्यवीर्या सारखा

शक्तिमान व शिवासारखा धैर्यवान होईल. इंद्रा सारखा अजिंक्य, तुझी किर्ती सर्व पृथ्वीभर पोहोचवेल. जशी विष्णूने त्याच्या आईची (अदिती) किर्ती वाढवली होती. तो अनेक वीरांचा पराभव करील जसें मद्र, सोमक, चेड्डी, काशी आणि करूश. तो कुरुवंशाचे नांव किर्तीमान करील. जसें स्वेतकेतु राजाच्या यज्ञात बळीच्या प्राण्यांच्या चरबीने अग्नीचे पोट भरले तसेंच खांडव वनातील आगीने पुन्हा अग्नीचे पोट हा भरेल. हा असा शूर योद्धा होणार आहे जो सर्व मस्तवाल झालेल्या राजांचा पाडाव त्याच्या भावंडांच्या मदतीने करील. हा त्याच्या भावंडांच्या बरोबर तीन मोठे यज्ञ करील. धाडसात हा परशुरामासारखा अथवा विष्णू सारखा होईल. हा प्रसंगी शिवाला आव्हान देईल, त्यानंतर हा शिवाकडून पशुपत अस्त्र बक्षिस मिळवेल. पुढे हा तुझा बलशाली मुलगा इंद्राच्या सांगण्यावरून दैत्य निवटकवचाला मारील. हा तुझा पुत्र इतर अनेक दैवी शस्त्रं व अस्त्रं प्राप्त करील. हा तुझा पुत्र त्याच्या वंशाची संपत्ती पुन्हा संपादन करील. प्रसवशय्येवर पडल्या पडल्या कुंती हे सगळे तिच्या मुलाचे कौतुक ऐकते". ती आकाशवाणी इतक्या मोठ्या आवाजात होती कीं, ती सर्व उंच पहाडांवर रहाणारे, स्वर्गात रहाणारे अशा सगळ्यांना ऐकू आली. ती ऐकून इंद्र स्वतः अत्यंत खुष झाले कारण, अर्जुन त्याचा मुलगा होता. अदृष्य नगारे व ढोलकी ह्यांच्या गाज सर्वत्र आकाशात निनादत होता. अदृष्य पर्या सुगंधी फुलांचा शिडकावा सर्वत्र करीत होत्या. स्वर्गातील विविध जमाती जशा अप्सरा, गंधर्व, किन्नर पृथाच्या नवजात बालकाचे कौतुक करण्यासाठी गाऊ लागले होते. कद्रुची मुलं (नाग लोक) विनताचे गरूड, अरूण, सप्त ऋषी, भरद्वाज, काश्यप, गौतम, विश्वामित्र, जमदग्नी, वसिष्ठ आणि तेजस्वी अत्री ज्यांनी सूर्याच्या गैरहजेरीत सर्व ब्रह्मांड उजळून टाकले होते, असें सगळे त्या कौतुक सोहळ्यात सामील झाले होते. त्याशिवाय मरिची, अंगिरस, पुलस्त्य, पुलह, कत्रू, दक्ष प्रजापति, गंधर्व व अप्सरांच्या विविध टोळ्या त्यांच्या विविध देखण्या दागिन्यानी, पोषाखानी मढून त्यात नृत्य करीत सामील झाल्या होत्या. ते सगळे विभत्सु (अर्जुन) अवतरल्याचे स्तुतिसुमनानी स्वागत करीत होते. तुम्वुरू (तंबोरा, वीणा असें तंतुवाद्य) घेऊन गंधर्व स्वर्गीय मधूर संगीत वाजवू लागले. भिमसेन, उग्रसेन, उर्नयूस आणि अनोघ, गोपती, धृतराष्ट्र, सूर्य व आठवे वर्च, युगप, त्रिनप, कृष्ण, नंदी, चित्रहार, तेरावा कलिशर, चौदावा पर्जन्य, पंधरावा कली, सोळावा नारद असें सगळे तेथे हजर होते. सिद्ध, विर्हद्ध, वृबक, श्रेष्ठ करल, ब्रह्मचारी गण,

वहुगुण, प्रसिद्ध सुवर्ण, विश्वावसु, भूमन्य, सुचंद्र, करू त्याशिवाय स्वर्गातील हह व हुहू ह्या प्रसिद्ध गंधर्वांच्या जमाती, ज्यांच्या स्वरनादाची तुलना होत नाही असें, तेथे होते. अनेक ख्यातनाम अप्सरा त्यांच्या विलोभनीय सौंदर्याने व त्यांच्या रत्नजडीत दागिन्याने तो परिसर सुशोभित करीत होत्या. त्यात विशेष उल्लेख करण्यासारख्या अशा, अनवद्या, गुणमुख्या, गुणवरा, अद्रिका, सोमा, मिश्रकेशी, अलम्वुशा, मरिचा, कुचिका, विद्यात्पर्णा, तिलोत्तमा, अम्विका, लक्ष्मणा, क्षेमदेवी, रंभा, मनोरमा, अशिता, सुवहू, पुंड्रीका, सुगंधा, स्त्रिशा, सुप्रिया, प्रोमथीनी, कम्या, शरदवती अशा सगळ्या एकत्र होऊन नाचू लागल्या. मेनका, सहजन्या, कर्णिका, पुंजिकस्था, ऋतुस्थला, घृताची, विश्वची, पुर्वचित्ती, प्रसिद्ध अप्सरा उमलोचना, दहावी प्रमलोचना, अकरावी उर्वशी ह्या मिनाक्षी (मोठे डोळे असलेल्या) त्यात सुर धरून मदत करीत होत्या. धात्री, आर्यमन व मित्र, वरूण आणि अंगसा, वग, इंद्र स्वतः, विवस्वात (सूर्य), पुशन, तस्त्री, पर्जन्य विष्णू, असें बारा अदिती हजर होते. प्रवकसुद्धा पंडुच्या पुत्राचे कौतुक करण्यासाठी आले होते. अरे जनमेजया आणखीन काय सांगू, मृगव्याध, सर्प, प्रसिद्ध निर्ती, अजैकपद, अहिव्रधन, पिनाकीन, दहन, ईश्वर, कपालिन, स्थानू, प्रसिद्ध भग असें अकरा रुद्र तेथे आले होते. त्याशिवाय आश्विनीकुमार होते. आठ वसू, महाबली मरुत, विश्वदेव, साध्यक सुद्धा तेथे पंडुच्या मुलाचे कौतुक करण्यासाठी हजर होते. त्याशिवाय नागकुळाचे महाबली कर्कोटक, वासुकी, कश्चप, कुंड्ड व प्रसिद्ध तक्षक तेथे आले होते . तर्कश्य, अरिश्तमि, असिताध्यज वगैरे नाग तेथे आले होते. विनताच्या परिवारातील गरूड, अरुण व अरुणी होते. अनेक ऋषी त्यांच्या रथांतून तो सोहळा पहात होते. कांहीं उंच पर्वतांच्या शिखरांवरून पहात होते. त्या सगळ्या सोहळ्यातून एकच गोष्ट दिसत होती कीं, पंडुच्या मुलांवरील त्या सर्वांची प्रेमळ दृष्टी. अशा कौतुकाने भारावून गेलेला पंडु आणखीन एका पुत्राची इच्छा धरतो व कुंतीला बोलतो, कीं, ती आणखीन देवांना आवाहन करावे. परंतु, कुती त्यास सांगते, शहाणे जाणकार चारापेक्षा जास्त अपत्य बाईला होणे अयोग्य समजतात. मी आधीच ती प्रसवली आहेत तेव्हां माझ्याकडून आणखी अपेक्षा करू नये. जी बाई चारांपेक्षा जास्त पुरुषांशी संभोग करते तीला स्वैरीणी समजले जाते. जी पांचांशी संबंध करते तिला वेश्या समजतात. म्हणून माझे स्वामी, कृपया आता मला आणखीन कोणाशी संबंध करावयास

लावू नका. तुम्ही पवित्र नियमांचा चांगला अभ्यास केला आहे त्याचा आपल्याला विसर पडला नाहीना? तेव्हां ह्यापेक्षा कांहीं जास्त सांगण्याची आवश्यकता नाही असें मी समजते.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशेतेवीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे चोवीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन ऋषी पुढे सांगतात, कुंतीचे तीन पुत्र व गांधारीचे शंभर पुत्र जन्मल्यानंतर मद्र देशाची राजकन्या माद्री आपल्या पतिला विचारते, "अहो शत्रूघ्न राजर्षी, माझी कांहीं तक्रार नाही जरी तुम्ही मला स्पर्श केला नाही कारण मी समजते परंतु, आपण जाणता आहात किं, मी जन्माने कुंतीपेक्षा वरचढ असून त्या दृष्टीने मी तिच्यापेक्षा कनिष्ठ झाली आहे. मला त्याचेसुद्धा वाईट वाटत नाही. माझे दुःख एवढेच आहे किं गांधारीलासुद्धा व्यासांच्या कृपेने शंभर पुत्र झाले पण मला अजून कांहीं नाही व तुमच्या परिस्थितीचा विचार करतां, ते साधारण परिस्थितीत शक्य होणार नाही मग मी काय करावे ते सांगा. वस्तुतः मी व कुंती तुमच्यासाठी समान असल्या पाहिजेत, तरी मी निपुत्रिक रहाणे तुम्हाला योग्य वाटते कां"? "आपण कुंतीला सांगून मला पुत्र होईल असें कांहीं करावे. मी तिची सवत आहे म्हणून स्वतः तिला अशी विनंती करण्याचे धाडस माझ्यात नाही तरी तुम्ही सांगाल तर ती नाही म्हणणार नाही ह्याची माझी खात्रा आहे". ते माद्रीचे काकुळतीने बोलणे ऐकून पंडु तिला बोलतो, "अग माद्री, खर सांगावयाचे तर हा विचार माझ्या मनांतसुद्धा गेले कांहीं काळ येत आहे पण तू काय समजशील ह्या शंकेने मी स्वस्थ बसलो आहे. परंतु, आता माझी खात्री पटला आहे किं, तुला कुंतीच्या मंत्राचा उपयोग करण्यात कांहीं हरकत नाही, मग अशा परिस्थितीत मी कुंतीकडे बोलतो , तू आता त्याबद्दल निश्चिंत रहा. मला विश्वास आहे किं, कुंती माझ्या विनंतीचा अव्हेर करणार नाही ".

वैशंपायन पुढे सांगतात, त्यानंतर पंडु कुंतीला एका बाजूस घेऊन तिचे मन वळवण्याच्या उद्देशाने तिला सांगतात, "अहो कुंती , मला आणखीन अपत्ये व्हावी असें फार वाटते त्यासाठी तू मला मदत करू शकशील. तुला माहीत आहे, क्षत्रियाच्या वंशाचा कांहीं भरवसा नसतो. युद्धात वंश नाश पावू शकतो हे तुला एक राजकन्या म्हणून जाणतेसच. त्यासाठी जास्त पुत्र असणे आवश्यक होते. प्रजेच्या व देशाच्या हितासाठी हे अगत्याचे ठरते. त्यासाठी तू मला जास्त मुलं देऊन मदत करू शकतेस. मला ठाऊक आहे किं, असें करणे तुला शक्य नाही परंतु, तू तुझ्या सवतेस बोलावून तिच्या द्वारा हे घडवून आणू शकतेस. असें केल्याने तुझी ख्याति तिनही लोकांत पसरेल. इंद्रसुद्धा अशा किर्तिसाठी

यज्ञ करत असतो. वेदाचे पूर्ण ज्ञान असलेले ब्राह्मणसुद्धा केवळ किर्तीसाठी त्यांच्या अध्यात्मिक गुरूंना वंदन करत असतात. त्यामुळे त्यांचे निरहंकारीपण जगाला समजते. जर तू माद्रीला मदत केलीस व तिचे निपुत्रिकपण संपवण्यास तिला मदत केलीस तर सवतीला मदत करण्याच्या उपकारामुळे तू जगभरच्या स्त्री समाजात ख्यातनाम होशिल. आपण सगळेच किर्तीसाठी प्रतिष्ठेसाठी बर्याच गोष्टी प्रायः करीत असतो. हे लक्षात घेऊन तू माझ्यावरील तुझे प्रेम, माझी इच्छा पूर्ण करून, दाखवशील अशी अपेक्षा धरतो. ते पंडुचे काकुळतीने बोलणे ऐकून कुंती त्याच्या वरील प्रेमामुळें पाघळते. कुती माद्रीला बोलावते व सांगते, "तुला ज्या देवाकडून संतति पाहिजे त्याचे स्मरण कर. ते ऐकून प्रसंन्न झालेली माद्री थोडावेळ विचार करते व ठरवते, ज्या देवांबद्दल तिला नेहमीच आकर्षण होते त्यांच्या देखणेपणामुळें त्या, आश्विनीकुमारांचे ती स्मरण करावे. त्याप्रमाणें आश्विनीकुमार येतात व माद्रीला त्यांच्या पासून दिवस जातात. प्रसुतीत माद्री एका जुळ्याना जन्म देते त्यांची नांवे पहिला आलेला नकुल व नंतर आलेला सहदेव अशी झाली. ती दोनही त्यांच्या जन्मदात्यापेक्षा जास्त देखणे असतात. त्यांच्या जन्माच्या वेळी अशीच एक आकाशवाणी होते व त्यात ती सांगते, हि आश्विनीकुमारांची संतति त्यांच्यापेक्षा जास्त शक्तिमान, सामर्थ्यवान, कर्तृत्ववान होतील. अशारितीने पंडुला पांच पुत्र झाल्यानंतर शतश्रृंगी पर्वतावर रहाणारे ऋषी त्या बालकांना शुभेच्छा, आशिर्वाद देऊन त्यांच्या जन्माचा विधी संपन्न करतात. त्या पांचातील सर्वात मोठा युधिष्ठीर, दुसरा भिम तिसरा अर्जुन व माद्रीच्या उदरी जन्मलेले जुळे नकुल व सहदेव असें हे पांच एकेका वर्षाच्या अंतराने जन्मलेले असतात. ती सगळी स्वर्गीय सौंदर्य असलेली तारकांसारखी चमकणारी मुलं पाहून पंडुचा हर्ष गगनात मावत नाही. आपल्या पूर्वजांचे पारणे फेडण्यासाठी हे पांच आहेत ह्याचा त्याला अत्यानंद झालेला असतो.

माद्री जुळ्यांना प्रसवते हे पाहून कुंती विलक्षण अशा चिंतेत पडते . तशातच एक वर्षानंतर पंडु पुन्हा कुंतीला सांगतो किं . तिने माद्रीला आणखीन एक संधी द्यावी. कुती पंडुला सांगते एका संधीत माझ्या सवतेने दोन मुलं घेतली आता पुन्हा तिला संधी दिली तर ती माझ्यापेक्षा जास्त मुलांची आई होईल ते मला चालणार नाही. माझे महत्व घरातील कमी होईल. कोणत्याही परिस्थितीत माद्रीला माझ्यापेक्षा जास्त अपत्ये होणे मला मंजूर नाही.

असें बोलून कुती पंडुकडे एक वचन मांगते. पंडु कांहीं विचार न करता तिला ते देतो व विचारतो तुला कोणते वचन माझ्याकडून पाहिजे होते? कुंती त्याला सांगते , तुम्ही पुन्हा माझ्याकडे त्या मंत्राचा वापर करण्याची विनंती करणार नाही, असें ते वचन होते. ते ऐकून पंडु समजतो किं, ह्यापुढे जास्त पुत्रांची अपेक्षा करावयाची नाही.

अशारितीने, पंडुची पांच अपत्ये मोठी होऊ लागतात. प्रत्येक मुलगा जसा मोठा होत जातो तसें त्यांचे विलक्षण गुण दिसू लागतात. चंद्रासारखे देखणे, सिंहासारखे अभिमानी, सर्व शस्त्रात पटाईत, तिरंदाजीत तरबेज, बोलण्यात संयमी असें उत्तम पुरुष होत होते. त्यांचे शरीर देखणे, मजबूत, जसें खरे योद्धे असावेत तसें तयार होत होते. त्यांची जशी प्रगती होत होती जसें ते पांचही जण मोठे होत होते त्यांची प्रगती पाहून उंच हिमवत पर्वतांत रहाणारे ऋषी ते न्याहाळत होते व त्यांचे समाधान व्यक्त करीत होते. हे पांच पांडव व धृतराष्ट्राचे शंभर कौरव असें सगळे कुरु वंशाचे वारसदार मोठे होत होते त्यात सगळ्यांना समाधान होते.

जनमेजय वैशंपायनाना विचारतो, "अहो ऋषीवर, पांडवांच्या जन्म वेळी आकाशवाणी झाल्या तसें साधारणपणे एरवी होत नाही, त्याचे कारण काय"? त्यावर वैशंपायन त्याला सांगतात कीं, "अरे राजा, तुझे ते पूर्वज सामान्य पुरुष नव्हते, ते देवाचे अंशावतार होते. कांहीं विशिष्ट कार्य करण्यासाठी पृथ्वीवर त्या निमित्ताने अवतरले होते. अशा प्रसंगी अशा आकाशवाणी होतात".

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशेचोवीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे पंचवीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, आपली पांच मुलं त्या अरण्याने भरलेल्या पहाडातील प्रदेशात वाढत आहेत हे पहात पंडु आपले गेलेले तेज पुन्हा मिळवत होता. एकदा वसंत ऋतूत पंडु व त्याची पत्नी माद्री त्या जंगलात फिरत होते. त्याने पाहिले किं, सगळी झाडे, वेली व वृक्ष फळाफुलांनी भरलेले होते. चौफेर अनेक वृक्ष जसें पलस, तिलक, आम्र, चंपक, पारिजात, कर्णीकर, अशोक, केशर, अतिमुक्तै व कुरुवकै बहरलेले होते व त्यांच्या सुगंधी फुलांवर मधमाशांचे थवे घोंघावत होते. कोकीळ पक्षी त्या झाडाभोवती त्यांचे सुश्राव्य संगीत गांत घिरट्या घालत फिरत होते. त्याशिवाय तो राजा पहात होता किं, इतर बरीच झाडे, वेल त्यावरील बहराने वाकून गेले होते. तो पहातो किं, सभोवार अनेक तलावातील पाणी सुगंधी कमळांने भरली होती. तेथे मंदसा वारा हलकेच फिरत होता. ते सर्व पाहून पंडुच्या काम वासना जागृत होत होत्या. त्याच्या बरोबर त्याची धर्मपत्नी माद्री होती. तिच्या अंगावर झुळझुळीत व तलम असें वस्त्र होते कीं त्यातून तिचे आकर्षक अंग दिसत होते. आपल्या सुकुमार सौंदर्यवती माद्रीला पाहून त्याच्या काम वासना विशेष उत्तेजित होत होत्या. पंडु आपल्या वासनांना संयमित करण्याचा प्रयत्न करीत होता पण सभोवारचे मादक वातावरण त्याला अधिकाधिक कामांध करण्याचे काम करीत होते. भडकलेल्या अग्नीच्या ज्वाळा जशा उफाळतात तशा त्याच्या कामवासना पुनःपुन्हा उफाळत होत्या. शेवटी त्याचा संयम संपला व त्याच्या कामवासना त्याच्या काबूत राहिल्या नाहीत. पंडुला समजले नाही केव्हां त्याने माद्रीचा कोमल हात पकडला. तिने त्याला विरोध केला पण व्यर्थ. पंडुचे पुरुषी सामर्थ्य तिला अडवता आले नाही. माद्री घाबरलेली थरथरत त्याला त्या हरणांने दिलेल्या शापाची आठवण करण्याचा आटोकाट प्रयास करते परंतु, कामांध पंडु तेथे सपशेल दुर्लक्ष करतो. विवेक हरवलेला पंडु माद्रीला घट्ट आलिंगन देतो. अशा कृत्याने त्याचे आयुष्य संपुष्टात येईल तेसुद्धा तो त्याक्षणी विसरला होता. माद्रीबरोबर संभोग तो घेऊ लागला व त्याच क्षणी त्या ऋषीच्या शापाचा प्रभाव दिसला व तो कुरुवंशाचा राजा त्याच्या वासनांच्या कारणाने संभोग करीत असतां तात्काळ मरून जातो. त्या विलक्षण अवस्थेत त्याची पत्नी माद्री त्याचे मृत कलेवर दोनही हातात पकडून तशीच

पडून रहाते. माद्रीचे आर्त किंकाळणे दूर घरात असलेल्या कुंतीला व लहान पांच पांडवाना ऐकू येते. ते सगळे धावत त्या जागी येतात व पहातात पंडु मेलेल्या अवस्थेत पडला आहे. माद्री दुःखाने भरलेल्या आवाजात कुंतीला एका बाजूस येण्यास सांगते व बोलते , मुलांना बाजूला कर, ते ऐकून कुंती पांडवांना बाजूला होण्यास सांगते. पंडु त्या शापाच्या प्रभावामुळें मेला हे समजल्यावर कुंती मोठ्याने हंबरडा फोडते. माद्री पंडुच्या अंगाखालून बाहेर येण्याचा प्रयत्न करीत असते व आता कुंती तिला त्यात मदत करते. पंडुचे शरीर त्या अवस्थेत तसेंच पडलेले पाहून कुती दुःखवेगांने बोलते, "त्यांने (पंडुने) वासनांवर काबू ठेवला असतां तर असा प्रसंग आला नसता. कुंती माद्रीला दोष देते व बोलते , मी असें कधीच होवू दिले नसते, तू जास्त काळजी घ्यावयाला पाहिजे होतीस, तिच्या त्या अर्धपारदर्शक वस्त्राकडे निर्देश करून कुंती काकुळतीने बोलत होती. त्यानंतर ती पंडुला सुद्धा दोष देते, एक राजा असूनही इतका संयम त्याला करता आला नाही हेसुद्धा सदोष आहे असें कुंती सांगते . आपल्याला एका ऋषीने मरतांना शाप दिला आहे ह्याचे भान त्याने ठेवायला पाहिजे होते असें ती बोलते. परंतु, प्रारब्ध कोणीही बदलू शकत नाही व विनाश काळी दुर्बुद्धी उफाळून वर येते हेसुद्धा समजले पाहिजे. हे कुंती समजते. तरी कुंती आपल्या सवतीला पूर्णदोषी ठरवण्यात कांहीं कसर ठेवत नाही. मांद्रीमुळें हे घडले ते कुंती सर्वांच्या मनांत बिंबवते. माद्री पंडुला जास्त आवडत होती ह्याचे कुंतीला सलत होते , त्याला पूर्ण वाट ती आपले दुःख व्यक्त करतांना देत रहाते. ते ऐकून माद्री काकुळतीने रडत रडत कुंतीला बोलते , "माझ्या मोठ्या बहिणी, माझ्या शब्दांवर विश्वास ठेव, मी त्याला कडाडून विरोध केला पण त्याच्या पुरुषी ताकदीपुढे माझे कांहींच चालणे शक्य नव्हते. एक वेळ मला वाटले किं, त्या ऋषीच्या शापाचा प्रभाव वाढत आहे व त्यामुळें एरवी संयमी, विवेकी आणि मर्यादाशील असलेले पंडु अंगात आल्यासारखे वागू लागले होते, कदाचित तू हे मानणार नाहीस कारण आपण सवती आहोत पण मी जे हे सांगितले ते सगळे सत्याला धरून आहे, विश्वास ठेव. जर माझ्या जागी तू असतीस तरी असेंच घडले असते कारण, त्यांना नियंत्रित करणे त्या क्षणी केवळ अशक्य होते". ते ऐकल्यावर गंभीर होऊन कुंती बोलते, "आता आपल्याला पुढचा विचार करावा लागेल". पुढे ती बोलते निर्वाणीची भाषा, कुंती बोलते , "मी आपल्यातील मोठी पत्नी आहे म्हणून माझी जबाबदारी आहे किं, मी

माझ्या पतिसह गेले पाहिजे. माझ्या पश्चात तू सगळ्या मुलांची काळजी घेशील. जरी तुझ्या चुकीच्या वागण्यामुळें आपला नवरा मोहात पडला असला व त्या कारणांने असा प्रसंग झाला असला तरी मोठी सवत ह्या नात्याने मींच त्याच्या बरोबर गेले पाहिजे", कुंत्ती आग्रहपूर्वक बोलते.

माद्री ते ऐकून बोलते, "मी अजून माझ्या पतिला  धरून ठेवले आहे. त्याला मी सोडणार नाही. तू म्हणतेस कीं, मी त्याला मोहात टांकले व म्हणून तो त्या शापाच्या प्रभावामुळें गेला, हे एकापरीने बरोबरच आहे, म्हणून मी त्याच्या जाण्यास कारणीभूत आहे हे तू सुद्धा मान्य करशील म्हणून मीच त्याच्या बरोबर सती जाणार. त्याच्या बरोबर रहाण्याची माझी भूक अजून शमलेली नाही, तू माझी मोठी बहिण आहेस तरी तूंच माझ्या दोन मुलांची काळजी घेशील ह्याबद्दल मला शंका नाही". पुढे माद्री कुंत्तीला विनंती करते किं, ती माद्रीच्या विनंतीला स्वीकारून मागे राहून तिच्या दोन मुलांची स्वताच्या मुलांसारखी काळजी घेईल. माद्री त्यानंतर स्वगत बोलते, भरत कुळाचा तारा त्याच्या अखेरीच्या क्षणी माझ्याबरोबर समागम करण्याची इच्छा धरतो, जरी तो पूर्णपणे जाणत होता किं, असें करण्यांने त्याचा मृत्यू होणार आहे. ह्यातच हे स्पष्ट होते कीं, त्याचे माझ्यावरील प्रेम त्याच्या जगण्यापेक्षाही जास्त होते. नंतर माद्री कुंत्तीला बोलते , "आणखीन एक गोष्ट मी सांगते अग, माझ्या मोठ्या भगिनी ऐक माझे कीं, तुझ्या सारखी मी आपल्या मुलांची काळजी घेऊ शकणार नाही. मुलांना तुझा लळा आहे जसा माझ्याबद्दल त्यांत नाही. तू एक जास्त चांगली माता शाबीत केले आहेस, तुझ्यात मुलांची काळजी घेण्याची जी क्षमता मी पाहिली आहे त्या योग्यतेची क्षमता माझ्यात नाही हे तूसुद्धा जाणतेस. माझे नकुल व सहदेव तुझ्यात अशी रमतात जणूकाय तूंच त्यांची माता आहेस, तसें तुझ्या मुलांचे माझ्याबाबत दिसत नाही. तुझ्या भिमाला सांभाळणे किती अवघड आहे हे तुला मी वेगळे सांगण्याची गरज नाही. तुझ्या मुलांना सांभाळणे माझ्यासारखीला सोपे नाही अशा कांहीं कारणांना समजून तू माझे सती जाणे जास्त रास्त आहे हे मान्य करावे".

वैशंपायन नंतर सांगतात, असे बोलून मद्र देशाची राजकन्या पंडुची (विकत घेतलेली) दुसरी पत्नी, माद्री  सती जाण्याच्या तयारीने तेथेच आपला जीव सोडते.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे पंचवीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सव्वीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, त्या वनातील देवासारखे पवित्र ऋषी जमा होतात व एकमेकांना सांगतात, पंडु त्याच्या किर्तीमान कारभारानंतर वनात तपस्या करण्यासाठी आला व येथे त्याच्या हातून अपघाताने जे दुष्कृत्य झाले त्याच्या बद्दल आपल्या पत्नीद्वयांसह प्रायश्चित्त करीत आपल्या परिवारासह रहात होता, तो आता त्याच्या तपोसामर्थ्यामुळें स्वर्गात गेला आहे त्याच्या दुसर्या पत्नी सह, आता त्यांच्या मुलांची जबाबदारी आपण घेऊ शकत नाही. त्यासाठी आपण सर्व त्या परिवाराला घेऊन हस्तिनापुरी जावयाला पाहिजे. असें ठरवून ते सगळे ऋषी, पंडु व माद्रीचे अस्थी घेऊन व कुंती आणि लहान पांडवांना घेऊन निघतात.

वैशंपायन पुढे सांगतात, ते दैवी ऋषी तो परिवार घेऊन भिष्म व धृतराष्ट्र ह्यांच्या स्वाधीन करण्यासाठी निघतात. कष्टाची सवय नसलेली कुती आता मात्र तो लांबचा प्रवास तिच्या मुलांसह करण्यास सिद्ध होते. कुरुजंगलात आल्यावर त्या नगरीच्या प्रवेशद्वाराशी कुंती उभी रहाते. तिच्या बरोबर असलेले ऋषीजन त्यांच्यासह असलेल्या हमालांना आत राजाला बातमी देण्यासाठी पाठवतात. ती वार्ता येतांच हस्तिनापुराचे हजारो नगरवासी, ऋषी, मुनी आणि शरण एकच गर्दी करून तेथे त्यांना स्वीकारण्यासाठी उभे होतात. सर्वांच्या मुखावर दुःखापेक्षा जास्त आश्चर्यभाव प्रकट होत होता. त्यांचे आगमन मध्यरात्रीचे होते परंतु, जशी पहाट होते तसें लोकांना कळल्यावर जेथून तेथून माणसे तेथे जमू लागतात. आपला मृत राजा व त्याची पत्नी आणि त्यासह आलेली त्याची पांच मुलं व कुती ह्यांना ते न्याहाळू लागतात. राज्यातील सर्व स्त्री पुरुष आपापल्या वाहनांतून त्यांच्या राजाचे शेवटचे दर्शन घेण्यासाठी सगळीकडून येत होते. क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य, सुत व शुद्र प्रजा मोठ्या भावनेने येत होते. त्यावरून पंडु त्याच्या प्रजेत किती प्रिय होता ते दिसत होते. प्रचंड जमाव जमलेला असून इतकी शांतता होती कीं, लोकांच्या मनाचा अंदाज येत होता. एवढा मोठा योद्धा अशारितीने मरावा ह्याने लोक विस्मयचकीत होत होते. शंतनु व सोमदत्त म्हणजेच वल्हिका ह्यांचा पुत्र, भिष्म, राजर्षी धृतराष्ट्र आणि दूरदृष्टीसाठी ओळखले जाणारे विदूर, कौरवांची माता गांधारी, आजी सत्यवती असें सगळे राजकुटूंबातील आप्त

एकत्र झाले होते. त्याशिवाय धृतराष्ट्राची शंभर मुलं आली होती. पंडु व त्याची सती गेलेली पत्नी माद्री ह्यांची शवं घेऊन आलेल्या ऋषींची राजदरबारातील पुरोहितांनी पुजा केली व सर्वांनी भूमीला स्पर्श करून त्यांचे अभिवादन केले. त्यानंतर सर्वश्री भिष्म त्यांचे अभिवादन करतात. आलेल्या ऋषींना ते पाय धुण्यासाठी पाणी देतात. रिवाजानुसार अर्ध्य वाहतात. त्यानंतर राज कारभारातील प्रश्नांवर ते बोलतात. त्या नंतर आलेल्या ऋषींतील ज्येष्ठ उभे  रहातात व त्यांच्या बरोबर इतर ऋषीसुद्धा त्यात सामील होतात. ज्येष्ठ ऋषी बोलतात, "ह्या राज्याचे कुरुवंशाचे राजे पंडु ह्यांनी सर्व प्रकारची प्रलोभने सोडून वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार केला होता. त्यासाठी ते आपल्या भार्यांसह शतश्रृगी पर्वतावर रहाण्यासाठी गेले. ते ब्रह्मचर्य स्वीकारतात तरी कांहीं समजण्या पलिकडील कारणांने त्या वनात देवांच्या कृपेने त्याला मुलं होतात. त्यात युधिष्ठीर प्रथम जन्मतो. त्यासाठी प्रत्यक्ष यमदेव भाग घेतात. त्यानंतर वायूदेवाच्या कृपेने दुसरा जन्मतो त्याचे नांव भिम आहे. त्यानंतर कुंत्तीला इंद्रापासून अर्जुन (धनंजय) जन्मतो. त्यानंतर माद्रीला मातृत्वाची अभिलाषा होते ती पूर्ण करण्यासाठी आश्विनीकुमार मदत करतात व दोन मुलं, नकुल व सहदेव होतात. हे होत असतां पंडुचे वानप्रस्थाश्रम व्रत चालू होते. ह्या व्यवस्थेमुळें त्याच्या आजोबाची वंशपरंपरा चालू रहिली आहे. हे सगळे तेथे अरण्यात होत असतांना आपल्याला येथे हस्तिनापुरात त्याची कांहींच माहिती नव्हती. ह्या पंडुच्या मुलांचे पोषण, शिक्षण योग्य होईल त्याबद्दल कोणालाही शंका नाही. ते यथावकाश सच्चाईच्या मार्गाने आपले काम करण्याचे शिकतील ह्या बद्दल आम्हाला चिंता नाही. आज सतरा दिवस झाले पंडुला देवाघरी जाऊन. जसें पंडुच्या शवाला अग्नी दिला गेला तसें त्याची दुसरी भार्या माद्री त्या चितेवर चढली व त्याच्या बरोबर निघून गेली. माद्री आता सतींच्या स्वर्गात विसावत आहे. आता आपण त्यांच्या आत्म्यांसाठी श्राद्ध द्यावयाचे आहे. ह्या येथे त्यांच्या अस्थि आम्ही आमच्या बरोबर आणलेल्या आहेत. त्याबरोबर आम्ही त्यांची मुलं व विधवा कुंत्ती घेऊन आलो आहोत . त्यांचा राजघरातील मंडळी स्वीकारतील ह्याबद्दल आम्हाला पूर्ण विश्वास आहे. ह्या पंडुच्या परिवाराचे आपण सन्मानपूर्वक स्वागत कराल अशी आम्ही ऋषी अपेक्षा करतो. पंडुच्या दशक्रिया पूर्ण झाल्यावर आपण त्या दोघांचे सपिंड श्राद्ध करणार आहोत. त्यामुळें पंडु त्याच्या पितरांबरोबर व्यवस्थितपणे स्थाईक होऊ शकेल.

वैशंपायन पुढे बोलतात, असें कुरु घरातील सदस्यांना सांगितल्या नंतर ते गुह्यक, ऋषी आणि त्यांच्या बरोबर आलेले सिद्ध असें सगळे, एकदम अदृष्य होतात. त्यांच्या त्या अचानक अदृष्य होण्याने व उंच आकाशात नंतर दिसण्याने प्रभावित झालेले लोक आपापल्या घरी निघून जातात. आता फक्त तेथे कुंती व तिची पांच छोटी मुलं उभी असतात.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे सव्वीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशेसत्ताविसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, धृतराष्ट्र नंतर बोलतात, अहो विदूर, त्या नरकेसरी पंडुच्या अंत्यविधी त्याला शोभेल अशी करावी. पंडु व माद्री ह्याच्या सर्व अंत्यविधी राजघराण्याला शोभतील अशा प्रकारे कराव्यात. त्यांच्या स्मृतीसाठी धन धान्य, गुरं, कपडे वगैरे विविध मौल्यवान चीजांचे दान करावे. लोकांना जेवढे पाहिजे तेवढे द्या कारण त्यामुळें पंडु व माद्रीच्या आत्म्याना शांती मिळेल व ते स्वर्गात सुखाने रहातील. कुंतीला तिच्या पतिचे व सवतीचे श्राद्ध तिला हवे त्याप्रकारे करण्यात सगळे सहाय्य करावे. पंडु व माद्रीचे अस्थी अशारीतीने कपड्यात झाकून ठेवा कीं, सूर्य आणि वायू त्यांना स्पर्श करू शकणार नाही. निष्पाप पंडुच्या मृत्यू करता शोक करू नका कारण त्यांने पांच तेजस्वी पुत्र मागे सोडले आहेत. त्यांच्या रुपाने तो आपल्यात सदैव रहाणार आहे. वैशंपायन नंतर सांगतात, भिष्माची परवानगी घेऊन विदूर त्या सगळ्या प्रस्तावांना मंजुरी देतो. त्या अभागी जोडप्याचा अंत्यविधी नगरा बाहेरील एका रम्य ठिकाणी करण्याचे ठरते. त्यानुसार राजपुरोहित पवित्र अग्नी घेऊन जो शुद्ध तुप व सुगंधी द्रव्यांनी युक्त होता, त्या जागी जातात. मित्र, आप्त ह्यांच्या सानिध्यात त्या अस्थी सुंदर वस्त्रात गुंडाळलेल्या, फुलांनी, हारांनी सुशोभित केलेल्या अशा तेथे मिरवणूकीने आणल्या गेल्या. तेथे त्यांना प्रतिष्ठीत राजघराण्याच्या परिवारातील सदस्यांनी खांद्यावर उचलून सजवलेल्या श्रीमंती चितेवर ठेवल्या गेल्या, त्या अस्थिंवर शुभ्र रंगाची छत्री धरलेली होती ज्याद्वारा हे सुचीत होत होते कीं, त्या खास अस्थी आहेत. विविध वाद्यांचे सुर ऐकण्यास येत होते. सर्व प्रसंग प्रतिष्ठीत परंतु, शोकमय वाटत होता. राजाच्या जाण्याचे सगळ्यांना दुःख झाले होते पण जग कोणासाठी थांबत नाही हे त्या दृष्यांतून व्यक्त होत होते. चितेला अग्नी दिला तेव्हां तेथे जमलेले प्रजाजन रत्नांच्या भेटी देत होते जी अशा प्रसंगी करण्याची प्रथा होती. शुभ्र वस्त्र परिधान केलेले पुरोहित त्या चितेभोवती प्रदक्षिणा करीत साजुक तुप त्या पेटलेल्या चितेत ओतत होते. सर्व प्रजाजन ज्यांत क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य व शुद्र मोठ्या संख्येने मिरवणूकीत त्या ठिकाणी येत होते. ते जोरांनी ओरडत आपले दुःख व्यक्त करीत होते. ते ओरडून त्यांच्या प्रिय राजाला हांका मारत होते व विचारत होते अरे आमच्या राजा तू असा

आम्हाला सोडून कसा जाऊ शकतोस. त्यांच्या आर्त ओरडण्यातून पंडु व मांद्री प्रजाजनात किती प्रिय होते ते दिसत होते. ती मिरवणूक अखेरीस गंगेच्या किनारी पोहोचते. तो प्रसंग असा होता किं, धिरोदात्त भिष्म व विदूरसुद्धा त्यांचे अश्रू आवरू शकले नाहीत. पंडु माद्रीची मुलं पांडव जरी लहान होते त्यांनासुद्धा रडू आले व सगळा प्रसंग मोठा शोकमय झाला होता. पुरोहितांच्या मार्गदर्शनानुसार सर्व विधी संपंन्न होत होत्या. कौरवांनी अखेरीस त्या चितांना अग्नी दिला. ती चंदन, कमळ व इतर सुगंधी द्रव्यानी मढवलेली ती चिता धडधडून पेट घेते. सर्वत्र ते सुगंध पसरले होते. ती पेटलेली चिता पाहून कौसल्या आपले दुःख आवरू शकली नाही व मोठ्याने रडू लागली. अरे माझ्या मुला असें कसें झाले असें ओरडत ती जमिनीवर गडबडा लोळू लागली. तिला दुःख अनावर झाले होते. कुंतीच्या त्या रडण्यामुळें ते सभोवार आणखीनच भावूक झाले. सर्वत्र केवळ दुःख पसरलेले होते. पंडु कायमचा त्यांच्यांतून गेला आहे ह्या जाणीवेने सगळे बेचैन झालेले होते.

भिष्म, विदूर, धृतराष्ट्र, छोटे पांडव आणि शाहीकुटूंबातील स्त्रिया शेवटी पाण्याचे अर्ध्य देतात व नंतर ते सगळे आपला शोक व्यक्त करण्यासाठी शोककाळात जमिनीवर झोपण्याचे ठरवतात. ते पाहून प्रजासुद्धा तसेंच करण्याचे ठरवतात. पंडुंच्या मुलांसाठी सगळ्या लोकांना विशेष वाईट वाटत असते, त्यांचे पितृछत्र इतक्या बालपणी विधात्याने कां काढले, असा प्रश्न ते एकमेकांत विचारत होते.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे सत्ताविसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे अठ्ठावीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

ते सगळे संपल्यावर भिष्म व कुंती त्यांच्या परिवारासह दिवंगत राजाचे पिंडदान करुन श्राद्ध करतात. त्या प्रित्यर्थ ते ब्राह्मणांना अनेक दानं करतात त्यात जमिनीचे दान होते. असें सर्व सोपस्कार झाल्यावर ती सर्व मंडळी हस्तिनापुरी परततात. त्यांचे सुतक संपले होते. तरी त्यांचे दुःख कमी झालेले नव्हते. पिंडदानासह श्राद्ध उरकल्यावर सर्वजण दुःखात बुडलेले पाहून व्यासऋषी त्याच्या मातेस, सत्यवतीला बोलतात, "आई आपले आनंद करण्याचे दिवस संपले आहेत व पुढे संकटांचे दिवस येणार आहेत. पृथ्वीवरील पापाचा भार दिवसेंदिवस वाढतच आहे. जग आता प्रौढ झाले आहे. कौरवांचा आपत्काळ येत आहे तरी ते पहाण्यापेक्षा तू आता सन्यासाश्रम स्वीकारून वनात तपस्येसाठी जाणे उचित वाटते. तू ह्यापुढे योगाभ्यासात तुझा काळ घालवावा असें मला सुचवावेसे वाटते. कारण ह्यापुढे समाजात संशय, फसवणूक, कलह वाढणार आहेत. चांगले घडणे कमी होत जाणार आहे, हे सगळे तू तुझ्या ह्या उतारवयात पहाणे योग्य होणार नाही". व्यासाचे ते सांगणे ऐकल्यावर सत्यवती तेथून उठून आतील कक्षात, जेथे स्त्रीया बसतात तेथे जाते व आपल्या सुनानां सांगते, "अहो अंबिका मला असें समजते किं, तुझ्या नातवंडांच्या अपकृत्यांमुळें भरत साम्राज्य लयाला जाणार आहे. त्याकरतां जर तुझी परवानगी असेल तर मी कौसल्यासह अरण्यात जाऊ इच्छिते". नंतर सत्यवती भिष्माकडे पाहून बोलते, "अहो राजश्री, मी आता संन्यासाश्रमात प्रवेश करीत आहे". अशारितीने उभयतांची परवानगी घेऊन ती आपल्या दोनही सुनांना घेऊन घोर तपस्या करण्यासाठी अरण्यात निघून जाते. त्यांच्या सह कुंतीसुद्धा वनात निघण्याची तयारी करत असतांना विदूर तिला अडवतात व सांगतात, तुझी ह्या मुलांना आवश्यकता आहे, तुझ्या संस्कारात ते वाढणे जरूरीचे आहे. मग ती वनात जाण्याचा विचार सोडून देते.

अरे जनमेजया, अशारितीने तपस्या करणारी गंधवती अर्थात् सत्यवती यथावकाश स्वर्गात जाते. पुढे वैशंपायन सांगतात, पंडुची पांचही मुलं वेदात दिलेल्या संस्कारा नुसार शुद्ध झाल्यावर त्यांचे राजपुत्राचे जीवन जगण्यास सुरुवात करतात. लहान मुलं सगळी एकत्र खेळत असतांना पांडवांच्या श्रेष्ठ गुणांमुळें ते नेहमीच त्यांच्या चुलत भावंडांना, कौरवांना

भारी जात होती. सर्वच खेळांत भिम सगळ्याना हरवत असें मग तो कोणताही खेळ असो. खेळांत हरल्यानंतर बालिशपणाने भिम त्याच्या चुलत भावंडांच्या झिंज्या खेचून त्याना दूर फेकत असें. अशा गोष्टींमुळें त्या दोन चुलत भावंडांत नकळतपणे तेढ वाढू लागली. कधी कधी तो भिम एका वेळी दहा पांच जणांना भारी जात असें. त्या त्याच्या कारवायांमुळें कित्येक कौरवांचे हात तुटले, डोकी फुटली, खांदे उखडले गेले. कधी कधी भिम त्यांना उचलून पाण्यात फेकून देई व त्यांना बुडवण्याचा खेळ करीत असें. जेव्हां ते कौरव झाडांवर फळे काढण्यासाठी चढत तेव्हां भिम ते झाड धरून गदागदा हलवत असें व त्यामुळें ते सगळे त्या झाडावरून खाली पडत असत, त्या बरोबर फळेसुद्धा खाली पडत असतं. हे सगळे भिम त्याच्या अफाट ताकदीमुळें करीत असें परंतु, त्यात कोणतीही पापबुद्धी नसें. भिमाचे असें चाळे पाहून कौरवांचा सर्वात मोठा भाऊ दुर्योधन भिमाचा द्वेष करू लागला. त्यातून तो दुर्योधन, भिम व त्यासह त्याच्या इतर निष्पाप भावंडांना त्रास देण्यासाठी दुष्ट हालचाली करू लागला. त्यात त्याचा उद्देश पांडवांचा मोड करण्याचा असला तरी अजून त्यात पापबुद्धी नव्हती. दुर्योधन त्या भिमात, त्याचा प्रतिस्पर्धी पाहू लागला व त्यासाठी अगदी त्या कोवळ्या वयात तो भिमाला मारून टाकण्यासारख्या योजना आखू लागला ज्यात पापबुद्धी होती. हा एक भिम आपल्यासगळ्या शंभरांना भारी आहे हे दुर्योधनाला सहन होत नव्हते. तेव्हां असें कांहीं केले पाहिजे किं, तो बेसावध असतांना त्याला मारून टाकावयाचे असा बेत तो आखतो. दुर्योधनाने एक गोष्ट भिमाची पाहिलेली असते किं, तो झोपला कीं, मेल्यासारखा झोपतो, त्याचा फायदा घ्यावयाचा असा तो बेत करतो व ठरवतो कीं, भिम बगीच्यात झोपला कीं, त्याला उचलून गंगेच्या वाहत्या प्रवाहात फेकून द्यावयाचे. तो बगीचा गंगेच्या किनार्यालाच असल्यामुळें तसा बेत होता. ते झाले किं, पांडवातील दुसरे भाऊ युधिष्टीर व अर्जुन जे त्यामानाने कमी आगाऊ किंवा मवाळ, आहेत त्यांना कोठल्यातरी कामात गुंतवून ठेवून मी सर्व कौरवांचे संरक्षण करू शकेन. हे ठरवल्यानंतर तो व त्याची भावंड भिम कधी बगीच्यात झोपतो त्याची वाट पहात रहातात. कांहीं काळानंतर दुर्योधन त्याच्या सेवकांकडून गंगेच्या किनारी असलेल्या प्रमनकोटी नांवाच्या ठिकाणी एक वाडा बनवून घेतो. अनेक तलम पडदे व पताका लावून तो त्या वाड्याला चांगलेच सुशोभित करून घेतो. त्या वाड्याचे नांव तो ठेवतो,

जलक्रिडाभुवन. चांगल्या स्वैपाक्यांच्या कडून तो उत्तम खाद्य पदार्थांची व्यवस्था करतो असें कीं, ते खाल्यानंतर झोप येईल. सर्व व्यवस्था झाल्यानंतर दुर्योधन पांडवांना त्या जलक्रिडाभुवनात खेळण्यासाठी बोलावतो. त्याच्या कपट कारस्थानाची कल्पना नसलेल्या व मुळातच निष्कपट अशा युधिष्ठीराला ते आमंत्रण आवडते. सर्व पांडव सुरुवातीपासून त्यांच्या मोठ्या भावाच्या आज्ञेत रहात असल्याने तेसुद्धा तेथे खेळण्यासाठी जाण्यास तयार होतात. पाळलेल्या हत्तींच्या पाठीवर बसून व अवाढव्य आकाराच्या गाड्यातून ते सगळे हस्तिनापूर सोडतात.

ठरलेल्या जागी येतात. त्यांच्या सेवकांना छुट्टी देऊन ते त्या जलक्रिडाभुवनात प्रवेश करतात. त्या रमणीय परिसराचे निरीक्षण ते करत फिरता फिरता त्या वाड्यात प्रवेश करतात. तेथील मनोरम कमानी, सुंदर नक्षिदार काम केलेल्या व रंगवलेल्या भींती व छतं, उंच आणि रुंद दरवाजे, उंच व गोलाकाराच्या खिडक्या असें ते भुवन पाहून ती मुलं रमून गेली. बाहेर बगीच्यात उंच थुईथुई उडणारे कारंजे, त्या तलावातील नितळ पाणी व भोवती दाट पसरलेली वनश्री, तलावाच्या भोवती सुगंधी फुलांचा दरवळ पसरलेला, असें मोठे मनोवेधक वातावरण त्यां मुलांनी अनुभवले. तेथे असलेल्या करमणूकीच्या चीजांचा उपयोग करून आपले मन रमवण्यात ते कौरव व पांडव गर्क झाले. तेथे भरपूर खाद्य पदार्थ होते ते ती मुलं एकमेकांना भरवू लागली. दुष्ट मनाचा दुर्योधन, भिमाला एक विषाने भरलेला अन्नाचा घास भरवतो. त्या बरोबर आणखीन जास्त खाद्य त्याला खाण्यास घालतो, त्याचबरोबर पोटातील द्वेष लपवून व तोंडात गोड बोलून तो भिमाला संशय येणार नाही असें पहातो. मोकळ्या मनाचा तो पांडव ते सगळे आधाशा सारखा खातो. आपला उद्देश साध्य झाला ह्या खुषीत दुर्योधन मात्र इतरत्र खेळण्यासाठी जातो. दिवसभर खेळल्याने थकलेले ते सगळे कौरव व पांडव नंतर त्या प्रशस्थ वाड्यात विश्रांती घेतात. त्यावेळी ते आपले कपडे बदलतात, पूर्णपणे शुभ्र वस्त्र ते नेसतात. सगळ्यांना पाण्यात खेळवणारा भिम त्या कष्टाने बराच थकलेला आसतो. त्यामुळें पाण्यातून बाहेर आल्यावर तो तेथेच किनार्यावर आडवा निजतो. त्यावेळी त्याला खाण्यास दिलेल्या विषारी खाद्यामुळें तो जास्त थकल्यासारखा होतो. थोड्यावेळांनी तो तेथेच वाहणार्या थंड वार्यामुळें गाढ झोपून जातो. त्याच्या सगळ्या अंगात ते जालिम विष सावकाशपणे पसरत

असते. दुर्योधन त्याच्या सगळ्या हालचालीवर लांबून लक्ष देऊन होता. जसा भिम निपचित पडलेला आहे हे तो दुष्ट पहातो तसा तो भिमाच्या जवळ जाऊन त्याला तेथे असलेल्या चिवट वेलांच्या मदतीने घट्ट बांधून गंगेच्या वाहत्या पाण्यात ढकलून देतो. तो बेशुद्ध पांडव पाण्यात बुडतो व खोल आत जातो. खाली त्या प्रवाहात असंख्य विषारी पाणसाप फिरत होते ते भिमाला दंश करू लागतात. भिम आता पाण्यातील नागांच्या वस्तीत येऊन पडलेला असतो. तेथे ते अनेक विषारी साप चावल्यामुळे दुर्योधनाने खायला घातलेल्या वानस्पतिक विषांवर त्या नागांच्या विषाचा उलट प्रभाव होऊन दोनही प्रकारची विषं एकमेकांना बाद करतात व त्यामुळे तो वायूपुत्र मरत नाही. छाती सोडून इतर सर्व शरीरावर त्या सापांनी दंश केलेले असतात. कारण छातीकडील त्याची चामडी इतकी जाड असते किं, तेथे त्या सापांचे दांत घुसू शकत नाहीत. कांहीं वेळांनी भिम शुद्धीवर येतो तसा तो जोरांने ते वेल तोडून टाकतो व स्वतःला मोकळा करतो परंतु, तो आता नागांच्या राज्यात पडलेला असतो. त्याच्या भोवती घोंघावणारे साप त्याला डिवचण्याचा सतत प्रयत्न करीत असतांना तो त्यांना जोरांने फेकून देतो. ते साप त्यांच्या राजाकडे म्हणजे वासुकीकडे जातात व त्याची माहिती देतात. ते सांगतात, "अहो राजा, एक माणूस वेलीने बांधलेल्या स्थितीत आला आहे. त्यांने शुद्धीवर येताच ते वेल तोडले व आमच्यावर धावून आला. त्याचे काय करावे ते सांगा. तो जेव्हां पडला तेव्हां तो कदाचित विषाच्या प्रभावा खाली असावा पण जसें आम्ही त्याला दंश करू लागलो तसें तो शुद्धीवर आला. कृपया हा कोण मनुष्य आहे ते शोधून काढा".

सापांच्या त्या सांगण्यानंतर वासुकी तेथे त्याच्या सहायकांसह जातो. तेथे त्याच्या बरोबर असतो एक नाग, अर्यक. हा गेल्या जन्मी कुंतीचा आजोबा होता . अर्यक भिमाला पाहून त्याला प्रेमांने मिठी मारतो. ते ऐकून वासुकी आनंदीत होतो व अर्यकाला विचारतो, "ह्या तुझ्या नातवा साठी आपण काय करावे ते सांग". "त्या आपण धन रत्नं देऊया कां"? अर्यक सांगतो, "त्या पेक्षा आपण त्याला भरपूर अमृत पाजू. त्यामुळें ह्याच्यात हजार हत्तींचे बळ येईल जे त्याला मानवांच्या जगात अजिंक्य करील". वासुकी त्या प्रस्तावाला मान्यता देतो व त्यानंतर नाग अमृत पाजण्याचा विधी सुरु करतात. प्रथम भिमाला ते न्हाऊ घालतात. पूर्वेकडे तोंड करून तो ते अमृत पिण्यास प्रारंभ करतो. भिम एका झटक्यात

एक अख्खा घडा अमृत पिऊन टाकतो. असें आठ घडे तो पितो त्या नंतर त्याची तहान भागते. त्यानंतर त्याच्यासाठी नाग एक छानसा बिछाना तयार करतात व त्यावर तो झोपतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे अठ्ठाविसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशेएकोण तिसावा

(संभव पर्व पुढे चालू)

पुढे वैशंपायन सांगतात, त्या सुमारास इतर पांडव व कौरव त्याचे खेळणे व विश्रांती संपल्यावर घरी जाण्यासाठी निघतात. त्यांच्या बरोबर भिम नसतो पण त्याचे त्यांना कांहीं वाटत नाही कारण, दुर्योधन त्यांना सांगतो किं कदाचित भिम आधीच घरी एकटा गेला असावा. त्याच्या त्या बोलण्यावर विश्वास ठेवून ते सगळे भिमाशिवाय हस्तिनापुरी आपापल्या गाड्यांतून निघतात. भिम मेला असें समजून दुर्योधन मोठ्या खुषीत त्यांच्या बरोबर घरी जातो. पांडवांचा मोठा युधिष्ठीर निष्पाप मनाचा इतर सगळ्यांना त्याच्या सारखेच निष्पाप व प्रामाणिक समजत असतो. घरी आल्यावर त्याला समजते कीं, भिम घरी पोहोचलेला नाही तेव्हा तो अपराध्याच्या मनाने त्याच्या आईला विचारतो, "आई भिम आला आहे कां"? त्यावर ती त्यांची आई, पृथा त्याला सांगते किं, "अजून भिम आलेला नाही. कोठे गेला असेल तो"? युधिष्ठीर तिला सांगतो, "आम्ही त्याला पुष्कळ शोधले पण तो कोठेच नव्हता. म्हणून मग आम्ही समजलो किं तो शक्तिमान कोणालाही न भिणारा कदाचित एकटाच घरी परतला असावा. परंतु तो आलेला नाही हे पाहून आता मात्र मला काळजी वाटत आहे, काय करावे आता"? "शेवटी त्याला पाहिले तेव्हां तो नदीच्या काठावर थकून झोपलेला होता". "मला वाटते तो झोपेत मेला असावा, किंवा हरवला असावा". ते युधिष्ठीराचे बोलणे ऐकून कुंती जोरांनी किंचाळते व बोलते , "असें होणे शक्य नाही कारण माझ्या मुलांना तसा आशिर्वाद ऋषींनी दिला आहे. तो निश्चितच कोठे तरी आहे, त्याला तुम्ही चौघे जाऊन ताबडतोब त्याला शोधून आणा". त्यानंतर कुंती विदूराला बोलावणे धाडते. कुंती त्यांना बोलते , "अहो इथत्री, माझा भिमसेन हरवला आहे, त्याला शोधून आणले पाहिजे. सहलीला गेलेले सगळे परत आले आहेत पण एक भिम त्यांच्या बरोबर आलेला नाही किंवा एकटासुद्धा माझ्याकडे आलेला नाही तरी आपण कांहीं करावे". "माझा असा कयास आहे किं, त्या दुर्योधनाने कांहीं केले असावे कारण मी जाणते किं, तो भिमाचा द्वेष करत असतो, तसेंच त्याला राजगादीचा मोठा मोह आहे". "कदाचित त्यांने भिमाला रागाच्या भरात मारले असावे. माझे मन आता शांत राहू शकत नाही कांहीं तरी कृपया आपण करावे".

ते तिचे विव्हळणे ऐकून विदूर तिला बोलतो, "तुझ्यावर कृपा आहे, तू असें कांहीं अभद्र बोलू नकोस. तू आता तुझ्या इतर मुलांचे बघ, जर तू समजतेस तसा तो दुर्योधन पांडवांच्या वाईटावर असेल तर तो इतरांनासुद्धा मारण्याचा प्रयत्न करण्याचा संभव आहे. तुला माहीत आहे किं, तुझ्या सगळ्या मुलांना ऋषींचे आशिर्वाद आहेत म्हणून, तू तशा प्रकारचे विचार मनातून काढून टाक". एवढे बोलून विदूर आपल्या गृही जातो व कुंती तिच्या मुलांना घेऊन तिच्या घरी जाते.

ते होत असतांना आठ दिवस जातात व भिम त्याच्या झोपेतून उठतो. अमृताच्या प्रभावामुळें त्याची ताकद कमालीची वाढलेली असते. त्या उठलेला पाहून तेथे असलेले नाग त्याचे स्वागत करतात. ते अर्यक त्याला सांगतात, "अरे भिमा आता तुला कोणीही कशाही प्रकारे मारू शकणार नाही, तुझ्या अंगात हजार हत्तींचे बळ आले आहे. आता तू गंगेच्या पवित्र जलांत स्नान उरकून तुझ्या घरी जावे कारण तुझी आई, माझी नांत तुझ्या काळजीने चिंतेत बसली आहे". ते ऐकून भिम स्नान करतो व शुभ्र वस्त्र परिधान करून थोडा नाश्ता नांगाने त्याला दिलेला परमन्नाचा (भाताची खीर व कच्चे मांस) करतो व निघतो. भिम निघण्याआधी अर्यक, वासुकी आणि इतर मित्र नागांचे शतशः आभार मानून त्यांचा निरोप घेतो. भिम त्या नागांच्या जगातून मानवाच्या जगात येतो. नांग मित्रत्वाच्या नात्याने त्याला मदत करतात व त्याला तो ज्या उपवनात होता त्या ठिकाणी पोहोचवतात. त्यानंतर ते नाग त्याच्या नजरेसमोग अदृष्य होतात. एकदा ह्या जगात आल्यावर तो महाबलशाली आतूरतेने आपल्या आईकडे धाव घेतो. आई व वडील बंधू ह्या दोघांना लवून वंदन करतो. त्याच्या माथ्याचे चुंबन घेऊन कुंती मोठ्या प्रेमाने त्याच्या डोक्याला हुंगते व नंतर मिठी मारते. त्यानंतर सगळेच पांडव त्याला घट्ट मिठी मारतात. तुला परत आलेला पाहून किती आनंद वाटला, आजचा दिवस फारच चांगला आहे, असें म्हणतात. त्यानंतर कुंती त्याच्या अंगाला नागांच्या दंशामुळें झालेल्या जखमांवर औषध लावत असतांना सगळे पांडव एकत्र जमलेले होते तेव्हां भिम त्यांना दुर्योधनाचा डाव सांगतो व त्यानंतर जे घडले ते सगळे सांगतो. त्यात अर्यकांची कृपा कशी झाली तेसुद्धा सांगतो जे ऐकून कुंती सद्गतीत अंतःकरणाने तिच्या आजोबांचे आभार मानते. सर्वच पांडव अर्यक व वासुकीला अभिवादन करतात व त्यांचे उपकार कधीही न विसरण्याचे

वचन देतात. अर्जुन व दुसरे नकुल व सहदेव युधिष्ठीराला सांगतात कीं, त्याने दुर्योधनाला जाब विचारावा परंतु, तो दैववादी त्यांना सांगतो, "जे दैवात लिहीलेले होते ते घडले आता त्याबद्दल कशाला बोलून कौरवांना सावध करावे"?

पांडवाना कौरवांचा त्यांच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन विकृत आहे ते जरी समजले तरी ते तसें न दाखवून त्यांच्या इतर कारवायां कशा असतील त्याचा अंदाज घेण्याचे ठरवतात. आता आपण ह्या कौरवांपासून सदैव सावध राहीले पाहिजे असें तें समजून सर्व प्रकारची दक्षता बाळगण्याचे एकमेकांना सांगतात. त्यांना विदूर काकांचा पाठिंबा आहे असें त्यांचा मोठा भाऊ युधिष्ठीर त्यांना सांगतो व पांडवांच्या मनोधर्यात शक्ती प्रदान करतो. युधिष्ठीराच्या भाबडेपणावर मात्र भिम व अर्जुन थोडे ताशेरे मारतात पण कुंती त्यांना सांगते किं, ते सगळे नेहमी एकत्रच राहून युधिष्ठीराच्याच आज्ञेनुसार जे काय करावयाचे ते करतील. ती पुढे त्यांना आज्ञा करते किं, ह्यापुढे ते निशंकपणे त्याच्या मोठ्या भावाच्या सगळ्या आज्ञांचे पालन करतील. सगळे पांडव त्या प्रमाणे वागण्याचे तिला आश्वासन देतात. त्याप्रमाणे सगळे पांडव आता भविष्यातील संकटांसाठी जणू तयार होतात. तेव्हां भिम मात्र युधिष्ठीराच्या क्षमाशिलते बद्दल चिडून बोलतो, "ह्याच्या क्षमाशिलतेमुळें असुरीसंपदा वाढते, क्षमाशिलता सत्पात्र असली पाहिजे नाहीतर त्यामुळें क्षत्रियांचा सर्वनाश होईल". विदूर आणि कुंती त्याला शांत करतात . कुंती तिच्या पांचही मुलांना एकत्र घेऊन सांगते, मुलांनो आपण बापाविना आहोत, आपण जर लहान सहान करणांनी भाडू लागलो तर त्याचा गैरफायदा तुमचे शत्रू घेतील म्हणून, तुम्ही सगळे एकजुटीने रहाल आणि युधिष्ठीराच्या आज्ञेचे पालन कराल कारण तो तुमचा ज्येष्ठ बंधू आहे. त्याच्या वचनबंधात रहाण्याचे वचन ती त्या लहान परंतु, फार समंजस असलेल्या पांडवांकडून घेते. त्याप्रमाणे ते आयुष्यभर रहातात. *त्याचे कांहीं घातक परिणाम पुढे होतात, ते द्युत आणि अनुद्युत पर्वात पहाणार आहोत. वनपर्वात द्रौपदी कृष्णासमक्ष त्यावरून पांडवांची कानउघडणी करते.*

थोड्याच काळानंतर दुर्योधन पुनः भिमावर विषप्रयोग करतो पण कौरवांचा सावत्र भाऊ, युयुत्सू, पांडवांबद्दलच्या चांगल्या भावनांमुळें त्याला योग्यवेळी सावध करतो व त्यामुळे वृकोदर (भिम) ते विष खाऊनही त्यातून सहीसलामत वाचतो. हा दुसरा प्रयोग फसल्यावर

दुर्योधनाचा कावेबाज मामा शकुनी व मित्र कर्ण (जो वस्तुतः पांडवांचा भाऊ आहे) नवीन नवीन अजब कारवाया करण्याचे बेत आखत रहातात, जेणे करून पांडवांचा नाश होईल. विशेष म्हणजे त्या सगळ्या कारवायांची आगाऊ चाहूल युयुत्सूकडून पांडवांना येत होती कारण, त्याची आई पांडवाच्या बद्दल विशेष दयाळू होती कारण ती बापाविना (पोरकी) होती. तरी त्याची साधी जाणीव ते धूर्त पांडव कौरवांना येऊ देत नव्हते. विदूराच्या सुचनेनुसार पांडव तसे वागत होते. कौरवांच्या ह्या व इतर वाह्यात वर्तणूकीचा अंदाज त्याचा पिता धृतराष्ट्र ह्याला आला होता कारण कौरवांच्या विरुद्ध इतर लोकसुद्धा वेळोवळी कांहीं ना कांहीं तक्रारी त्याच्याकडे घेऊन येतच होते. अखेरीस धृतराष्ट्र त्यांना शिक्षणासाठी गुरुकुलात वेदाभ्यास व इतर क्षत्रियांच्या अभ्यासासाठी पाठवण्याचा निर्णय घेतो व गौतमऋषींच्या (त्यांचा कृपाचार्य असासुद्धा उल्लेख आहे) आश्रमात त्यांना शिक्षणासाठी पाठवण्यात येते परंतु, पांडव मात्र तेथे राजवाड्यातच रहातात.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशेएकोणतीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे तिसावा

(संभव पर्व पुढे चालू)

जनमेजय राजा वैशंपायनांना विचारतो, अहो ब्रह्मर्षी, मला ह्या कृपांच्या बद्दलचे सगळे ऐकण्याची इच्छा आहे. त्यांचा जन्म कसा झाला व असें सांगतात कीं, ते मातीतून उत्पन्न झाले तर त्याबद्दल मला ऐकावयाचे आहे तरी ते सांगा. त्यांनी त्यांची शस्त्रविद्या व ती अस्त्रे कोठून व कशी मिळवली ते समजून घ्यावयाचे आहे.

वैशंपायन त्याला उद्देशून सांगतात, अरे राजा, महान साधू गोतम ह्यांना एक मुलगा होता. त्याचें नांव होते शरद्वत. हा शरद्वत जो जन्मला तोंच बाण हातात घेऊन. अरे शत्रुघ्ना (जनमेजयाला उद्देशून), शरद्वताला अभ्यासात फार गोडी होती. परंतु, तो अभ्यास शस्त्रास्त्रांचा होता. इतर ज्ञान शाखांत त्याला रस नव्हता. इतर ब्राह्मण ज्या तपश्चर्येने वेदांचे ज्ञान मिळवतात त्याच व तितक्याच तपश्चर्येने हा शरद्वत शस्त्राच्या विज्ञानात तयार झाला होता. हा शरद्वत अर्थात् गौतम जो गोतमाचा मुलगा आहे, सुद्धा तसांच इतर विविध शस्त्रांच्या तंत्रांत प्रवीण होता. त्याच्या त्या तपश्चर्येने तो इंद्राला घाबरवत असतो. अखेरीस इंद्र गौतमाचा काटा काढण्यासाठी त्याची हुकमी युक्ती वापरण्याचे ठरवतो. तो त्याची एक अप्सरा जिचें नांव होते जनपदी, तिला बोलावतो व गौतमाची तपश्चर्या मोडून काढण्यास सांगतो. शरद्वताच्या नयनरम्य आश्रमात ती पोहोचते. अल्पवस्त्रात अशी ती रुपगर्विता जनपदी एकटीच त्या आश्रमाच्या भोवती असलेल्या रानात फिरत असतांना गौतम तिला पहातो. तिच्या सौंदर्यावर तो लुब्ध होतो. तिला पहाण्यात तो शरद्वत इतका तल्लिन होतो किं, त्याच्या हातातील बाण व इतर आयुधं जमिनीवर खाली पडतात. नव्याने उत्पन्न झालेल्या वासना क्षोभामुळें त्याचे सर्व तरुण शरीर कंप पावते. परंतु, तो तपस्वी थोडक्यात स्वताला सावरतो. त्याला त्याच्या आत्मबळाने सावध केल्यामुळे तो त्या मोहातून बाहेर येतो. असे जरी झाले होते तरी ज्या क्षणी त्याला वासनेचा पहिला धक्का बसला त्याक्षणी त्याचे वीर्य खाली पडते. झालेल्या प्रकारामुळें आत्मसंशोधन करण्यासाठी शरद्वत त्याची आयुधं, चर्मवस्त्रं तेथेच टाकून जनपदेपासून दूर निघून जातो. त्याचे ते तेजस्वी वीर्य तेथे जमिनीवरील मातीच्या उंचवट्यावर पडते. तेथे त्याचे दोन भाग होतात. त्यातून दोन बालकं उत्पन्न होतात. एक मुलगा असतो व दुसरी मुलगी असते. त्याचवेळी

राजा शंतनु शिकारीसाठी त्या परिसरात असल्यानें त्याचे शिपाई तेथे वावरत असतात, त्यातील एकाला ती दोन बालकं सांपडतात. त्या मुलांच्या आवती भोवती बाण, तिरकमटा आणि आणखीन कांहीं आयुधं व त्याचप्रमाणे चर्मवस्त्र पडलेली दिसतात. तो शिपाई समजतो कीं, ही बालकं कोणातरी शस्त्रविद्या विशारदाची असावीत. असा विचार त्याच्या मनात आल्यावर तो ती दोन बालकं व ते शस्त्र आणि चर्मवस्त्र घेऊन शंतनुकडे जातो व त्याला दाखवतो. त्या छोट्या अर्भकांना पाहून राजाला किंव येते व मोठ्या दयाभावाने तो त्या दोनही बालकांना त्याची स्वताची अपत्ये असावीत असें दत्तक घेतो. अशाप्रकारे ती शरद्वताची मुलं शंतनुच्या राजवाड्यात पोहोचतात. तेथे शंतनु, प्रदीपाचा पुत्र त्या मुलांना धर्मविधीपूर्वक आपली करतो (दत्तक घेतो) व त्यांची नांव ठेवतो. मुलांचे नांव कृप व मुलीचे कृपी अशी नांवे होतात. अशी नांवं ठेवण्याचे कारण, त्याना राजाने कृपादृष्टीने स्वीकारलेले असते. गोतमाच्या मुलांने त्याचा आधीचा आश्रम सोडल्यानंतर त्याची शस्त्रसाधना जोरात चालू करतो. त्याच्या दिव्यदृष्टीने तो हे जाणत असतों कीं, त्याची दोनही अपत्ये राजा शंतनुच्या आश्रयात वाढत आहेत. यथावकाश शरद्वत शंतनुकडे जातो व त्याला सांगतो किं, ही दोन मुलं त्याची आहेत व त्यांना तो त्याची शस्त्रविद्या शिकवू इच्छितो. शंतनु त्याचा सन्मान करून त्या मुलांना त्या विद्या शिकण्यासाठी गौतमाकडे सुपुर्द करतो. कृप त्याच्या बापाकडून त्या शस्त्रविद्या झपाट्याने आत्मसात करतो व त्यांत निष्णात होतो. यथावकाश हा कृप त्या विद्यांचा प्राध्यापक होतो. तो ती विद्या त्या काळातील श्रेष्ठ क्षत्रिय घराण्यांतील राजपुत्रांना ज्यात पांडव, कौरव, यादव आणि वृश्री (बलरामाचे घराणे) होते त्यांना शिकवतो. त्यामुळे त्याला सगळेजण कृपाचार्य असें संबोधू लागतात.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे तिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे एकतीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे जनमेजयाला सांगतात, भिष्माला मात्र त्याच्या नातवंडानी अशा गुरुकडून विद्या शिकावी ज्याच्या सारखा अप्रतिम बुद्धीमान, सामर्थ्यवान, प्रवीण, शस्त्रविद्येत पारंगत, दैवी शक्ती असलेला दुसरा कोणी नाही. आणि म्हणून तो कुरु राजपुत्रांसाठी भारद्वाजांचा पुत्र द्रोण ह्याची गुरु म्हणून निवड करतो. बुद्धीमान द्रोण त्याशिवाय वेदात पारंगत असतात. हा सन्मान झाला असें समजून द्रोण ते पद स्वीकारतात व पांडव आणि कौरवांना त्या सर्व विद्या, ज्या राजपुत्रांनी शिकल्या पाहिजेत त्या शिकवण्यास सुरुवात करतात. आधीच सामर्थ्यवान असलेले पांडव यथावकाश त्या सगळ्या विद्या शिकून त्यात प्रवीण होतात.

जनमेजय वैशंपायनाला विचारतो, अहो ऋषी, मला सांगा हे द्रोण कसे जन्मले, त्यांनी कशा व केव्हां ह्या सगळ्या विद्या आत्मसात केल्या. त्यांचा कुरु राजवंशाशी केव्हां व कसा संबंध आला ते सुद्धा सांगा. द्रोण कोणाचा पुत्र होता, व त्याचा मुलगा अश्वत्थामा कसा जन्मला हे सुद्धा सविस्तरपणे सांगा.

असें विचारल्यानंतर वैशंपायन त्याला सांगू लागतात, गंगेच्या उगमस्थानी एक ऋषी, भारद्वाज नांवाचे रहात होते. अखंड व्रतस्थ जीवन जगणारे असें ते ऋषी एकदा ठरवतात किं, अग्नीहोत्र सुरु करावे. त्यासाठी ते व त्यांच्या बरोबर इतर ऋषी गंगेच्या तटी अर्ध्य देण्यासाठी जातात. गंगेच्या तटाजवळ आल्यावर त्याला घ्रृताची नांवाची अप्सरा तेथे घोटाळत असलेली दिसते. स्वताच्या गुर्मीत व मादकतेच्या अविर्भावात तिच्या त्या हालचाली होत होत्या व ती तिचे गंगेला अर्ध्य देण्याचे उरकल्यावर पाण्यातून बाहेर येते. अंगाला भिजलेल्या वस्त्रानिशी ती फिरत असतांना ते वस्त्र अंगावरून थोडे बाजूला सरकते. ते सगळे पाहून भारद्वाजाला भावना अनावर होतात व त्याचे वीर्य बाहेर येते. ते खाली सांडू नये म्हणून तो द्रोणात घेतो व त्यात सांभाळतो. त्यातून यथावकाश एक बालक निर्माण होते, तेंच हे द्रोण. त्यांना त्यांच्या उगमस्थानवरून असें नांव पडले. अशारितीने उत्पन्न झालेला द्रोण सगळ्या वेदविद्या आत्मसात करतो. त्या आधी भारद्वाजानी त्यांचा शिष्य अग्नीवेष ह्याला अग्नीसंबंधित असलेल्या शस्त्रांची विद्या शिकवली

होती त्या विद्येला अग्नेय असें म्हणतात. हा भारद्वाजांचा शिष्य स्वतः यज्ञकुडातील अग्नीतून उत्पन्न झाला होता. त्यांने त्या सगळ्या विद्यासुद्धा नंतर द्रोणाला शिकवल्या होत्या ज्या प्रथम त्याच्या गुरुने त्याला शिकवल्या होत्या. भारद्वाजाचा एक मित्र राजा होता त्याचे नांव प्रिशत होते. प्रिशतला त्या सुमारास एक मुलगा झाला होता त्याचे नांव होते द्रुपद. असा द्रुपद नेहमी आपल्या पित्याच्या मित्राच्या, भारद्वाजांच्या आश्रमात खेळण्यासाठी जात असें. तेथे तो व द्रोण असें दोघे खेळत व शिकत असत. जेव्हां प्रिशत देवाघरी गेला तेव्हा रिवाजानुसार द्रुपद त्या राज्याचा वारस झाला व त्या पांचाल राज्यात राज्य करू लागला. साधारण त्याच सुमारास ऋषी भारद्वाजसुद्धा परलोकी गेले. द्रोण आपल्या पित्याच्या आश्रमातच राहून तपस्या करत होता. वेदांचा अभ्यास केलेला असा तो ब्राह्मण ज्यांने त्याची सगळी पापभावना नष्ट केली होती तो गृहस्थाश्रमाच्या रिवाजानुसार व त्याच्या पित्याच्या इच्छेमुळे कृपीशी, गौतमाच्या मुलीशी जी कृपाची बहीण होती, लग्न करतो व गृहस्थाश्रम सुरु करतो. कृपी प्रपंचातील पुण्यकारक कर्तव्ये करीत व अग्नीहोत्र सांभाळत तिचा संसार करत होती. तशारितीने व्रतस्थ अशा कृपीला द्रोणापासून एक मुलगा होतो जे गृहस्थाश्रमानुसार योग्य होते, त्याचे नांव अश्वत्थामा असें ठेवले गेले. हा अश्वत्थामा लहानपणी उच्चैश्रव घोड्यासारखा खिंकाळत असें म्हणून त्याचे नांव त्यावरून तसें पडले होते. अश्वत्थामा झाल्यामुळें द्रोण अतिशय प्रसन्न झाला. आपल्या आश्रमात राहून द्रोण त्याची शस्त्र, अस्त्र विद्या अधिकाधिक तेजस्वी करण्यात गुंतला होता. अश्वत्थामाचे खिंकाळणे ऐकून एकदा भारद्वाज बोलले होते किं, हा मुलगा अनेक क्षत्रियांच्या नाशास कारणीभूत होईल.

त्या सुमारास द्रोणाला वार्ता येते किं, जमदाग्नीचा पुत्र (परशुराम, जामदग्न्य) त्याची सगळी शस्त्रास्त्र लायक ब्राह्मणास देऊ इच्छितो आहे. त्या परशुरामाची मोठी ख्याती होती कारण त्यांने भ्रष्ट क्षत्रियांचा पराभव करून पृथ्वीला त्याच्या जांचापासून मुक्त केले होते. त्या शस्त्रा बरोबर परशुराम त्याची सगळी विद्यासुद्धा दान करण्याचा संकल्प असतो. ते ऐकून द्रोण त्याच्याकडे जाऊन ती विद्या व ती शस्त्रास्त्रे, युद्धनितीचे शास्त्र प्राप्त करण्यासाठी त्याच्या सगळ्या तत्त्वशिल व्रतस्थ शिष्यगणांना घेऊन परशुरामाला भेटण्यासाठी महिंद्र पर्वताकडे निघतो. तेथे तो भृगुऋषीच्या वंशाचा मुलगा (परशुराम) त्याला भेटतो. द्रोण

त्याला आपली ओळख सांगतो किं, तो अंगिरसाच्या कुळातील ऋषी आहे. परंतु, मी ब्रह्मासारखा स्त्रीयोनीशिवाय उत्पन्न झालो आहे. ते ऐकून परशुराम त्याचे स्वागत करतात. त्यानंतर द्रोण जामदाग्न्याच्या पायावर मस्तक ठेवून प्रणिपात करतो व बोलतो, "मी ऐकले आहे किं, आपण आपली संपत्ती दान करू इच्छिता, तेव्हा मी त्याचा वाटेदार होऊ इच्छितो आहे". ते ऐकल्यावर परशुराम त्याला सांगतात, "अरे, माझी सगळी वास्तविक संपत्ती, सोने, रत्न इत्यादी मी आधीच ब्राह्मणांना दान केली आहे. जी जमीन, समुद्र, शहरे होती ती काश्यपाला देऊन टाकली आहे. आता माझ्याकडे फक्त शस्त्रे व त्याची विद्या उरलेली आहे. ती सुद्धा मी योग्य वाटेकर्याला देऊन सर्व संन्यास घेणार आहे". असें बोलून परशुराम ओरडून विचारतात, "तुला काय पाहिजे ते चटकन सांग".

ते ऐकल्यावर द्रोण त्याला बोलतात, "मला ती शस्त्रे व ती विद्या, ज्यामध्ये ती शस्त्रे व अस्त्रे कशी वापरावयाची व कशी हाताळावयाची, ती परत कशी घ्यावयाची असें सगळे असलेले ज्ञान, मला पाहिजे तरी ती आपण मला द्याल अशी अपेक्षा करतो". ते ऐकल्यावर परशुराम तथास्तू असें बोलतात व ती सगळी विद्या द्रोणाला दान करतात. अशारितीने त्या ब्राह्मणाची मनिषा पूर्ण झाल्यामुळे आनंदात तो त्याच्या शिष्यांना घेऊन द्रुपदाच्या पांचाल नगरीकडे निघतो. द्रोणाचा उद्देश असा असतो कीं, त्यानंतर उर्वरित आयुष्य त्याचा मित्र द्रुपदाकडे व्यतित करावे व ब्रह्मसाधना सिद्ध करावी. द्रोणाला द्रुपदाला त्याच्या नव्याने प्राप्त झालेल्या शस्त्र विद्येचा फायदा करून द्यावयाचा होता परंतु, हे जनमेजया, घडले कांहीं विपरीतच.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे एकतिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे बत्तीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, अहो राजर्षी, भारद्वाजचा मुलगा द्रौपदापुढे उभा रहातो. द्रोण त्या राजाला त्याच्या सर्व दरबारींच्या समक्ष बोलतो, "अरे राजा, तू मला आपल्या मैत्रीसाठी ओळखतोस, असें त्यांचे बोलणे द्रुपदाला रुचत नाही. तो राजा त्याच्या वैभवाने उन्मत्त झालेला, त्याला रागांने भुवया वर करीत लालबुंद झालेला, ओरडतो, "अरे ब्राह्मणा तुझी विद्वत्ता एवढी नाही कीं, तू अशारितीने माझ्याशी बोलावेस. मी मान्य करतो कीं, तू माझा बालमित्र आहेस परंतु, माझ्या दरबार्यांच्या समक्ष असें एकेरी बोलणे तुला शोभत नाही. कारण, कालमानाने त्या गोष्टी विसरल्या जातात हे तुझ्या लक्षात आलेले दिसत नाही. अगदी बालमैत्रीसुद्धा त्याला अपवाद नसते. म्हणून त्या बालमैत्रीचा दाखला येथे देण्याचा मूर्खपणा तू करू नकोस. ती माझी मैत्री कांहीं उद्देशाने होती, त्यावेळी आपण फक्त लहान मुलं होतो. आज परिस्थिती तशी नाही, आज तू एक दरिद्री व मी एक राजा अशी अवस्था आहे, त्या नव्या परिस्थितीत अशी जुनी मैत्री रहात नाही. शिकलेला व अशिक्षित, शूरवीर व भित्रा अशांच्या बालपणच्या मैत्री मोठेपणी मानल्या जात नाहीत. फक्त एकाच योग्यतेच्या लोकांत असें मैत्रीचे अथवा शत्रूत्वाचे नाते रहाते. दरिद्री व संपन्न ह्यात मैत्री किंवा शत्रूत्वसुद्धा असू शकत नाही. चांगल्या खानदानीचा व अक्करमाशा ह्यांच्यात मैत्री असूच शकत नाही. मैत्री राखण्यासाठी तू तुझी योग्यता वाढवायला पाहिजेस नाहीतर ती बालपणाची मैत्री विसरून जाणेंच बरे. एका राजानेच दुसर्या राजाची दोस्ती सांगावयाची असते. म्हणून, तू ती जुनी मैत्री आता विसरून जा". असें बोलून द्रुपद त्याला निघून जाण्याची हातांने खूण करतो. ते ऐकून तो भारद्वाजाचा शक्तिमान पुत्र संतापतो आणि त्याच क्षणी द्रौपदाला धडा शिकवण्याचा निर्धार करतो. पांचाल राजाचे ते उद्धटपणाचे वक्तव्य पाहून द्रोण ताबडतोब तेथून बाहेर पडतो. आपला सूड उगवण्याचा निर्धार पक्का करून तो त्या निमित्ताने तडक कुरु राजाच्या राजधानीकडे, हस्तिनापूरी मोर्चा वळवतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशेबत्तीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे तेहतीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

हस्तिनापुरी आल्यावर तो गुणवान ब्राह्मण, भारद्वाजाचा मुलगा, कृपाचार्यांच्या घरात खाजगीपणे रहात राहिला. त्याचा हशार मुलगा, अश्वत्थामा अधून मधून कृपाच्या शिकवण्या संपल्यावर पांडवांना शस्त्रांच्या वापरांवर धडे देत असें. परंतु, त्याचे शस्त्रविद्येवरील प्रभुत्व किती आहे ते मात्र कोणालाही माहीत नव्हते.

असा द्रोण कृपाच्या घरात रहात असतांना एके दिवशी कुरु घराण्याचे ते सगळे राजपुत्र एकत्रपणे शहराबाहेर येतात व चेंडु फेकण्याचा खेळ खेळू लागतात. खेळत असतांना त्यांचा चेंडु एका खोल विहीरीत पडतो. तो त्या विहीरीतून काढण्याचा खूप प्रयास करतात. परंतु, त्यांचे सगळे प्रयत्न व्यर्थ गेले. आता काय करावे ह्या विचारांने ते शरमेने एकमेकांकडे पाहू लागले. आता हा चेंडु कसा बाहेर काढावयाचा ह्या चिंतेत ते व्यस्थ झाले. त्याच वेळी ते एका सावळ्या वर्णाचा ब्राह्मण त्यांच्यात उभा असलेला पहातात. अग्नीहोत्र सांभळणारा तो कृश देहयष्टी असलेला, नुकताच त्याचे अन्हीक उरकून येत असतांना त्या राजपुत्रांना दिसतो. चेंडु काढण्यात अशस्वी झालेले ते त्या ब्राह्मणाला घेरतात. त्यांच्या कडे स्मित हास्य करीत द्रोण त्यांना बोलतात, "तुम्हा क्षत्रिय भरत कुळातील राजपुत्रांना लाज वाटली पाहिजे किं, तुम्हाला तुमच्या विद्येचा उपयोग करता येत नाही". ते ऐकून खजिल झालेली मुलं त्याला तो काढून देण्याची विनंती करतात. त्यावर द्रोण त्या मुलांना बोलतो, "मी काढून देईन पण त्या बदल्यात तुम्हाला मला एक भोजन द्यावे लागेल. त्या बदल्यात मी तुमचा चेंडु काढीनच पण त्याबरोबर हि आंगठी जी मी आता विहीरीत टाकतो, तीसुद्धा ह्या गवताच्या पात्याने बाहेर काढून देईन, कबूल आहे कां"? असे ते बोलतात. असें बोलून तो शूर ब्राह्मण त्याच्या हातातील आंगठी त्या कोरड्या विहीरीत टाकतो. ते ऐकून कुंतीपुत्र यु्धिष्ठीर त्यांना सांगतो, "अहो ब्राह्मण, आपण फारच मामुली बक्षिस मागत अहात. आम्ही आमचे गुरू कृपाचार्यांच्या परवानगीने इतके देऊ किं, त्यानंतर आपल्याला कोणापुढे भिक्षा मागावी लागणार नाही".

ते ऐकल्यावर द्रोण हातातील मुठभर गवताची पाती त्यांना दाखवून बोलतात, "पहा, ह्या गवताच्या पात्यांवर मी मंत्र मारतो व त्यांच्या मदतीने तो चेंडु व माझी आंगठी कशी बाहेर

काढतो ते. माझ्या मंत्रामुळें ही क्षुल्लक गवताची पाती एकाद्या हत्यारासारखी कशी काम करतात ते पहा. एका पात्याच्या टोकांने मी त्या चेंडुला टोचून पकडीन व दुसर्या पात्याच्या टोकांने आंगठी उचलीन व त्यांची साखळी करून त्याद्वारा ते दोनही बाहेर काढीन".

वैशंपायन पुढे सांगतात, जसें द्रोण बोलतात नेमके तसेंच ते करतात व सर्वांना आश्चर्य वाटेल अशाप्रकारे ते चेंडु व आंगठी बाहेर काढतात. ते पहातांना पहाणार्यांचे डोळे विस्फारतात, त्यांचा विश्वासच त्या प्रकारावर बसत नाही. विहीरीत पडलेली आणखीन एक आंगठी ते दाखवतात व द्रोणांना विनंती करतात किं, ती आंगठीसुद्धा काढावी. त्यावर द्रोण एक बाण धनुष्याला लावून तो बाण असां मारतात किं, त्यामुळें ती आंगठी उंच उडून विहीरी बाहेर फेकली जाते. तो प्रकार पाहून ते राजपुत्र लवून त्या भारद्वाजाच्या मुलांला नमन करतात. युधिष्ठीर बोलतो अशी किमया इतर कोणी करू शकेल असें वाटत नाही. ते एकत्रपणे द्रोणांना विचारतात, "आपण कोण व आपले पिता कोण? आम्ही आपल्यासाठी काय केले तर आपल्याला आनंद होईल ते बोला".

ते ऐकून द्रोण त्या पांडवाना बोलतो, "तुम्ही जे पाहिले त्याची वार्ता तुमच्या आजोबांना, भिष्माला जाऊन सांगा. म्हणजे तो महाबली मला ओळखेल". ते ऐकून सगळे राजपुत्र एकदम बोलतात, "तसेंच होईल".

ते सगळे भिष्माला भेटतात व जे घडले ते सगळे सविस्तरपणे सांगतात. ती आश्चर्यकारक करामत ऐकून भिष्मसुद्धा अजब करतात व ओळखतात कीं, हा ब्राह्मण दुसरा तिसरा कोणी नसून द्रोणच आहे. त्यानंतर भिष्म मोठ्या सन्मानाने द्रोणांना बोलावतात आणि त्यांची पांडवाचे गुरू म्हणून नेमणूक करतात. औपचारीक गोष्टी बोलतांना भिष्म द्रोणांना विचारतात, "हस्तिनापुरी येण्याचे काय प्रयोजन"?

भिष्माचे ते विचारणे ऐकल्यावर द्रोणाचार्य त्याला आपली कर्म कहाणी सांगू लागतात. ते सांगतात, "एकेकाळी मी ऋषी अग्नीवेष ह्यांच्या कडे शस्त्रविद्या शिकण्यासाठी गेलो होतो. त्यांची सेवा करीत मी अनेक वर्षे जटाधारी होऊन त्यांच्या आश्रमात सेवा करीत रहात होतो. त्याच सुमारास पांचाल देशाचा राजपुत्र यज्ञसेन आमच्या बरोबर ती विद्या शिकण्यासाठी रहात होता. तेथे आमची दोस्ती झाली. तेथे तो सदैव माझे भले व्हावे असें वागत होता. त्यामुळें तो मला प्रिय झाला होता. असें आम्ही बरीच वर्षे एकत्र रहात होतो.

तो मला नेहमी सांगत असें तो जेव्हां राजा होईल तेव्हा मला त्याच्या राज्यात जागा देईल. असें वचन तो मला नेहमी देत असें. माझी सगळी मालमत्ता, संपत्ती तुला वापरायला देईन वगैरे वगैरे तो बोलत असे. त्यावेळी ते त्याचे वचन खूप आनंद देत असें. यथावकाश गृहस्थाश्रमाच्या मोहात मी लग्न केले, माझ्या मित्राच्या कृपाचार्याच्या बहिणीशी जिचे नांव आहे कृपी. ती तीव्र व्रतवैकल्ये करीत असें. आम्हाला नंतर एक पुत्र झाला त्याचे नांव अश्वत्थामा ठेवले. त्याच्या जन्माने मला फार आनंद झाला होता. आमच्या सभोवार श्रीमंत लोक रहात असत व त्यांची मुलं दूध पित असत. एकदा माझ्या अश्वत्थामाला दूध पिण्याची इच्छा झाली परंतु, आम्ही त्याला दूध देऊ शकत नव्हतो कारण, त्यासाठी आमच्याकडे पैसे व गाय नव्हते. तो दूधासाठी आकांत करू लागला, शेवटी त्याच्या आईने पाण्यात तांदळाचे पीठ कालवून ते त्याला पाजले तेव्हां तो अतिशय आनंदाने ओरडून सगळ्यांना सांगू लागला, त्याला दूध पिण्यासाठी मिळाले, ते पाहून मला फार दुःख झाले व मी ठरवले कीं, कांहीं झाले तरी आता ब्राह्मण वर्णाचे दरीद्री जीवन सोडून पैसे कमवायचे. मी त्यासाठी वण वण अनेक देश फिरलो परंतु मला कोणी काम दिले नाही. मुलासाठी एक गाय घ्यावचाची होती परंतु, कोणी मला एक गाय दान केली नाही. मला समजले किं, माझ्या मुलांचे श्रीमंत मित्र त्याला पीठपाणी दूध समजून प्याल्यामुळें हसत होते, ते मला फार लागले. पीठपाणी पिऊन दूध प्याल्याच्या आनंदात जेव्हां माझा अश्वत्थामा आनंदाने नाचत असें तेव्हां ते त्याच्या निरागसपणाचे हंसे उडवित, ते मी पहात असें. सभोवारच्या धनवान लोकांचे तिरके टोमणे मला एकावयाला लागत होते, एवढी शस्त्रविद्या अवगत असूनही मी असा निष्कांचन, ह्याचे ते टोमणे मारून माझा अपरोक्ष अपमान करीत असत परंतु, मी कांहीं करू शकत नसे कारण, मी ब्राह्मणांचे निष्कांचन रहाण्याचे व्रत घेतले होते. तरीही अहो राजर्षी भिष्मदेव, मला पैशासाठी कोणाची चाकरी करण्याची वेळ येऊ नये अशी इच्छा आहे. ते जास्त निंदनीय आहे असें मी समजतो. अखेरीस मी माझ्या जुन्या आश्रमवासी मित्राला भेटण्याचे ठरवले. त्यांने दिलेल्या वचनाची त्याला आठवण करून द्यावयाची व त्याच्या बरोबर रहावे असें मी ठरवले होते. माझा प्रिय मुलगा व पत्नी असें आम्ही त्याच्या कडे गेलो. तो सोमक वंशी राजा जो माझा गुरुकुलातील सवंगडी होता व ज्याने मला भरपूर आश्वासने दिली होती त्याच्याकडे मी

पोहोचलो. तो आता द्रुपद राजा झाला होता. त्याला मी माझी ओळख सांगितली ती त्याच्या दरबारी सेवकांच्या पुढे. कदाचित, अहो भिष्मदेव, त्याला ते माझे ओळख देणे रुचले नाही व त्यानी माझी निर्भत्सना केली. तो तुच्छतेने हसत मला बोलला, अरे त्याकाळी ती दोस्ती होती, बदलत्या काळानुसार अशा दोस्ती सुद्धा संपत असतात हे तुला माहित नाही कां? तुला कांहीं अक्कल आहे कां, किं तू असा सरळ माझ्याकडे येऊन जुन्या मैत्रीचा हवाला देत आहेस. ती माझी मैत्री कांहीं मतलबाने मी तुझ्याशी ठेवली होती कारण मला तुझ्या पित्याकडून विद्या ग्रहण करावयाची होती. तो मतलब पूर्ण झाल्यानंतर कसली दोस्ती व कसले काय? तू त्या मैत्रीला विसरून जा. एक गोष्ट तू समजली पाहिजे किं, एक श्रीमंत व एक भिकारी ह्यांच्यात दोस्ती कधीही होत नसते. फक्त तोलामोलाच्या मंडळीत मित्रत्व असू शकते. काळ व क्रोध दोघे मैत्री संपुष्टात आणतात ते तुला मी सांगावे कां, तुझ्यासारख्या ब्राह्मणाला ते समजत नाही कां? मी तुझ्याशी केवळ त्या काळापुरते मैत्रीचे ढोंग करीत होतो व तू त्याला खरी मैत्री समजलास हा तुझा मूर्खपणा झाला. तसेंच अशिक्षित व सुशिक्षित अशांमध्ये खरी मैत्री कधीही होत नसते. माझ्यासारख्या श्रेष्ठ राजाची तुझ्यासारख्या अवदशाशी कशी दोस्ती असेल बरे? एक विद्वान ब्राह्मण आहेस म्हणून मी तुला एकवेळचे भोजन मात्र देण्यास तयार आहे".

पुढे द्रोण भिष्माला सांगतो, "असें अपमानकारक त्याचे बोलणे माझ्या पत्नीसमोर केलेले ऐकल्यावर मी तेथून बाहेर पडलो. त्याच्या कडून झालेल्या अपमानाचा वचपा काढण्याचे ठरवून मी तेथून निघालो. अशा बेताने मी येथे आपल्या कुरु वंशाकडे आलो आहे. मला बुद्धिमान व नम्र असें शिष्य हवेत म्हणजे मी त्यांना माझी अमुल्य विद्या देऊन आपली मर्जी संपादन करू शकेन. आता सांगा मी काय करावे म्हणजे आपण माझ्यावर कृपा कराल"?

वैशंपायन पुढे सांगतात, ते द्रोणाचे बोलणे ऐकून भिष्म त्याला आज्ञा देतात किं, "अहो भारद्वाजाचे गुणी पुत्र आता वेळ न दवडता तुमच्या धनुष्याची दोर ताणून घ्या व माझ्या नातवंडांना धनूर्विधा शिकवण्याचे कार्य सुरु करा. तसे केल्यास तुम्हाला कशाचीच कमतरता रहाणार नाही. ह्यापुढे हे कुरु तुमच्या बरोबर असतील व तुम्हाला सर्वकांहीं

मिळेल. तुमची इच्छा पूर्ण झाली असेंच समजा, अहो ब्राह्मणा. आमचे मोठे नशीब कीं आम्हाला तुमच्या सारखा गुरु आमच्या मुलांना शिकवण्यासाठी मिळाला आहे".

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे तेहतीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशेचौतीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, भिष्म ह्याप्रकारे द्रोणाचा सन्मान करून त्यांच्या परिवारास त्यांच्या राजवाड्यात एक कक्ष रहाण्यासाठी उपलब्ध करतात. आता द्रोण तेथे राहू लागतात. त्यांचा आदर भिष्म मोठ्या आनंदाने त्याची कौरव व पांडव नातवंडे घेऊन करतात, असें किं, द्रोणाला एक शेत जमीन व त्याला लागून आश्रमासाठी जागा आहे. त्याशिवाय बर्याच मौल्यवान भेटीसुद्धा देतात. हा सगळा सन्मान व कौतुक द्रोण मोठ्या आनंदाने व समाधानाने स्वीकारतात. तो महान धनुर्विद्यावंत त्यानंतर कौरव व पांडव ह्यांना रितसरपणे त्याचे शिष्य करून घेतो. त्यानंतर एक दिवस त्या सर्वांना वेगवेगळे बोलावून द्रोण त्यांच्या कडून पादपुजा करून घेतात. त्या विधीनंतर द्रोण त्या मुलांना मानापासून सांगतात, "माझ्या मनात एक उद्देश आहे. मला तुम्ही आश्वासन द्या किं, जेव्हां तुम्ही ह्या विद्येत तयार व्हाल तेव्हां तुम्ही माझा उद्देश पूर्ण करण्यास तयार असाल". वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकून कुरु राजपुत्र गप्प बसून रहातात. परंतु, अर्जुन शपथ घेतो किं, तो ती इच्छा जी कांहीं असेल ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करील. अर्जूनाचे असें बोलणे ऐकल्यावर अतिशय आनंदाने द्रोण त्याला उराशी घट्ट धरून मिठी मारतात आणि त्याचा माथा पुनःपुन्हा हुंगतात. त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागतात. एवढे झाल्यानर द्रोण पांडवांना मोठ्या हिमतीने त्यांची सगळी शस्त्रविद्या, त्यात मंत्रविद्या व सामान्य शस्त्रसाधना असें सगळे आले शिकवतात. ते समजल्यावर इतर राजांची मुलंसुद्धा त्यांच्याकडे त्या विद्या शिकण्यासाठी येऊ लागतात. त्यांत वृश्नी घराण्याचे व अंधक घराण्याचे होते त्याच बरोबर राधाचा सुतपुत्र (कर्ण) त्यांमध्ये होता. द्रोण सगळ्यांना सारखेच शिकवित होते परंतु, अर्जूनाचे साफल्य व प्रभूत्व इतर राजपुत्रांपेक्षा सरस ठरत होते. त्या सगळ्यांत कर्ण स्वताला वेगळा समजत होता कारण, तो इतरांप्रमाणे राजपुत्र नव्हता, तो सदैव पांडवांशी आकसांने वागत होता, तेंच कौरवांचा मोठा भाऊ, दुर्योधनाला फार आवडले व त्यांची दोस्ती विशेष वाढत गेली. कर्णाच्या त्या वागण्याने खूष होऊन दुर्योधन त्याला उत्तेजन देत असें ज्याकारणांने कर्ण पांडवांना अधिक त्रास देऊ शकत होता. अर्जुन त्याच्या गुरूच्या बरोबर राहून इतर गोष्टींकडे दुर्लक्ष करून शस्त्र विद्या संपादन

करण्यात गर्क झालेला होता. त्याच्या अशा वागण्यामुळें तो त्या विद्येला लागणारी कला, ताकद, धीरोदात्तता, लवचिकपणा वगैरे बाबत इतर शिष्यांपेक्षा सरस ठरत होता. द्रोणांना समजून आले कीं, अर्जुनाच्या तोडीचा शिष्य त्यांच्याकडे नाही. हे लक्षात आल्यावर द्रोणांनी अर्जुनासाठी कांहीं जास्त शिकवण सुरु केली. तरीसुद्धा द्रोण आपल्या अश्वत्थामासाठी विशेष काळजी घेत. इतर शिष्यांपेक्षा त्याला जास्त शिकवता यावे म्हणून द्रोण मुलांना पाणी आणण्यास पाठवतांना सगळ्यांना बारीक तोंड असलेली घागर देत व आपल्या मुलांला मात्र मोठ्या तोंडाची घागर देत त्यांचा उद्देश असा होता कीं, अश्वत्थामा इतरांपेक्षा लवकर पाणी भरून आणी व त्या आधीच्या वेळांत द्रोण त्याला कांहीं खास क्ल्युप्त्या शिकवत असतं. ज्यामुळें त्यांचा पुत्र इतरांपेक्षा नेहमीच सरस ठरत असें. परंतु, धूर्त अर्जुनाच्या ते लक्षात आले व तो वरुण अस्त्राचा वापर करून त्याच्या बारीक तोंडाच्या घागरीत पाणी भरून अश्वत्थाम्याच्याही आधी येत असें. त्यामुळें अर्जुन व अश्वत्थामा एकाच योग्यतेचे शिक्षण घेत होते. अर्जुनाची त्याच्या गुरूबद्दलची श्रद्धा व शिकण्याची ओढ विशेष होती. त्याच्या अशा गुणांमुळे तो द्रोणांचा खास शिष्य होत गेला. अर्जुनाचे अभ्यासातील ध्यान पाहून एक दिवस द्रोण त्यांच्या आचार्यास अंधारात जेवण न वाढण्याची आज्ञा देतात. पण एक दिवस अर्जुन जेवत असतांना वार्यामुळें त्याच्या जेवणाच्या ठिकाणी असलेला दिवा विझला, तरी तक्रार न करतां अर्जुन त्या अंधारात जेवण जेवत राहीला. अंधारात अर्जुनाचा हात बरोबर जेवणाच्या पदार्थांना जात होता ते लक्षात आल्यावर तो ठरवतो ह्या गुणाच्या मदतीने आपण अंधारात सुद्धा तिरंदाजी करू शकू. त्या प्रमाणे तो रात्री तिरंदाजीचे धडे गिरवू लागला. एकदा द्रोणांना रात्री धनुष्याच्या टणत्कारांचे आवाज ऐकू आल्याने ते आश्रमाबाहेर येऊन पहातात किं, अर्जुन तिरंदाजीचा सराव करीत आहे. अर्जुनाला मिठीत घेऊन द्रोण त्याला बोलतात किं, सार्या पृथ्वीवर तुझ्यासारखा धनुर्धारी होणार नाही.

वैशंपायन सांगतात, त्यानंतर द्रोण अर्जूनाला इतर आयुधांचा वापर कसा करावयाचा ते शिकवू लागतात. त्यात गदा, तलवार, दांडपट्टा, भाला, बर्ची, वगैरे होते. त्याशिवाय घोड्यावरून तिरंदाजी, हत्तीवरून, रथातून, आणि जमिनीवरून अशी सगळी त्याला ते शिकवतात. एकाच वेळी अनेकांशी लढणे ह्याचा सुद्धा अभ्यास त्याच्या कडून करून

घेतला. अर्जुनाची ख्याति ऐकू गेल्यावर बरेच इतर राजे द्रोणांच्या गुरूकुलाकडे आपली मुलं पाठवू लागली. त्यात निशादाचा (भिल्ल) राजा हिरण्यधनुसचा मुलगा एकलव्य होता. द्रोण त्यांच्या नियमानुसार योग्य ठरलेल्या उमेदवारालाच शिकवणीसाठी घेत व त्या सबबीचा वापर करून त्यासाठी ते एकलव्याला तो निशाधाचा मुलगा म्हणून शिकवण्याचे नाकारतात मात्र खरे कारण, त्याना भिती वाटते किं, हा निशाधाचा मुलगा अर्जुनाला हरवेल.

अहो जनमेजय, नेमके तेंच होते ते कसे ते सांगतो, एकलव्य द्रोणांचे पाय धरून नमस्कार करतो व तेथून निघून तो रानात जातो व तेथे एक मातीची मूर्ती द्रोणाचार्यांची अशी बनवतो. त्यामूर्तीची नित्य पुजा करून तो कठोर शिस्तीने तिरंदाजीचा सराव करू लागतो. त्या त्याच्या निर्धाराची द्रोणांना माहिती नसते.

एक दिवस द्रोणाचार्य आपल्या शिष्यांना घेऊन वनात सराव करण्यासाठी जातात. त्यांच्या बरोबर त्यांचा एक सेवक इतर सामान घेऊन मागून येत असतो. त्या सेवकाबरोबर त्याचा कुत्रा असतो. सेवक जंगलात फिरत असतां त्याचा कुत्रासुद्धा त्या जंगलात इतरत्र फिरत होता. तशात त्या कुत्र्याला निशाध एकलव्य दिसतो. काळा सावळा, डोक्याला केसाच्या बटा, अंगावर चामड्याचे वस्त्र असा वेगळा तो दिसल्याने तो कुत्रा त्याच्या अंगावर जोरजोरात भूंकू लागतो. भूंकतांना कुत्र्याने तोंड उघडले होते ते तसेंच असतांना एकलव्य सात बाण त्वरेने सोडून त्या कुत्र्याचे तोंड बंद करतो व त्या कुत्र्याचे भूंकणे बंद करतो. तशा अवस्थेत तो कुत्रा पांडव जेथे होते तेथे जातो, त्याला त्याचे तोंड उघडता येत नव्हते. ते पाहून ते सगळे आश्चर्यचकित होतात. असें आपण करू शकणार नाही हे लक्षात आल्यावर ते शरमेने खाली मान घालून उभे रहातात. हा कोण तिरंदाज असा प्रश्न द्रोणांना पडतो. ते त्या अज्ञात धनुर्धार्याला शोधू लागतात. लवकरच त्यांना तो पावसासारखे बाण सोडणारा तिरंदाज दिसतो. त्या विचित्र प्रकारचे वस्त्र परिधान केलेल्या तरुणाला ते पहातात. तो त्यांना पूर्णपणे परका होता. ते त्याला विचारतात, "तू कोण व कोणाचा पुत्र"? तो तरुण त्यांना सांगतो, "अहो वीरांनो, मी हिरण्यधनूसचा मुलगा आहे. ते निशाधांचे राजे आहेत. मीसुद्धा महान गुरु द्रोण ह्यांचा शिष्य आहे. त्यांच्या मार्गदर्शना खाली मी तिरंदाजी शिकत आहे". त्याची सगळी माहिती काढून ते पांडव घरी परतले, ते त्या धक्क्यातून

अजून बाहेर आलेले नव्हते. ते द्रोणाचार्यांकडे जातात व जे घडले ते त्यांना सांगतात. त्या निशाध राजपुत्राच्या कमालीच्या तिरंदाजीमुळें अर्जुन विशेष दुखावला गेला होता कारण तो स्वतःला श्रेष्ठ तिरंदाज समजत होता. तो द्रोणांना बोलतो, "आपण मला सांगता किं, तुम्ही फक्त मला व अश्वत्थाम्याला श्रेष्ठ दर्जाची तिरंदाजी शिकवता पण ते खोटे आहे. कारण हा एकलव्य हिरण्यधनूसचा पुत्र माझ्यापेक्षा जास्त चांगला तयार आहे. तो आम्हाला बोलला किं, तुम्ही त्याचे गुरु अहात, हे कसें ते सांगा". असें अर्जुनाचे बोलणे ऐकून द्रोण स्तिमीत झाले व कांहीं ठरवून त्याला सांगतो, "चल माझ्या प्रिय शिष्या, आपण आत्ताच जाऊन त्याला भेटू. ते दोघे त्या वनात जातात व तेथे पहातात किं, तो निशाध कुमार त्याचा तिरंदाजीचा सराव जोरात करीत होता. ते दोघे त्याच्या जवळ जातात. द्रोणांना आलेले पाहून तो एकलव्य मोठ्या नम्रपणे त्यांना नमन करतो. द्रोणाचार्यांपुढे साष्टांग नमस्कार करतो व विचारतो, "काय आज्ञा आहे गुरुवर्य". द्रोण त्याला विचारतात तू मला तुझा गुरु सांगतोस पण तू मला अजून माझी गुरुची दिक्षा दिलेली नाहीस त्याचे काय"? ते ऐकल्यावर मोठ्या आदराने तो निशाध राजपुत्र त्यांना विचारतो, "मी आपल्याला ती देण्यासाठी उत्सुक आहे, सांगा मी काय द्यावे कारण माझ्याकडे आपल्याला देण्यासाठी धनसंपत्ती नाही". त्याचा नम्रपणा व प्रामाणिकपणा पाहून द्रोणाची पाशवी इच्छा उद्युक्त होते. ते त्याला बोलतात, अरे एकलव्या, मला तुझ्याकडून धनसंपत्ती नको. मला जे पाहिजे ते तू देऊ शकशील असें आहे. ते ऐकून तो निशाध राजपुत्र आनंदात विचारतो, "सांगा ते काय आहे". द्रोण सांगतात किं, त्याना एकलव्याचा उजव्या हाताचा आंगठा पाहिजे. ती कठोर मांगणी ऐकून कोणी मांगे सरकला असतां पण तो सच्चा शब्दाचा निशाध राजपुत्र क्षणाचाही विलंब न करता उजव्या हाताचा आंगठा कापून द्रोणांना देतात. अर्जुन त्याच्या एकलव्याबद्दल असलेला मत्सर त्यामुळे नाहीसा होतो. त्यानंतर द्रोण एकलव्याला पुनः तिरंदाजी करण्यास सांगतात, त्यावर तो शूर निशाध आपले तिरकमटा ताणून तिरंदाजी करू लागतो, त्यावेळी अर्जुन पहातो किं, आता त्याची तिरंदाजी पूर्वीसारखी तरल चपळाई राहीली नव्हती. ते पाहून अर्जुन खूष झाला व ते परत राजधानीकडे निघाले. अशारितीने द्रोणांनी आपण खाल्लेल्या अन्नाला जागतो असें सिद्ध केले. ही गोष्ट द्रोण आपल्या मेहुण्यास, कृपास सांगतात तेव्हां तो त्याला बोलतो किं

शास्त्रार्थानुसार तू जे केलेस ते अयोग्य होते कारण, तू त्या निशाद मुलाचा गुरू नव्हतास, त्याचा गुरू होता तो पुतळा! अशारितीने तू फसवून जे पाप केले आहेस त्याची भरपाई तुला केव्हांतरी करावी लागेल. महाभारतयुद्धात शेवटी द्रोणाचार्याचा मृत्यू फसवणूकीनेच होतो, ते मी तुला यथावकाश सांगेन असें, वैशंपायन जनमेजयाला सांगतात.

वैशंपायन पुढे सांगतात, द्रोणाच्या मल्ल विद्येतील शिष्यात, भिम पांडवांतील व दुर्योधन कौरवातील होते. द्रोणाचार्यांचा सुपुत्र अश्वत्थामा सगळ्याच शस्त्र विद्यांतील मंत्रशाखेत तेजस्वी असतो परंतु, इतर भावंडांत नकुल व सहदेव तलवारबाजीत सर्वात श्रेष्ठ होते. युधिष्ठीर रथ चालवण्यात उत्तम होता. तरी सुद्धा अर्जुन सगळ्याच शाखांत उत्तम ठरत होता. प्रसंगावधानात त्याचे काम अतुलनीय होते. अर्जुन महारथी झाला होता. विविध शस्त्रे हाताळण्यात त्याचे स्थान सर्वोच्च होते. गुरुशी असलेल्या श्रद्धेत सुद्धा अर्जुन पुढे होता.

पांडवांचे सर्वच विद्यांत जे श्रेष्ठत्व सिद्ध होत होते त्यामुळें दुर्योधनाचा तिळपापड होत होता. सर्वांचे शिक्षण संपल्यावर द्रोण त्यांची एक परिक्षा घेतात, त्यासाठी सर्व कुरु राजपुत्रांना ते एकत्र बोलावतात. ते सगळे एका उपवनात जमा होतात. तेथे द्रोणांनी एक पक्षी उंच झाडावर ठेवतात आणि सांगतात, "पहा तो पक्षी उंच फांदीवर ठेवलेला आहे, त्याचे डोके तुम्हाला बाणांने उडवायचे आहे. तेवढे बोलल्यावर द्रोण प्रथम कुरु राजपुत्रातील सगळ्यात मोठ्या युधिष्ठीराला बोलावतात व बाजूला घेऊन विचारतात, "सांग युधिष्ठीरा तुला काय दिसते. त्यावर तो बोलतो, "मला ते झाड, आजूबाजू, इतर सगळे दिसतात. असें उत्तर मिळाल्यावर द्रोण त्याला बाजूला करतात. अशारितीने ते एक एक करून सगळ्या कुरु राजपुत्रांना विचारतात. सगळे युधिष्ठीरा प्रमाणे उत्तर देतात, पण अर्जुन सांगतो त्याला फक्त तो पक्षी दिसतो. अशारितीने तो त्या परीक्षेत उत्तीर्ण होतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशेचौतीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशेपस्तीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, जेव्हां सगळे पांडव आणि कौरव तपासून झाले द्रोणांनी शेवटी अर्जुनाला बोलावले व तोंच प्रश्न त्याला विचारला. अर्जुन बोलतो, "मला फक्त तो पक्षी दिसतो आहे. बाकी कांहींही मला दिसत नाही". त्यानंतर द्रोण त्याला विचारतात, "जर तुला पक्षी दिसतो तर त्याचे वर्णन कर". त्यावर अर्जुन सांगता, "मला फक्त त्याचे डोके दिसते कारण, मला ते उडवायचे आहे, इतर कांहींही मी पहात नाही". अर्जुनाचे ते सांगणे ऐकल्यावर समाधानाने द्रोण उठून बोलतात, "आता त्याला बाण मार". त्या बरोबर अर्जुन त्याचा बाण सोडतो व क्षणात त्या पक्षाचे डोके तुटून खाली पडते. द्रोण फाल्गुना वर (अर्जुन) इतके खूष होतात कीं, ते त्याला घट्ट आलिंगन देतात. मनातल्या मनात द्रोण म्हणतात, आता द्रौपदाचा नाश करणे सोपे झाले आहे.

कांहीं काळानंतर द्रोण त्याच्या सगळ्या शिष्यांना घेऊन गंगेकिनारी स्नान करण्यासाठी जातात. तेथे द्रोण पाण्यात स्नान करीत असतांना एक सुसर तेथे येते व ती द्रोणाची मांडी पकडते. त्यावर द्रोण त्याला सोडवण्यासाठी त्याच्या शिष्यांना आवाहन करतो परंतु, कोणीही त्याला मदत करण्यास धजत नाही. फक्त अर्जुन पाण्यातून पांच बाण त्या सुसरीच्या पोटात असें मारतो कीं, त्याचे पोट फाटते व त्याच्या पकडीतून द्रोणांची मांडी सुटते. किनार्यावर जमलेले इतर शिष्य ते पाहून चकित होतात. त्या प्रसंगानंतर द्रोण अर्जुनाला त्यांचा पट्ट शिष्य म्हणून मान्यता देतात. भारद्वाजाचा तो सामर्थ्यवान पुत्र अर्जुनाला जवळ बोलावून सांगतो, "अर्जुना, आता मी तुला एक महाअस्त्र देणार आहे. ते सगळ्या अस्त्रात श्रेष्ठ आहे. त्याला ब्रह्मास्त्र म्हणतात. ते सोडता येते तसेंच मागे घेता येते. परंतु, हे कोणाही माणसावर वापरू नकोस. कारण, जर ते कमी कुवतीच्या लक्ष्यावर सोडले तर हे अस्त्र संपूर्ण पृथ्वीचा नाश करेल. ह्या अस्त्राला पर्याय नाही, कोणतेही इतर शस्त्र अथवा अस्त्र ह्याच्या तोडीचे नाही म्हणून हे तू जपून ठेव. त्यानंतर भारद्वाजांचा पुत्र द्रोण अर्जुनाला सांगतात, फक्त युद्धात हे अस्त्र तू अमानवी शत्रूवर सोडू शकतोस त्यामुळे तो नष्ट होईल. ह्या अस्त्रामुळें ह्या जगात तुला हरवणारा कोणीही नसेल. एवढे बोलून झाल्यावर अर्जुन हात जोडून ते अस्त्र स्वीकारतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे पस्तीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे छत्तिसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, भारत घराण्याच्या राजा, पुढे ऐक, राजसभेत द्रोण तेथे जमलेल्या प्रतिष्ठीत महामानवांना सांगतात, ज्यात धृतराष्ट्र, कृप, सोमदत्त, वल्हिक, भिष्म, विदूर जमलेले होते, "प्रतिष्ठीत सज्जन हो, आज तुमच्या राजपुत्रांचे शिक्षण पूर्ण झाले आहे असें मी जाहिर करतो. आपल्या परवानगीने त्यांच्या तयारीचे प्रात्यक्षिक दाखवण्याची परवानगी द्यावी".

ते द्रोणाचे बोलणे ऐकून धृतराष्ट्र त्याला बोलतात, "अहो ब्राह्मण, तुम्ही तुमचे काम खरोखरच फारच उत्तमरित्या केले आहे. आता तुम्हीच सांगा केव्हा, कोठे व कशी ह्या मुलांची परीक्षा घ्यावयाची. माझ्या अंधत्वामुळें मी, ज्यांना दिसते त्यांच्याबाबत थोडा हेवा करतो. मी त्यामुळें माझ्या पुत्रांचे कौतुक त्यांचे कर्तृत्व पाहून करू शकत नाही". असें बोलून मग तो अंध राजा त्याच्या धाकट्या भावास, विदूरास बोलतो, अरे "क्षत्री, तू माझ्यावतीने ते सगळे कर, जे गुरुवर्य द्रोण सांगतील. तुझ्या सारखा तत्त्वनिष्ठ माणूस देखरेख करीत असल्यास मला कांहीं चिंता करण्याची आवश्यकता नाही". ते ऐकल्यावर विदूर त्या प्रमाणे करण्याचे आश्वासन राजा धृतराष्ट्राला देतो. त्या परीक्षेची तयारी करण्यासाठी तो व द्रोण तेथून बाहेर पडतात. त्यानंतर द्रोण एक अशी जागा निवडतात जेथे झाडे झुडपे नाहीत, त्या ठिकाणी झरे व विहीरी असल्या पाहिजेत, अशा मोकळ्या ठिकाणी ती चाचणी होणार असते. त्यानंतर रात्र अंधारी जेव्हां आकाशातील तारे चमकतांना दिसतील असा दिवस व रात्र निवडली जाते. अशा शुभ मुहूर्ताला देवांना बळीचा प्रसाद देऊन व सर्व प्रजेच्या समक्ष ती परीक्षा करण्याचे योजले जाते. ते प्रजाजन त्या परीक्षेचे साक्षीदार असतात. त्यांच्या राजपुत्रांची योग्यता त्याना दाखवणे असा प्रघात होता तसे सगळे ठरले. एका बाजूस राजाच्या परिवारासाठी उंच मंच उभारला जातो, जसें शास्त्रात सांगितले आहे. तेथे सगळ्या प्रकारची आयुधे ठेवलेली होती. बायकांसाठी आणखीन एक मंच उभारला होता, तेथे त्या बसून तो देखावा पहाणार असतात. सामान्य जन साध्या जागी बसणार होते व श्रीमंत लोक त्यांच्यासाठी तंबू उभारतात. परीक्षेचा दिवस ठरवला जातो. भिष्म व मुख्य शिक्षक कृपाचार्य पुढे असतात व त्यांच्या पाठून इतर

दरबारी असें मिरवणूकीने तेथे येतात. तो मंडप सोन्याने मढवलेला होता. त्याल लावलेल्या पताकांवर माणिक मोती व इतर रत्ने जडवलेली होती. मुख्य यजमानांनंतर त्यांच्या वैभवाला शोभतील असें वस्त्र परिधान केलेल्या अशा, राज घराण्याच्या स्त्रिया, गांधारी, कुंती व त्यांच्या सेविका तेथे मिरवणूकीने येतात व आपल्या स्त्री कक्षातील आसनांवर जाऊन बसतात. त्या आल्यानं सर्वत्र सुगंध पसरतो जो त्या बायकांनी वापरला होता. चारही वर्णाचे लोक ती स्पर्धा पहाण्यासाठी चहोबाजूने तेथे येत होते. लोकांचे कुजबुजणे व इतर वाद्यांच्या आवाजांने सगळा आसमंत दणाणून गेला होता. सर्व जमल्यावर अखेरीस द्रोण व त्यांचा मुलगा अश्वत्थामा पूर्ण शुभ्र कपडे घातलेले, अगाला चंदनाचे गंध चोपडलेले असें तेथे येतात. आल्यावर तो भारद्वाजाचा पुत्र इतर सर्व ब्राह्मणांसह प्रसंगानुरूप मंत्रपुजा करतात. त्या शुभ प्रसंगाचे शुभचिंतन त्याद्वारा करतात. त्यानंतर त्या प्रसंगाचे अनुरूप संगीत वाजवले जाते व त्यामुळें वातावरण तयार केले जाते. त्यानंतर कांहीं सेवक विविध शस्त्रे, अस्त्रे व इतर साधने घेऊन त्या ठिकाणी हजर होतात. सर्वात शेवटी ते भरत वंशाचे राजपुत्र आपापल्या क्षत्रिय वस्त्रांत तेथे एका मागोमाग असें येतात. ते त्यांच्या खाजगी शस्त्रासह तेथे हजर होतात. त्यात सर्वात प्रथम युधिष्ठीर असतो. ते राजपुत्र त्यांच्या वयाच्या क्रमाने तेथे त्या अंगणात प्रवेश करतात. आल्यावर ते त्यांची कसब दाखवण्यास सुरुवात करतात. कांहीं प्रजाजन बाण अंगावर पडू नये म्हणून खाली वाकतात तर कांहीं जाणकार फक्त कौतुक करतात. घोड्यावरील परीक्षेत ते घोड्यावरून त्यांच्या लक्ष्यावर भाले फेकतात, त्यांच्या भाल्यांवर त्यांची नांवं कोरलेली होती. ते दृष्य पाहून कांहींना वाटले कीं, ते गंधर्वांचे सैन्य पहात आहेत. त्यांच्या त्या करामती पाहून कांहीं प्रजाजन व कांहीं जाणतेसुद्धा वाह रे वा, करून त्यांना उत्तेजन देत होते. रथ चालवण्याचे कसब पाहून कांहीं आनंदाने ओरडून आपली शाबासकी देत होते. आपल्या राजपुत्रांची करामत पाहून ते सगळे प्रभावीत होत होते. वृकोदर व दुर्योधन त्याच्या गदा घेऊन आखाड्यात उतरतात तसे हत्तीच जणूकाय आले असें वाटत होते. त्याची लढत पाहून बरेचजण घाबरून गेले. त्यातील उग्रता कोणालाही भिववणारीच होती. हे होत असतांना विदूर त्याचा मोठा भाऊ व राजा धृतराष्ट्राला आणि गांधारीला व कुंतीला जे काय होत होते त्यातील शास्त्रोक्तता समजावून देत होता.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे छत्तिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सदोतीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, त्या चढाओढीत जेव्हां भिम व दुर्योधन आखाड्यात मल्लयुद्ध करण्यासाठी उतरतात तेव्हां प्रजाजनांत दोन तट पडलेले दिसतात. एक भिमाची वहाव्वा करीत होता तर दुसरा दुर्योधनाची. दुर्योधनाकडे पाहून कांहीं ओरडत होते, तो पहा कुरु राज्याचा वारस, तर कांहीं भिमाकडे पाहीन ओरडत होते, तो पहा महाबली भिम. अशा ओरडाओरडीमुळें त्या परिसरात एकच गोंधळ उडाला. कांहीं फार मोठी गडबड होणार असें सर्वांना वाटत होते. द्रोण ते पाहून आपल्या मुलाला सांगतात, "जा आणि त्या महाबली मल्लयोद्ध्यास आवर. लोकांच्या अशा उत्तेजन देण्यामुळें कांही अघटीत होता कामा नये". वैशंपायन पुढे सांगतात, ती आज्ञा समजून अश्वत्थामा त्या दोघा योद्ध्यांना आवरतो. द्रोण स्वतः आखाड्यात उतरतात व प्रथम संगीत थांबवतात. त्यानंतर तो भारद्वाजाचा शूर पुत्र ढगांचा गडगडाट व्हावा अशा आवाजात बोलतो, "आता पहा तो पार्थ, माझा प्रिय शिष्य, जो मला माझ्या मुलापेक्षा जास्त आवडतो, जो सर्व शस्त्रात प्रवीण आहे, जो साक्षात इंद्राचा मुलगा आहे, जणू काय विष्णूचा धाकटा भाऊ, ज्याने सगळे पवित्र विधी उरकले आहेत, आपल्या बोटांत अंगुष्टके घालून धनुष्यावर हात ठेवून उभा आहे. सुवर्णाने मढवलेले चिलखत नेसलेला असा फाल्गुन सुर्यासारखा चमकत आहे. असा अर्जुन पाहून जमलेला सगळा प्रजाजन आनंदाने ओरडू लागला, कोणी शंख तर कोणा तुतारी वाजवू लागले. कोणी ओरडत होते, तो पहा कुंत्तीपुत्र अर्जुन येत आहे. हा पांडवातील मधला व तिसरा आहे. हा कुरु घराण्याचा संरक्षक आहे. हाच सर्वात श्रेष्ठ योद्धा आहे. हा सर्वगुण संपन्न आहे. हाच सुसंस्कृतपणाचा पुतळा आहे". असें सगळे प्रशंसोद्गार ऐकून कुंत्तीचे ऊर भरून आले. त्यामुळें जो गोंधळ उडाला त्यांने चकीत होऊन धृतराष्ट्र विदूराला विचारतो, "अरे क्षत्री हा गोंधळ कशामुळें होत आहे"? त्यावर विदूर सांगतो, "अरे राजा, तो पांडवातील तिसरा अर्जुन त्याची आभूषणे घालून येत आहे त्याचे स्वागत प्रजाजन करीत आहेत". ते ऐकून धृतराष्ट्र बोलतो, "तो पार्थ जणू पवित्र अग्नीच कीं काय, त्याच्या साठी हे होत आहे कां? मी धन्य झालो".

प्रेक्षकांचे ओरडणे शांत झाल्यावर विभत्सू (अर्जुन) त्याची धनुर्धारी करामत दाखवायला सुरुवात करतो. अग्नेय अस्त्राने तो अग्नी उत्पन्न करतो. वरुण अस्त्राने तो पाऊस पाडतो. वायव्य अस्त्राने तो वारा उत्पन्न करतो त्यामुळें सगळीकडे वावटळ उठते. पर्जन्य अस्त्रांने आकाशात ढगे येतात. आणि भौम अस्त्रांने जमीन तयार होते. पर्वत अस्त्राने डोंगर तयार होतात. अंतर्धान अस्त्राने ते सगळे एकदम अदृष्य होते. आता ते अर्जुन एकदम उंच व नंतर एकदम छोटा दिसू लागतो. आता तो रथाच्या चाकावर बसलेला दिसतो तर दुसर्या क्षणी तो रथात बसलेला दिसतो. त्याच्या दुसर्या क्षणी तो जमिनीवर दिसतो. त्याची कसब कमालीची असते. भाला फेकीत तो एका हलणार्या लोखंडाच्या डुकराला भाला मारतो. अर्जुन त्याची तलवारबाजीची कसब दाखवतो. उंच टांगलेल्या रिकाम्या शिंक्यात तो एकवीस बाण मारतो. अर्जुन त्याची कसब तिरंदाजीत, तलवारबाजीत आणि गदा चालवण्यात अशा सर्वच शस्त्रात दाखवतो.

तो सोहळा संपला व सगळ्या राजपुत्रांची चाचणी संपल्यावर सगळीकडे शांतता पसरली. लोक आपापल्या घरी जाऊ लागले. शेवटच्या सलामीत वाद्यांच्या आवाजात संचलन करीत द्रोण व त्यांचे सर्व शिष्य पटांगणाच्या एका बाजूस येत होते. द्रोण सर्वात पुढे होते व त्यांच्या मागून पांच पांडव शिस्तीत चालच होते. त्यांच्या मागून दुर्योधन व त्याच्या मागून त्याची शंभर भावंड (त्यात युयुत्सू होता म्हणून शंभर) शिस्तीत संचलन करीत होती. कौरवांच्या मागून द्रोणांचा पुत्र अश्वत्थामा चालत होता. प्रत्येक राजपुत्र त्याचे खास शस्त्र घेऊन असें चालत होते. जणूकाय ते दानवांच्या फौजेचा परामर्ष घेण्यासाठी जात आहेत.

अशारितीने आदि पर्वातील संभव पर्वाचा एकशे सदोतीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे अडतिसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगत असतात, तो विलक्षण देखावा सर्वजण डोळे विस्फारून पहात असतांना एका बाजूने तो महारथी कर्ण ज्याच्या कपाळावर सूर्याची चिन्हे होती कानात सूर्याची कुंडले होती आपले धनुष्य व बाण घेऊन पुढे सरसावत होता . त्याच्या अंगावर इतर शस्त्रे जी योद्धा घेऊन फिरतो तीसुद्धा होती. आता तो प्रांगणाच्या मधोमध येऊन ठेपला. त्याची धिप्पाड देहयष्टी, सुंदर मुद्रा, ऐटबाज चालण्याची तर्हा सर्व कांहीं लोकांची नजर खेचणारेच होते. आपल्याला माहित आहे कीं, तो कुंतीला तिच्या कौमार्यावस्थेत झालेला तिचा पहिला पुत्र होता. तो सूर्याचा अंश होता. त्याची हिम्मत व धाडस एकाद्या सिंहासारखे होते. तो नरपुङ्ग्व होता. हत्तीसारखा रुबाबार चालत तो राजबिंडा युवक प्रांगणात येऊन त्यांने अर्जूनाने ज्या सगळ्या करामती केल्या त्या सगळ्या करण्याची परवानगी कृपाचार्यांकडे नम्रतापूर्वक मागितली. एका बाजूला अर्जुन ते सगळे विस्मय करीत पहात होता व आतापर्यंत नाखुष दिसणारा दुर्योधन मात्र त्या प्रकारामुळें विशेष उत्साहीत होत्साता आनंदाने हसत होता. कर्णाला हे माहीत नव्हते किं. तो अर्जूनाचा मोठा भाऊ आहे, अशा परिस्थितीत तो धीरगंभीर आवाजात सगळ्याच्या समक्ष बोलतो किं, तो आता जे अर्जुनाने करून दाखवले ते सगळे प्रकार करू इच्छितो. पुढे तो सगळ्यांना आर्जव करतो किं, त्याला त्यासाठी रितसर परवानगी द्यावी. सोहळा संपला अशा समजूतीने जे प्रजाजन निघून जाण्याच्या तयारीत होते ते हा प्रकार पाहून पुन्हा स्थानापन्न होतात व पुढे काय होते त्याची उत्सुकतेने वाट पहातात. विदूर मात्र थोडे विचलित मनाने तो प्रकार, काळजी वाटल्या सारख्या चर्येने, पहात असतात. दुर्योधन व त्याची भावंडे मोठ्या उत्साहाने जाऊन कर्णाला मिठी मारतात. त्यांचा आनंद जणू गगनात मावत नव्हता. दुर्योधन कर्णाला उद्देशून बोलतो, "अरे, महारथी तुला मी नेहमीच मदत करून माझ्या बाजूला केले आहे. तू तुला जसे करावयाचे तसेंच कर परंतु, ह्या साम्राज्यात तुझा सुद्धा वाटा आहे हे लक्षात असू दे". त्यावर कर्ण त्याला उत्तर देतो, "जेव्हां तू तसें वचन देतोस तेव्हां मी असें समजतो किं, तसेंच होणार ह्यात शंका नसावी. मला तुझ्या मैत्रीची अभिलाषा आहे हे मात्र खरे. अहो राजपुत्र, माझी केवळ एकच इच्छा आहे किं, एकवेळ

माझे व अर्जुनाचे द्वंद्व व्हावे". दुर्योधन कर्णाला बोलतो, "अरे मित्रा तू नेहमीच माझ्या कडून खरी मैत्री अनुभवली आहेस तेव्हां तूसुद्धा माझ्या गरजेला हजर रहाशिल असें मी समजतो. अरें मर्दा, तू तुझ्या शत्रूच्या माथ्यावर तुझे पाय रोवशिल ह्यांत मला तिळमात्र शंका नाही". ते त्या दोघांचे संभाषण अर्जुन खजिल झाल्यासारखा ऐकत होता. शेवटी न राहून तो कर्णाला बोलतो, "तू कांहींही समज, तुझा अंत माझ्या हातूनच होणार आहे हे समजून रहा". ते ऐकल्यावर शांतपणे कर्ण त्यास ऐकवतो, "अरे अर्जुना हे लक्षात ठेव किं, हे परीक्षेचे प्रांगण सर्व शिष्यांसाठी आहे असें मी समजतो व त्याप्रमाणे मी आर्जव करीत आहे. तुला मध्ये बोलण्याची आवश्यकता नाही. अरे फाल्गुना राजे अनेक आहेत आपापल्या ताकदीने ते लढत असतात, एक क्षत्रिय म्हणून मला माझे अधिकार आहेत ते तू दुर्लक्षू शकत नाही, अथवा कोणीही दुर्लक्षू शकत नाही". ते कर्णाचे उद्गार एकून दुर्योधन आनंदाने टाळ्या वाजवू लागतो. कर्ण पुढे अर्जुनाला सांगतो, "आपण क्षत्रिय बडबडण्यात वेळ घालवत नाही आपण बाणांने बाणाला उत्तर देतो हे तू विसरला आहेस कां? तू तुझे बाण काढतोस कां मी तुझे डोके आत्ताच येथे उडवून देऊ सर्वांसमक्ष आणि आपल्या गुरूवर्यां समक्ष"? अर्जूनाला त्या भांडणात वाढ होऊ नये म्हणून त्याची भावंड धरून अडवतात. ते पाहून कौरव हसू लागतात. तरी अर्जुन कर्णाशी मुकाबला करण्यासाठी सरसावतोच. तेथे कर्णाला उत्तेजन देण्यासाठी दुर्योधन त्याला आश्वासक आलिंगन देतो. दोघे लढण्यासाठी सज्ज होतात. ते सगळे आकाशातून सूर्य व स्वर्गातून इंद्र पहात असतात. आकाशात ढगे जमतात व विजा चमकू लागतात. इंद्राचे धनुष्य दिसू लागते. गडगडाटाने ढगे हसू लागतात. हे असें जसें कांहीं इंद्रदेव आपल्या पुत्राचे कौतुक पहात आहे. त्याच वेळी सूर्य त्या ढगांला बाजूला सारून लख्ख प्रकाश पृथ्वीवर सोडतो जणूकाय सूर्य ती लढाई पहात आहे. अर्जुन ढगात लपलेला व कर्ण सूर्य प्रकाशात उघडा असें ते विलक्षण दृष्य होते. धृतराष्ट्राचे पुत्र कर्णाबरोबर व द्रोण, कृप, भिष्म पार्थाबरोबर उभे आहेत असें दिसले. त्याप्रमाणे सगळी प्रजा व स्त्री परिवार दोन भागात  वाटला आहे असें दिसले. ते विदारक दृष्य पाहून त्याची माता कुंती बेशुद्ध होते . तिच्या बरोबर असलेल्या सेविका व विदूर तिला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करू लागतात. तोंडावर पाणी शिंपून व चंदनाचा लेप लावून. आपली दोन अपत्ये एकमेकाच्या जीवावर उठलेली पाहून ती

असहाय अवस्थेत घाबरून जाते. ती त्यांना समजावण्याच्या परिस्थितीत नव्हती. ते सगळे हाता बाहेर जात आहे हे पाहून शस्त्रविद्येचे प्रमुख आचार्य ह्या नात्याने मध्येच येतात. आपले गुरुवर्य म्हणून जे कर्तव्य आहे ते त्यांना चांगलेच माहीत होते व म्हणून ते त्या दोघांना दूर होण्याची आज्ञा करतात. त्यानंतर कृपाचार्य कर्णाकडे पहातात. तेव्हां कर्ण पुनः एकदा त्याचे कसब दाखवण्याची परवानगी मागतो.

त्याचे ते आर्जव ऐकून गुरुवर्य कृपाचार्य पुढे येतात व त्याला सांगतात, "अरें कर्ण द्वंद्वाच्या नियमांचे तुला भान राहीलेले नाही ह्याचे मला नवल वाटते. तुला माहीत आहे किं, त्या आधी तुला तुझे पिता कोण व आई कोण ते सांगावे लागेल व जर ते अर्जुनाच्या आईबापांच्या तोलामोलाचे नसतील तर तुमचे द्वंद्व होऊ शकत नाही कारण, फक्त एका योग्यतेचेच द्वंद्व करू शकतात. तरी तू तुझी खरी माहीती जाहिर कर".

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकून कर्णाचे स्वरुप एकाद्या कोमेजलेल्या कमळाच्या फुलासारखे होते. त्याला क्षणभर असें वाटते किं, धरणीमाता त्याला गिळून कां टाकत नाही. परंतु, त्याचा मित्र दुर्योधन ज्याला ते शास्त्र चांगलेच ज्ञात होते तो बोलतो, "अहो गुरुवर्य, शास्त्रातील ग्रंथाप्रमाणे तीन प्रकारचे लोक द्वंद्व करू शकतात. पहिले ते ज्यांचे तुम्ही आत्ता सांगितले, दुसरा दोन राजे द्वंद्व करू शकतात व तिसरा सैन्याचा मुख्य असें तीन प्रकारचे त्यांच्यात द्वंद्व होऊ शकते. तरी मी कर्णाला आत्ताच अंगदेशाचा राजा जाहीर करतो मग त्यांची लढाई होण्यात तुम्हाला कांहीं अडचण वाटणार नाही नां"?

वैशंपायन पुढे सांगतात, तेथल्या तेथे दुर्योधन ब्राह्मणांकरवी रितसरपणे मंत्रपुजा करून कर्णाला अंगदेशाचा राजा घोषित करतो. ते पाहून सर्व प्रजाजन किंचाळून त्या राज्यारोहणाला अनुमोदन देतात व कर्ण राजा होतो व म्हणून अर्जूनाला द्वंद्वासाठी आव्हान देण्यास योग्य होतो. त्यानंतर कर्ण दुर्योधनाकडे वळून बोलतो, "अहो नरपुङवा दुर्योधना, तुझ्या ह्या उपकाराची फेड मी कशी करावी असें तुला वाटते ते सांग. तू जे सांगशिल ते मी करीन. मी तुझ्या मैत्रीचा ऋणी आहे". दुर्योधन त्यावर कर्णाला बोलतो, "तसेंच होईल". त्या दोघा मित्रांच्या आनंदाला पारावार रहात नाही, सगळे कौरव कर्णाचे अभिनंदन करू लागतात.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे अडतिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे एकोणचाळीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन बोलतात, अशारितीने कर्ण अंगदेशाचा अधिकृत शास्ता झाला. कर्णाचा पालक, अधिरथ, त्या ठिकाणी पोहोचले. आपल्या थरथरत्या शरीराने हातात असलेल्या काठीवर आपल्या देहाला आधार देत तो उभा राहिला. त्यांना पाहून कर्ण आपली शस्त्रं बाजूला ठेवून अत्यंत आदराने पुत्रासारखा त्यांच्या पुढे नतमस्तक उभा झाला. त्याच्या अंगावरचे राज्याभिषेकाचे जल त्याच्या पित्याच्या पायावर पडत होते. अधिरथ झटकन कर्णाला घट्ट आलिंगन देतो. त्याच्या पायावर पडलेले ते पाणी तो आपल्या झग्याने पुसून टाकतो. त्या नवोदित राजाला तो बोलतो, "माझ्या मुला", एवढेच बोलतो व त्याच्या नेत्रांतून आनंदाश्रू वाहू लागतात, त्याला त्यापेक्षा कांहीं जास्त बोलू शकत नाही. ते पिता व पुत्रामधील प्रेम संबंध पाहून पांडवांतील भिम त्या अधिरथाला कर्णाचा पिता समजून कुत्सितपणे उद्‍गारतो, "अरे, रथचालकाच्या मुला, तुझी लायकी नाही कीं, तू पार्थाच्या हाती मरावेस. तुझी लायकी एक चाबूक चालवण्याचीच आहे. तुझी राजा बनण्याचीसुद्धा योग्यता नाही. तुला असें राज्य देणे हे असें झाले कीं, यज्ञासाठी काढलेले लोणी कुत्र्याला खिलवणे". एवढे बोलतांना त्याचे ओठ संतापाने थरथरत होते. ते बोलल्यानंतर त्यांने एक मोठा श्वास घेतला व गप्प बसला. आकाशाकडे पहात असें अविर्भाव केले जसें, "अहो भाग्य". हे पाहिल्यावर जसा एकादा तुफान झालेला हत्ती उसळी मारून चाल करून यावा तसा दुर्योधन उसळून उठतो व रागांत गर्जतो, "अरे मवालीगिरी करणार्या भिमसेना, वृकोदरा, तुला असें बोलणे शोभत नाही. सामर्थ्य हा प्रत्येक क्षत्रियाचा हक्क असतो. क्षत्रिय कनिष्ठ कुळातील असला तरी तो क्षत्रिय आहे म्हणून लढण्यासाठी योग्य ठरतो हे तुला माहित नाही कां. क्षत्रियांची वंशावळी एकाद्या मोठ्या नदी सारखी असते, जसे नदीचे मूळ माहीत नाही म्हणून तिचे पावित्र्य कमी होत नाही, तसेंच क्षत्रियांचे असते. आज पर्यंत होऊन गेलेल्या अनेक हिम्मतवान क्षत्रियांच्या कुळाची कोणालाही माहिती नाही म्हणून ते बाद होत नाहीत. ज्या दणक्याने दानवांचा नाश केला ते हाड एका मर्त्य दिधीचीच्या फासळ्याचे होते. गुह ज्याचे कार्य देवतांच्या कार्याशी मुकाबला करते त्याच्या वंशाचे कोणालाही ज्ञान नाही. कांहीं त्याला अग्नीचा पुत्र मानतात, कांहीं कृत्तिका, कांहीं रुद्र आणि

कांहीं गंगा. खरे कोणालाच माहीत नाही. आम्ही असें सुद्धा ऐकतो कीं, जन्माने क्षत्रिय व्यक्ति नंतर ब्राह्मण होतात. विश्वामित्र, वसिष्ठ, परशुराम व अनेक इतर जन्मले क्षत्रिय म्हणून परंतु, पुढे ते ब्राह्मण समजले गेले. त्यानी ब्रह्म गाठले म्हणून ब्राह्मण झाले. महान गुरु द्रोणाचार्य पाण्यातून उत्पन्न झाले, गुरुवर्य कृपाचार्य गौतमाच्या घराण्याचे मातीतून आले. अरे पांडवानो, तुमचे जन्म कसे झाले त्याचा विचार करावा. हरीणीच्या पोटी काय वाघ जन्म घेऊ शकतो? सूर्यासारखा तेजस्वी, ज्याच्या कडे दिव्य कुंडले जन्मातः आहेत , जो जन्माता शुभ लक्षणे घेऊन आला आहे, अशा क्षत्रियांस माझ्या मैत्रीच्या कारणांने अंगदेशापेक्षा मोठ्या देशांचा राजा व्हायला पाहिजे. जर  कोणाला, मी कर्णाला दिलेला सन्मान मान्य नसेल तर तो त्याचा रथ चालवून कर्णाबरोबर द्वंद्व करण्यास तयार होईल, फालतू शिवीगाळी करू नये. अशा शिवीगाळीने तुम्ही पांडव, आपली खरी लायकी काय ते सगळ्यांना दाखवता अहात.

वैशंपायन पुढे सांगतात, असें दुर्योधनाचे वक्तव्य ऐकल्यावर प्रेक्षकांतील कांहीं जे त्या मताशी सहमत होते ते एकमेकांत कुजबुजतात. त्या दिवशीचा सूर्य मावळत होता त्यामुळें त्यावेळी द्वंद्व होणे शक्य नव्हते म्हणून दुर्योधन कर्णाचा हात धरून त्याला त्या प्रांगणातून सन्मानपूर्वक बाहेर नेतो. तो सोहळा अशाप्रकारे कौरव व पांडवांच्या वाढत्या तेढीनेच संपतो. पांडव, द्रोण, भिष्म, कृप असें सगळे आपापल्या रथातून त्यांच्या घरी जातात. लोकसुद्धा आपापल्या गृही निघून जातात. निरनिराळी माणसे आपापल्या मतांचे समर्थन करीत बोलत आपापल्या घरी जातात, कोणी म्हणतात, अर्जुन जिंकला, कोणी म्हणतात कर्ण, तर कोणी दुर्योधन. कुंतीला मात्र आता तिचा पहिला पुत्र कर्णच आहे हे त्या प्रसंगामुळें समजते. त्याची सगळी शुभ लक्षणं दुर्योधन सांगतो ती तिला माहीत असल्याने त्यांवरून हे तिला खात्रीपूर्वक पटते. त्याचे राज्यारोहण झाले हे पाहून एका आईला जसा आनंद व्हावयाला पाहिजे तसा कुंतीला झालेला असतो . परंतु, ती पार्था त्याची जाणीव कोणाला होणार नाही ह्याची दक्षता राखते. ती कर्णाला राजपद दिले म्हणून मनापासून दुर्योधनाचे शतशः आभार मानते. अशारितीने दुर्योधनाच्या कारणांने कुंतीला कर्णाची माहिती मिळाल्यामुळें ती अभागिनी माता ह्यापुढे दुर्योधनाशी चांगले संबंध ठेवण्याचे ठरवते. तिची अपेक्षा असतें कीं, दुर्योधनाच्या माध्यमातून ती कर्णाशी संपर्क करू शकेल.

कुंतीला तिच्या मोठ्या मुलाला भेटण्याची इच्छा तीव्र होते. अशा मनस्थितीत ती घरी परतते. इकडे युधिष्ठीर, मोठा पांडव, कर्णाची योग्यता जगातील श्रेष्ठ योद्ध्यात आहे हे मान्य करतो. कर्णाबद्दल त्याच्या मनात सद्भाव वाढतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे एकोणचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशेचाळीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, द्रोण पहातो कीं, आता पांडव व कौरव भावंडे शस्त्र विद्येत निपूण झाला आहेत तेव्हां मी माझी गुरूदक्षिणा मागावयाला हरकत नाही. असेंच द्रोणाचे एकदा सर्व शिष्य जमले असतां द्रोण त्यांना गुरूदक्षिणा द्यावयास सांगतो. ते सगळे विचारतात, "गुरुवर्य आपल्याला काय दिल्याने आपले समाधान होईल", ते ऐकून मोठ्या उत्साहाने गुरुवर्य द्रोण बोलतात, "माझी इच्छा आहे किं, पांचालच्या राजाशी युद्ध करून त्याला पकडून माझ्या समोर आणावे, अशी माझी गुरुदक्षिणा आहे". ते ऐकून ते शिष्य एकदम बोलतात, "गुरूवर्य आम्ही ते करू". त्यानंतर लवकरच ते सगळे शूरयोद्धे आपापल्या रथांतून पांचाल देशाकडे कूच करतात. पांचाल देशाला ते वेढा घालतात. दुर्योधन, कर्ण, युयुत्सू, दुःशासन, विकर्ण, जलासंध आणि सुलोचन असें पुढाकार घेतात व त्यांच्या पाठी इतर क्षत्रिय योद्धे एकमेकांशी चुरस लागल्यासारखे द्रुपदावर हल्ला करण्यासाठी सज्ज होतात.

आपापल्या रथातून ते त्यांच्या पायदळी बरोबर पांचाल नगरीत मुसंडी मारून घूसतात. पांचालनरेश हे काय होत आहे ते आश्चर्याने पहात रहातात. त्यांच्या लक्षात येते कीं, हे आक्रमण आहे. त्यासरशी तो दिग्विजयी राजा भावंडांसह युद्धाला तोंड देण्यासाठी आपापल्या रथांतून निघतात. पांचाल नरेश यज्ञसेन जरी शस्त्रसज्ज होता तरी कुरु राजपुत्रांचा हल्ला जबरदस्त होता. त्यांच्या बाणांचा पाऊस पडू लागला व त्यात बेसावध असें पांचाल सैनिक गारद होत होते. रण ललकार्या ओरडत पांचाल सेना यज्ञसेनाच्या मार्गदर्शना खाली कुरु राजपुत्रांच्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी निघतात. यज्ञसेन अर्थात् द्रुपद, आपल्या शुभ्र रथातून लढाईला निघतो. अर्जुन आपल्या इतर कौरव भावंडांचा उत्साह पाहून द्रोणांना सांगतो, ह्यांचा उत्साह भरपूर आहे तरी प्रथम त्यांना नगरात शिरून आपली हिम्मत दाखवू द्या व नंतर आम्ही पांडव थोड्या वेळे नंतर आत शिरू. पांचाल नरेश ह्यांच्या धाडसाने नमणारा नाही तरी आम्ही ताजी फौज बनून पांचालांची दमछाक झाल्यावर हल्ला करावा असें मला वाटते. त्यावर द्रोण त्या व्युहास संमति देतात. त्याप्रमाणे पांडव शहराबाहेर पहिल्या हल्ल्याचे काय होते ते पहात रहातात. कौरवसेना आंत मुसंडी

मारून पांचाल शहराचे बरेच नुकसान करतात. त्याच बरोबर पांचाल राजा त्याच्या बाणांनी असंख्य कौरवांना घायाळ करतो. दोनही बाजूने बाणांचा वर्षाव होत असतो. ते असें होत असते किं, कौरवांना वाटते किं, फार मोठी पांचाल सेना लढत आहे. त्यात पांचाल सेनेच्या कडून जे ढोल व शंख ह्यांचे कान किटवणारे आवाज शहरातील घराघरातून होत होते, त्यांनी ते कौरव थोडे जास्त भयभीत होत होते. दुर्योधन, विकर्ण, सुवाहू, दीर्घलोचन, दुःशासन, ते पांचाल नरेशाचे आव्हान मोठ्या हिरीरीने स्वीकारतात आणि यज्ञसेनावर थेट मारा करू लागतात. पांचाल नरेश प्रिशताचा मुलगा जरी अनेक बाणांनी जखमी झाला होता त्याचे शौर्य यत्किंचितही कमी झालेले नव्हते. त्यात पांचाल देशाच्या लढाऊ नागरिकानी अनेक अस्त्रे व आयुधे घेऊन लढाईत भाग घेण्यास सुरुवात केल्याने त्या युद्धाचे स्वरुप अधिक भीषण झाले होते. द्रुपदाचे सच्चे नागरिक लहान मोठे सगळे त्या युद्धात सामील झाले होते. जसें हे होऊ लागले तसें कौरव समजले कीं, बाजू उलटण्याची शक्यता आहे तसें, ते माघार घेऊ लागले, ते पाहून आता पांडव दुसर्या चढाईच्या तयारीने शहरात घुसले.

पांडवांना समजले किं, आता त्यांची पाळी आहे, ते द्रोणाला नमन करून आपापल्या रथांतून युद्धासाठी निघतात. अर्जुन युधिष्ठीराला सांगतो, त्याने मागे रहावे व अर्जुन पुढे राहील कारण त्याप्रमाणे त्याची व्युहरचना होती. त्याप्रमाणें युधिष्ठीर मागे राहीला व अर्जुनाने आगेकुच केली. अर्जुनाने नकुल व सहदेव ह्यांना त्याला साथ देण्यास सांगितले. भिमसेन त्याची गदा घेऊन पायदळीवर चालून गेला. त्याच्या गदेने असंख्य राऊत (पायदळीचे सैनिक) मारले गेले. प्रेतांचा ढीग झाला. भिम त्याना तुडवित पुढे आक्रमकपणे जात होता. भिमांने पांचालांच्या हत्तीफौजेवर हल्ला केला व एकेका हत्तीस गदेने मारून ठार करण्यास सुरुवात केली. भिमाच्या गदेच्या मारामुळें त्या अजस्त्र हत्तींची मुंडकी फुटून पडू लागली. रक्ताची थारोळी सर्वत्र जमिनीवर झाली होती. वृकोदराच्या त्या मार्यामुळें पांचाल सेनेची धुळधाण झाली. अर्जुन द्रोणांचे ऋण फेडण्यासाठी द्रौपदाच्या दिशेने बाणांचा वर्षाव करतो त्यामुळें तो राजा हत्तीवरून जात होता त्या हत्तीवरून खाली कोसळतो. त्यानंतर तो महारथी इतर रथ व पायदळीच्या सैनिकांवर बाणांचा वर्षाव करून त्यांना इतस्तथा पळवतो. पांचाल नरेश व त्याचा भाऊ श्रींजय अर्जुनावर बाणांचा वर्षाव करतात. ते सगळे

बाण फाल्गुन अडवतो व कांहीं तसेंच मारणार्यावर उलटवतो. जसें पांचालांचे स्वसंरक्षणासाठी प्रतिहल्ले होत होते तसें अर्जुनाचा लढण्याचा जोर वाढत होता. असूर संवर जसां इंद्रावर चाल करून गेला तसें पांचाल नरेश व त्याचा सेनापती सत्यजित अर्जुनावर चालून गेले. दोनही बाजूंनी बाणांचा पाऊस पडत होता, त्यात अनेक वीर घायाळ होत होते, युद्ध रंगात आले होते. अर्जुनाचे हात इतक्या वेगांने हलत होते बाण मारतांना किं, एकादे यंत्र असावे. जेव्हां सत्यजित पहातो कीं, अर्जुन द्रौपदाला काबीज करणार, तेव्हां तो, इंद्र जसा असूर विरोचनाचा पुत्र वलीवर चालून गेला, तसा जातो. त्यांच्यात तुंबळ युद्ध होते, ज्याची तुलना कशाशी करावी असें कळत नाही. अर्जुन सत्यजिताला दहा बाणांनी घायाळ करतो. तशा स्थितीत तो शूर योद्धा सत्यजित अर्जुनावर शंभर बाणांनी प्रतिहल्ला करतो.

अर्जुनाची चपळाई कमालीची होती, तो त्याचे बाण जास्त वेगांनी सोडावयास लागतो. त्याने तो सत्यजिताचे धनुष्य मोडून टाकतो. परंतु, सत्यजित हार मानणार्यातील नव्हता. तो फिरून हल्ला करतो जेव्हां अर्जुन पांचाल नरेशाला ताब्यात घेण्याचा प्रयत्न करण्यास सुरुवात करतो. सत्यजित पार्थाच्या रथाची मोडतोड करतो, त्याच्या घोड्यांना जखमी करतो. हे युद्धनितीच्या विरूद्ध होते व ते सत्यजित केवळ जिंकण्यासाठी करतो आहे, हे पाहून पार्थ त्याच प्रकारचा प्रतिहल्ला त्याच्यावर करतो. त्यात अर्जुन सत्यजिताच्या घोड्यांना मारून टाकतो. त्याचा रथावरील ध्वज फाडून टाकतो. शेवटी त्याच्या सारथ्याला मारून टाकतो. एवढे झाल्यावर सत्यजित हार मानून लढाईतून माघार घेतो. जखमी अवस्थेतील द्रुपद आपल्या सेनानीची ती अवस्था पाहून समजतो कीं, आपण हरत आहोत. तरीसुद्धा शेवटचा प्रयास म्हणून तो त्या अवस्थेत भाल्यांचा मारा करू लागतो. अर्जुन द्रौपदाच्या रथाचे नुकसान करतो, त्याचा ध्वज फाडून टाकतो, ध्वजाचा दांडा तोडून टाकतो. नंतर त्याचे घोडे मारतो. आपली बाकदार तलवार हातात घेऊन तो शूरवीर योद्धा द्रुपदाच्या रथावर त्याच्या रथातून उडी मारतो. आता अर्जुन द्रुपदाच्या रथात त्याला पकडण्याच्या अभिनिवेषात उभा असतो. ते पाहून इतर सैनिक युद्ध संपले हे ओळखून आपापली शस्त्रे घेऊन तेथून निघून जाण्याच्या तयारीला लागतात. जसें गरूड सापाला पकडतो असें ते दृष्य होते. द्रौपदाला अर्जुन अटक करतो. त्यानंतर अर्जुन त्या

पांचाल नरेशाला उद्देशून बोलतो, "अहो यज्ञसेना, तुम्ही आमचे नातलग अहात म्हणून भिम तुमच्या सेनेला आता मारणार नाही. आम्ही हे युद्ध केले कारण, आमच्या गुरुनें आमच्याकडे अशी गुरुदक्षिणा मांगितली आहे किं, आम्ही त्यांचे सगळे शिष्य, तुम्हाला पकडून त्यांच्या समोर एकाद्या कैद्यासारखे हातपाय बांधून हजर करावे. एकदा ते झाले किं. आमचे गुरुऋण संपते म्हणून दुसरा कांहीं अर्थ कृपया काढू नका". त्यानंतर ते पांडव व कौरव आपल्या मंत्र्याच्या संम्मतिने द्रोणाचार्यां पुढे द्रुपदाला हातपाय बांधलेल्या केविलवाण्या अवस्थेत उभे करतात. ते पाहून द्रोण द्रुपदाला बोलतात, "द्रुपदा आता तू माझ्याशी असलेली दोस्ती आठवशील कां"? नंतर द्रोण त्याला बोलतात, "घाबरू नकोस, माझ्या बालमित्रा, मी तुला फक्त ते दाखवण्यासाठी हे केले. आम्ही ब्राह्मण सदैव क्षमाशिल असतो. क्षत्रियांसारखे डुग धरून सूड उगवणे आम्हा ब्राह्मणांचे स्वभावात नसते. परंतु, तुझ्या त्या बेजबाबदार वागण्याची ही शिक्षा तुला करावी लागली आहे. माझे तुझ्यावरील प्रेम तितकेच आहे जितके तेव्हां बालपणी होते म्हणून मी आता तुला कांहीं देणार आहे. त्याआधी एक सांगू इच्छितो किं, मी त्यावेळी तुला कां भेटण्यास आलो होतो. माझ्या बालमित्रा, तेव्हां मी जामदाग्न्याकडून त्याची सगळी शस्त्रविद्या दानात मिळवून आलो होतो व असा विचार करत होतो कीं ती विद्या माझ्यापेक्षा तुझ्यासारख्या राजालाच जास्त उपयोगाची ठरेल व म्हणून ती विद्या मी तुला देण्यासाठी आलो होतो. ती तुला देऊन तुझ्या बरोबर उर्वरित आयुष्य व्यतित करणे असां माझा साधा उद्देश होता. परंतु, तू ज्या प्रकारे माझी निर्भत्सनी कारण नसतांना केलीस त्यामुळें मी तो विचार सोडला व उलट तुझे डोळे उघडण्यासाठी हे मला करावे लागले". द्रोणांचे ते निष्पाप बोलणे ऐकून द्रुपद खजिल झाला व खाली मान घालून क्षमा याचना करू लागला. त्यानंतर थोडे थांबून द्रोण त्या सांगतात, "अरे मित्रा, आता मी दुसरेच कांही देणार आहे. आता तुला माहीत आहे किं, तुझे राज्य आता माझे झाले आहे. तर त्यातील अर्धा भाग मी तुला दान करणार आहे व उरलेला मी स्वतःसाठी ठेवणार आहे. भागिरथी नदीच्या दक्षिणेकडील भाग मी तुला दान करतो व उत्तरेकडील भाग मी स्वतःसाठी ठेवणार आहे. तुला हे मान्य आहे कां ते सांग व माझी मैत्री मान्य कर". एवढे बोलून द्रोण मिस्किलपणे हसत त्या हरलेल्या राजाकडे पहात राहीले.

द्रुपद त्याला उत्तर देतो, "तू खरोखरच महान आहेस. माझी मोठी चूक झाली तरी ह्यापुढे मी तुझी मैत्री सदैव मान्य करीन".

वैशंपायन नंतर सांगतात, द्रोण पांचाल नरेशाला सोडून देतो. आनंदाने जिंकलेले राज्य स्वीकारण्याचा विधी केला जातो. द्रुपद मात्र त्याच्या नगरात दुःखी अंतःकरणाने आपल्याला मिळालेल्या अर्ध्या राज्यात जे मकंदी प्रांतात असते व गंगेच्या किनारी रहातो त्याचे राज्य चर्मनवती नदीच्या तटापर्यंत पसरलेले होते, व कधी वचपा काढता येईल कां त्याची संधी पहात असतो. त्यासाठी तो सर्व जग पालथे घालतो एक असा पुत्र (अर्जुनासारखा) मिळवण्यासाठी जो त्याच्या पराजयाचा सूड उगवण्यात यशस्वी होईल. द्रोण आपले निवासस्थान अहीछत्र येथे हलवतो, जेथे अनेक नगरे व शहरे वसली होती. जी अर्जुनाने जिंकून आपल्या गुरुला दान केली होती.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे चाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे एकेचाळीसावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, परीक्षेच्या एक वर्षानंतर धृतराष्ट्र युधिष्ठीराला गादीचा उत्तराधिकारी करावयाचे ठरवतो. युधिष्ठीराची वर्तणूक, त्याची न्यायप्रियता, प्रेमळपणा, मनाचा मोकळेपणा, प्रामाणिकपणा, धैर्य, हिम्मत, कामातील सावधानता, शिस्त, निर्णयाचा खंबीरपणा, सर्वांना घेऊन काम करण्याची हातोटी, शांत प्रवृत्ती, दिलदारपणा अशा विविध गुणांमुळें तो गादीसाठी योग्य समजला गेला, त्याशिवाय तो कुरु वंशाचा त्या पिढीतील ज्येष्ठ होता. इतर मानकर्यांनी सुद्धा त्याला मान्यता दिली होती. गादीवर बसल्यावर थोड्याच काळात तो त्याची निवड किती योग्य होती ते त्याच्या कामांने सिद्ध करतो. तो त्याच्या आधीच्या राजांपेक्षा जास्त चांगला आहे हे सगळे मान्य करतात. पांडवातील दुसरा, वृकोदर म्हणजे भिम, शंकरशनाकडून (बळराम) गदा व तलवार व इतर शस्त्रांचे शिक्षण घेत असतो. त्याचे प्रशिक्षण संपल्यावर तो द्युमत्सेनासारखा किंबहुना त्याहूनही जास्त प्रखर गदायोद्धा झाला. ती सगळी पांचही भावंडे त्यांच्या मातेच्या मार्गदर्शनामुळें एकमेकांस सांभाळून सगळी कामं व्यवस्थितपणे करीत होती. तिसरा अर्जुन त्याच्या धनुर्धारी विद्येत चपळाईसाठी ख्यातनाम झाला होता. नेमबाजीत त्याचा हात कोणीही धरू शकणारा नव्हता. क्ष्वर, नरच, वल आणि विपथ ही आयुधं तो उत्तमरित्या हाताळत होता. कशीही असली तरी ती तो वापरून परिणाम साध्य करीत होता. द्रोणांनी त्याला जगातील सर्वात श्रेष्ठ तिरंदाज कीं, जो चपळाईत, वेगांत, नेमबाजीत, नाजूकपणात त्याच्या सारखा तोंच असें ते सांगत. एकदा सगळ्या शिष्यांच्या समक्ष द्रोण अर्जुनाला सांगतात, कीं, अगस्त्य ऋषींचा कोणी चेला होता, त्याचे नांव अग्नीवेश. अग्नीवेश माझे गुरू, त्यांने त्याच्या तपस्येच्या जोरावर एक अद्वितीय अस्त्र मिळवले होते त्याचे नांव ब्रह्मास्त्र. हे ब्रह्मास्त्र कधीही व्यर्थ जात नाही परंतु, त्याचा उपयोग कोणा मामुली माणसांवर केला तर मात्र सगळे जग ते अस्त्र नष्ट करून टाकेल. ते त्यांनी मला शिष्यपरंपरेनुसार दिले आहे व ते मी तुला देण्याचा विचार करीत आहे. ते अस्त्र देतांना ते मला म्हणाले होते कीं, देण्या आधी त्याची चांगली परिक्षा घे कारण त्याचा उपयोग अयोग्य ठिकाणी होणार नाही. मी ते अस्त्र देण्याची गुरू दक्षिणा ह्या सगळ्या तुझ्या भावंडां समक्ष मांगत आहे. ती अशी कीं, "तू त्या

अस्त्राचा दुरुपयोग करणार नाहीस, असें वचन तू मला देत आहेस. त्याशिवाय जेव्हां मी तुझ्यावर शस्त्र उगारीन तेव्हां तूसुद्धा माझ्यावर तितक्याच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त त्वेषाने माझ्यावर शस्त्र चालवशील". अशा जगावेगळी गुरूदक्षिणा अर्जुन द्रोणाला देतो व उत्तरेकडे निघून जातो. त्याक्षणी एक आकाशवाणी होते कीं, सगळ्या जगात अर्जुनासारखा धनुर्धारी नाही. खरोखरीच त्याप्रमाणे अर्जुन कोणत्याही लढाईत मग ती बाणांची असो, गदेची असो अथवा तलवारीची असो अर्जुनाची कसब अतुलनीय ठरे. पांडवांतील सहदेव नितीशास्त्र आणि कर्तव्यांचे तंत्र वृहस्पतींकडून शिकतो, जे स्वर्गाचे गुरू होते. तो त्याच्या चार भावंडांच्या सानिध्यात नेहमी रहात होता. त्याचा सहोदर बंधू नकुल द्रोणांच्या शिकवणीने एक उत्तम महारथी (अतिरथ) व सर्वगुणसंपन्न असा योद्धा झाला होता. असें ते पांच भाऊ इतके प्रबळ झाले किं, कोणताही शत्रू त्यांच्या पुढे उभा राहू शकत नसें. सौवीर ज्यानें तीन वर्षे चालणारा यज्ञ केला, गंधर्वांचा पाडाव करण्यासाठी, त्याचा पराभव केला. ज्या यवन राजाचा पाडाव पंडुला करता आला नाही त्याचासुद्धा पाडाव त्या पांच भावंडांच्या चमूने केला. विपुल जो सौवीरांपैकीं होता, ज्याच्या धाडसाचे सर्वजण कौतुक करीत त्याला ठार मारले कारण तो कुरु वंशाच्या लोकांचा तिरस्कार करीत असें. राजा सुमित्रसुद्धा जो सौवीरांपैकीच होता, ज्याला दत्तमित्र म्हणून सुद्धा ओळखले जाते, त्याची खोडकी चांगली जिरवली अर्जुनाने.

भिमाच्या मदतीने अर्जुन एका रथातून पूर्वेकडील हजार रथ असणार्या राजाला नमवतो. सगळे दक्षिण दिशेचे प्रांत धनंजय लुटतो व अगणित संपत्ती कुरु राजधानीत आणतो. अशाप्रकारे पराक्रम करीत ते पांच पांडव आपल्या राज्याच्या सीमा वाढवत राज्याची श्रीमंती वाढवत, इतर राजांना मांडलिक करीत, राज्याचा कारभार करीत होते. हे होत असतांना धृतराष्ट्राच्या मनात त्याची मुलं व हे पांडव ह्यांची तुलना होत असें, त्यात त्याच्या बायकोचा भाऊ शकुनी व स्वतः गांधारी कानपिचक्या देत, अशाप्रकारांची वाढ झाली व परिणाम स्वरुप पांडवांबद्दल एकप्रकारची आसुया, द्वेषभाव उत्पन्न होत गेला. त्याकारणांने त्याची झोप उडाली व नसते विचार त्याच्या मनांत घर करून राहू लागले. पांडव मात्र त्या धृतराष्ट्राच्या मंडळींच्या अशा मनस्थितीबद्दल पूर्णपणे अनभिज्ञ होते. अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे एकेचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे बेचाळीसवा

(संभव पर्व संपले)

वैशंपायन सांगतात, धृतराष्ट्राला जशी वार्ता येत रहाते किं, पंडुची मुलं विक्रमावर विक्रम करीत राज्याचा विस्तार करीत आहेत व आपली मुलं छंद फंदात वेळ घालवत आहेत, तो दुर्दैवी पिता सततच्या चिंतेत पडलेला रहातो. अखेरीस धृतराष्ट्र त्याचा सल्लागार व कुटीलनितीतज्ञ कनिक जो सुद्धा गांधारचा होता त्याला विचार विनिमयासाठी बोलावतो. कनिकाला तो अंध राजा आपली व्यथा सांगतो, कीं, "अहो ब्राह्मणा, कनिका, दिवसें दिवस पंडुच्या मुलांचे प्रस्थ वाढत आहे, मला त्यांचा आता मत्सर वाटू लागला आहे कारण, त्यांच्या तुलनेने माझी मुलं कमी पडत आहेत. तरी त्याकरतां काय करावे ते सांगा. तुम्ही जे सांगाल तसे मी करीन".

वैशंपायन पुढे सांगत रहातात, कनिक मुद्याला धरून राजकारण नितीशास्त्रांत जे दिले आहे तें सांगू लागतो, "ऐका राजे, माझे उत्तर तुमच्या प्रश्नाला असें आहे, परंतु, माझ्या उत्तराने जर आपण नाराज होणार असाल तर मी न बोलणेच माझ्या हिताचे होईल", एवढे बोलून कनिक थांबला. धृतराष्ट्र त्याला अभय देतात व त्यानंतर तो राजनिती निपूण ब्राह्मण त्याला सांगतो, "एक राजा नेहमी शस्त्राने सज्ज असावा लागतो व जेव्हां गरज निर्माण होईल तेव्हा तो ते शस्त्र वापरण्याच्या तयारीत असला पाहिजे. त्यांने स्वताची क्षमता सतत सुधारीत ठेवली पाहिजे. स्वताच्या चुका होणार नाहीत अशारितीने सदैव दक्ष राहिले पाहिजे व त्याच वेळी शत्रूच्या चुकांवर लक्ष ठेवून त्याचा उपयोग कसा करता येईल ते ठरवले पाहिजे. जो राजा सदैव लढण्याच्याच तयारीत त्याचे सैन्य ठेवतो त्याला सगळे वचकून रहातात. म्हणून तो राजा सतत त्याची सेना व त्याची हत्यारे नेहमी अद्ययावत ठेविल. त्याचे सैन्य त्याच्या आज्ञेत राहिल अशासाठी तो सर्वकांहीं करील. राजाचे वागणे असें असले पाहिजे, ज्यामुळें त्याचे व त्याच्या सैन्याचे कमकुवतपणाचे मुद्दे शत्रूच्या ध्यानात येणार नाहीत. त्याचवेळी तो राजा शत्रूचा कमकुवतपणा हेरून त्याचा उपयोग स्वताच्या फायद्यासाठी करील. राजा एकादी मोहीम सुरु करण्या आधी त्याच्या सगळ्या बर्यावाईट बाजूंचा पूर्ण विचार करील व त्यानंतर ती मोहीम तडीस नेण्याचा निर्धार करून त्यात यशस्वी होईल. जसें अंगात रुतलेला कांटा पूर्णपणे काढला गेला नाही तर त्याचा

आंत अडकलेला भाग जसा रुतत रहातो तसें त्याचे दोष पूर्णपणे काढून टाकले गेले नाहीत तर ते मोठी पिडा होऊन त्रास देत रहातात. आपल्याला जाणून बुजून पिडा देणार्या शत्रूचा नायनाट करणे हे प्रशंसनीय असते मग कोणी कांहीं टीका करो. जर शत्रू मोठा हिम्मतवान असेल तर त्याच्या वाईट दिवसांची वाट पहावयाची असते व जसे ते सुरु होतील त्याचा फायदा उठवून त्या शत्रूचा पाडाव करावयाचा असतो. जिंकणे हे एकच राजाचे ध्येय असले पाहिजे त्यासाठी तो कांहींही करण्यास तयार असला पाहिजे. जे दोष सुधारता येत नाहीत त्यांकडे राजा दुर्लक्ष करील जणूकाय ते त्याला समजलेच नाहीत. शत्रूचा द्वेष न करता राजा त्याच्यावर लक्ष ठेविल. राजाला नेहमी सावध रहावयाचे असते व कोणावरही आंधळेपणे विश्वास ठेवावयाचा नसतो. बेसावध राजा नष्ट होतो. भाबडेपणा (भोळसटपणा) राजाला शोभत नाही. राजा विवेकी असला पाहिजे. जर तुझा शत्रू तुझ्या ताब्यात असेल तर त्याला त्वरित नष्ट करणेंच उचित समजावे. राजाला प्रतिस्पर्धी व शत्रू ह्यातील फरक समजला पाहिजे. प्रतिस्पर्धी आपल्या बाजूला वळवता येतो (पैसे देऊन किंवा प्रलोभनाने) शत्रू नाही. म्हणून शत्रूचा नायनाटच करावयाचा असतो. मेलेल्या शत्रूचा द्वेष करू नये. शत्रूचे मित्र शत्रू समजावेत. शत्रूचे शत्रू मित्र समजावेत. तुझ्या साधन सामुग्रीची कल्पना शत्रूला येणार नाही अशी व्यवस्था असली पाहिजे. ज्या राजाचा आत्मविश्वास डळमळीत आहे तो राजा नष्ट होतो म्हणून, राजा त्याचा आत्मविश्वास कायम राखील. छुपे व उघड अशा सर्व प्रकारच्या शत्रूंवर लक्ष ठेवावे. शत्रू बेसावध असतांना त्याच्यावर चाल करावयाची असते. शत्रूला उघड आव्हान देण्याची गरज नसते, तसें खेळात करतात राजकारणात नाही. म्हणून खेळातील लढाई व युद्धातील खरी लढाई ह्यात फरक असतो हे लक्षात ठेव. शत्रूला खोटी आश्वासने देऊन झुलवत ठेवणे हे एक यशस्वी तंत्र आहे. राजाला शत्रू, शत्रू कां झाला ते समजणे आवश्यक असते. बर्याच वेळा, त्या कारणांचे निराकरण करून शत्रूत्व कमी करता येते म्हणून तसा प्रयत्न कोणीही शहाणा राजा करील. कारण, कमीत कमी शत्रू असणे राज्याच्या प्रगतिसाठी आवश्यक असते. शत्रूचा नाश करण्यासाठी त्याच्या अंधश्रद्धेचा, विश्वासांचा वापर करणे हे एक चांगले धोरण समजले जाते. मित्राच्या वेषात किती शत्रू आहेत हे अजमावणे राजाला आवश्यक असते. अस्थिनीतील निखारे बाहेरील आगीपेक्षा जास्त हानिकारक असतात म्हणून राजा

स्वताच्या लोकांची पहाणी करण्यास कमी पडणार नाही. शत्रूच्या खोट्या विनवण्यांवर जो राजा विश्वास ठेवतो तो राजा नाश पावतो. शत्रूचा विश्वासघात करणे राजाचे कर्तव्य असते कारण जर ते त्याने केले नाही तर तो शत्रूकडून नष्ट होईल. ज्या राजाला शत्रू व मित्र ह्यातील फरक समजत नाही, तो धूर्तपणा नाही तो राजा नष्ट होतो कारण तो त्याच्या मित्राला शत्रू समजून मारून टाकतो व शत्रूला मित्र समजून जवळ घेतो. शत्रू ठरवण्या आधी साम, दाम, दंड व भेद निती वापरून पहावयाचे असते परंतु, ह्या कशांनेही तो वळला नाही तर त्याला शत्रू मानावे व त्याचा नाशाची कारवाई करावी. जे ह्या चार कारवायांनी वळतात त्यांना प्रतिस्पर्धी समजावे. कांहीतरी प्रश्न असतो त्यामुळें तो प्रतिस्पर्धी अथवा शत्रू होत असतो. साम, दाम, दंड, भेद व भय हे तो प्रश्न सोडवण्याचे पांच मार्ग सांगितलेले आहेत. त्याशिवाय तुल्यबळ प्रतिस्पर्धी असेल तर रोटी बेटी व्यवहाराने नाते संबंध करून (सोयरीक करून) त्याला मित्र, नातेवाईक करता येते. तरी त्याने काम नाही झाले तर त्याचा बिमोड करावा. झालेल्या नात्याची गय करू नये. धृतराष्ट्र कनिकाला विचारतात, "मला सांग ह्या पांच मार्गांचा कसा कसा उपयोग करावा म्हणजे तो प्रश्न मिटेल".

कनिक  सांगतो, "ऐक राजा, एक गोष्ट सांगतो त्यातून तू समजून घे, एक कोल्हा होता. तो राजकारणाचे तंत्र चांगलेच जाणत होता. तो चार जोडीदारां बरोबर त्या जंगलात रहात असतो. ते चार मित्र होते, एक  वाघ, एक उंदीर, एक लांडगा व एक मुंगूस. एके दिवशी ते पहातात, एक दणकट बांधा असलेला सांबर जो त्याच्या झुंडीचा प्रमुख असतो, त्याला पकडण्याचा प्रयत्न ते करतात परंतु, त्याच्या चपळाईमुळें तो त्यांना पकडता येत नाही. म्हणून ते चार एकत्र येऊन सल्ला मसलत करतात. तेथे कोल्हा प्रथम बोलतो, तो वाघाकडे पहात बोलतो, तू आता पर्यंत बर्याच वेळा त्या सांबराला पकडण्याचा प्रयत्न केलास पण त्याची चपळाई व बुद्धीमत्ता तुझ्यापेक्षा जास्त असल्यामुळे तुला यश आले नाही. आता आपण उंदराला त्या सांबाराचे पाय कुरडण्याचे काम देऊ जेव्हा तो झोपला असेल. असें झाले कीं, तो चपळाईने पळू शकणार नाही व वाघ त्याला पकडेल. असें झाले कीं आपल्या सगळ्यांना खूप मांस खावयाला मिळेल. त्या प्रमाणें वाघ त्या सांबराला मारतो. ते पाहून कोल्हा त्या सर्वांना सांगतो, जा तुम्ही सगळे प्रथम स्नान करून या मग आपण सर्व ते मांस

खाऊ, तोवर मी ह्या सांबराच्या शवावर लक्ष देऊन रहातो. त्या प्रमाणे ते वाघ, लांडगा, मुंगूस व उंदीर नदीवर स्नान करण्यासाठी जातात. वाघ लवकर येतो व पहातो कीं, कोल्हा तेथे ध्यानस्थ बसलेला आहे. वाघाला पाहून कोल्हा त्याला सांगतो, अरें मित्रा, उंदीर बोलत होता कीं, हे सांबर त्याच्यामुळे पकडता आले म्हणून ते त्याचे आहे. ते ऐकून वाघाला समजते किं, ह्यापुढे आपण उंदरासारख्या यत्किंचित प्राण्याची मदत घेऊन स्वताचा अपमान करून घेतला आहे. तो स्वाभिमानाने तेथून न खाताच निघून जातो. त्यानंतर उंदीर येतो, त्याला पाहून कोल्हा त्याला सांगतो, अरें तुझ्या आधी मुंगूस आला होता तो सांगतो किं, वाघाच्या पंजामुळें ते मांस विषारी झाले आहे व म्हणून ते न खाताच तो निघून जातांना सांगत होता किं, जर उंदीर आला तर त्याला मी खाऊन टाकीन. ते ऐकून घाबरून तो उंदीर बिळात पळून जातो. त्या नंतर लांडगा येतो. त्याला पाहून कोल्हा त्याला बोलतो, वाघ आता आला होता पण त्याला त्याच्या बायकोबरोबर सांबर खायचे आहे असें म्हणतो व तो आपल्या बायकोस आणण्यासाठी गेला आहे, तो दुसर्या कोणालाही ते खाऊ देणार नाही मलासुद्धा त्यांने दम दिला आहे. हे ऐकून लांडगा मांस न खाताच निघून गेला. त्या नंतर मुंगूस येतो त्याला पाहून कोल्हा त्याला सांगतो, मी बाकीच्याना मारल्याने ते पळून गेले आहेत, तुलासुद्धा मी मारीन जर बर्या बोलांने तू गेला नाहीस तर, ते ऐकून मुंगूस पळून जातो. अशारितीने तो कोल्हा सगळे मांस स्वतासाठी घेतो". कनिक पुढे सांगतो, "हे राजा, ह्याचे तात्पर्य असे कीं, प्रतिस्पर्ध्याला त्याच्या कमजोरीनुसार युक्ती वापरून बाद करावयाचे असते. घाबरट असेल त्याला फक्त घाबरवून, शूराला मसलतीत अडकवून, लोभीला अर्थाने आणि समसमान व दुबळ्यास ताकदीच्या वापराने काबूत ठेवता येते. आता हे राजा, आणखीन एक गोष्ट सांगतो. आवश्यकता झाल्यास राजाने त्याचा मुलगा, भाऊ, मित्र, पिता आणि गुरू अशा कोणालाही आपल्या मतलबासाठी ठार मारावयास तयार असले पाहिजे. शत्रूला शापांने, प्रलोभनाने, विषप्रयोगाने, फसवून अशा हर प्रकारे बाद करावयाचे असते. प्रतिस्पर्ध्याचे शत्रूत रुपांतर केव्हाही होऊ शकते म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष करण्याचा अथवा त्याचा तिरस्कार करण्याची चूक कधीही करावयाची नाही. जर दोघे तुल्यबळ असतील तर कावेबाजपणे समृद्धीचे आश्वासन देऊन काम चालवावे. जर सल्लागार खोटा सल्ला देतो असें लक्षात आले

तर त्याचीसुद्धा गय करू नये. राजाने त्याचा राग आवरून काम केले पाहिजे. आपण शांत आहोत असेंच दाखवले पाहिजे. राग दाखवल्याने प्रतिस्पर्धी व इतर निरीक्षक जागृत होतात व राजाच्या मनाचा ठाव त्यांना लागतो, ते राजासाठी चांगले नसते. तुच्छता दाखवण्यापेक्षा त्याची कींव करणे जास्त रास्त असते. कींव करण्याने राजाची ताकद (पत) वाढते व तुच्छता दाखवल्याने कमी होत असते. राग दाखवण्यानेसुद्धा कमजोरी दिसून येते. खोटे अश्रू दाखवून प्रतिस्पर्ध्याला बेसावध ठेवावे. प्रतिस्पर्ध्याला नेहमी असें वाटले पाहिजे किं, राजा संयोग करण्याच्या तयारीत आहे व चुक आपलीच आहे कारण, आपणच त्याला समजून घेत नाही!

चांगुलपणाचे ढोंग करत बदमाशी करणार्यांची घरदार जाळून त्याला त्याच्या सगळ्या सोबत्यांसकट मारून टाक कारण, असें प्रजाजन बाहेरच्या शत्रूपेक्षा जास्त धोकेबाज असतात. चोर, लुटारु, ईश्वर न मानणारे, जुगारी अशा लोकांना राज्यात थारा देऊ नये कारण, ते इतरांना बिघडवून राज्याची योग्यता कमी करतात. असें लोक प्रलोभनाने राज्याच्या शत्रूंस हात मिळवून राजा व त्याची प्रजा अशा दोघांना धोक्यात टाकत असतात. त्यांनाच मी अस्थिनीतील निखारे असें म्हणतो. उघड शत्रूपेक्षा हे जास्त धोक्याचे असतात. म्हणून त्यांना मारून टाकावे अथवा राज्याबाहेर काढून टाकावे. अशा लोकांना त्यामुळें जरब बसते व त्यांच्या हालचाली बंद पडतात. ईश्वराला भिणारे मर्यादा पाळतात, त्यांना नियंत्रणात ठेवणे सोपे असते. राजाचे छुपे शत्रू प्रथम ह्यांच लोकांना हाताशी घेऊन त्यांच्या राजविरोधी  कारवाया करीत असतात म्हणून जो राजा, त्याच्या प्रजेतील अशा लोकांचा नायनाट करतो तो चांगले राज्य चालवतो. राजा जर असें समजेल कीं, एकाद्या पासून धोका नाही तर ते बरोबर नसते कारण, राजाला केव्हांही कोणाकडून धोका होईल ते सांगता येत नाही म्हणून हे राजा धृतराष्ट्रा, तू नेहमी तुझ्या मित्रांवरसुद्धा बारीक लक्ष ठेवूनच राहिले पाहिजे. राजा जो अशारितीने सदैव दक्षता बाळगत नाही तो नष्ट होण्याची दाट शक्यता असते. विश्वासघाताची शक्यता राजाने कधीही नाकारू नये व प्रत्येक गोष्ट चांगली तपासूनच स्वीकारली पाहिजे. त्यासाठी अरे राजा, तू चांगले हेर खाते सांभाळले पाहिजे. राजाचे हेर त्याच्या व बाजूच्या राज्यात असें सर्वत्र पसरलेले असतील तर तो राजा जास्त सुरक्षित असतो. राजाचे हेर कोण आहेत ते त्याच्या मित्रांना (हेरांबाबत

पूर्ण गुप्तता बाळगली पाहिजे) समजता कामा नये कारण तसें झाले तर हेर काम करू शकणार नाहीत. राजाचे हेर सन्याशाच्या रुपात, व्यापार्याच्या रुपात, फेरीवाले, सेवकाच्या रुपात, दासीच्या रुपात, विदूषकाच्या रुपात, पुरोहिताच्या रुपात, नायकिणीच्या रुपात अशा विविध रुपात असावेत. त्यांच्या जागा बाजारपेठा, नायकीणींचे अड्डे, बगीचे, मनोरंजनाची ठिकणे, पाणथळं, तीर्थक्षेत्रे, देवळे, दारुची दुकाने, आराम करण्याच्या जागा, श्रीमंतांच्या मिळण्याच्या जागा, विविध शासकीय जागा, दवाखाने, राणीकक्ष, रुंगणालये, तुरूंग, जुगाराचे अड्डे, विशी (रहाण्याची व्यवस्था असलेले हॉटेल), खानावळी, आश्रम, वेश्यागृह अशा विविध ठिकाणे जेथे लोक जमतात तेथे असतील व त्यांचे काम लोकांवर नजर ठेवून कांहीं वार्ता मिळते, ती काढणे व योग्य तर्हेने राजापर्यंत पोहोचवणे. कोण हेर आहे ते कोणालाही समजणार नाही अशी दक्षता हेर विभागांने बाळगावयाची असते. ज्या राजाची हेर व्यवस्था निर्दोष आहे तो राजा त्याच्या राज्यात यशस्वी रहातो.

हे राजा, तुझी वाणी मधूर असली पाहिजे. असे असले तरी हृदयात तो प्रसंगी कठोर असला पाहिजे. कठोर काम करतांना सुद्धा त्याच्या मनात शांतता असली पाहिजे व विवेक जागृत असला पाहिजे. राजाने नम्रतेचे सोंग धरून आपले काम केले पाहिजे कारण, राजाला खरोखरच सदैव नम्र रहाणे श्रेयस्कर नसते. ऋषी, उच्च कोटीचे ब्राह्मण ह्यांच्या प्रति आदर असल्याचे दाखवण्याने त्या राजाची प्रतिमा प्रजाजनांत उंचावते हे त्यांनी ध्यानात ठेवावे. सुंदर फुलं देणारे परंतु, त्याला फळें लागत नाहीत अशा झाडासारखे राजाचे वागणे असले पाहिजे. राजाकडे विनंती केली किं, त्वरीत काम झाले तर त्या राजाची प्रतिमा स्वस्त होते म्हणून तसें होणार नाही ह्याची दक्षता बाळगावयाची असते. योग्या मागणीचे काम सुद्धा थोडा वेळ घेऊन मग करावे. तरीसुद्धा राजाने त्याची प्रतिमा अशी ठेवावी किं, लोकांना त्याच्या बद्दल विश्वास कायम राहील. राजा हा सर्वांचे आशास्थान असला पाहिजे. एका माणसाचे काम केले तर शंभर लोकांना विश्वास होतो कीं, त्यांची कामं सुद्धा यथावकाश होणार आहेत. जरी त्यांची कामं कधीच झाली नाहीत तरी हा विश्वास कायम रहातो. देवसुद्धा ह्या प्रमाणे आपली श्रद्धा स्थानं सांभाळत असतात हे तू लक्षात ठेव. राजा, तू स्वताच्या सुखापेक्षा प्रजेचे सुख मोठे असे लक्षात ठेवून जगले पाहिजेस. उत्तम गुण, वैभव व सुख हे राजाचे साध्यतेचे क्रम असले पाहिजेत. कामात

अपयश आले तर लाज न वाटता तू ब्राह्मणांचा (शहाण्या लोकांचा) सल्ला घेतला पाहिजे. प्रजेत स्वताचे महत्व प्रस्थापित करण्यासाठी प्रसंगी हिंस्र मार्गाचा उपयोग करण्यास हरकत नसते. परंतु, महत्व प्राप्त झाल्यानंतर मात्र राजा फक्त प्रेम व शांतिचे धोरण अजमावेल व जो कडवटपणा त्याच्या कठोर मार्गांने जाण्यामुळें जनतेच्या मनात उत्पन्न झाला असेल तो विसरला जाईल. एवढेच नाही तर लोकांचा विश्वास होईल कीं ते जे राजाने केले ते परिस्थिती नुसार योग्यच होते. लोकांच्या दुःखात राजा प्रामाणिकपणे सामील होईल. खरोखरच दुर्दैवात असलेल्यांना राजा मदत करील व लोकांचा विश्वास जिंकेल. गुणीजनांना त्यांच्या गुणांचे त्यांना संधी देऊन कौतुक करावे. प्रजेतील गुणीजनांना राजाबद्दल विश्वास वाटेल असें राजाच्या कारभाराचे धोरण असले पाहिजे. राजा दानधर्म करून स्वताची प्रतिमा उंचावेल. मात्र दान करतांना ते सत्पात्र केले पाहिजे नाहीतर राजाची प्रतिमा बिघडेल. अशा धोरणांमुळें त्या राजाकडे सर्व गुणीजन अनुकूल रहातात ज्यामुळे त्या राजाची ताकद वाढत रहाते. एक गोष्ट राजे, आपण पक्के ध्यानात ठेवावे कीं, दुर्जनांच्या मदतीने कांहीं काळ समृद्धी प्राप्त होईल पण ती फार काळ टिकणार नाही पण गुणीजनांच्या मदतीने जी समृद्धी प्राप्त होते ती चिरकाळ टिकणारी असते, म्हणून दुर्जानांचा प्रसंगी उपयोग करावा व नंतर त्यांचा नाश करावा किंवा बाजूला करावे. राजा आपल्या मनातील उत्कट भावना त्याच्या हेरांच्या समक्ष व्यक्त करणार नाही. राजा त्याच्या मनात काय आहे ते कधीही उघड दाखवणार नाही. राजा समृद्ध होण्यासाठी स्वताच्या प्रजेला लुटणार (कर लावून वगैरे) नाही, तो त्यासाठी शत्रूला लुटेल. जो राजा प्रजेला लुटून समृद्ध होतो तो रसातळाला जातो. कारण, अशा देशाची जनता शत्रूला सहयोग देण्याची शक्यता असते. राजा आपल्या प्रजेसाठी दैविक संपदा आचरेल. तो असुरीसंपदा कधीही आचरणार नाही. राजा शत्रूशी मात्र असुरीसंपदा आचरेल कारण एर्हवी तो शत्रू त्याला आवरणे शक्य होणार नाही. हे राजा, एक गोष्ट लक्षात ठेव कीं, राजाचे हित, प्रजेचे हित, राजाच्या कारभार्यांचे (नोकरशहांचे) हित, सैन्याचे हित हे चार हितसंबंध वेगवेगळे असतात. त्यांचे संतुलन ज्याला सांभाळता आले तो राजा लोकमान्य होतो. जो राजा त्याच्या घरातील विरोधकांकडे दुर्लक्ष करतो तो र्हास पावतो. शत्रूंचे प्रजाजन व शत्रू राजा हे एकच न समजता राजा त्याच्या शत्रूच्या प्रजाजनाचे मन जिंकून त्या शत्रू राजाला शह देऊ शकतो

व त्या मार्गांने तो शहाणा राजा शत्रूचे राज्य युद्ध न करतांच काबीज करू शकतो. जो राजा शत्रू राजाच्या इतर तीन हितसंबंधांना युक्तीने हाताळून त्या राजाला शह देऊन हरवू शकतो तो यशस्वी ठरतो. हे कुटील राजनितीमध्ये येते. युद्ध न करता अशा मार्गांने राजा त्याचे राज्य विस्तारू शकतो. ह्याला भेद निती असेंसुद्धा म्हणतात. शत्रू राजाला हरवण्यासाठी प्रथम त्याच्याशी मैत्रीचा बहाणा करावयाचा असतो. हे राजा, माणसाचा स्वार्थ ही एक मोठी शक्ती असते. तिचे व्यवस्थापन करून राजा त्याच्या प्रजेचे, कारभार्यांचे, सैन्याचे हित साध्य करून त्यांचा विश्वास प्राप्त करू शकतो. शत्रूराजाला नामोहरम करण्यासाठी त्याच्या राज्यातील ह्या तीन हितसंबंधांचा वापर करावा. त्यालाच कुटील निती असें म्हणतात. असा राजा कधीही हरत नाही. जो राजा समृद्धी व स्वास्थ्य राज्यात रहावे असें समजतो तो सावधगिरीने मित्र राजे तयार करतो. तसेंच युद्धे करतो. सावधगिरी दुरदृष्टीने प्राप्त होते. पुढे काय परिणाम होणार आहेत, आपल्या एकाद्या धोरणाचे, हे जो बरोबर हेरतो तो दूरदृष्टी असलेला राजा समजला जातो. असा राजा त्याच्या पुढच्या कारवाईची साधी भणकसुद्धा आपल्या जवळच्या मित्रांनासुद्धा लागू देत नाही. कारभारातील गुप्तता हा सावधगिरीचा एक भाग असतो. कारवाई सुरु झाल्यावर ती त्यांना समजली तर चालेल. कारण तेव्हां त्यांना तुला थांबवता येणार नसते. सावधानता व भिणे ह्यातील फरक समजून घे. सावधानता ताकदीतून येते व भिणे कमजोरीतून येते. आपण कमजोर असल्याचे दाखवणे बर्याच वेळा श्रेयस्कर असते तेव्हां तसे नाटक राजा करतो. त्यामुळें प्रतिस्पर्धी बेसावध रहातो व राजाला त्याच्या हालचाली करणे जास्त चांगले जमते. कमजोरीचे नाटक केल्यामुळें प्रतिस्पर्धी त्याच्या ठेवणीतले दमदार डावपेंच वापरत नाही व त्यामुळें त्याला फशी पाडणे सोपे जाते. प्रतिस्पर्ध्याचे ठेवणीतील डावपेंच उलटवणे कदाचित राजाला अवघड जाण्याची शक्यता असू शकते म्हणून हे धोरण वापरावयाचे असते. प्रतिस्पर्धी फशी पडल्यावर त्याच्या ठेवणीतील डावपेंच तितके त्याला उपयोगाचे नसतात. हरलेला प्रतिस्पर्धी सूडाच्या भावनेत असला तरी क्षमा याचना करतो म्हणून जर तू त्याला माफ केलेस तर तू मरणाला आमंत्रण देत असतोस. सर्व शक्यतांचा अभ्यास करूनच पुढची पावले टाकावयाची असतात. तो अभ्यास असा असावा कीं, जणूकाय ते खरोखरच घडले आहे, अशारितीने सर्व समजून जेव्हां राजा कार्य करतो तेव्हां

त्याला मनाची शांतता न घालवता ते कार्य करता येते. कारण, अनपेक्षीत असें कांहीं त्याच्यासाठी घडत नसते. जे घडले त्याची कल्पना त्याला त्याच्या दूरदृष्टीमुळें आधीच झालेली असते. अशा सावधानतेमुळें तो कधीच हतबल होत नाही, तो प्रतिस्पर्ध्याच्या पुढे दोन पावले नेहमी रहातो. बर्याच कार्यात काळ व जागा महत्वाच्या असू शकतात, त्यांचे तंतोतंत नियोजन त्याला करता आले पाहिजे. कमजोर प्रतिस्पर्धी कडे तो कमजोर आहे म्हणून दुर्लक्ष करणे धोक्याचे असते. परंतु, त्याला आपल्या ऋणांने बांधून घेऊन त्याचा विरोध मोडून काढता येत असेल तर तसें करावे. अशा कारवाईमुळें त्याच्या सगळ्या हालचालींवर राजा नियंत्रण ठेवू शकतो. अशा धोरणामुळें प्रतिस्पर्ध्याला मांडलिक राजाचा दर्जा देण्यासारखे होते. प्रेमळ वागणूकीने, उपकार करून, नाते संबंध जुळवून अशा मार्गांने बरेच प्रतिस्पर्धी मित्र करता येतात. एक गोष्ट राजा धृतराष्ट्रा लक्षात ठेव कीं, हे जे मी तुला सांगत आहे ते कदाचित सगळे तुझ्या प्रतिस्पर्ध्याला माहीत असेल तर त्याला कसें आवरणार ह्याचा विवेक तुला करावा लागेल. अपमान करून वागणे, पिडा देणे, विश्वासघात करणे, मदत नाकारणे, दुर्लक्ष करणे अशा बेजबाबदार वागण्याने चांगला मित्रसुद्धा छुपा शत्रू होत असतो. जसें एक नगण्य ठिणगी प्रसंगी मोठा वणवानल होत असते तसे छोटा प्रतिस्पर्धी मोठी अडचण होऊ शकते. राजकारणातील माणसे ही, समजून घे राजा, रजोगुणी अथवा तमोगुणी असतात त्या प्रमाणे त्यांचे वागणे व अपेक्षा असतात. त्यात कोणी संत, महंत, सात्त्विक नसतो. त्यांचे सगळे व्यवहार काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर ह्या सहा विकारानेंच प्रभावित झालेले असतात. म्हणून हे राजा, त्याप्रमाणे तू तुझे वागणे त्यांच्याशी ठेवले पाहिजेस. दिलेले वचन मोडण्यासाठी पटणारे कारण द्यावे लागते, नाहीतर त्याचे परिणाम भोगावे लागतात. तुझ्याकडून मदत मांगणार्या राजाचा अंतस्थ हेतू समजूनच ती मदत करावयाची असते. कारण व सबब ह्यातील फरक समजून घे, कारण म्हणजे खरी परिस्थिती व सबब म्हणजे पटण्या सारखी खोटी परिस्थिती. राजकारणात बर्याच वेळा कारणांपेक्षा सबबी जास्त उपयोगाच्या असतात. जो सबबीला कारण समजून स्वीकारतो तो नष्ट होतो. शत्रू कारण देतो आहे कां सबब, हे समजण्यात राजाची धूर्तता सिद्ध होते. हे राजा, तू सुद्धा सबबी वापरून शत्रूला फसवू शकतोस व त्या मार्गाने शत्रूला चित करू शकतोस. शत्रूच्या राज्यातील प्रजा अनुकूल करून त्या राजाला शह देऊन

नमवता येते म्हणून प्रजा व राजा एकच आहेत असें समजण्याची आवश्यकता नसते. शत्रूराजा वरील क्रोधासाठी त्याच्या प्रजेला त्रास देऊ नये. ज्या राजाची स्तुती इतर देशातील लोक करतात तो राजा सम्राट समजला जातो. राजा जर सदोष असेल तर त्याचे कारभारीसुद्धा तसें होतात व ते राज्य बुडते म्हणून हे राजा तू नेहमी निर्दोष कारभार ठेवशील. ज्या राज्यात प्रजा सुखी नाही त्या राज्यात बंडाळी माजते व तो राजा नष्ट होतो. राजा एक गोष्ट लक्षात ठेव, दुर्जन कधीही सत्कार्य करत नाहीत, म्हणून जर कोणी दुर्जन सत्कार्य करण्याच्या गोष्टी करू लागला तर तू सावध हो. त्याचा अंतस्थ उद्देश समजून घे व त्या प्रमाणे तू काम करशील. हे राजा, जरी तू स्वभावतः सात्त्विक असलास तरी व्यवहारात तू रजोगुणी असल्या सारखे वागावेस, तरच राज्य चालवण्यात यशस्वी होशिल. हे राजा एक गोष्ट लक्षात ठेव कीं, तुझ्या कारभार्यात भेद निती वापरून तू त्यांना एकत्र येऊ देऊ नकोस कारण जर ते एकत्र आले (एकमेकांचे मित्र झाले) तर ते तुझा नाश करू शकतात. तुझे कारभारी अमित्र (एकमेकांना न ओळखणारे) असले पाहिजेत व त्यांना एकत्र आणणारा दुवा तूंच फक्त असला पाहिजेस. अशा धोरणामुळें तुझी गादी सुरक्षित राहील. राजा तू शत्रूची अहिंसक हत्त्या करशील. जसें खाटीक प्राण्याची करतो. हिंसक हत्त्येत पाप असते म्हणून ते असुरीसंपदेत येते, त्यापासून तू अलिप्त रहाशील. (भगवद्गीतेत १६व्या अध्यायात दैवी संपदा व असुरी संपदा सांगितल्या आहेत त्या नंतर पहावयाच्या आहेत.) अशारितीने ब्राह्मण कनिक धृतराष्ट्राला त्याची राजनिती समजावून सांगतो. (ह्यालाच महाभारतातील कनिक गीता असें म्हणतात)

कनिक ब्राह्मण धृतराष्ट्राला सांगतो, "कुरु कुळाच्या तुला पांडव व तुझे पुत्र ह्यांना एकाच वेळी सांभाळावयाचे आहे, त्यासाठी तुला योग्य धोरण आचरावे लागेल नाहीतर तू भविष्यात दुःख करत रहाशिल. तुला हे राजा तुझ्या मुलांपेक्षा पंडुची मुलं जास्त शक्तिमान आहेत हे लक्षात घेऊन तुझी भविष्यातील धोरणें आखावी लागतील. त्यासाठी तुझ्या हिताचे काय आहे माझ्या मते ते आता सांगतो ते नीट ऐक. मग त्यानुसार तू योग्य तसे कर. तू असें वागावेस कीं, तुला पांडवांपासून धोका होणार नाही. असें वागलास तर तुला भविष्यात पश्चात्ताप करावा लागणार नाही. तुझी मुलं पांडवांचा हेवा करतात व त्यामुळें, तसेंच महत्वाकांक्षी शकूनी त्यांना सल्ला देत असतो म्हणून ते पांडवांना त्रास होईल असें

कांहीं करत रहाणार आहेत, तर तुझे वागणे असें असले पाहिजे किं, त्या तुझ्या मुलांच्या कारवायात तू सामील नाहीस असेंच पांडवांना वाटले पाहिजे. पांडवांना सदोदीत असें वाटले पाहिजे किं, तू त्यांच्या बरोबर आहेस. तुझ्या अंधत्वाचा तू चतुराईने ह्यासाठी उपयोग करू शकतोस. पांडव जेवढे बेसावध तेवढे तुझे मुलगें त्यांच्यावर कुरघोडी करण्यात जास्त यशस्वी होतील.

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने कनिकांने त्याची निती सांगितली व तो त्याच्या घरी गेला. हि कनिक निती ऐकल्यावर धृतराष्ट्र जास्तच काळजीत पडला.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकशे बेचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे त्रेचाळीस

## (लक्षागृह पर्व सुरु)

वैशंपायन पुढे सांगतात, पांडवांच्या बद्दल असलेल्या द्वेषामुळें सुवलाचा पुत्र शकूनी, अर्थात् कौरवांचा मामा व दुर्योधन, दुःशासन, आणि कर्ण असें मिळून एक कारस्थान करतात. त्यासाठी त्यांचे पिता धृतराष्ट्र ह्यांची सम्मति घेतात. त्यांच्या त्या कृष्ण कारस्थाना नुसार कुंती व तिचे पांच पुत्र एका घरात जाळून टाकावयाची व्यवस्था असते. परंतु, धूर्त व दूरदृष्टी असलेला त्यांचा काका विदूर ते कारस्थान समजतो. त्याप्रमाणे, विदूर ठरवतो किं, कुंती व तिचे पुत्र कोठेतरी लपवले पाहिजेत म्हणजे कौरवांचा तो डाव यशस्वी होणार नाही. त्यासाठी विदूर, एक मजबूत होडी तयार करतो ज्यात वारा व वादळी परिस्थितीला तोंड देण्याची क्षमता आहे. तिच्यावर परदेशाचा ध्वज फडकवला होता म्हणजे कोणी संशय घेऊ नये. त्यानंतर तो कुंतीला भेटून सांगतो, धृतराष्ट्र कुळाचे नांव बदनाम करण्यामागे लागला आहे, तुझ्या मुलांच्या वाईटावर आहे, त्यासाठी त्याच्या मुलांनी जो डाव केला आहे त्यातून सहीसलामत निसटण्याकरता मी एक मजबूत होडी किनार्यावर तयार ठेवली आहे, त्यात बसून तू व तुझी मुलं सुखरुपपणे निघून जा.

वैशंपायन पुढे सांगतात, हे दीराचे बोलणे ऐकून कुंतीला फार दुःख होते. परंतु, त्याच्या सांगण्यानुसार ती त्या मजबूत होडीने गंगेतून निघते. धृतराष्ट्राने पांडव व कौरवांतील तेढ पाहून पांडवांना वरणावतात जाऊन रहाण्याचे सांगतात व तेथे त्यांनी त्यांचे भवितव्य घडवावे असें ठरते. त्यासाठी त्यांना दिलेली संपत्ती घेऊन ते पांडव कुंती बरोबर त्यांना आखून दिलेल्या ठिकाणी जातात. पांडवासाठी तयार केलेल्या लक्षागृहात विदूराच्या सांगण्याने एक भिल्ल बाई तिच्या बाळाबरोबर जाऊन रहाते व तेथे ती स्वयंपाक करतांना झालेल्या आगीत जळून जाते. तिच्या प्रमाणे ते घर बांधणारा शिल्पी पुरोचन जो म्लेच्छ (ईराणी) होता तो सुद्धा त्या आगीत जळून मेला. त्या अपघातामुळें ते घर लाखेचे बनवलेले आहे हे विदूराला समजले. आपल्याला रहाण्यासाठी दिलेले घर ज्वालाग्राही पदार्थांचे आहे हे समजल्यावर तेथून ते निबीड अरण्यात लपण्यासाठी निघतात. अशा घटणेमुळें कौरवांचा व त्यांच्या मसलतकारांचा तो प्रयत्न अयशस्वी झाला. त्या घटनेमुळें पांडव वाचले. विदूराच्या दूरदृष्टीमुळें ते व त्यांची आई वाचली होती. वरणावताच्या रहिवाशांना

मात्र असें वाटले कीं, पांडव व त्यांची आई त्या आगीत जळून मेली. त्याप्रमाणे ते धृतराष्ट्राला कळवतात कीं, पांडव व त्यांची आई त्या आगीत मेली आहेत. ते धृतराष्ट्राला सांगतात, तुझा उद्देश सफल झाला आहे आता तू तुझ्या पुत्रांबरोबर आनंदाने राज्य करावे. ती वार्ता ऐकल्यावर धृतराष्ट्र व त्याची मुलं आणि गांधारी फार दुःख झाल्यासारखे दाखवतात. परंतु, अंतर्यामी ते सगळे हर्ष पावले होते. विदुराला सर्व माहीत असून इतर कुरु कुटूंबियांसह तो पांडवांचे दशक्रिया विधी करण्यात सहभागी होतो.

जनमेजय विचारतो, "अहो ब्राह्मण, मला तो इतिहास सविस्तर ऐकावयाचा आहे तरी तो सांगावा. ते लाखेचे घर कसे पेटले आणि पांडव व कुंती कसे त्यातून निसटले . हे कृत्य निखालस दुष्टपणाचे होते, त्याना असें करण्याचा सल्ला देणारा कनिकच होता. हे मला माहित आहे तरी तपशिलात तो ऐकण्यासाठी मी उत्सूक आहे".

वैशंपायन सांगू लागतात, असें असेल तर ऐक जनमेजया, त्या लक्षागृहाची कथा. दुष्ट दुर्योधन भिमसेनाचे वाढते महत्व, अर्जूनाचे शस्त्रविद्येतील श्रेष्ठत्व अशा गोष्टांमुळें कौरव व त्यांचे सहयोगी, कर्ण, शकूनी ह्यांना पांडवांचा वेळीच बंदोबस्त नाही केला तर ते राज्यसत्ता बळकावतील अशी रास्त भिती सतत सतावत होती. पांडव ह्या परिस्थितीला ओळखत होते व कौरवांच्या सर्व अशा कारवाया हाणून पाडत होते. त्यामध्ये पांडवांना विदूराची मदत होत होती तर कौरवांना धृतराष्ट्राची गुप्तपणे मदत होत होती.

पांडवांच्या रास्त कर्तृत्वामुळें ते सर्व राज्यात लोकांत चर्चेचा विषय झाले होते. प्रजेच्या हितगुजात कौरवांच्या दुर्योधनापेक्षा पांडवांतील युधिष्ठीर गादीवर बसण्यासाठी जास्त योग्य आहे असा सूर आढळत होता. ते समजत किं, जरी धृतराष्ट्राला ज्ञानचक्षू आहेत, तो जन्मतः अंध असल्यामुळें दैनंदिन कारभार करण्यासाठी तो अयोग्य आहे. म्हणूनच पूर्वी पंडु गादीवर बसला होता परंतु, त्यांच्या जाण्यामुळे हा प्रश्न उभा राहिला पण जर जन्मक्रम पाहिले तर पुनः युधिष्ठीर दुर्योधनापेक्षा मोठा असल्याने त्या नियमानुसार सुद्धा गादीवर पांडवांचा हक्क लागतो. भिष्मदेव गादीसाठी योग्य असले तरी त्यांनी गादीचा हक्क शंतनुच्या विवाहासाठी वचन देऊन विचित्रवीर्याच्या संततिसाठी सोडला असल्याने ते शर्यतीत नाहीत. अशा चर्चेमुळें कौरव गटाचा तिळपापड होत होता. सार्वजनिक मत पांडवांच्या बाजूनेच जात होते. राजा युद्ध जिंकणारा असावा लागतो त्यासाठी त्याच्या

मनगटात ताकद असावी लागते ती ताकद कुरु कुळात फक्त पांडवांच्यात आहे हे आधी झालेल्या परीक्षा सोहळ्यास, सिद्ध झाले होते. अशारितीने पुनःपुन्हा युधिष्टीरालाच गादी द्यावी असा जनतेचा सुर दिसत होता.

जनतेचा हा आवाज ऐकून दुर्योधन अधिकाधिक चिडत होता. अखेरीस कांहीं फैसला झाला पाहिजे म्हणून दुर्योधन आपल्या पित्याकडे तो एकटा आहे असें पाहून जातो. त्याला अभिवादन करून बोलतो, अहो तात, मी हल्ली ऐकतो कीं, जनतेचा कल युधिष्ठीराच्या बाजूने आहे. ते बोलतात कीं, राज्याच्या गादीवर भिष्म अथवा आपण बसणे रास्त नाही व पंडुपुत्र युधिष्ठीराचे नांव घेतले जात आहे. लोकांच्या ह्या बोलण्यामुळें आपल्या हक्काला धक्का बसतो असें आपल्याला नाही कां वाटत? असेंच जर होत गेले तर पंडुची मुलं राज्य घेतील व त्यांची व त्यांच्या नंतर त्यांची मुलं गादीवर बसतील व आमचे काय होईल? अशामुळें तुमचे वंशज राज्या सत्तेपासून दूर ढकलले जातील हे योग्य वाटते कां आपल्याला? अहो तात आत्ताच वेळ आहे कांहीं करण्याची. आत्ता नाही केले तर कधीच करता येणार नाही हे आपण समजतांना? साध्या अन्न, वस्त्रासाठी रहाण्याच्या घरासाठी अशा सर्वच बाबींसाठी आपल्या वंशजांना पंडुच्या वंशजांकडे हात पसरावे लागतील हे आपल्याला योग्य वाटते कां? आज परिस्थिती अशी होत आहे किं, लोक आपल्या विरोधात जात आहेत. आपण गादीचा कब्जा घेतला पाहिजे असें मला वाटते.

अशारितीने आदिपर्वातील लक्षागृह पर्वाचा एकशे त्रेचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे चव्वेचाळीस

(लक्षागृह पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, राजा धृतराष्ट्र पाहू शकत नसल्याने जे त्याचा मुलगा बोलत होता ते ऐकून त्याला कनिकाचे बोलणे आठवले व तो दुःखी झाला. त्याच प्रमाणे त्याचे मन द्विविधा झाले. पांडवांची बाजू घ्यावी कीं, आपल्या पुत्रांची असा संभ्रम त्याच्या मनात उत्पन्न झाला. आपल्या पित्याची ती अवस्था दुर्योधनाच्या लक्षात आली व त्यावर काय करावे हे ठरवण्यासाठी तो कर्ण, शकूनी, दुःशासन ह्यांच्या बरोबर सल्लामसलत करतो. त्यात शकूनीच्या कुटील कारस्थानानुसार एक योजना तयार होते. त्यानुसार दुर्योधन धृतराष्ट्राला सांगतो, "अहो तात, पांडवांना कोठल्यातरी कामा निमित्ताने हस्तिनापूरातून दूर बाहेर जसें, वरनावत, अशा ठिकाणी पाठवावे. म्हणजे त्यांचे येथील अस्तित्व संपल्याने तुमच्या मुलांना राज्याचा कारभार ताब्यात घेता येईल. ते दूर असल्याने त्यांचा येथील कारभारात हस्तक्षेप होणार नाही". ते त्याच्याच मुलाचे बोलणे ऐकून तो अंध राजा दुर्योधनाला सांगतो, "अरे मुला, पंडुने राज्य चालवतांना कधीही आप्तांशी कारस्थान केले नाही व तो माझ्याबाबत विशेष काळजी घेत असें हे तुम्हाला माहित नाही कां? अशा परिस्थितीत मी त्याच्या मुलांशी असें कसें करू शकेन? पंडु स्वताच्या उपभोगात कधीही रमला नाही व सतत लोकांचेच हित पहात होता, अशा प्रामाणिक, तत्त्वनिष्ठ भावाच्या मुलांशी मी असें कारस्थान करणे उचित होणार नाही. त्याच्या मुलांना त्यांच्या राजधानीतून कसे काय हकलवता येईल? आपले सगळे कारभारी, त्यांचे सेवक, त्यांचे आप्त असें सगळे पंडुला व त्याच्या मुलांनाच मानतात हे तुम्हाला माहित नाही कां? आपण जर असें कांहीं केले तर जनता आपल्याला व आपल्या सगळ्या परिवाराला मारून टाकील". ते भावनाविवशतेने भरलेले त्याच्या पित्याचे उद्गार ऐकून दुर्योधन त्याला बोलतो, "आपण जे बोलता ते आम्हाला सर्वथा मान्य आहे. परंतु, त्याच्या वाढत्या ताकदीमुळें तुमच्या मुलांचे धोक्यात जाणारे भवितव्य आपल्याला दुर्लक्षिता येणार नाही. समाजातील श्रीमंत लोक व कारभारातील मंत्री बरेचसे आमच्या बाजूने आहेत त्यांना द्रव्य देऊन त्यांचा रोष संपवता येईल. कारण, तूर्तास राज्याचा खजिना आमच्या दिमतीला आहे. युधिष्ठीराच्या भोळसट स्वभावाचा आम्ही धूर्तपणे वापर करु शकतो. तसेंच कारभार

आमच्या हातात आल्यावर जसें मी कर्णाला आपलेसे केले तसे इतरांनाही करीन मग त्याचा रोष होणार नाही. पांडवाना बाहेर काढण्यासाठी अशी सबब वापरावयाची कीं, कोणालाही आपल्या अंतस्थ उद्देशाचा संशय येणार नाही. फार मोठ्या मोहीमेवर त्यांना पाठवता येईल. जसें, वरनावताचा विकास करण्याची मोहीम त्यांच्यावर सोपवावी. अशी सबब वापरल्यास कोणालाही अगदी पांडवांनाही संशय येणार नाही. वरनावत हस्तिनापूरासारखेच भले मोठे शहर आहे, तेथे जाऊन ते तो कारभार पाहू शकतील व आम्हाला हस्तिनापूर मिळेल. एकदा गादीचा ताबा माझ्या हातात आला कीं, मग ते पांडव व त्याची माता कुंती परत हस्तिनापुरी आले तरी हरकत नाही कारण , त्यामुळे मी त्यांना त्यांच्या योग्यतेच्या जागी बसवीन".

ते दुर्योधनाचे बोलणे ऐकून धृतराष्ट्र त्याला बोलतो, "अरे दुर्योधना, नेमके हेंच माझ्या मनात आहे. पण कसे साध्य करावे ते समजत नाही. फक्त ते पापकारक कृत्य ठरेल ह्या भितीने मी गप्प बसलो होतो. तुला माहित आहे किं, भिष्म, द्रोण, क्षत्री (विदूर), कृप हे कोणीही अशा योजनेला मान्यता देणार नाहीत. त्यांच्या दृष्टीला तुम्ही व पांडव एकसमान वाटतात. ते ज्ञानी जन तुमच्यात असा भेदभाव कधीच करणार नाहीत. त्यामुळें असें पांडवांशी करणे मंजूर होणार नाही. त्यापेक्षा ह्या पवित्र लोकांच्या हातून मला मरण आले तर मी धन्य होईन".

ते हताश बोलणे ऐकल्या नंतर तो धूर्त कौरव त्याच्या बापाला समजावतो, "हे पहा तात, भिष्म कोणाचीही बाजू घेणार नाहीत, त्यांना कांहीं फरक पडत नाही कोण राज्य करतो. द्रोणांचा मुलगा अश्वत्थामा आमच्या बरोबर आहे, कृप नेहमी द्रोणांबरोबर रहाणे पसंत करतात कारण ते एकमेकांचे मेहुणे आहेत म्हणजे तेसुद्धा आमच्या बरोबर असतील, विदूर आमच्यावर त्याच्या रहाण्यासाठी अवलंबून आहेत म्हणजे तें सुद्धा आम्हाला विरोध करणार नाहीत. जरी त्यांचे मन पांडवांच्या पाशी असले. जरी त्याकरतां विदूरांनी पांडवांची बाजू घेतली तरी ते एकटे आमचे कांहीं बिघडवू शकत नाहीत. म्हणून वरनावतला पांडवांची खुशाल रवानगी आपण करावी, मी जे कारण सांगितले ते देऊन असें करा किं, ते ताबडतोबच तेथे जातील. अहो तात, माझ्या अंगाची लाही लाही होत आहे, ह्या

पांडवांच्या येथील असण्यामुळें, ती त्याने बंद होईल. पांडवांचे असणे मला बोचते ते तुम्ही थांबवू शकाल".

अशारितीने  आदिपर्वातील लक्षागृह पर्वाचा एकशे चव्वेचाळिसाला भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे पंचेचाळीस

(लक्षागृह पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, धृतराष्ट्राची मुक संम्मती मिळाल्याने मोठ्या जोमांने दुर्योधन त्याच्या साथीदारांसह कारभारी लोकांना त्यांच्या बाजूला वळवण्यास साम, दाम मार्गांने सुरुवात करतात. धृतराष्ट्राच्या सांगण्यावरून एका राज सभेत एक कारभारी वरनावतची स्तुती करण्यास प्रारंभ करतो. त्याला इतर कारभारी जे कौरवांनी विकत घेतले होते ते आणखीन साथ देण्यास सुरुवात करतात. एकजण सांगतो, पशुपतिचा सोहळा वरनावताला होतो. त्या सोहळ्याचे तो वर्णन करत जातो. तेथे असलेले वैभव अवर्णनीय असल्याचे ते सांगतात, तेथील दागदागिने, मिरवणूका, वाडे, उपवने, वैभव अशांचे वारेमाप वर्णन ते करतात. तशा मोहक वर्णनामुळें पांडवांना, विशेषकरून भिमाला तेथे जाण्याची तीव्र इच्छा होऊ लागते. पांडवांच्या एकमेकातील कुजबुज धृतराष्ट्राला ऐकू येते तेव्हां तो त्यांना विचारतो, "अरे माझ्या प्रिय पुतण्यांने, जर तुम्हाला वरनावताला जाऊन ते सगळे वैभव उपभोगावयाची इच्छा असेल तर कांहीं दिवसांसाठी तुम्ही तुमच्या आईला घेऊन तेथे जाण्यास माझी कांहींच हरकत नाही. कामाचा क्षीण त्यामुळें निघून जाईल व तुम्ही पुन्हा नव्या दमाने येथे कामासाठी हजर व्हावे. त्यासाठी मी तुम्हाला भरपूर धन दौलत देतो म्हणजे तुम्हाला तेथे कांहीं कमी पडणार नाही. तुमची हौस भागली कीं, तुम्ही परत हस्तिनापुराला यावे व आपली कामे पुनः सुरु करावीत". ह्या त्याच्या बोलण्याचा विपरीत अर्थ निघण्यास कांहींच उघड उघड कारण नसल्याने ते पांडव खुषात ते स्वीकारतात. परंतु, त्याचा काका विदूर व मोठा भाऊ युधिष्ठीर ते सगळे वेगळ्याच रितीने पहात असतात.

वैशंपायन सांगतात, युधिष्ठीर काकाचा अंतस्थ उद्देश ओळखून ती विनंती नसून आज्ञा आहे हे समजून व स्वतः कमजोर असल्याने ते निमंत्रण स्वीकारतो. त्यानंतर भिष्माकडे पाहून तो तेथे जमलेल्या सगळ्यांना उद्देशून हळूवार व नम्रपणे बोलतो, "अहो, विदूर, द्रोण, कृपाचार्य, अश्वत्थामा, भुरीश्रव, समस्त कारभारी, दरबारी ब्राह्मणानो, पुरोहीत मंडळी व सन्माननीय काकी गांधारी, आपल्या राजे धृतराष्ट्रा ह्यांच्या इच्छेनुसार आम्ही पांडव आमच्या आईला घेऊन त्या आनंददायक ठिकाणी, वरनावत कडे लवकरच प्रस्थान करू.

त्यासाठी आपल्या सर्वांच्या शुभेच्छा आमच्याबरोबर असतील अशी मी आशा करतो व भरपूर संपत्ति घेऊन आम्ही तेथे निवास करू म्हणजे त्याकारणांने आमच्या हातून कांहीं पाप होणार नाही".

पंडुपुत्राचे ते वचन ऐकून समस्त कौरव व त्यांचे बगलबच्चे आनंदाने ओरडून त्याना मोठ्याने ओरडून त्यांच्या शुभेच्छा देतात. दुर्योधन मोठा चांगुलपणाचा अविर्भाव आणून पांडवांना बोलतो, आमच्या शुभेच्छा आहेत व त्यामुळे तेथे कोणतीही यत्किंचितही अडचण तुम्हाला होणार नाही अशी अपेक्षा करतो. त्यांचा मालमत्तेतील हिस्सा घेण्याचे सोपस्कार पांडव पूर्ण करतात व वरनावताकडे निघतात.

अशारितीने आदिपर्वातील लक्षागृह पर्वाचा एकशे पेचेचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सेहेचाळीस

(लक्षागृह पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, क्रूरकर्मा दुर्योधन त्याच्या अंध बापावर खूष होतो कारण तो पांडवांना वरनावताला पाठवण्याच्या कामात मदत करतो. त्यानंतर तो पुढील कारवाईसाठी तयारीला लागतो. तो पुरोचनाला, त्याचा गुप्त कारस्थानी सल्लागार, बोलावणे धाडतो. भेटल्यावर दुर्योधन त्याचा उजवा हात धरून त्याला बोलतो, हे बघ ह्या जगातील संपत्ती माझी आहे व तशीच ती तुझीसुद्धा आहे, जर तू माझ्या कामात मला मदत करशील. माझ्या मंडळींत खास विश्वसनीय अशी माणसे कमी आहेत. तू त्यात सर्वात जास्त खात्रीचा असा आहेस. म्हणून मी तुला एक काम देणार आहे. ते असें किं, तू माझे सर्वात मोठे शत्रू पांडव ह्यांचा नायनाट करण्याचे आहे व ते तू तुझ्या युक्तिने करशील असें मी समजतो. मी जसे तुझ्यासाठी करतो तसे तू माझ्यासाठी करशील अशी माझी अपेक्षा आहे. माझ्या पित्यानी त्यांना वरनावत कडे धाडले आहे. तेथे होणार्या सणात ते मजा मौज करणार आहेत. ते वरनावत कडे खेचराने ओढला जाणार्या रथाने जाणार आहेत म्हणून ते तेथे पोहोचण्या आधी तू एक चौकोनी घर उभे करशील जे लाकडाचे असेल व त्याच्या बनावटीत ज्वालाग्राही लाखे सारखे पदार्थ तू घालशील. ते पांडव तेथे पोहोचल्यावर त्या घरात रहातील असें कर. आणि तू त्यांच्या नजिक कोठेतरी लपून त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवशील. हे सगळे असें तू करशील कीं, त्या ज्वालाग्राही पदार्थांचा उपयोग केला आहे व ते घर पेटणारा आहे असा संशय त्यांना अजिबात येणार नाही. जसे पांडव तेथे पोहोचतील तू त्यांची मोठ्या आर्जवाने त्यांची पुजा करशील व त्यांना त्यांच्या मातेसह त्या घरात रहाण्याचा आग्रह करशील. तेथे उत्तम कारागिरी केलेले जळाऊ सामानाचे बिछाने, आसने, चौरंग असतील असें कीं, धृतराष्ट्र तुझी तारीफ करतील. परंतु, त्या घराला बाहेर जाण्यासाठी एकच द्वार ठेव. हे सगळे करतांना त्या गावातील कोणालाही ह्या कारवाईची भणक लागता कामा नये. एकदा ते पांच भाऊ तेथे झोपले कीं, तू त्या घराला बाहेरून आग लावशील म्हणजे ते पांच भाऊ व त्यांची आई त्यात जळून राख होतील. हे सर्व असें झाले पाहिजे कीं, त्या गांवातील माणसांना असें वाटले पाहिजे कीं, ती आग अपघाताने जसें, पेटता दिवा पडल्याने लागली असावी.

ते सगळे ऐकल्यावर तो दुर्योधनाचा प्रामाणिक सेवक फार वेगांने धावणार्या पांच खेचरांनी खेचला जाणारा रथ घेऊन वरनावत कडे त्वरीत निघतो. तेथे पोहोचल्यावर पुरोचन मोठ्या झपाट्याने दुर्योधनाने सांगितल्या सारखा महाल उभा करतो. आणि तेथे पांडवांच्या येण्याची वाट पहात रहातो.

अशारितीने आदिपर्वातील लक्षागृह पर्वाचा एकशे सेहेचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सत्तेचाळीसावा

(लक्षागृह पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, येथे हस्तिनापुरी पांडव वरनावतला जाण्यासाठी तयारी करत असतात. ते जलद वार्याच्या वेगांने पळणार्या घोड्यांना आपल्या रथाला जोडण्याचे ठरवतात. परंतु, त्यांना घर सोडून जाणे अगदी मनावर आले होते. ते साश्रू नयनाने भिष्म, धृतराष्ट्र, द्रोण, कृप आणि विदूर व इतर कुरुकुळातील वडिलधार्यांचे पाया पडण्यासाठी जातात. त्यावेळी त्या शिवाय इतर सगळे लहान मोठे प्रजाजन त्यांना निरोप देण्यासाठी येतात. त्या सगळ्या प्रिय जनांना आलिंगन देत ते सहृदय पांडव त्यांचा निरोप घेतात. पांडवांच्या बरोबर विदूर व इतर पांडवांवर प्रेम असलेले कांहीं कारभारी त्यांच्या सह काही अंतर त्यांना निरोप देण्याच्या उद्देशाने प्रवास करतात. पंडुची मुलं हस्तिनापुर सोडून जात आहेत त्यामुळे कष्टी झालेले अनेक नागरिकसुद्धा त्यांच्या पाठोपाठ कांहीं अंतर चालतात. त्यातील कांही मोठ्या मोठ्याने ओरडतात, पापी धृतराष्ट्र आंधळा असला तरी त्याला पांडवांचे चांगले बघवत नाही म्हणून तो त्यांना अशारितीने दूर पाठवत आहे, धिक्कार असो अशा राजाचा. कुरु राजाला पांडवांचे बरे बघवत नाही हेंच खरे. ते पुढे ओरडून बोलतात, जर ह्या राजाच्या वागण्यामुळे बंडाळी झाली तर त्याची जबाबदारी भिष्म, युधिष्ठीर, भिम, अर्जुन (धनंजय) ह्यांची नसेल हे धृतराष्ट्राने समजून रहावे. दुसरे कांही ओरडतात जर मोठी भावंड गप्प राहून हे सगळें चालू देतात तर राणी माद्रीचे छोटे नकूल व सहदेव काय करणार? कांहीजण विचारतात, बापाकडून आयते मिळालेले राज्य धृतराष्ट्राला सांभाळता येत नाही, आणि ते नागरिक विचारतात, भिष्म असें पांडवांचे त्या खतरनाक ठिकाणी पाठवणे कसे गुपचुप ऐकून घेतात ते समजत नाही. हा अन्याय आहे तरी ते गप्प कसें आहेत? ते प्रजाजन मोठ्याने ओरडून सांगतात, आम्हाला हा अन्याय मान्य नाही व आम्ही आमचा लाडका राजा युधिष्ठीरा कडे जाणार. जेथे आमचा राजा तेथे आम्ही, असें घोषणा देत ते सर्व नगरभर फिरत राहीले. पांडवांच्या अशारितीने वरनावतला पाठवण्यामुळें सगळे हस्तिनापुर अस्वस्थ झालेले दिसले. दुर्योधनाचा जनतेबद्दलचा अंदाज खरा असल्याचे आढळते. त्या अस्वस्थ जनताजनार्दनास युधिष्ठीर सांगतात, आमच्या भल्यासाठी सर्व कांहीं करणार्या राजाच्या आज्ञेचे प्रामाणिकपणे पालन आम्ही केले पाहिजे.

त्याला शासकीय शिस्त म्हणतात. जेव्हां अशी वेळ येईल किं, कांहीं प्रतिक्रिया देणे आवश्यक होईल तेव्हां तुम्ही आमच्या बरोबर येऊन आपली आमच्यावरील श्रद्धा सिद्ध करावी. त्यांच्या उद्देशावर संशय घेणे उचित नाही. मी तुमच्या भावना समजू शकतो. तुमच्या ह्या आंदोलनाने मला संतोष झाला आहे. आता माझ्या मित्रानो, तुम्ही आपापल्या घरी जावे व पुढे काय होते ते पहावे. युधिष्ठीराचे असें त्यांना मान्यता दाखवणारे वक्तव्य ऐकल्यावर ते पांडवांच्या बाजूचे प्रजाजन पांडवांना शुभेच्छा देऊन आपापल्या गृही गेले. त्यानंतर युधिष्ठीराला एका बाजूस घेऊन त्यांचा काका विदूर, त्याला कांहीं खाजगीत बोलतो, इतरांना समजू नये म्हणून ते दोघे म्लेच्छांच्या बोलीत (प्राचीन फारसी) संवाद करतात कारण, बाजूच्या कोणालाही त्यांचे बोलणे समजणे धोक्याचे त्यांना वाटले. विदूर सांगतो, "अरे माझ्या पुतण्या, ह्यात कांहीं काळबेरे निश्चित आहे असें मला वाटते. त्यासाठी जर कांहीं गोष्टीसाठी त्यांच्या माणसांने आग्रह केला तर त्या गोष्टी विषयी विशेष सावध व्हावे. परंतु, तुम्ही सावध अहात त्याचा अंदाज त्यांना आला नाही पाहिजे. धारदार शस्त्र, पाणी आणि आग अशा कोणत्याही मार्गांने ते तुम्हाला मारण्याचा प्रयत्न करतील असा माझा संशय आहे तरी तुम्ही अजिबात बेसावध राहू नका. ज्या प्रेमाचे नाटक ते करतील त्याच नाटकाची पुनरावृत्ती तुम्ही करावी म्हणजे ते बेसावध रहातील. जेव्हां तुम्हाला संशय येईल तुम्ही त्वरित दाट अरण्यात निघून जा कारण, तेथे तुम्हाला शोधणे व मारणे त्यांना शक्य नसेल. तसेंच त्यांचा कोण हस्तक तुमच्यावर लक्ष देऊन आहे ते पहा व त्याचा प्रथम एकाद्या अपघाताने नायनाट करा. हे सगळे करतांना तुमच्या आईला ह्या कारस्थानाची कल्पना देऊ नका कारण, त्यामुळें तिला अतिदुःख होईल. पळतांना अंधाराचा फायदा घ्या. ज्याला तो काय करतो त्याचा अंदाज नसतो तो कधीही प्रगती करत नाही. जर असाच प्रसंग आला तर पळून गेल्यावर परत न येता कोठेतरी दूर गुप्तपणे रहा व तेथून घरी काय होत आहे त्यावर लक्ष ठेवा. अशारितीने बाह्य जगात सामान्य माणसाप्रमाणे रहाण्याने तुम्ही जगाची रीत शिकाल जी राजघरात राहून तुम्हाला कधीच शिकता येणार नाही. तुम्ही तुमच्या वासनांवर संयम ठेवाल म्हणजे वासनांच्या उद्रेकामुळें ज्या चुका माणूस करतो त्या चुका तुम्ही करणार नाही. अशा वासनांच्या उद्रेकांचा शत्रू वापर करून तुम्हाला नष्ट करू शकतील".

विदूराचे ते शहाणपणाचे सांगणे ऐकल्यानंतर युधिष्ठीर त्यांना सांगतो, "आपण सर्वज्ञ अहात, आपण जे सुचवत अहात ते आम्ही समजून त्याप्रमाणे आम्ही लक्ष देऊन भविष्यात गोष्टी सावधगिरीने करत राहू".

त्या संभाषणानंतर विदूर त्यांच्या बरोबर कांहीं अंतर चालले व नंतर स्वताच्या गृही निघून गेले. जनता, भिष्म व विदूर असें सगळे पांडवांचा निरोप घेऊन परतल्यावर कुंती युधिष्ठीराला विचारते, "विदूर काय सांगत होते ते मला समजले नाही कारण ते मला न समजणार्या वाणीत बोलत होते, तरी ते काय सांगत होते ते मला समजून घ्यावयाचे आहे तरी ते, तू मला सांगावेस".

युधिष्ठीर तिला उत्तर देतात, "काका विदूर मला सांगत होते किं, आपल्याला रहाण्यासाठी जे घर तयार केले आहे ते जळाऊ पदार्थांचे आहे व त्याला रात्री आग लागण्याची शक्यता आहे म्हणून आपण सावध राहून वरनावतमध्ये गेले पाहिजे. पुढे ते सांगत होते किं, तेथून रात्र होण्याआधी आपण पळून अरण्यात लपले पाहिजे. दुर्योधनाचा साथीदार कोण आहे ते समजून त्याला आपल्या हालचालींची माहिती होणार नाही ह्याची दक्षता घ्यावी. पळून गेल्यावर लगेच घरी यावयाचे नाही व सामान्य लोकांत अज्ञातवासात राहून सामान्य लोकांचे जीवन जवळून अभ्यासावे व त्याद्वारा राज्य कसे करावे ते आम्ही शिकावे असें ते सांगत होते, जे घडते ते विधीची रचना असते म्हणून ते समजून आम्ही सगळ्या गोष्टी केल्या पाहिजेत असें ते सांगत होते. आम्ही आमच्या इंद्रियावर संयम ठेवून वासनांच्या (क्रोध, मोह, लोभ, मद, मत्सर) आहारी न जाता संयमानी सर्व कामं केली पाहिजेत. ते सर्व ऐकल्यावर मी त्यांना बोललो किं, मला त्यांनी जे सांगितले ते सगळे चांगलेच समजले असून त्यानुसार आम्ही सावधपणे सर्व कांहीं करू".

वैशंपायन पुढे सांगतात, फाल्गून महिन्याच्या अष्टमीच्या दिवशी जेव्हां रोहीणी नक्षत्र उगवत होते, पांडव वरनावतकडे निघाले. वरनावत मधील त्याच्या घरी जातांना ते वाटेत नगरीतील लोकांना ते पहात होते.

अशारितीने आदिपर्वातील लक्षागृह पर्वाचा एकशे सत्तेचाळिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे अठ्ठेचाळिसावा

(लक्षागृह पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, वरनावताचे रहिवासी समजतात किं, पंडुपुत्र त्यांच्या मातेसह त्यांच्या नगरीत येत आहेत तेव्हां त्यांना फार आनंद होतो. पांडवांचे स्वागत करण्यासाठी ते नगरवासी हजारोंच्या संख्येने त्यांच्या वाहनांने वरनावतच्या बाहेर त्यांचे स्वागत करण्यासाठी येतात. शास्त्राच्या संकेतानुसार ते आपापल्या भेटवस्तु घेऊन तेथे येत होते. पांडवाच्या सभोवती ते उभे राहून त्यां सर्वांनी पांडवांना "जय" असें बोलून त्यांना त्यांच्या भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. ते पाहून उत्साहीत झालेले युधिष्ठीर इंद्रासारखा चमकत होता. अशारितीने स्वागत झाल्यानंतर ते वरनावतमध्यें प्रवेश करतात. प्रवेश केल्यावर प्रथम ते पांचही भाऊ तेथील ब्राह्मणांच्या निवासस्थानी गेले व त्यांना अभिवादन केले. त्यानंतर ते वरनावतच्या कारभारी अधिरार्यांकडे गेले व त्यांची औपचारिक भेट घेतली. त्यावनंतर ते वरनावतातील कारागिर (सुत) व वैश्य (व्यापारी) लोकांना भेटले. त्यानंतर ते पांडव आपल्या मातेसह शुद्रांच्या वस्तीला जाऊन त्यांना भेटले. अशारितीन ते त्या नगरातील सर्व जनतेचा विश्वास संपादन करतात. त्यानंतर पुरोचन त्यांना भेटतो व त्यांना त्यांच्या महालात घेऊन जातो. तो पर्यंत संध्याकाळ झालेली असतो व ते त्या महालात गेल्यावर पुरोचन त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करतो. झोपण्यासाठी आरामशीर असें बिछाने व खाली गालिचे असतात. आपल्याला कांहीं पाहिजे ते सांगा, माझी नेमणूक तुमची सेवा करण्यासाठी झालेली आहे तरी जे कांहीं आपल्याला लागेल ते मला सांगा मी ते तुमच्याकरतां सज्ज ठेवीन असें पुरोचन नम्रतापूर्वकपणे युधिष्ठीराला सांगतो. पांडव मौल्यवान कपडे व त्यावर शोभतील असें जवाहीर घालून त्या महालात राहू लागतात. अशारितीने ते आरामात तेथे दहा दिवस रहातात. पुरोचन सुद्धा त्यांच्या दिमतीस रहाण्यासाठी त्याच घरात रहात असतो, वस्तुतः तो पांडवांवर लक्ष ठेवण्यासाठी तेथे रहात असतो हे युधिष्ठीराने ओळखलेले असते. तो  त्याने बांधलेल्या त्या घराची सतत स्तुती करीत असतो. आता ते पांडव त्या घराची कसोशीने पहाणी करण्यास सुरुवात करतात. पहाणी नंतर युधिष्ठीराला खात्री होते किं, ते घर खरोखरच झपाट्याने जळणार्या पदार्थांपासून बनवलेले आहे. तसें तो भिमाला सांगतो. घराला सुगंधी धुपाचा सारखा गंध

येत असतो त्यामुळें जरी वातावरण प्रसन्न होत होते त्या मागील उद्देश सुगंध देण्याचा नसून जाळण्याचा आहे हे ते चांगलेच समजून घेतात. सर्व घराला विविध प्रकारच्या ज्वालाग्राही परंतु, सुगंधी पदार्थांचा वास येत असतो. सुके गवत, सुका सुगंधी ताग, राळ, लोबन, बांबू अशा पदार्थांचा वापर ते बनवण्यात खर्च केला गेला होता. त्यावरून विदूरांचा कयास किती योग्य होता त्याचा अंदाज पांडवाना येतो. दुर्योधनाचा प्रामाणिक नोकर पुरोचन त्यांच्या बरोबर रहात असतो ते सुद्धा पांडवांवर नजर ठेवण्यासाठी हे त्यांच्या ध्यानात येते. पांडवांच्या मनात कांहीं संशय येऊ नये, ह्याची दक्षता तो पहात असतो हेसुद्धा त्यांच्या लक्षात येते. युधिष्ठीर इतर पांडवांना सांगतो किं, विदूर काकाला ह्या कारस्थानाचा अंदाज आला होता व त्याची साधारण कल्पना त्यांने दिली होती हे तो त्या इतर पाडवांना सांगतो. आता ते सगळे सावध होतात. ते ऐकून भिम बोलतो किं, जर हे घर इतके खतरनाक आहे तर आपण हे घर सोडून आधी जेथे उतरलो होतो तेथे जाऊन राहू. त्यावर युधिष्ठीर सांगतो, तसें नको, आपण येथेच राहून योग्य वेळी येथून पलायन करावे व अरण्यात अज्ञातवासात राहून पुढे काय दुर्योधन करतो ते पहावे कारण जर आपण येथून दुसरी कडे गेलो तर तेथे तो कांही करील कारण त्याला आपल्याला ठार मारावयाचेच आहे. जर पुरोचनाला संशय आला किं, आपल्याला त्यांचा डाव समजला आहे तर तो लागलीच ह्या घराला आग लावून टाकेल. तो पापी पुरोचन कशाचीच पर्वा करणारा नाही. जर आपण अशाप्रकारे जळून गेलो तर भिष्म दुःखी होतील. आपण आपल्या पूर्वजांचे ऋणसुद्धा फेडू शकणार नाही. त्यापेक्षा पुरोचनाला समजणार नाही अशारितीने येथून भुयार करून त्यातून बाहेर दूर जावे व त्याआधी ह्या घराला त्या पुरोचनासकट जाळून टाकावे. त्यानंतर विदूरांनी सांगितल्या प्रमाणे, आपण अज्ञातवासात राहून ह्या जगाचा सामान्य लोकांसारखा अभ्यास करावा, असें करण्याचे कारण आज आपल्याकडे सत्ता, संपत्ती व सुविधा ह्यांपैकी कांहींही नाही व त्या उलट दुर्योधनाकडे ते सगळे आहे त्यामुळे तो आपल्याला मारू शकेल. अज्ञातवासात आपण जास्त चांगल्याप्रकारे पुढची तयारी करू शकू. आपला बेत कोणालाही समजणार नाही अशाप्रकारे हे सर्व आपण करायला पाहिजे. पळून जाण्याआधी हे घर आपण जाळू असें कीं. त्यात तो पापात्मा पुरोचन सुद्धा जळून जाईल. असा सगळा बेत पक्का ठरतो.

अशारितीने आदिपर्वातील लक्षागृह पर्वाचा एकशे अठ्ठेचाळीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे एकोणपन्नास

(लक्षागृह पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, असें ठरत असतांना विदूर त्याचा एक तज्ज्ञ सुत पांडवांच्या भेटीस पाठवतो, तो भुयारे खोदण्याच्या कामात निष्णात असतो. तो पांडवांना भेटतो व सांगतो, "मला विदूरांनी तुमच्या मदतीसाठी पाठवले आहे. मी भुयारे खोदण्याचे काम करतो. तुमच्यासाठी मी काय करावे ते सांगा. विदूरांनी मला तुमच्या कक्षातून खोल व लांबवर जाणारे भुयार करण्यास सांगितले आहे. विदूरांच्या हेरांनी सांगितले आहे किं, धृतराष्ट्र पुत्र दुर्योधनची योजना आहे कीं, आजपासून चौदाव्या रात्री पुरोचन ह्या घराच्या प्रवेशद्वारालाच आग लावणार आहे व स्वतः नंतर पळून जाणार आहे, कारण ह्या घराला दुसरा दरवाजा नाही. खिडक्यांना ज्वालाग्राही गज बसवले आहेत. तेव्हा तुम्हाला हे सगळे त्या आधी उरकावे लागेल". असें बोलून मग तो सुत विदूरांनी जे खास म्लेच्छ भाषेत युधिष्ठीराला सांगितले ते बोलून दाखवतो त्यामुळे हा माणूस विदूरांनीच पाठवला आहे ह्याची पांडवांना खात्री पटते. युधिष्ठर त्याला बोलतो किं, आमचा आता तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. विदूर व आम्ही ह्यात फरक न करता तू तुला दिलेले कार्य करण्यात आम्ही तुला मदतच करू. धृतराष्ट्राची पुत्र एवढी संपत्ती मिळाली तरी आमचा पिच्छा सोडत नाही ह्याचे दुःख होते. आम्हाला मारण्यासाठीच हे घर असें ज्वालाग्राही बनवले आहे त्याकरता तू सांगतोस त्याप्रमाणे आम्ही तुला भुयार करण्यात मदत करू व चौदाव्या दिवसा आधी येथून पळून जाऊ. तू तुझे काम आरंभ कर असे युधिष्ठीर त्याला आज्ञा करतो. त्या प्रमाणे तो कारागिर घरापासून दूर असलेल्या एका अरण्यातून भुयार खोदण्यास सुरुवात करतो ते असें किं, त्याचे दुसरे मुख त्यांच्या आतील कक्षातून उघडेल. त्या कामाला सर्व शक्तिमान असें सगळेच पांडव मदत करतात व त्यामुळें ते खोदणे झपाट्याने ते पूर्ण करतात. भुयाराची दिशा घराच्या मागील बाजूने असल्याने पुढे प्रवेशद्वारावर बसलेल्या पुरोचनाला त्याचा थांगपत्ता लागत नाही. दिवसां ते पांडव अरण्यात शिकारीला जाण्याच्या बहाण्याने दररोज पहाटे बाहेर पडत त्यामुळें पुरोचनाला त्यांच्या जाण्याचे विशेष वाटले नाही. प्रथम शिकार करून मग ते त्या अरण्यातील भुयाराच्या मुखात शिरून खोदकाम करीत व रात्री उशीरा ते ती शिकार घेऊन परतत त्या

परिपाठामुळें पुरोचन त्याच्या कारवाईला ओळखू शकला नाही. पांडव दिवसभर घरात नसल्याने पुरोचन घराला दिवसा आग लावणार नाही व म्हणून कुंती सुरक्षित होती हे निश्चित होते. आग जर लावावयाची तर ती तो रात्रीच लावील हे ते पांडव ओळखून होते. एकदाचे ते भुयार तयार झाले. भुयार तयार झाल्यावर त्याचे घरातील मुख लाकडाच्या फळ्यांनी उत्तमरित्या बंद केले होते असें किं, ते कोणाला दिसणार नाही. रात्री झोपतांना ते शस्त्रांनी सज्ज रहात जर त्यांनी ठरलेल्या दिवसाच्या आधी आग लावली तर आपण बेसावध नसावे म्हणून ते सज्ज असत. पुरोचनाला कांहीं संशय येऊ नये असेंच त्याच्याशी त्याच्या सारखेच मोठ्या प्रेमांनेच वागत होते. आपण तुझ्या सेवेवर फार खूष आहोत असेंच ते त्या नराधमाला दाखवत होते. तरीसुद्धा ते त्याला घरात वावरू देत नव्हते म्हणजे त्याला त्या भुयाराची कल्पना येऊ नये. त्यामुळें पुरोचन पुरता बेसावध झाला होता. पुरोचन त्या रात्रीची वाट पहात होता पण आता पांडवांचा पळण्याचा मार्ग सज्ज होता. ते आता योग्य वेळेची संधी पहात होते. ह्यासर्व कारवाईची भणक कोणालाही नव्हती. फक्त विदूर, त्याचा खंदक करणारा मित्र व पांडव एवढेंच ते जाणत होते. कुंतीसुद्धा अनभिज्ञ होती . पांडव त्यांच्या संपत्तिचा वाटा जो ते वरनावतात घेऊन आले होते तो त्या विदूराच्या हस्तकास देऊन सांगतात किं, हे सामान विदूरांकडे घेऊन जा. अशारितीने ती संपत्ति योग्य जागी जाईल ह्याची ते दक्षता बाळगतात. आता पांडव निष्कांचन झालेले असतात. फक्त अंगावरील वस्त्र काय ते त्यांच्याकडे असतात, नाही म्हणायला कुंतीचे कांहीं सामान असते तेवढें च.

अशारितीने आदि पर्वातील लक्षागृह पर्वाचा एकशे एकोण पन्नासावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे पन्नासवा

(लक्षागृह पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, पाडव अशारितीने तेथे एक वर्ष रहातात. ते मजेत आहेत व शिकारी करण्यात दंग असतात ते पाहून पुरोचन त्याच्या पद्धतीने फार खूष झालेला असतो. पुरोचन बर्यापैकीं बेसावध आहे असें लक्षात आल्यावर एक दिवस युधिष्ठीर त्याच्या चारही भावंडांस बोलतो किं, "आता आपण पूर्ण तयारीत आहोत तेव्हां पुरोचन झोपलेला असतांना आपण पुढचा दरवाजा कडी लावून बंद करून मग आईला घेऊन आपल्या भुयारातून अरण्यात निघून जावयाचे, शेवटी भिम घराला आग लावून आपल्या मागून भुयारातून येईल, असे मला सुचवावयाचे आहे". सगळे पांडव त्याला अनुमोदन देतात.

वैशंपायन सांगतात, एका दानधर्माच्या प्रसंगी कुंती माता पुष्कळ ब्राह्मणांना आमंत्रण देते . त्यांच्या बायकांनासुद्धा तिने बोलावले असते. ती सगळी मंडळी खाऊन पिऊन आनंद करून नंतर आपापल्या घरी जातात. त्या सोहळ्यात एक अभागी भिल्ल स्त्री आपल्या पांच लेकरांना घेऊन तेथे कांहीं अपेक्षेने आलेली असते. ते सगळे मद्य पिऊन धुंद झालेल्या स्थितीत बेसावध अशा अवस्थेत जणू मेलेले असावेत त्या घरात एका कोपर्यात झोपण्यासाठी जागा मांगतात. त्या प्रसंगाच्या परिस्थितीनुसार त्यांना तेथे निजण्याची परवानगी पांडव मोठ्या मनाने देतात. रात्री सगळे झोपी जातात व अशा समयी वारा सोसाटाचा वाहू लागतो. जणू वादळ सुरु होणार असेंच वाटले. ही उत्तम संधी आहे असें हेरून सगळे पांडव त्या घराला आग लावून पळून जाण्याचा बेत करतात. त्या प्रमाणे भिम पुरोचन झोपला होता त्या जवळ आग पेटवतो. इतर भावंड त्या निवासाच्या इतर चौफेर भाग पेटवतात. जेव्हां त्यांना खात्री होते कीं, आग पूर्णपणे पसरली आहे तेव्हां ते आपल्या आईला घेऊन त्या भुयारातून अरण्याच्या दिशेने निघून जातात. त्या लाखेच्या घराने झपाट्याने पेट घेतला व त्या आगीचा आवाज व तो घोंघावणारा वारा ह्यामुळें सगळे वरनावत जागे होते. ती आग इतकी मोठी असते कीं, ती विझवणे केवळ अशक्य होते. ते पाहून त्या नगरीचे रहिवासी दुःखी अंतःकरणाने पांडव त्यात जळून मेले असेंच समजतात. त्या रहिवाशाना हा धृतराष्ट्राचाच डाव आहे व त्यानेच हे अमानुष कृत्य घडवले असें ते

प्रजाजन समजतात. शत्रूचा नाश करावा असें त्यांने आपले पुतणे व वहिनी ह्यांना जाळून मारले अशी वार्ता सगळीकडे पसरते. पुरोचनसुद्धा त्यात मेला हे ते ओळखतात. तो पापी नराधम मेला त्याचे त्यांना चांगले झाले असें ते बोलतात. कारण ते घर बनत असतांना त्या वरनावताच्या सज्जन रहिवाशांनी ते घर जळाऊ पदार्थांचे बनवले जात होते तेव्हांच ते ओळखतात कीं, ह्यात कांहीं काळेबेरे आहे, आणि नेमके तेंच घडले. पंडुची मुलं व पत्नी मेली हे समजल्यावर त्या नगरात शोककळा पसरते.

एकीकडे ते वरनावताचे लोक त्या घराभोवती बसून शोक करत असतांना ते पांच पांडव त्यांच्या आईला घेऊन त्या बिळातून दूर अरण्यात येतात व अधारात वेगांने आणखीन दूर जाण्याचा प्रयास करत असतात. परंतु, अंधार व भरपूर झाडी ह्यामुळे फार वेगांने जाणे शक्य होत नाही. अशावेळी भिम त्या सगळ्यांना आपल्या अफाट अंगावर उचलून घेतो व झपाट्याने त्या जागे पासून दूर चालत रहातो. जातांना तो भिम अनेक झाडे मोडून टाकतो व मातीत त्याची पावले त्या सगळ्या वजनामुळें खोल रुतत असतात. असाच त्यांचा प्रवास चालू असतो.

अशारितीने आदिपर्वातील लक्षागृह पर्वाचा एकशे पन्नासावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे एकावन्नावा

(लक्षागृह पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, तोपर्यंत विदूराने त्याचा खास विश्वासातील सेवक ब्राह्मण त्या वरनावताच्या अरण्यात पाठवला होता. तो ब्राह्मण त्याला दिलेल्या संकेतानुसार एका ठिकाणी येतो व तेथे तो ते पांच पांडव त्यांच्या आईसह बसलेले पहातो. ती जागा गंगेच्या खोलीवरून त्याला सापडलेली असते. विदूराच्या गुप्तहेरांच्यामुळें दुर्योधनाचे कारस्थान तो हुडकून काढतो. त्यामुळें ते शक्य झालेले असते. तो ब्राह्मण पांडवांना भेटल्यावर आपण विदूरानेच पाठवलेले दूत आहोत हे सिद्ध करण्यासाठी ठरलेला परवलीचे वाक्य तो युधिष्ठीराला बोलून दाखवतो. त्यामुळें हा आपलाच माणूस आहे ह्यावर पांडवांचा भरवसा होतो. ते परवलीचे वाक्य असें होते, "गवत खाणारा व अरण्यात रहाणारा त्या गवताला आणि अरण्याला कधीही आग लावत नाही, जंगलातील बिळात ती आग शिरू शकत नाही, ज्यांना हे समजते ते स्वताचे संरक्षण करू शकतात". असें बोलून तो पवित्र ब्राह्मण युधिष्ठीराला विनंती करतो किं, तो विदूरांने पाठवलेला दूत असून त्यांने गंगेच्या किनारी आणलेल्या मजबूत होडीने आणखीन दूर निघून जावे. ती होडी कशाही वादळात व वार्याच्या तुफानात बुडणारी नाही. त्यानंतर तो विद्वान ब्राह्मण कुंतीला विदूराचा संदेश सांगतो कीं, तिचे पुत्र कर्णाला व दुर्योधनाला तसेंच शकूनीला ठार मारतील व ह्या कृत्याचा वचपा काढतील. पुढे तो त्यांना बोलतो, "ही होडी तुम्हाला सुरक्षित जागी गंगेच्या किनार्याने कोठेही लांब पोहोचवू शकते. तरी त्यात बसा व आपला पुढचा अज्ञातवासातील प्रवास सुरु करावा. पुढे तो ब्राह्मण त्यांना विदूराचा आणखीन एक सल्ला सांगतो किं, "ह्यापुढे अजिबात बेसावध राहू नका". नंतर "जय", अशी घोषणा करून तो विदूराचा हस्तक त्यांना निरोप देऊन आपल्या मार्गे आल्यावाटेने परत निघतो.

पांडवसुद्धा त्या हस्तकाला विदूरासाठी कांहीं निरोप देऊन त्याची बोळवणी करतात. त्यानंतर ते महारथी आपल्या आईस घेऊन गंगा किनार्याने ती होडी नेत कोणत्या तरी अज्ञात ठिकाणी जातात.

अशारितीने आदिपर्वातील लक्षागृह पर्वाचा एकशे एकावन्नावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे बावन्नावा

(लक्षागृह पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, रात्र संपल्यावर सकाळपासून वरनावताचे रहिवाशी त्या जागी जमा होऊ लागले. त्यावेळे पर्यंत आग शमली होती व फक्त धूर होता. त्या सुमारास मोठ्या चपळाईने भुयार खोदणारा तेथेच होता तो घराच्या आतील बाजूस असलेले भुयाराचे तोंड राखेने भरून काढतो असें किं, कोणालाही ते बिळ दिसणार नाही. इतर माणसेसुद्धा त्याला त्या कामात मदत करू लागतात. जसें ते राख गोळा करावयाला लागतात, त्या आसमंतात पसरलेला धुपाचा दर्प त्यांना स्पष्टपणे सांगत होता किं, तेथे फक्त लाख व राळ हे पदार्थच प्रामुख्याने वापरलेले होते. ह्यावरून ते वरनावताचे लोक समजतात किं, पांडवाना मारून टाकण्यासाठीच हे घर पुरोचनाने बांधले होते व त्यात ते पांडव कदाचित् मेले असावेत. शोधतांना त्यांना त्या भिल्लीणीचे व तिच्या पांच पुत्रांचे करपून गेलेले अवशेष आढळतात. त्याच प्रमाणे पुरोचनाचा मृत देह ते ओळखतात कारण त्याठिकाणी त्याचा विशेष लक्षात येईल असा जरीच्या कपड्याचा अंगरखा होता. म्हणजे पुरोचन ज्यांने दुर्योधना करता हे सगळे केले तोसुद्धा त्यात मारला गेला होता. भिल्लीणीला कुंती समजून व तिच्या मुलांना पांडव समजून ते वरनावताचे लोक आकांत करतात किं, पंडुची मुलं त्यांच्या आईसकट मेली. ते ओळखतात किं, हा पांडवांना मारण्याचा डाव आहे व त्याला धृतराष्ट्राची सम्मती असल्याशिवाय ते करणे केवळ दुर्योधनाला अशक्य आहे. ते भिष्म, द्रोण, कृप अशा सगळ्यांना त्या बद्दल दोषी ठरवतात कारण त्यांनीसुद्धा नियमांचे पालन केलेले नव्हते असा त्यांचा आरोप होता. ते वरनावताचे नागरिक हस्तिनापुराला संदेश पाठवतात किं, अहो राजे, धृतराष्ट्रा तुझा पांडवांना मारून टाकण्याचा डाव सफल झाला आहे, त्यासाठी आनंद कर, आता तुझा दुर्योधनाला गादीवर बसवण्याचा प्रयत्न य़शस्वी झाला आहे. असा उपरोधिक संदेश ते धाडतात. कौरवांबद्दलचा रोष जनतेत आणखीनच वाढतो. आगीच्या बातमीने हस्तिनापुरात शोककळा पसरते. दुर्योधनाला समजते किं, त्याचा हस्तक पुरोचनसुद्धा त्यात मेला आहे.

पांडवांच्या कथित मृत्यूच्या बातमीमुळें सगळे आकांत करत असतांना विदूर मात्र त्याच्या ब्राह्मण हस्तकाची वाट पहात असतो. तो इतरांप्रमाणे दुःख दाखवत नसतो परंतु, त्याकडे

कोणाचेही लक्ष नसते. धृतराष्ट्र आपल्या भावाचा निर्वंश झाला म्हणून खेद व्यक्त करत असतो व तो पांडव व त्यांची माता कुंती , कुंतीराजाची मानस कन्या ह्यांच्या दशक्रिया विधीची व्यवस्था करण्याचे आदेश दिले जातात. त्यांच्या अस्थींचे विसर्जन राजघराण्याच्या इभ्रतीनुसार करण्याचे आदेश दिले जातात. त्याप्रमाणे त्या भिल्ल स्त्रीचे व तिच्या मुलांचे अस्थी पांडवांच्या अस्थी समजून विधीपूर्वक विसर्जित केल्या जातात. अशारितीने ते सगळे विधी वरनावतातच संपन्न केले जातात. त्यांच्या स्मर्णार्थ धन दौलत गरीबांत वाटली जाते जेणे करून त्यांच्या आत्म्यास शांति मिळो. हस्तिनापुरात अंबिकापुत्र धृतराष्ट्र त्याच्या नातेवाईकांसह मृतात्म्यांना अर्ध्य देतो. कोणी युधिष्ठीरासाठी तर कोणी भिमासाठी व इतर कांहीं अर्जूनासाठी आक्रोश करतात तर कांहीं माद्रीच्या जुळ्यांसाठी आकांत करत असतात. जणू दुःखाचा पहाड त्या नगरावर कोसळला आहे असें दृष्य होते. विदूर मात्र शांत बसलेले होते कारण त्यांनाच फक्त माहीत होते कीं, वस्तुस्थिती निराळी आहे. दुसरीकडे कौरवांची माता शांतपणे विचार करीत होती किं, असें कसें झाले परंतु, तिच्या मनात ती खूष झालेली होती हे नाकारता येणार नाही. तिला कुंतीचा प्रेमळ स्वभाव आणि पांडवांचा आज्ञाधारकपणा विशेष आठवतो. एका बाजूस दुःख होत असतां दुसर्या बाजूस आपली मुलं गादीवर बसणार ह्यांचा संतोष ती लपवू शकत नाही.

येथे पांडव त्याच्या वेगवान होडीने गंगेतून झपाट्याने दिवसभर प्रवास करीत फार दूर अशा प्रदेशांत पोहोचण्यात मग्न झालेले असतात. एका निर्जन भागात ते ती होडी किनार्याला लावतात व तेथेच तिला सोडून तेथे पसरलेल्या निबीड अरण्यात शिरतात. रात्रीमुळें व त्यात पुन्हा दाट वनश्री असल्याने सर्वत्र अंधार पसरलेला असतो. त्यातून जाणे सोपे नव्हते म्हणून बळश्री भिम त्याच्या खांद्यावर सगळ्या पांडवांना व कुंतीला घेऊन भराभरा वाटचाल करत रहातो. वाटेत जातांना युधिष्ठीर भिमाला बोलत असतो, आपल्याला अजून माहित नाही किं, तो नराधम पुरोचन मेला किं नाही. त्यावर ते बोलतात, त्याचा कांहीं परिणाम आता त्यांच्यावर होणार नाही. एकजण सुचवतो, आपल्या मरणाची वार्ता सर्वत्र पसरली तर ती आपल्याला कोठेतरी वस्तीत गेल्यावर निश्चितपणे समजेल. युधिष्ठीर बोलतो, कोणत्या दिशेने आपण जावयाचे ते कळत नाही. तरीसुद्धा

बलवान भिम तसांच कशाचीही पर्वा नकरतां त्या अंधारातून वाट काढत माहित नसलेल्या दिशेने जात रहातो.

अशारितीने आदिपर्वातील लक्षागृह पर्वाचा एकशे बावन्नावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे त्रेपन्नावा

(लक्षागृह पर्व संपले)

वैशंपायन पुढे सांगत असतात, तो महाबलवान भिम त्या जंगलातून वेगांने जात होता व त्याचे भाऊ त्याच्या मागेमाग येत होते, त्याची आई त्याच्या खांद्यावर बसलेली होती, असें ते त्या अनोळखी प्रदेशातून वाट काढत चालत होते. अधून मधून एकेक पांडव थकल्याने भिमाच्या खांद्यावर बसत व असा प्रवास चालू होता. वाटेत येणारे वृक्ष वेली तो उपटून फेकत असें व अशाप्रकारे मार्ग तयार करीत असें. हत्तींचा तांडा जातांना जसें होते लहान मोठ्या  झाडांचे तसेंच होत होते. भिमाचा चालण्याचा वेग असा होता किं, जणू वारा जोरांने वहात आहे. त्याच्या अफाट देहातून घामाच्या धारा लागल्या होत्या. कांहींवेळा त्याच्या वेगांने चालण्याच्या भरात ते पांडव थकून मृच्छा येऊन पडत होते, पुन्हा उठून चालत होते, थकल्यानंतर ते भिमाच्या खांद्यावर बसत होते असें होत होते व ते सगळे त्यांना माहित नसलेल्या प्रांतात वेगांने प्रवास करीत होते, त्यांचा उद्देश एकच होता किं, जितके होईल तितके जास्त दूर हस्तिनापुराहून जाणे. जेव्हां वाटेत झरे, नद्या लागत तेव्हां तो बलवान त्या पाण्यातून एकाद्या माशासारखा पोहून जात असें. धृतराष्ट्राच्या क्रूर मुलांपासून पळत होते. प्रवास करता करतां ते एका अशा प्रदेशात येतात जेथे झाडी होती परंतु, तेथील झाडांवर खाण्यासारखी फळें नव्हती. उपासमार व तहान ह्यांने ते बेजार झाले होते. त्या वनात रात्री ते पोहोचले. तेथे भयानक प्राण्यांचे ओरडणे व पक्षांचे किंचाळणे ह्याशिवाय कांहीही नव्हते. मधून मधून जोराने वारे वहात होते व त्यामुळें झाडांची पाने खाली पडत होती.

थकल्यामुळें ते सगळे एका जागी त्या रानात थांबतात. कुंतूला तो त्याच्या पाठीवरून खाली उतरवतो व एका झाडाखाली ते बसतात. कुंती त्यांना म्हणते , "माझी सगळी मुलं माझ्या बरोबर आहेत पण मला तहान लागली आहे त्यासाठी कोणी पाणी शोधेल कां"?

भिम थकला होता पण आईच्या प्रेमापुढे ते थकणे कांहींच नव्हते, तो पाणी शोधण्यासाठी निघतो. त्याला पाणथळावर उडणार्या पक्षांचा वास येत असतो व म्हणून तो त्या पाणथळाच्या शोधात निघतो. त्याच्या बरोबर त्याची भावंडेसुद्धा प्रवास सुरु करतात. जाता जाता ते एका मोठ्या वडाच्या झाडाकडे येतात. तेथे तो त्यांना थांबायला सांगतो व

स्वतः पाणी शोधण्यासाठी त्या पक्षांच्या वासाच्या दिशेने निघतो. अदमासे चार कोस अंतर चालल्यावर त्याला तो तलाव दिसतो. भिम त्यात मनसोक्त डबक्या मारून स्वताचा श्रमपरिहार करतो, त्यानंतर तो भरपूर पाणी पितो व त्याच्या भावंडांसाठी व आईसाठी त्याच्या अंगावरील वस्त्र पाण्याने भिजवून ते पाणी घेऊन तो त्या वडाच्या झाडाकडे निघतो. उलट मागोवा घेत तो अखेरीस त्या वडाच्या झाडाकडे येतो. तेथे तो पहाते किं, त्याची भावंडे व आई निवांतपणे त्या जमिनीवर झोपलेली होती. ते सगळे इतके थकलेले होते कीं, ती झोप त्यांना आवश्यक होती.

भिमाच्या मनात एक एक विचार येतात, आपली आई, कुंतीभोजाची मुलगी जिने कधी जमिनीवर झोपण्याचा विचारसुद्धा केला नसेल ती आता ह्या वनात मातीवर झोपली आहे व ते सुद्धा त्या नराधम दुर्योधनामुळें, भिम त्याचे पंजे जोराने कुसकरतो जणूकाय तो दुर्योधनाची मुंडी पिरघळतो आहे. तो विचार करतो, वरनावतात लुसलुशीत गादीवर झोपणारे माझे हे चार भाऊ येथे मातीवर पहुडले आहेत ते सुद्धा त्या हरामखोरामुळें त्याचा क्रोध अनावर होतो पण भिम स्वताला सांगतो, "आपला मोठा भाऊ युधिष्ठर त्यांच्यावर कां रागवत नाही? जर त्यांने आज्ञा केली तर एका दमात मी त्यांना मारून टाकीन. हे काय दिवस आले आहेत आपल्यावर, इतकी ताकद माझ्यात असूनही मी कांहीं करू शकत नाही". तो युधिष्ठीराकडे पहातो, त्याच्या तोंडाकडे पहातो व विचार करतो, "हा हस्तिनापुराचा राजा व्हायला पाहिजे तो येथे जंगलात मातीवर झोपला आहे असां कीं काय तो एकादा कैदी पळून जात आहे. तो अर्जूनाकडे पहातो. त्याचा सावळा वर्ण पहातो. तो स्वगत पुटपुटतो, "हा जगातील सर्वश्रेष्ठ धनुर्धर असहाय होऊन येथे रानात झोपला आहे, काय हे प्राक्तन त्याचे किं हा इंद्राचा पुत्र असा झोपला आहे, हे काय होत आहे आमच्या बरोबर कांहीं समजत नाही". नंतर तो नकुल व सहदेवांकडे पहातो. ते सुंदर पुरुष पाहून त्याला गंमत वाटते, "हे कोणाच्याही आग्यात नाहीत कीं, मध्यात नाहीत तरी ते विनाकारण येथे असें मातीवर पहुडले आहेत, हे काय होत आहे? ह्या सगळ्याला आपले काकाच, धृतराष्ट्रच कारणमात्र आहेत. त्यांना सत्ता पाहिजे म्हणून आमचा काटा काढण्याची काय गरज? आम्ही सत्ता मागितली नाही, कधी त्याचा विचारसुद्धा केला नाही मग हे असें कां वागतात? आम्ही गुण्यागोविंदाने त्यांच्या बरोबर रहायला तयार असतांना

हा दुष्टावा कां? जर युधिष्ठीरांनी मला एक आज्ञा केली तर त्या दुर्योधनाला मी झटक्यात ठार करू शकतो पण आमच्या वडील भावाला त्यांच्याशी लढण्याची इच्छा होत नाही, एवढे झाले तरी तो शांत कसा"? भिमाचा क्रोध वाढत होता, "दुर्योधनच काय कर्ण, शकूनी, दुःशासन ह्या सगळ्यांना मी एकटा भारी आहे पण आमच्या मोठ्या भावाला त्यांचा राग येत नाही व मी माझ्या भावाच्या आज्ञेबाहेर जाऊ शकत नाही. कारण, आम्ही सगळ्यांनी त्याच्या आज्ञेत रहाण्याचे वचन आईला दिले आहे". असें सगळे त्रागाचे विचार त्याला चिडवत होते व तो महाबली क्रोधांने स्वताचेच पंजे जोरांने पिरघळत होता. नंतर भिम शांत होतो व विचार करतो किं, जवळच एकादे गांव असेल तर तेथे आपण हे सगळे उठल्यावर जाऊ व तेथे वस्ती करू. मी आणलेल्या ह्या कपड्यातील पाण्याने कदाचित त्यांची तहान भागेल तर बरे. असें विचार करत तो त्याच्या निष्पाप भावंडांकडे पहात रहातो, त्याच्या आईच्या पायाला हात लावून तो वेळोवेळी नमस्कार करीत असतो.

अशारितीने आदिपर्वातील लक्षागृह पर्वाचा एकशे त्रेपन्नासावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे चोपन्नावा

(हिडींब वध पर्व सुरू)

वैशंपायन सांगतात जनमेजय राजाला, पांडव जेथे निजले होते त्या जागापासून जवळच एक राक्षस एका साल वृक्षावर रहात होता. राक्षसच तो, महा शक्तिमान व धाडसी, माणसांना खात असें. त्याच्या बळकट पकडीतून कोणीही सुटू शकत नसें. त्याचे तीक्ष्ण व लांब दांत एकदा अंगात घुसले कीं, तो माणूस मेलाच असें समजावे. भिम तेथे जवळच निष्पाप बुद्धीने पांडवांना जाग कधी येते त्याची वाट पहात बसला होता अशावेळी त्या राक्षसाला माणसाची जबरदस्त भूक लागते कारण, त्याला माणसांचा गंध येत असतो. त्याचे उदर मोठे व लंब होते. त्याच्या अंगावर लांब काटेरी केंस होते व त्यांचे अंग तांबड्या वर्णाचे होते. त्याचे खांदे एकाद्या मोठ्या वृक्षाच्या आडव्या पसरलेल्या फांद्यांसारखे रुंद होते. जसें राक्षसांचे कान असतात तसे ते टोकाला चिंचोळे झालेले असें होते ज्यामुळें तो लांबचेसुद्धा स्पष्ट ऐकू शके. त्याचे एकंदर स्वरुप भयावह होते. त्याचे डोळे लाल व घाबरवणारे होते. आजूबाजूला त्याने त्याची दूरदृष्टी टाकली तेव्हां त्याला ते पंडुपुत्र शांतपणे झोपलेले दिसले. त्याना पाहून तो भयंकर राक्षस आपल्या लांब व कोरड्या जटा हाताने पिंजारत बाजूला सारत त्या पांडवांकडे नीट निरखून पहात रहातो. त्यांना पाहून त्याची माणसांची भूक जास्त वाढते. सालवृक्षावरून खाली उतरण्या आधी तो एक मोठी जांभयी देतो त्यातून भयंकर दुर्गंधी सभोवार पसरते. पावसाच्या कृष्ण ढगांसारखे त्याचे अंग व त्याचे दांत त्याच्या कृष्ण वर्णी मुखातून चमकत होते. त्या पांच पांडवांना पाहून तो खूष झाल्यासारखा दिसतो. आता आपल्याला माणसांचे मांस खाण्यास मिळणार ह्या कल्पनेने तो फारच आनंदी झालेला दिसतो. माणसांचा गंध आल्यामुळें तो राक्षस आपल्या बहिणीला हांक मारतो. तिला सांगतो, "बर्याच दिवसांनी माणसांचे मांस आपल्याला खाण्यासाठी मिळणार आहे, असें माणसांचे मांस खाण्याच्या खुषीत मी आजचा दिवस मजेत घालवणार आहे. त्यांचे कंठ चिरून मी त्यांचे उष्ण रक्त पिणार आहे. तरी तू जाऊन माहिती काढ किं, हे कोण आहेत व येथे असें अरण्यात काय करतात. त्यांच्या मांसाच्या गंधाने मी त्यांना खाण्यासाठी अगदी उतावीळ झालो आहे. त्यांना मारून माझ्याकडे घेऊन ये". "ते माझ्या हद्दीत झोपले आहेत, त्यामुळें त्यांना भिण्याचे तुला कारण नाही. मी

सांगतोय ते पटकन कर म्हणजे आपण दोघे त्यांचे मांस एकत्र बसून खाऊ. त्यानंतर आपण तो आनंद साजरा करण्यासाठी खूप नांचू". आपल्या भावाचे ते बोलणे ऐकल्यावर त्याची बहिण जिचे नांव हिडींबा होते ती त्या झोपलेल्या पांच भावांच्या जवळ जाते. जवळ गेल्यावर तिला दिसते किं, ते चार झोपलेले असून त्याच्या बरेबर एक वयस्कर स्त्री निजलेली आहे व बाजूला एक अजस्र शरीर असलेला कोणी बसलेला आहे. त्या अजस्र देहयष्टी असलेल्या भिमाला पाहून ती राक्षसीण त्याच्या प्रेमात पडते. त्याचे सोनेरी रंग असलेले शरीर व रुंद बांधा, कमळासारखे डोळे, मजबूत आकर्षक गर्दन हे सगळे पाहून ती ठरवते कीं, ह्याच्याशीच आपण लग्न करावयास पाहिजे. त्याच वेळी ती ठरवते कीं, ती तिच्या भावाची आज्ञा मानणार नाही. तू जनमेजया जाणतोसच किं, मुलींचे प्रेम पतिवर भावापेक्षा जास्त असते. ती विचार करते, भावाच्या आज्ञेचे पालन केले तर त्यामुळें थोडावेळ मजा करता येईल पण जर मी ह्या सुंदर पुरुषाला प्रसन्न केले तर मी आयुष्यभर सुखात राहीन. असा विचार पक्का झाल्यामुळें ती राक्षसीण जी कोणतेही रुप धारण करू शकत होती, एका सुंदर स्त्रीचे रुप धारण करते. त्या सुंदर रुपात सर्वांगावर दागिन्यानी मढलेली, ती हिडींबा राक्षसीण महाबली भिमाच्या जवळ जाण्यास सुरुवात करते. तिच्या मुखावर प्रेमळ स्मित होते व तिची चाल मंद व मोहक होती. त्याच्या जवळ गेल्यावर ती भिमाला विचारते, "अहो महाबली, आपण येथे कोठून आला अहात व आपण कोण अहात? हे दुसरे कोण आहेत येथे निजलेले ते समजेल कां? आणि ही स्वर्गीय तेज असलेली महिला कोण आहे? ते येथे असें झोपले आहेत जसें काय ते त्यांच्या घरातच झोपले आहेत. तुला कदाचित माहीत नसेल कीं, ही वनातील जागा राक्षसांची आहे. येथे एक महाभयंकर राक्षस ज्याचे नांव हिडींब आहे तो रहातो. आपल्याला पाहून मला माझ्या क्रूर भावांने तुम्हाला मारून टाकण्यासाठी पाठवले आहे. त्याला तुम्हाला खाण्याची इच्छा झाली आहे. परंतु, खरे सांगते, तुला पाहून मला तुझ्याशी लग्न करण्याची इच्छा झाली आहे व म्हणून मी तुम्हाला मारण्याच्या मनस्थितीत नाही. मला खात्री आहे किं, तुला सर्व रितीरीवाज माहीत आहेत व त्याप्रमाणे जे उचित वाटेल ते करावे. आपल्याला पाहिल्यापासून मला कांहीं सुचत नाही, कामदेवाचा बाण माझ्या हृदयात खोल घुसला आहे, मी अशा परिस्थितीत काय करावे ते सांगा. आपल्याला माझ्याशी लग्न करण्याची

इच्छा होत असेल तर मला आपण आत्ताच आपलेसे करावे. जर तू मला पत्नी म्हणून स्वीकारलेस तर मी तुमची ह्या राक्षसांपासून सुटका करीन व नंतर आपण एकाद्या उंच डोंगरावर ज्या ठिकाणी इतर कोणीही येणार नाही अशा, मजेत राहू, मी माझ्या सिद्धीने सगळे कांही जसें पाहिजे तसें उत्पन्न करीन". ते तिचे लोभसवाणे बोलणे ऐकून भिम तिला सांगतो, "राक्षस मुली, मी एकाद्या मुनीसारखा सगळी प्रपंचाची बंधने झुगारून, माझ्या झोपलेल्या भावांना व आईला सोडून तुझ्या वासना पूर्तीसाठी येथून जाऊ हे कसे शक्य आहे? माझी काय लायकी ठरेल असें वागण्याने ते पहा. तुझा भाऊ ह्यांना खाऊन टाकील त्याचे काय"? त्यावर ती राक्षसीण बोलते, "तसे असेल तर ह्यांना उठव व मी माझ्या राक्षसी सिद्धीने त्यांचे माझ्या भावापासून संरक्षण करीन". भिम तिला बोलतो, "तुझ्या माणसे खाणार्या भावाच्या भितीने मी माझ्या भावांची झोप मोडणार नाही, त्यांना त्या निद्रेची फार गरज आहे, ते पूर्णतः थकलेले आहेत, माझी आईसुद्धा थकलेली आहे. मी तुझ्या राक्षस भावाला बिलकूल भीत नाही. माझ्या बाहूंची ताकद तुला व त्याला माहीत नाही. अगं सुंदरी, तुला माहीत नसेल पण माझ्या बाहूंच्या ताकदीपुढे माणूस, यक्ष, गंधर्व, राक्षस कोणीही टिकणार नाही हे लक्षात घे. तुला हवे असेल तर माझ्याबरोबर रहा अगर निघून जा, जशी तुझी मर्जी, पण मी माझ्या आप्तांना सोडून जाणार नाही". भिमाचे ते बंधूप्रेम पाहून हिडींबा समजते किं, तिने जी ह्या माणसाची निवड केली ती अगदी योग्य आहे, त्या जाणीवेने ती अधिकच प्रसन्न होते.

अशारितीने आदिपर्वातील हिडीब वध पर्वाचा एकशे चोपन्नावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे पंचावन्नावा भाग

(हिडींब वध पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगत असतात, हिडींब राक्षसांचा राजा बराच वेळ त्याची बहिण हिडींबा परत आली नाही म्हणून त्या साल वृक्षावरून उतरून ते पांडव जेथे झोपले होते तेथे लगबगीने निघतो. लालेलाल झालेले डोळे, अंगावरील केंस ताठ उभे जसें तो भारी संतापला आहे, त्याचे दात तीक्ष्ण व लांब आणि टोकदार, हाताची नखे लांब व धारदार, तोंड मोठे उघडलेले जणूकाय आत्ताच तो खाणार असे त्याचे भयावह रूप ती त्याची बहीण त्याला येतांना पहाते व घाबरून जाते. त्या घाबरलेल्या अवस्थेत ती भिमाला विनंती करते, "तो पहा माणसे खाणारा माझा भाऊ राक्षस हिडींब चवताळून येत आहे ह्या ठिकाणी, तरी तुम्ही सगळे लांब पळून जा व मी सांगते तसें करा म्हणजे मी तुमचे संरक्षण करू शकेन. तुम्ही खूप धैर्यवान अहात हे मी जाणते तरी, तुम्ही माझ्या पाठीवर बसा म्हणजे मी तुम्हाला उंच आकाशात घेऊन उडेन जेथे माझा भाऊ तुम्हाला शोधण्यासाठी येणार नाही".

हिडींबाचे ते विनवणीचे बोलणे ऐकून मोठ्या प्रेमांने तो बलाढ्य वायूपुत्र तिला आश्वासन देतो किं, "प्रिये, मी असतांना कोणालाही माझ्या भावांच्या व आईच्या नखालाही बाधा करता येणार नाही. तू त्याबद्दल निश्चिंत असावेस".

पुढे तो बलशाली वृकोदर तिला आश्वासन देतो किं, "मी तुझ्या भावाला तुझ्यापुढे मारून टाकतो, कसें ते तू पहात रहा. माझी छाती पहा किती विशाल आहे, माझे पाय लोखंडाच्या गदे सारखे आहेत, माझे हे हात हत्तीच्या पायासारखे रुंद व ताकदवान आहेत, आता तू माझी इंद्रासारखी ताकद व शौर्य काय आहे ते पहात बस. तुझ्या भावाला मी मारल्याने तू माझा द्वेष करू नकोस".

ते ऐकून हिडींबा त्याला सांगते, "अहो माणसातील स्वर्गीय सामर्थ्य असलेल्या शूरा, मी तुझा कधीच द्वेष करणार नाही कारण मी तुला माझ्या मनाने पूर्णतया माझे मानले आहे पण मला धास्ती अशाची वाटते कीं, तू अजून माझा भाऊ माणसांना कसा चिरफाडतो ते पाहिलेले नाहीस. मला तुझी फार काळजी वाटते म्हणून बोलते, त्यात दुसरा कांहींही अर्थ तू काढू नकोस".

वैशंपायन नंतर सांगतात, तो महाभयंकर हिडींब राक्षस त्या दोघांचे ते संभाषण ऐकत ऐकतच पुढे येत असतो, भिमाच्या गर्वोक्तीमुळें त्याच्या अंगाचा नुसता तिळपापड होत असतो, कधी एकदाचा ह्या गर्विष्ठ माणसाला चिरफाड करून मारतो असें त्याला झालेले होते. तो भयंकर राक्षस त्याच्या बहिणाला तेथे माणसाच्या सुंदर स्त्रीरुपात अर्धपारदर्शक कपड्यात व दागदागिन्याने मढलेली पाहून, त्याला त्याच्या बहिणाच्या इराद्याबद्दल संशय उत्पन्न होतो. हिडींब आपल्या बहिणीवर चिडतो. तिला ओरडून सांगतो, "हा काय अविचार तू करीत आहेस, त्या क्षुल्लक माणसाशी संभोग घेण्याचा तुला कसा मोह होत आहे"? "त्या तुझ्या वागण्याने मला किती राग आला आहे ते तू समजत नाहीस कां"? तू माझ्या रागाला आता भीत नाहीशी कशी झालीस? तुझा धिक्कार करतो मी. त्या माणसाशी लैंगिक संभोगासाठी तू तुझ्या सख्ख्या भावाशी विश्वासघात करत आहेस, मी तुलासुद्धा अशांने शिक्षा करीन. राक्षसांच्या इज्जतीशी तू खेळत आहेस त्यासाठी तुला मी शिक्षा करणारच. तुझ्या पूर्वजांचा तरी तू हे करण्याआधी विचार करावयाला पाहिजे होतास. मी आताच त्या माणसाबरोबर तुलासुद्धा मारून टाकतो". असें बोलून तो रागावलेला बलिष्ठ राक्षस आपले दात ओठ अक्राळ विक्राळ विस्फारून आपल्या बहिणावरच धावून गेला. हिडींबाला त्याच्या बहिणावर चाल करून जातांना पाहून तो बलाढ्य राक्षसापेक्षा जास्त शक्तिमान असा वृकोदर त्याला निर्वाणीचे "थांब", असें बोलतो.
वैशंपायन पुढे सांगतात, भिम पहातो किं, तो राक्षस त्याच्या बहिणावर चाल करून जात आहे, ते पाहून भिम तुच्छतेने हसत त्या राक्षसाला उद्देशून बोलतो, "अरे हिडींबा, तू माझ्या शांतपणे निजलेल्या परिवाराची झोप खराब करत आहेस, त्या मुलीकडे कां जातोस, माझ्याकडे ये आणि मग तिच्याकडे जा. एका असहाय बाईवर चालून जातांना तुला लाज वाटत नाही? विशेष करून जेव्हां तिने कोठलेही पाप केले नसतांना, हे तुला शोभत नाही. तिला माझ्याशी भोग घेण्याची इच्छा झाली ह्यात तिचा काय दोष? ते तिचे वागणे स्वाभाविक होते, व स्वाभाविक वागणे पाप समजले जात नाही हे तुला माहित नाही कां? संभोगाची इच्छा हा स्त्रीचा हक्क असतो व त्याची इच्छा केली तर ते आक्षेपार्ह कसे झाले? एक लक्षात घे ती येथे आली ते तुझ्या सांगण्यामुळें, मला पाहून तिला माझी इच्छा झाली त्यात तुला कांहीं धोका नसतांना तुझे हे वागणे नीचपणाचे ठरते. काम देवतेचा

(कामदेव इंद्राचे एक रुप समजले जाते) तू त्यामुळें अपमान केला आहेस. म्हणून तू तुझ्या बहिणाला सोडून दे व माझ्याकडे ये, चल पाहूया तुझ्यात किती दम आहे ते, मी तुला यमाच्या घरी ताबडतोब धाडीन. एक लक्षात घे, माझ्या समोर तू एकाद्या महिलेला ठार मारण्याचा साधा विचार सुद्धा करू नकोस. माझ्याकडे ये, म्हणजे मी तुझ्या डोक्याचे तुकडे एकाद्या हत्तीप्रमाणे करून टाकीन. त्यानंतर ती वनातील श्वापदं तुझ्या अवयवांचे आणखीन तुकडे करून खाऊन टाकतील. त्यामुळें हे अरण्य तुझ्या त्रासातून कायमचे मुक्त होईल. ह्या जंगलात तू अनेक माणसांना खाल्ले असेल ते त्यानंतर भयमुक्त होईल. तुझी बहिण तुला एकाद्या डोंगरा सारखा, एकाद्या प्रचंड हत्तीसारखा, एकाद्या मोठ्या काळ्या ढगासारखा समजते. पण आता ती पहाणार आहे कीं, तो एका सिंहाच्या हातून फाडला जाणार आहे. त्यानंतर ह्या वनातून कोणीही निर्भिडपणे प्रवास करू शकतील".
अशी भिमाची गर्वोक्ती ऐकून हिडींब ओरडून बोलतो, "काय ही गर्वोक्ती! तुझी मस्ती फार झाली, प्रथम तू जे बोलतोस तसें करून दाखव मग बोल. आता जास्त वेळ न घालवता तुझे सामर्थ्य व धाडस सिद्ध करून दाखव. प्रत्यक्ष द्वंद्व झाले म्हणजे खरे काय ते माझ्या बहिणीला समजेल. मी प्रथम तुला फाडून खाईन तोपर्यंत त्यानां आरामात झोपू दे, व मगच तुझ्या भावंडांना व त्या म्हातारीला खाऊन टाकीन. आता फालतु बडबड करण्यात समय व्यर्थ न घालवता माझ्याकडे येऊन दाखव. तूला ठार मारल्यावर अर्थातच मी माझ्या बहिणालासुद्धा ठार मारणार आहे कारण, तिने माझा विश्वासघात केला आहे".
वैशंपायन पुढे बोलतात, असें बोलल्यानंतर तो पहाडासारखा राक्षस मोठ्या मोठ्याने ओरडत, त्याचे हात पसरून भिमाच्या अंगावर धाव घेतो. भिमाच्या जवळ तो येतो तसें भिम त्याला उचलतो व चांगले तीस हात लांब फेकून देतो. हिडींब उठण्याचा प्रयत्न करत असतांना तेवढ्यात भिम वेगांने धावत जाऊन त्याला पुन्हा उचलतो व आणखीन दूर फेकून देतो व हिडींबेकडे पहात बोलतो, ह्या तुझ्या भावाच्या ओरडण्यामुळें माझ्या आई व भावंडांची झोप मोडेल म्हणून तुझ्या भावाला मी आणखीन दूर फेकत आहे म्हणजे त्याच्या किंचाळण्याने ते उठणार नाहीत. एवढ्याने त्या उन्मत्त राक्षसाला भिमाच्या शक्तिचा अंदाज आला. त्यामुळें त्याचा अहंकार जास्त दुखवला जातो व तो आणखीन संतापाने उठतो व जवळ आलेल्या भिमाला घट्ट पकडून जोरांने ओरडतो. भिम त्याच्या जवळ जातो व त्या

राक्षसाला आणखीन दूर फेकून देतो. आता त्यांची कुस्ती पांडव झोपले होते त्या जागेपासून बरीच दूर जाते म्हणजे त्याची झोप मोडणार नाही अशी दक्षता भिम घेत असतो. बर्यापैकीं लांब गेल्यावर भिम त्याच्याशी कुस्ती करण्यास सुरुवात करतो. त्यांच्या त्या कुस्तीमुळें त्या भागातील झाडे कोलमडून पडतात. त्या प्रचंड आवाजामुळें झोपलेले पांडव व त्याची माता कुंती ह्याची झोप अखेरीस मोडतेच . ते उठून पहात रहातात हे काय होत आहे!

अशारितीने आदि पर्वातील हिडींब वध पर्वाचा एकशे पंचावन्नावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे छप्पनावा

(हिडींब वध पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगत असतात, त्या गदारोळामुळें चारही पांडव व त्यांची माता जागे होतात. भिम व हिडींब ह्यांचे द्वंद्व आता त्या जागेपासून फार दूर होत होते परंतु, त्यांच्या मारामारीच्यामुळें जी वृक्ष तोड होत होती व त्या बरोबर हिडींबाचे अक्राळ विक्राळ ओरडणे, ह्यांच्या आवाजामुळें ते जागे झालेले असतात. एक एक जण उठून बसतात व आजूबाजूला पहातात तेव्हां त्यांना एक अप्रतिम लावण्यवती स्त्री त्यांच्या पासून जवळच एका मेलेल्या झाडाच्या ओंडक्यावर बसलेली ते पहातात. तिला पाहून ते सगळे अचंबित होतात, ही अप्सरा कोण असा प्रश्न कुंतीला पडतो . कुंती तिला विचारते , "अग, तू कोण स्वर्गातून आल्यासारखी वाटतेस? तू येथे केव्हा आलीस, तू कोणाची मुलगी, येथे अशा निर्जन अरण्यात काय करत्येस"?

"तू ह्या जंगलाची देवता आहेस कां"? "तसे असेल तर मला तुझ्याबद्दल सगळे सांग". असें प्रश्न कुंती त्या सुंदर मुलीला विचारून तिला अगदी भंडावून सोडते .

हे सगळे प्रश्न ऐकल्यावर हिडींबा तिला सांगते, "हे जे विस्तीर्ण हिरव्यागार झाडीने भरलेले अरण्य तुम्हाला दिसते ते एका हिडींब नांवाच्या राक्षसांचे निवासस्थान आहे. मी त्याची बहिण आहे व माझे नांवसुद्धा हिडींबा आहे. मला माझ्या भावांने तुम्हाला ठार मारण्यासाठी पाठवले होते. त्या त्याच्या निर्दयी आदेशाचे पालन करण्यासाठी मी येथे आले होते. परंतु, येथे आल्यावर मी तुमचा सोनेरी अंगकांती असलेला बलाढ्य मुलगा पाहिला व कामदेवांने माझ्यावर कृपा करण्यास सुरुवात केली व मी त्या तुमच्या शक्तिशाली मुलाच्या प्रेमात पडले. त्याला मी मनापासून माझा पति म्हणून स्वीकारले आहे. त्याला मी माझ्या भावना सांगण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु, ते माझे प्रेम स्वीकारण्यास त्यांने नकार दिला. त्या आमच्या संभाषणात बराच वेळ गेल्यामुळें माझा नरभक्षक भाऊ चिडून येथे आला. तसें माझ्या नवर्यांने म्हणजे तुमच्या बलवान मुलांने माझ्या भावाला विरोध केला. आता ते दोघे आपल्या ताकदीचा प्रत्यय एकमेकांना देत आहेत. त्यांच्या धमासान द्वंद्वामुळें जी झाडांची तोडमोड होत आहे त्याच्या आवाजाने व माझ्या भावाच्या ओरडण्यामुळें तुम्ही सगळे जागे झाला अहात".

वैशंपायन सांगत रहातात, हिडींबाचे ते स्पष्टीकरण ऐकल्यावर युधिष्ठीर उठतो व त्याच्या तीन भावांना घेऊन जेथे ते लढत होते त्या ठिकाणी जातो. भिम व हिडींब जणू तुल्यबळ असें एकमेकांना ढकलत दाबत प्रसंगी गुद्दे मारत, उचलून आपटत असें लढत आहेत हे, ते सगळे भाऊ पहातात. त्या द्वंद्वाच्या जोरदार हालचालीमुळें जमिनीची माती उंच आकाशात उडत होती व त्यामुळें वातावरणात धूळ पसरलेली होती. जंगलाला आग लागली असावी असे वातावरण झाले होते. त्या धुळीने माखलेले ते दोघे दोन डोंगर एकमेकाला भिडले आहेत असें दिसत होते. अर्जूनाला वाटले कीं, कदाचित भिम त्या राक्षसाशी लढतां लढता थोडा थकला असेल म्हणून तो भिमाला बोलतो, "अरे भिमा, आम्ही झोपलो होतो पण आता आम्ही चांगलेच तरतरीत झालो आहोत व जर तुला थकवा वाटत असेल तर मी तुला मदत करण्यासाठी येण्यास तयार आहे, तेथे नकूल व सहदेव आईची काळजी घेण्यात समर्थ आहेत". हे धनंजयाचे बोलणे ऐकून तो बलशाली भिम त्याला उत्तर देतो, "माझी काळजी अजिबात करू नकोस, फक्त ही मारामारी मजेत एकाद्या प्रेक्षका प्रमाणे पहात बस. हा दांडगट राक्षस अजून माझ्या तावडीत येत नाही पण जसा तो थकेल तसा तो माझ्या पकडीत येईल व मग बघत बस काय होते ते. मी बिलकूल थकलेलो नाही म्हणून तुमच्या मदतीची मला आवश्यकता वाटत नाही".

ते आत्मविश्वासी बोलणे ऐकल्यावर अर्जुन त्याला सांगतो, "अरें ह्या राक्षसाला जास्त वेळ जीवंत ठेवू नकोस. आपल्याला आणखीन दूर जावयाचे आहे व आता पहाट होत आहे, राक्षस दिवसा जास्त बलवान होतात तेव्हां आताच त्याला मारून टाक. त्याच्याशी खेळण्यात समय घालवू नकोस. संधी प्रकाशात हे राक्षस अदृष्य होतात तेव्हां त्या आधी तू त्याला एकदाचा मारून टाक. त्याला त्याची सिद्धी वापरण्याची संधी देऊ नकोस".

वैशंपायन सांगतात, अर्जूनाचे ते बोलणे ऐकल्यावर भिमाला त्याची चूक लक्षात येते व तो प्रचंड रांगाने त्या आपल्या पित्याचे, वायूचे स्मरण करतो. विश्वाच्या अंती वहाणार्या तुफान वार्याचे रुप तो आठवतो, आणि त्याच क्षणी भिम हिडींबाला उंच आकाशात भिरकावून देतो. त्या आकाशात गरगर फिरत तरंगणार्या राक्षसास भिम बोलतो, "अरे राक्षसा, माणसाचा मांसाहार केल्यामुळें तुझे दिवस आज संपले आहेत. ह्यापुढे ह्या जंगलात कोणीही निर्भीडपणे प्रवास करू शकेल. ह्यापुढे तू माणसाचे मांस खाणार नाहीस".

ते भिमाचे बोलणे ऐकल्यावर अर्जुन भिमाला बोलतो, "जर तुला थकवा आला असेल तर मला आज्ञा कर मी त्याची उरली सुरली जान खतम करतो. नाहीतर तूंच ते करून टाक कारण, आपल्याला पुढे जायला उशीर होत आहे".

वैशंपायन सांगतात, अर्जूनाचे ते बोलणे ऐकल्यावर वेळाचे भान भिमाला होते व तो त्या राक्षसाला जोरांने जमिनीवर आदळतो. "ह्याचा मीच नाश करणार, दुसर्या कोणाचीही त्यासाठी गरज नाही". असें भिम रागांच्या भरात बोलतो. हिडींबाला तो उचलतो व उलटा धनुष्यासारखा वाकडा करतो त्यामुळें त्याचा मणका मध्येंच तुटतो. त्यामुळें राक्षसाचा अखेरीस मृत्यू होतो. हिडीब मेल्याचे त्याला समजते व त्याचा त्याला अत्यानंद होतो. सर्व पांडव भिमाचे कौतुक करतात. युधिष्ठीर सांगतो, "आता आपल्याला पुढे जावयाचे आहे तरी जर भिमाला थोडी विश्रांति घ्यावयाची असेल तर आपण थोडावेळ थांबू". अर्जुन बोलतो, "हिडींबा, राक्षसाची बहिण सांगते आहे किं, येथून जवळच एक छोटे नगर आहे. तेथे दुर्योधन आपल्याला शोधू शकणार नाही, तरी आपण त्या नगराकडे निघावे".

अशारितीने ते महारथी आपल्या आई बरोबर त्या नगराकडे कुच करतात, आता त्यांच्या बरोबर राक्षस कन्या हिडींबा चालू लागते.

अशारितीने आदिपर्वातील हिडींब वध पर्वाचा एकशे छप्पनावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सत्तावन्नावा

(हिडींब वध पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, ते सगळे पुढे प्रवास करत असतांना भिम पहातो किं, ती राक्षसीण त्यांच्या बरोबर मागून चालत आहे. ते पाहून भिम त्याच्या रागीट स्वभावानुसार तिला बोलतो, "ए राक्षसीणी, तू सुद्धा तुझ्या भावाकडे जा, मायावी रुप घेऊन तू आमच्या मागें येऊ नकोस".

ते भिमाचे रागावून बोलणे ऐकल्यावर त्याचा ज्येष्ठ भाऊ, युधिष्ठीर त्याची कानउघडणी करतो किं, "अरें श्रेष्ठ मल्लयोद्ध्या एका अबलेशी असें बोलणे तुझ्यासारख्या शूराला शोभत नाही". पुढे तो बोलतो, "चांगल्या सवयी केवळ जीव वाचवण्याहून जास्त श्रेष्ठ समजल्या जातात. ज्यांने तुला मारण्याचा प्रयत्न केला त्याला तू यमाकडे पाठवले आहेस आता ह्या मुलीवर कां राग काढतोस, ती तर तुझ्या प्रेमात अडकली आहे म्हणून आपल्या बरोबर चालत आहे, तिच्यावर राग काढू नकोस". त्याशिवाय नकूल भिमाला त्याच्या जवळ जाऊन हळू आवाजात सांगतो, "ज्येष्ठ बंधू ही सुंदरी आपल्याला नजिकच्या नगरीचा रस्ता दाखवणार आहे, तरी तिच्याशी कटु बोलू नकोस". अशारितीने भिमाला कानपिचक्या त्याच्याच भावंडांकडून मिळाल्यानंतर तो हत्तीसारखा प्रचंड बलशाली वायूपुत्र शांत होतो व हिडींबाकडे वेगळ्या नजरेने पाहू लागतो, ती ललना मात्र मान खाली घालून शांतपणे सहदेवाच्या, तिच्या धाकट्या दीराच्या बाजूने चालत असते.

वैशंपायन पुढे सांगतात, रुपगर्विता अशी ती राक्षसीण, हिडींबा, हात जोडून कुंतीला व युधिष्ठीराला उद्देशून बोलते, "आपण माझ्या मातेसमान अहात, आपल्याला कल्पना असेल कामदेवाने पछाडलेली स्त्री किती असहाय्य होते. माझ्या ह्या अवस्थेला आपला पुत्र जबाबदार आहे. जोपर्यंत तुमचा मुलगा मला स्वीकारत नाही, तोपर्यंत माझे असेंच हाल होत रहाणार त्यासाठी आपण कृपया आपल्या मुलांला माझी इच्छा पूर्ण करावयास सांगा. मी माझा वंश व माझी मंडळी तुमच्या मुलासाठी कायमची सोडली आहेत, जर त्याने मला स्वीकारले नाही तर मला मरण्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही. आपण माझ्या ह्या परिस्थितीचा विचार करून माझ्यावर कृपा करावी. मला तुम्ही तुमची दासी केले तरी चालेल परंतु, मला आपण पाहिजे तर मूर्ख समजा, वेडी समजा पण आता अशा असहाय

स्थितीत सोडून जाऊ नका. मी तुम्हाला आश्वासन देते किं, आमचे लग्न झाल्यानंतर तुमचा मुलगा परत तुमच्याकडेच येईल. जेव्हा त्याची तुम्हाला आठवण येईल तेव्हा तो तुमच्या कडे हजर होईल एवढेच नाही तर मीसुद्धा तुम्हाला भेटण्यास येईन. मी नेहमीच तुमच्या आज्ञेत राहीन. माझ्या मायावी सामर्थ्याने मी तुम्हाला पाहिजे ती मदत करीन कारण मी तुमच्या परिवारातीलच आहे असें समजते. माझ्या राक्षसी सिद्धीच्या जोरावर मी तुम्हा सर्वांना माझ्या पाठीवर घेऊन कोठेही नेऊ शकते, त्याचा तुम्हाला ह्या अज्ञातवासाच्या काळात मोठा उपयोग होऊ शकतो त्याचा विचार करा. मी जाणते किं, दुरावस्थेत जो आपले उत्तम गुण सोडत नाही तो खरा उत्तमगुणी समजला जातो. परंतु, आपले वैध कर्तव्य करतांना कोणत्या प्रकारे ते केले हे महत्वाचे नसते, ते पूर्ण कसे होईल ते पहावयाचे असते. माणसाच्या गुणवत्तेची खरी परीक्षा अशा दुरावस्थेतच होत असते". तिचे हे विनवणीचे कळकळीचे बोलणे ऐकून दयाघन असा मोठा भाऊ युधिष्ठीर तिला बोलतो, "तुझ्या बोलण्यात यथार्थ दिसतो म्हणून मी तुला माझ्या भावाला एकदा मिलनाची परवानगी देतो. त्या आधी आम्ही जेथे निवास करू तेथे तो त्याचे दैनंदीन विधी करील त्या केल्या नंतर तो संपूर्ण एक दिवस तुझ्या संगतीत घालविल त्यानंतर जसा दिवस मावळेल, आमचा भाऊ परत आमच्याकडे आला पाहिजे. त्या दिवसात तू तुला जे कांहीं त्याच्या बरोबर आनंद भोग घ्यावयाचे ते घे व त्यानंतर तू आमची होशिल व तुझ्या वचनाप्रमाणें तू आम्हाला मदत करशील".

वैशंपायन ऋषी पुढे बोलतात, भिम त्यावर मान्य करतो जे त्याच्या ज्येष्ठ भावांने राक्षसीणीला सांगितले व नंतर तो त्या राक्षसीणाला वचन देतो किं, "मला माझ्या मोठ्या भावाची आज्ञा मान्य आहे व त्यात मी एकच फरक असां करतो किं, जोवर तुला माझ्यापासून पुत्र होत नाही तोवर मी तुला पुनः पुन्हा भेटत राहीन. पण जास्त काळ मी माझ्या भावंडांबरोबरच राहीन". ते ऐकल्यावर हिडींबा अतिशय आनंदी होते व म्हणते, "जे माझा पति सांगेल ते मला नेहमी शिरसावंद्य असेल". असें बोलून ती राक्षसीण आपल्या पतिला, भिमाला स्वताच्या पाठीवर घेऊन उंच आकाशात उडून जाते.

त्या पांडवाला पाठीवर घेऊन ती आकाशातून जातांना भिमाला मनोवेधक असे दृष्ये दिसतात. जी दृष्ये देवांनाच फक्त दिसतात, ती तो पहातो. सुंदर ठिपके असलेले विविध

प्रकारचे पक्षी मनोरम्य सुश्राव्य मधूर धून गांत उंचावरून उडतांना तो पहात होता. स्वतः हिडींबा अप्रतिम रत्नजडीत वस्त्र परिधान करून त्याच्या बाजूला बसलेली होती. तिच्या देहाला मोहक सुगंध येत होता, ज्याच्यामुळें भिमाच्या वासना उद्दीपित होत होत्या. कामदेवांने त्यांचे नेहमीचे कार्य जणूकाय सुरु केले होते. भिमाला संतोष होईल असें सर्व ती राक्षसीण करीत होती. ज्या प्रदेशात माणूस पायी चालत जाऊ शकत नाही अशा वन, सरोवर असलेल्या व माणसाला माहित नसलेल्या स्थळांना ती त्याला घेऊन जात होती. नयनरम्य जंगले, जेथे वृक्ष फळाफुलांनी बहरलेली आहेत ती भिम पहातो. ती त्याला हिमालयातील दर्या, डोह, झरे, डोंगारवरील धबधबे, विस्तीर्ण सरोवरात उमलणारी पंकज, त्यांच्या उमलणार्या पाकळ्या आणि हिमाच्छादीत डोंगर दाखवते. अशा प्रकारे ती राक्षसीण तिच्या जीवसख्याला आनंद देण्याचा प्रयत्न करीत होती. तेथून ती त्याला विस्तीर्ण अथांग पसरलेल्या समुद्राकडे नेते. तेथील मोत्यानी भरलेली बेटे, त्याचे अथांग पसरलेले सोन्यासारखे चमकणारे किनारे तो पहातो. तेथे वसलेली नगरे उंचावरून तो पहातो. देवांना पवित्र असणारी वनं तो पहातो. तपस्वी व गुह्यक जेथे वस्ती करतात अशा अज्ञात असणार्या मानस सरोवराकडील जागा तो पहातो. जेथे वर्षभर झाडे फळे व फुलांनी डवरलेली असतात. पुनःपुन्हा ती कामविव्हल राक्षसीण तिच्या प्रेमाला संतोष देण्यासाठी हरएक प्रयत्न करीत असते व ते सगळे भिमाला जाणवत होते व त्याचे परिणामस्वरुप सावकाशपणे तोसुद्धा तिच्याशी अनुरूप होत होता. त्याचा परिणाम ती राक्षसीण गरोदर होते व तिला एक महाशक्तिमान राक्षस व माणूस ह्यांचा संयोगी असा पुत्र होतो. त्याचा वर्ण राक्षसांसारखा तांबट, चेहरा माणसाचा असला तरी त्यातील अवयव राक्षसी स्वरुपाचे दर्शन करीत होते. ओठ दाट ताम्रवर्णी, केस दाट व काटेरी, डोळे लाल, टोकदार व मोठे दांत, हात व पाय रुंद व मोठे, कान लांब व शेवटाला टोकदार, अंगभर केंस असा तो दिसण्यास भयावह मुलगा ती प्रसवते मात्र त्याच्या माथ्यावर केस नसतात. तो भिमपुत्र पुढे एक नामचंद तिरंदाज होतो. त्याच्या हावभावात व इतर गोष्टीत तो बहुधा राक्षसच वाटत होता. त्याच्याकडे राक्षसांच्या सिद्धी ज्या त्यांना जन्मतः प्राप्त होतात त्या मिळाल्या होत्या. तो एक लहान मुलगा असूनही त्याची हिम्मत अशी होती किं, तो कोणाही पिशाच्चास, राक्षसास, तसेंच इतर शक्तींना सहसा आवरता येण्यासारखा नव्हता.

वैशंपायन जनमेजयाला सांगतात, अहो राजर्षी, तो जरी जन्मतः एक लहान मुलगा होता, जन्मल्यावर लवकरच तो कांहीं अवधित पूर्ण वाढलेल्या माणसा सारखा मोठा होतो. जसें राक्षसांच्या अपत्यांचे होते. मोठा झालेला तो त्यांचा पुत्र प्रथम त्याच्या आईला लवून नमन करतो व नंतर त्याच्या पित्यास नमन करतो. त्यानंतर त्याचे नांव ठरवण्याचा विधी होतो. कारण त्याच्या माथ्यावर केस नव्हते त्या टक्कलाचा उल्लेख त्याच्या नांवांत असावा म्हणून त्याच्या माथ्याचा उल्लेख "घट" (मडके), वरून त्याचे दोनही पितर त्याला घटोत्कच (माठा सारखा माथा असलेला) अशा, नावांने हांक मारतात.

घटोत्कच पांडवांचा अतिप्रिय पुतण्या होतो, जसें काय तो त्यांच्यापैकींच एक आहे. हिडींबाचा भिमाबरोबर रहाण्याचा काळ संपला होता व ती तिला पाहिजे तेथे जाण्यास मोकळी होते. हिडींबा पांडवांना सांगते कीं, ती त्यांच्या कृपेला कधीही विसरणार नाही, ज्या प्रकारे पांडवांनी, विशेषकरून ज्येष्ठ पांडव युधिष्ठीर तिला अनुमोदन करतात ते, ती नेहमी ध्यानात ठेवील. घटोत्कच राक्षसाच्या मधील श्रेष्ठ, त्याच्या पित्यास आश्वासन देतो, जेव्हां पांडवांना त्याची गरज होईल तो तेव्हां त्यांच्या बरोबर असेल. एवढे बोलून तो राक्षस उत्तरेकडे निघून जातो. हे कोणालाही माहीत नव्हते किं, इंद्राने त्याचा अंश देऊनच घटोत्कचाला उत्पन्न केले होते, ते अर्जूनाला कर्णाशी लढण्यात मदत व्हावी म्हणून. किती खोल ती योजना होती ते, तू हे राजा, तेव्हां समजशील, जसें आपण हे महाभारत आणखीन पाहू. इंद्राने जो बाण कर्णाला त्याच्या कवचाच्या बदल्यात दिलेला असतो तो बाद व्हावा व अर्जुन सुरक्षित व्हावा ह्यासाठी घटोत्कच इंद्राने निर्माण केला होता असें सांगितले जाते. तो बाण माणसांवर सोडता येत नाही म्हणून राक्षसाची नेमणूक इंद्राने हिडींबाच्या मुलाच्या रुपात केली असेंसुद्धा समजले जाते.

अशारितीने आदिपर्वातील हिडींब वध पर्वाचा एकशे सत्तावन्नावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे अठ्ठावन्नावा

(हिडींब वध पर्व संपले)

वैशंपायन सांगतात, ते शूरवीर महारथी पुढे त्यांचा अज्ञातवासातील प्रवास चालू करतात. एका जंगलातून दुसर्या जंगलात असा त्यांचा प्रवास चालू होता. वाटेत ते विविध खाद्य प्राण्यांची जसें, हरीण, सांबर शिकार करीत आपला उदरनिर्वाह करीत होते. अशारितीने ते एका देशातून दुसर्या देशांत जात होते. त्या भटकण्याच्या काळात ते अनेक देश जसें, मत्स्य, त्रिगर्त, पांचाल व किचक ह्यांना त्यांनी भेट दिल्या. त्या प्रदेशातील अनेक नयनरम्य वने व तलाव त्यांनी पाहिले. त्यांचे केस भरपूर वाढल्यामुळें व ते कापण्याची व्यवस्था नसल्याने त्या केसांच्या बटा झाल्या होत्या. तसेंच दाढ्या व मिशासुद्धा वाढलेल्या होत्या. अशा परिस्थितीत त्यांने ओळखणे किं, ते पांडव, कुरु घराण्याचे राजपुत्र आहेत, सहज नव्हते. त्यांच्या अंगावर वल्कले व प्राण्यांच्या कातडीची वस्त्रे होती. आपल्या मातेबरोबर ते जातांना असें वाटत होते किं, ते कोणी संन्यासी बैरागी आहेत. प्रसंगी ते आपल्या प्रवासाचा वेग वाढवत, तेव्हां कुंतीला पाठीवर घेऊन ते प्रवास करीत असत . कधी लपत छुपत सावकाशपणे तर कधी न लपता वेगांने असा त्यांचा प्रवास होत होता. प्रवासात ते आपल्या विविध विद्यांचा पुनः स्मरण करून अभ्यास करीत असत. त्यात वेद, वेदांगे, शस्त्रविद्या, मंत्रविद्या, नितीशास्त्रं, त्या कामात त्यांना त्यांचे जन्मदाते, व्यास अधून मधून भेटून मदत करीत होते. जेव्हा कृष्ण द्वैपायन त्यांना भेटत तेव्हां कुंती सह ते उभे राहून त्यांचे पाय पुजन करून त्यांना अभिवादन करत असत. अशावेळी व्यास महर्षी त्यांना बोलत, "मला माहीत आहे पहिल्या पासून किं, तुमचे हे अज्ञातवासात पळत रहाणे धृतराष्ट्राच्या मुलांमुळें होणार आहे. म्हणून मी तुम्हाला कांहीं मदत करण्याच्या उद्देशाने तुमच्याकडे येत असतो. तुम्हाला हे जे असें भोगावे लागते त्याबद्दल दुःख करू नका. हे होत आहे त्याची गोड फळे तुम्हाला भविष्यात चाखावयास मिळणार आहेत. खरं पहाता, तुम्ही व तुमचे प्रतिस्पर्धी कौरव माझ्यासाठी समसमान आहेत परंतु, जसें समजतात कीं, ज्याच्या पदरी जास्त दुःख असते त्याच्याबद्दल जास्त माया वाटते, त्याप्रमाणे माझे होत आहे. आता ऐका, येथून जवळच एक रमणीय नगर आहे, तेथे तुम्हाला कसलाच धोका नाही. तेथे माझ्या परत येण्यापर्यंत तुम्ही रहावे".

वैशंपायन पुढे सांगतात, असें सांगून तो सत्यवतीचा पुत्र जवळील एकचक्र नांवाच्या गांवात त्यांना वस्ती करण्यास सांगतो. तेथे त्यांना कोणीही ओळखण्याची शक्यता नसते. जातांना व्यास कुंतीला आश्वासन देतात किं , "हा तुझा मोठा मुलगा, जो सत्य व न्यायाची पुतळी आहे तो, ह्या पृथ्वीवर राज्य करणार आहे त्याशिवाय, हा तुझा भिम व अर्जुन त्यांच्या धाडसी कारभाराने व शौर्यांने समुद्रापर्यंतचा सर्व भूभाग पादाक्रांत करणार आहेत व हे माद्रीचे जुळेबंधू त्यांच्या महारथी कारवायांनी नवे विक्रम प्रस्थापित करणार आहेत. हे माझे वचन तुला मी देतो, तू निश्चिंत रहा. ही तुझी मुलं अनेक यज्ञ करणार आहेत जसें राजसूय, अश्वमेध. हे तुझे मुलगे ब्रह्मापर्यंत मजल मारतील, त्यांच्या पूर्वजांची राजसत्ता पुनः प्रस्थापित करतील. अनेक गुणी मित्रपरिवार सांभाळतील व जगात आनंद वाढवतील".

वैशंपायन पुढे सांगतात, व्यासमुनी पांडवांना त्या एकचक्र गावांत गेल्यावर एका ब्राह्मणाच्या घरी नेतात व तेथे त्यांची ओळख संन्यासी म्हणून करून देतात. व्यास युधिष्ठीराला सांगतात, "येथे माझी वाट पहात रहा. येथे रहाण्याचा सराव करा, म्हणजे तुम्ही मजेत राहू शकाल". वैशंपायन पुढे सांगतात, अरे राजा जनमेजया, पांडव कृष्ण द्वैपायनांचा हात जोडून निरोप घेतात. त्यानंतर तो महान ऋषी आल्या ठिकाणी निघून जातो.

अशारितीने आदि पर्वातील हिडींब वध पर्वाचा एकशे अठ्ठावन्नावा भाग संपला.

## - महाभारत आदिपर्व खंड तिसरा संपला –

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून  देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद